# सहजानंद

२०२०-२१

## सुवर्णमहोत्सवी विशेषांक

# शिक्षणाच्या नव्या दिशा






रयत शिक्षण संस्थेचे,

**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,**
**श्रीरामपूर, जि.अहमदनगर**

सहजानंद २०२० - २१ । सुवर्णमहोत्सवी विशेषांक । शिक्षणाच्या नव्या दिशा । प्रकाशक : प्रि. डॉ.मुकुंद पोंधे । संपादक : डॉ.भगवत शिंदे

# प्रेरणादायी स्मृती...



स्वामी सहजानंद भारती, भारताचे संरक्षणमंत्री मा. यशवंतराव चव्हाण व इतर मान्यवर



पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार व इतर मान्यवर



२००४: नॅक पिअर टीम सोबत चेअरमन प्रा. डॉ. एन. डी. पाटील व प्राचार्या एन. एस. मणेर




२०१३:नॅक पुनर्मुल्यांकन कमिटीसोबत प्रिं. डॉ. एम. एल. जाधव व प्रा. डॉ. आर. के. नान्नर



महाराष्ट्र शासन कम्पोझिट बी. एड. अभ्यासक्रम समिती सदस्यपदी प्रिं. डॉ. एम. एस. पोंधे यांची अभिनंदनीय निवड



कुलगुरु मा. नितीन करमळकर यांच्या हस्ते 'सहजानंद' नियतकालिकासाठीचे सलग तिसऱ्या वर्षी पारितोषिक स्विकारताना संपादक प्रा. डॉ. भागवत शिंदे

# सहजानंद

२०२०-२१

**सुवर्णमहोत्सवी विशेषांक**
**शिक्षणाच्या नव्या दिशा**



## संपादन समिती

- **अध्यक्ष :**
  प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे

- **संपादक :**
  डॉ. भागवत शिंदे

- **सदस्य :**
  प्रा.डॉ.आर.के.नान्नर
  डॉ.ए.के.करवर
  डॉ.एस.बी.इंगवले
  श्री.व्ही.एस.पाटोळे
  श्री.सी.एम.भोये
  श्री.एन.एच.मेंगाळ

- **विद्यार्थी संपादक :**
  अतुल गायकवाड, सोनाली बर्डे

- **मुद्रक :**
  श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, श्रीरामपूर

- **छाया चित्रण सहकार्य :**
  श्री.एन.एच.मेंगाळ
  डॉ.ए.के.करवर

- **मुखपृष्ठ निर्मिती :**
  चित्रकार राहुल पगारे
  कला शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल,दापूर

- **जाहिरात विभाग :**
  श्री.व्ही.एस.पाटोळे
  डॉ. भागवत शिंदे

- **वितरण व्यवस्था :**
  श्री.एन.एच.मेंगाळ (ग्रंथपाल)


रयत शिक्षण संस्थेचे,
**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर**
**जि.अहमदनगर-४१३ ७०९**
आय.डी.नं. : पी.यू./ ए.एन./ ई. डी. एन. / ०१३ (१९७०)
एन. सी. टी. ई. कोड नं. : १ १ ३ ० ९ ८
**Website: www.ssbcollege.com**
**e-mail: ssbcollege@yahoo.com**

रयत शिक्षण संस्थेचे,

## स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

**महाविद्यालय विकास समिती**

**चेअरमन**

श्रीमती मीनाताई माणिकराव जगधने

सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल,रयत शिक्षण संस्था,सातारा

**सभासद**

मा. सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा

मा. प्रकाश निकम पाटील साहेब

मा. बापुसाहेब बाळाजी पटारे

मा. प्रा.डॉ. रामदास नान्नर

मा. डॉ.अनिल करवर

मा. विजय पाटोळे

मा. नारायण मेंगाळ

मा. चंद्रकांत भोये

मा. एन.बी.चव्हाण

मा. शंकर अनारसे

मा. सौ.मंजिरी सोमाणी

मा. अध्यक्ष, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

मा. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

**सेक्रेटरी, मा. प्राचार्य**

स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक अॅक्ट ;
नियम ०८ फॉर्म ०४ प्रमाणपत्र निवेदन

**प्रकाशनस्थळ** : स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर – ४१३ ७०९
(०२४२२) २२२४८७

**प्रकाशकाचे नाव** : प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : प्राचार्य निवास
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर – ४१३ ७०९

**संपादकाचे नांव** : डॉ.भागवत शिंदे
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर – ४१३ ७०९
भ्रमणध्वनी : ९७६५१९६५५७

**मुद्रकाचे नाव** : अभय पवार
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स
वत्सला कॉम्पलेक्स एस.टी. स्टॅण्ड जवळ, श्रीरामपूर, जि. अ.नगर
भ्रमणध्वनी : ९८२२२४१६११

मी, प्राचार्य, डॉ. मुकुंद पोंधे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. मुकुंद पोंधे
प्राचार्य

(खाजगी वितरणाकरिता)

---

(सहजानंद या नियतकालिकामधील साहित्यात व्यक्त केलेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मी वहिनी
आणि स्वातंत्र्य सेनानी स्वामी सहजानंद भारती यांच्या
प्रेरणादायी स्मृतीस...

**कर्मवीर आण्णा तुम्ही...**

कर्मवीर आण्णा तुम्ही जन्म घेतलात काळोखाशी लढण्यासाठी
काळाने बंद केलेली प्रकाशाची दारे तुम्ही उघडलीत
आणि प्रवाहित केलेतं प्रकाशास शेवटच्या झोपडीपर्यंत...

आडमुठेपणाची चलती असणाऱ्या काळात
तुम्ही एक रोपटं रुजवलंत शिक्षणाचं
झिजत राहिलातं, झिरपत राहिलातं त्याच्या बुंध्याशी
आणि बनवलात त्याचा एक वटवृक्ष आसमंतास धाक दाखवणारा...

'स्वतःच्या संसाराची धूळधाण करणे' या म्हणीस, 'लाखो संसार उभे करणे'
हा नवा अर्थ प्राप्त करुन दिलात तुम्ही
माझे -तुझे किंवा जवळचे-लांबचे हे शब्द तुमच्यासाठी समानार्थी होते

सरपटण्याबाबत ही साशंक असणाऱ्या मानवी कळपांना
आभाळ खुले करुन दिलेत तुम्ही झेपावण्यासाठी आणि हिम्मत सुध्दा दिलीत झेपावण्याची...

तुमच्यातील झपाटलेपणाशी, दृढतेशी व निश्चयाशी
आजन्म एकनिष्ठ व बांधील राहण्याचे कसब कुठं शिकले होता तुम्ही?
त्या काळातही ज्यांना कुणीच नव्हतं त्यांना तुम्ही होता ही तुमची ओळख... !

आण्णा ...
मातीत पाय रोवून आभाळाला हात लावणाऱ्या
तुमच्या उंचीचा अंदाज कसा कुणास बांधता येईल...?

**– डॉ.बाबा तोंडे**



## मा. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

डी. लिट.

संस्थापकः रयत शिक्षण संस्था, सातारा

२२ सप्टेंबर १८८७ - ९ मे १९५९

काव्यपंक्ती प्रा. माधव थोरात

लाखलाख मुले आज माये वंदिताती तुला
हेवा करावा देवांनी असे भाग्य लाभे तुला
तुझ्या त्यागातुनी माते कर्मवीर जन्मा आला
मूर्त तुझी ठेवू आम्ही हृदयात साठवून
अरे आभाळाएवढे हिला कुणी दिले मन?



## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

७ जून १८९४ - ३० मार्च १९३०

राहुनी संन्याशी मार्गदर्शन केले सकलांना।
कर्तृत्वाचा धीरगंभीर महामेरु नमन तयांना ।।



परमपूज्य वैकुंठवासी स्वामी सहजानंद भारती

## संस्था पदाधिकारी



# मा. पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब

**अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा**

## उपाध्यक्ष



मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील



मा. गणपतराव देशमुख



मा. सौ. जयश्री अनंतराव चौगुले



मा. अरुण पुंजाजी कडू-पाटील



मा. पी. जे. पाटील



मा. आ. चेतन विठ्ठलराव तुपे

## संस्था पदाधिकारी



**मा. डॉ. अनिल पाटील**
चेअरमन



**मा. ॲड. भगीरथ शिंदे**
व्हा. चेअरमन



**मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर**
सचिव



**मा. प्रिं. डॉ. प्रतिभा गायकवाड**
सहसचिव (उच्च शिक्षण)



**मा. संजय नागपुरे**
सहसचिव (मा. शिक्षण)



**मा. प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
सहसचिव (उच्च शिक्षण)

## मा. मीनाताई जगधने

**सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**





**महाविद्यालयाचे गतिशील नेतृत्व**

## मा. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे

### अभिनंदन!

**प्राचार्यपदी पुनर्नियुक्ती**
**दि. १६.०९.२०२१ पासून**

## माजी प्राचार्य


प्रिं. व्ही. एस. रोकडे
१५.०५.१९७० ते ३०.०६.१९७८


प्र.प्रा. पी. एल. नानकर
०१.०७.१९७८ ते १०.०८.१९७९
१५.०६.१९८५ ते ३१.०८.१९८५


प्रिं. ए. पी. खरात
११.०८.१९७९ ते १४.०६.१९८५


प्रिं. एस. ए. अनारसे
०१.०९.१९८५ ते ३०.०४.१९९८


प्रिं. एन. एस. मणेर
०१.०५.१९९८ ते ३०.०४.२००६


प्र.प्रा. आर. एस. बोरुडे
०१.०५.२००६ ते ३०.०९.२००६


प्र.प्रा. डॉ. एस. बी. गागरे
०१.१०.२००६ ते १५.०३.२०१३


प्रिं. डॉ. एम.एल. जाधव
१६.०३.२०१३ ते १५.०१.२०१४

## संपादन समिती


प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे
अध्यक्ष


प्रा. डॉ. भागवत शिंदे
संपादक


प्रा. डॉ. रामदास नान्नर
सदस्य


प्रा. डॉ. अनिल करवर
सदस्य

अभिनंदन!
शिक्षणशास्त्र
पीएच.डी.


प्रा. डॉ. शरद इंगवले
सदस्य


प्रा. विजय पाटोळे
सदस्य


ग्रंथपाल नारायण मेंगाळ
सदस्य


प्रा. चंद्रकांत भोये
सदस्य

अभिनंदन!
शिक्षणशास्त्र
एम.फिल.

## प्रशासकीय सेवक


नामदेव चव्हाण
कनिष्ठ लिपिक


बाबा काळे
ग्रंथालय परिचर


दादाभाई पठाण
शिपाई


प्रभाकर जगधने
शिपाई


सुर्यकांत मंचरे
शिपाई


रविंद्र वाजे
शिपाई


प्रविण हरिश्चंद्रे
शिपाई

## २०२०-२१ बी.एड. विद्यापीठ परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन!


कु. कविता ज्ञानेश्वर गाडेकर
प्रथम क्रमांक ८३.६०%


ओमकार लक्ष्मणराव घाडगे
द्वितीय क्रमांक ८३.४०%


अतुल वैजिनाथ गायकवाड
तृतीय क्रमांक ८३.२०%

# मान्यवरांच्या भेटी



कर्मवीर जयंती प्रसंगी मा.पी.बी. कडू पाटील



मा. प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील व मान्यवर



सा.फु.पु. विद्यापीठ कुलगुरु मा. डॉ. नरेंद्र जाधव




AAA कमिटी चेअरमन प्रिं. डॉ. जे. जी. जाधव, प्रिं. डॉ.प्रतिभा गायकवाड व डॉ. अमर कांबळे



प्रा. डॉ. ह.ना. जगताप



मा. भाऊसाहेब चासकर



मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे



मा.प्रा. डॉ. व्ही. झेड. साळी



मा.प्रा. डॉ. स्मिता काळे



चेअरमन डॉ. अनिल पाटील व इतर मान्यवर



आप्पासाहेब तथा आ. डॉ. सा. रे. पाटील, चेअरमन ॲड. रावसाहेब शिंदे

# विविध उपक्रम



कर्मवीर जयंती प्रसंगी मा. मीनाताई जगधने, डॉ. हनुमंत गायकवाड व इतर




पदवीग्रहण समारंभ प्रसंगी अध्यक्षीय मनोगत प्रसंगी मा. मीनाताई जगधने व इतर मान्यवर



एन.एस.एस. विशेष श्रमसंस्कार शिबिरात श्रमदान करताना स्वयंसेवक



रयत शताब्दी महोत्सवातील एक प्रेरणादायी क्षण...



वार्षिक क्रीडा स्पर्धा उद्घाटन प्रसंगी प्रिं. डॉ.एम.एस. पोंधे प्राध्यापक व छात्राध्यापक



एन.एस.एस. व वि.वि. मंडळ स्वयंसेवक निर्मित २६१४ मास्क नगराध्यक्षा मा. अनुराधाताई आदिक यांच्याकडे सुपुर्द करताना मा. प्रिं. डॉ. एम.एस. पोंधे, मा. रविंद्र जगधने व इतर




महारांगोळीतून कर्मवीर जीवन दर्शन



वृक्षारोपण प्रसंगी मा. डॉ. रविंद्र जगधने, मा. मीनाताई जगधने व इतर मान्यवर

# यशाच्या पाऊलखुणा...













डॉ.रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कारः प्रिं. डॉ. एम. एस. पोंधे



उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार : प्रा. डॉ. अनिल करवर



उत्कृष्ट लघु संशोधन पुरस्कार : प्रा. विजय पाटोळे



मेस्टा बेस्ट रिसर्च पेपर ॲवार्डः प्रा. डॉ. भागवत शिंदे










HAPPY NEW YEAR
S.S.B. COLLEGE
WEL COME


शनिवार


कोर्स क्र.२०९ अंतर्गत
नाटिका सादरीकरण




स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर


GUIDANCE WING


LIBRARY


GIRLS HOSTEL


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
आर्थिक सहाय्य रु. ५,००,०००/-
"अनिवासी विद्यार्थी केंद्र"


SCIENCE LABORATORY


प्राचार्य निवास


सेवक निवास

# शिक्षणातून शेतीनिष्ठा जोपासावी : ॲड. शिंदे

श्रीरामपूर, ता. २८ : आजचे ... नंतर नोकरीच्या शोधात ... कोणीही ... उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, "कर्मवीरांच्या कमवा व शिका योजनेतून, स्वतःच्या ... बाच्या त्यागातून ग्रामीण तरुण ... शेतीबरोबर मनोवृत्ती ... केला;

विद्यालयापर्यंत संगणक, इंटरनेट उपलब्ध करून दिले आहे, असे शिंदे म्हणाले.

प्राचार्य डॉ. ...

## सहजानंद नियतकालिकास पारितोषिक

श्रीरामपूर : येथील स्वामी सहजानंद भारती महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकास सलग तिसऱ्या वर्षी सावित्री... नगर विभागात व्यावसायिक गटातून द्वितीय क्र... सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ... ल्या जाणाऱ्या वार्षिक अंकां... विद्यालयाच्या सहजानंद ... नगर विभागातील व्याव... प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ... कर, प्रभारी ...

## तरुणांनी आजच्या आव्हानांचा विचार करावा

### ...ताई जगधने यांचे आवाहन; श्रीरामपूरमध्ये बहिःशाल शिक्षण शिबिर

महत्त्वाचे आहे. समाजाच्या विकासासाठी आर्थिक बचत आवश्यक आहे. शेती, वाहतूक, व्यापार, कारखानदारी ही ... क्षेत्रे आहेत; परंतु स्वार्थापायी भ्रष्टाचार, काळा पैसा ... लागल्या आहेत. ... सामाजिक

## 'रयत'चे सामाजिक कार्यात मोठे योगदान- सौ. जगधने

श्रीरामपूर (प्रतिनिधी)- कर्मवीर भाऊराव ... रयत शिक्षण संस्थेच्या माध्य... विद्यार्थ्यांना शिक्षण ... त्यांच्यात ...

## बी. एड. अभ्यासक्रम समितीवर प्राचार्य मुकुंद पोंधे यांची निवड

श्रीरामपूर (प्रतिनिधी) – येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भा... ऑफ ...

सदस्यपदी निवड ... शासकीय व अ... ध्यापक महावि... ध्यापक शिक्षण ... एकात्मिक बी. ... करण्याचे सूचित ... राज्यातील शास... अनुदानित अध्य... एनसीटीईच्या सु... एकात्मिक अध्य... शिफारस करण्या...

## हिरगळ यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

श्रीरामपूर/प्रतिनिधी

येथील रयत शिक्षण संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ ... महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. ... हिरगळ यांना ...

## बी.एड. महाविद्यालयास पुरस्कार

श्रीरामपूर( प्रतिनिधी )- रयत शिक्षण संस्थेने सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेल्या ... काम, सामाजिक व क्रीडाक्षेत्रातील शिक्षण, मुलभूत सुविधा अद्यावत दृकश्राव्य शिक्षण, संपन्न ग्रंथालय, विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठीचे प्रयत्न, महाविद्यालया... विद्यार्थ्यांच...

## 'रयत'ला मी मनापासून समर्पित

### शंकरराव काळे यांचे प्रतिपादन; पाटील कृतज्ञता पुरस्कारांचे वितरण

## कालमर्यादा संपलेली औषधे वेळीच नष्ट करा –पोंधे

## गुणवत्तापूर्ण शिक्षण हे स्त्री-पुरुष समानतेसाठीचे सूत्र - प्राचार्य डॉ. पोंधे

श्रीरामपूर (प्रतिनिधी)- स्त्री-पुरुष समानता वाढीस लागावी तसेच महिलांच्या समस्या कमी होण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले.

महिला दिनानिमित्त कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. आज सर्वच ... आहेत. पुरु... आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रिया अग्रेसर आहेत. समाज सुधारण्यासाठी स्त्रिया सर्वात प्रभावी काम करू शकतात, असेही ते म्हणाले.

यावेळी सोनाली थोरात, हिना पटेल, केतकी चालुक्य, जिजाबाई थोरात, आशा सिनारे, रोहिणी गावडे, अतुल ...

## बी.एड. छात्र सेवाकालांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन

श्रीरामपूर/प्रतिनिधी

... येथील रयत शिक्षण संस्थेच्या बी.जी. ... सहजानंद भारती शिक्षणशास्त्र ... विविध उपक्रमांचे ...

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

गणेशखिंड, पुणे-४११००७, भारत.

**Savitribai Phule Pune University**

(formerly University of Pune)

Ganeshkhind, Pune-411007, India.

**प्रा. नितीन र. करमळकर**

कुलगुरू

***Prof. Nitin R. Karmalkar***

Vice Chancellor

दूरध्वनी : (कार्यालय) ०२०-२५६९३८६८

Telephone : 020-25693868

Fax : 020-25693233

E-mail : puvc@unipune.ac.in


## शुभसंदेश

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे २०२०-२१ हे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याचे जाणून अतिशय आनंद झाला. आपल्या महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीशील वाटचालीमध्ये सहभागी असलेल्या आजी-माजी प्राचार्य, पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी या सर्वांचे मी या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक अभिनंदन करतो तसेच भविष्यातही महाविद्यालयाची उतरोत्तर प्रगती होवो, नावलौकिक वाढो अशी सदिच्छा याप्रसंगी व्यक्त करतो !

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आपण सहजानंद सुवर्ण स्मृती विशेषांक प्रकाशित करीत आहात, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. या विशेषांकात शिक्षणशास्त्रातील मान्यवर अभ्यासकांचे शिक्षक शिक्षणाच्या नव्या दिशा... या मुख्य संकल्पनेवर आधारीत अभ्यासपूर्ण लेख घेण्याची आपली कल्पना निश्चितच स्तुत्य आहे. महाविद्यालयाच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने प्रकाशित होणा-या सहजानंद सुवर्णस्मृती या विशेषांकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

**प्रा. नितीन र. करमळकर**

*जा.क्र. व्हीसी/९५*

*दिनांक : २६/02/2021*

डॉ.अनिल आप्पासाहेब पाटील
एम.बी.बी.एस.
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
भ्रमणध्वनी : ९४२३८२८०५१
दूरध्वनी : ०२१६२-२३४५६६, २३३८५७
२२८५६६, २३४८५७
फॅक्स: ०२१६२-२३१४२४
निवास : २७१ सोमवार पेठ, सातारा
पिन : ४१५००२ दूरध्वनी : ०२१६२, २३७९३५
email : anil_a_patil@hotmail.com

दिनांक - २० /११/२०२१

## ~शुभेच्छा संदेश~

स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर महाविद्यालय सन २०२०-२१ हे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहे, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या भूमीत 'रयत' चे रोपटे रुजविले. बहुजन समाजातील सर्वसामान्य माणसांनी मायेने आणि प्रेमाने रोपट्याला जपले आणि बघता बघता या रोपट्याचा वटवृक्ष झाला. अहमदनगरच्या मातीतील उच्च शिक्षण देणारी याच वटवृक्षाची एक शाखा रुजली, ती श्रीरामपुर महाविद्यालयाच्या रूपाने. पन्नाशीत पदार्पण केलेल्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयाने कर्मवीरांचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार केले. बहुजन समाजातील मुलांची शिक्षणाची गरज भागवून व त्यांना आदर्श शिक्षक व नागरिक घडविण्याचा वसा या महाविद्यालयाने आस्थेने जपला.

देश पातळीवर नावलौकिक मिळवून रयतेच्या इतिहासाला साजेशी अशी कामगिरी श्रीरामपुर महाविद्यालय करीत आहे, याचा अभिमान वाटतो. रयतला अपेक्षित असणारा नव्या युगाचा माणूस या महाविद्यालयातून घडत आहे, ही ही गोष्ट अभिमानास्पद आहे. सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने महाविद्यालय प्रकाशित करीत असलेल्या 'सहजानंद सुवर्णस्मृती' या विशेषांकास व महाविद्यालयास खूप खूप शुभेच्छा.

शुभेच्छुक,

डॉ. अनिल पाटील,
चेअरमन
रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शिक्षण संस्था, रविवार पेठ, पोवईनाका, सातारा

**सौ. मीना जगधने**
सदस्या मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा.
चेअरमन, रयत शैक्षणिक संकूल, श्रीरामपूर
दूरध्वनी - (०२४२२) २२२९४१
मोबाईल - ९४२२०३०१०५

निवास -
कल्पना हौसिंग सोसायटी,
वार्ड नं. ७, श्रीरामपूर - ४१३ ७०९,
जि. अहमदनगर

दिनांक : 08.03.2021.

# शुभेच्छा संदेश !

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, श्रीरामपूर हे सन २०२०-२१ मध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. रयत शिक्षण संस्थेतील विविध शाळा, महाविद्यालयांसाठी उत्तम, प्रशिक्षित शिक्षक मिळावेत या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वप्नपूर्तीचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून सन १९७० मध्ये या महाविद्यालयाची स्थापना झाली. मागील ५० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विविध शाळा, महाविद्यालयांसाठी उत्तम शिक्षक, प्राध्यापक व प्रशासक पुरविण्याचे काम या महाविद्यालयाने केले आहे, व करीत आहे, ही खरोखरच अभिमानास्पद गोष्ट आहे. भविष्यातही आपणाकडून असेच कार्य होत राहो तसेच आपल्या महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती होवो, नावलौकिक वाढो अशी सदिच्छा याप्रसंगी व्यक्त करते.

या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने आपण प्रकाशित करीत असलेल्या 'सहजानंद सुवर्णस्मृती' या विशेषांकासाठी शिक्षणशास्त्रातील मान्यवर अभ्यासकांचे 'शिक्षणाच्या नव्या दिशा' या मुख्य संकल्पनेवर आधारित लेख प्रकाशित करण्याची आपली कल्पना आवडली. या विशेषांकास आणि महाविद्यालयास सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने माझ्या हार्दिक शुभेच्छा !

मीना जगधने

श्रीमती. मीनाताई जगधने
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा
चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर

# अनुक्रम


अध्यक्षीय मनोगत २१ ते २२
महाविद्यालयाची सुर्वणमहोत्सवी वाटचाल
प्रिं.डॉ. एम.एस.पोंधे

संपादकीय २३ ते २४
आज सोनियाचा दिनू...
प्रा.डॉ.भागवत शिंदे

विभाग एक २५ ते ६८
महाविद्यालयाची जडणघडण

विभाग दोन ६९ ते १३८
शिक्षणाच्या नव्या दिशा

विभाग तीन १३९ ते १६६
आम्ही चालवू हा पुढे वारसा...

विभाग चार १६७ ते १७६
शैक्षणिक अहवाल व इतर




मुखपृष्ठात दडलयं काय...
कोरोना या महामारीच्या काळात गेल्या दोन वर्षात सर्वांत जास्त नुकसान हे शिक्षण क्षेत्राचे झाले आहे. दोन वर्ष विद्यार्थी शाळा, महाविद्यालयात गेली नाहीत. अशा परिस्थितीत 'ऑनलाईन' हा नवीन शब्द प्रचलित झाला. यातच मुले व्हाट्सअॅप, फेसबुक,झुम,गुगल मीट,अॅन्ड्रॉईड, लॅपटॉप,अशा विविध माध्यमांव्दारे शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु यामध्ये मुलांना प्रत्यक्ष गुरुजी, शाळा आणि फळा हेच आपल्याला प्रभावी शिक्षण देऊ शकतात.किंबहुना प्रत्यक्षदर्शी शिक्षणाशिवाय आपल्याला पर्याय नाही. म्हणूनच चित्रातील मुलगा आपल्या अवतीभोवती असणाऱ्या डिजीटल माध्यमांना कंटाळून पुन्हा पुस्तकात आपले मन गुंतविताना दिसत आहे. तसेच मोबाईलच्या स्क्रिन पेक्षा माझी शाळा आणि फळा हेच माझ उज्वल भविष्य घडवू शकते हेच सत्य ! म्हणूनच मुलीची पावले फळ्याच्या दिशेने जात आहे.

नवीन शैक्षणिक धोरण हा नव आशेचा किरण मनात बाळगत शिक्षणाच्या नव्या दिशा तिला खुणावत आहेत. उद्याचा समृध्द आणि संपन्न भारत घडविण्यासाठी...

राहुल पगारे

# महाविद्यालयाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल

## अध्यक्षीय मनोगत...

प्राचार्य डॉ.मुकुंद पोंधे

मित्रहो ! सस्नेह नमस्कार, पद्‌भूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्राच्या समाजजीवनात विशेषत: ग्रामीण भागात असणाऱ्या अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी सन १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीरांसह सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनी या ज्ञान यज्ञानात आपल्या जीवनाची आहुती दिली आणि हा ज्ञानयज्ञ तेवत ठेवला. आज महाराष्ट्रातील पंधरा आणि कर्नाटक राज्यातील एक अशा सोळा जिल्ह्यात संस्था प्रभावीपणे कार्य करीत आहे. संस्थेतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक हा प्रशिक्षित असावा असा कर्मवीरांचा आग्रह असे. त्यांच्या या विचरातूनच संस्थेची दोन बी.एड. महाविद्यालये  व सात अध्यापक विद्यालये कार्यरत आहेत. त्यातीलच १९७० साली स्थापन झालेली स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर ही एक शाखा होय. यावर्षी महाविद्यालयाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. एक प्रदीर्घ टप्पा अतिशय यशस्वीरित्या महाविद्यालयाने पूर्ण केला आहे. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होणाऱ्या सहजानंद सुवर्णस्मृती या स्मरणिकेच्या व विशेषांकाच्या निमित्ताने आपल्याशी सुसंवाद साधताना मला मनस्वी आनंद होतो आहे.

महाविद्यालयाच्या इतिहासात मागे वळून पाहताना अनेक बाबी नजरेसमोर येतात. त्यावेळी श्रीरामपूर सारख्या ग्रामीण भागात कॉलेज ऑफ एज्यूकेशन श्रीरामपूर नावाने जून १९७० मध्ये हे महाविद्यालय सुरु झाले. प्रारंभीच्या काळात रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये हे महाविद्यालय भरत होते. १९९० साली महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत तयार झाली. या  इमारतीचे उद्‌घाटन सध्याचे संस्थेचे अध्यक्ष आणि राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री मा.खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते झाले.  मा.प्रा.एन.डी.पाटील, मा.ॲड.रावसाहेब शिंदे, मा.मीनाताई जगधने, मा.प्राचार्य ए.डी.आत्तार, प्राचार्य मा.व्ही.एस. रोकडे आदींसह परिसरातील हजारो हितचिंतकांचा या महाविद्यालयाच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे.

सध्या महाविद्यालयाच्या मुख्य इमारत, मार्गदर्शन कक्ष,ग्रंथालय,प्रयोगशाळा,सेमिनार हॉल, अनिवासी विद्यार्थी केंद्र,विद्यार्थी वसतिगृह,विद्यार्थिनी वसतिगृह,सेवक निवास,प्राचार्य निवास अशा विविध इमारती उभ्या आहेत. या सर्व इमारतींच्या बांधकामासाठी निधी उभारणीकामी मा.ॲड.रावसाहेब शिंदे, तत्कालिन,आमदार ज.य.टेकावडे,भास्करराव गलांडे पाटील,हिंद सेवा मंडळाचे दादा वामन जोशी,चंद्रभान रुपचंद डाकले शेटजी,पंचायत समिती, विविध सहकारी संस्था, परिसरातील अनेक थोर देणगीदार व आजी-माजी विद्यार्थी यांची मदत झाली आहे. मा.प्राचार्य व्ही. एस.रोकडे यांचेसह प्राचार्य पी.एल. नानकर,प्राचार्य ए.पी.खरात, प्राचार्य एस.ए.अनारसे, प्राचार्य श्रीमती एन.एस.मणेर, प्राचार्य आर.एस.बोरुडे, प्राचार्य एस.बी. गागरे,  प्राचार्य एम.एल.जाधव यांचे कुशल नेतृत्व या महाविद्यालयाला लाभले आहे.

वरील उल्लेखनीय बाबींचा परिपाक म्हणजे महाविद्यालयाला २००४ साली नॅक मूल्यांकनात ए ग्रेड तर २०१४ साली पूनर्मूल्यांकनात देखील ए ग्रेड मिळाली. अशी कामगिरी करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे कार्यक्षेत्रातील हे पहिले शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय ठरले. शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये रयत शिक्षण संस्थेद्वारे आदर्श महाविद्यालयासाठीचे कर्मवीर पारितोषिक मिळाले. याच शैक्षणिक वर्षात अहमदनगर जिल्हा

परिषदे मार्फत दिला जाणारा निर्मल महाविद्यालय पुरस्कार मिळाला. महाविद्यालयाच्या सहजानंद नियतकालिकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांचेकडून २०१५-१६ ते २०१७-१८ या सलग तीन शैक्षणिक वर्षामध्ये उत्कृष्ट नियतकालिकाचे पारितोषिक मिळाले. महाविद्यालयाच्या इतिहासातील हे मानाचे तुरे होत.

सध्या महाविद्यालयात बी.एड.नियमित अभ्यासक्रमाबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा एम.ए.शिक्षणशास्त्र व शालेय व्यवस्थापन पदविका हे अभ्यासक्रम शिकवले जातात. महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षकी पेशाबरोबरच शैक्षणिक प्रशासन आणि व्यवस्थापन क्षेत्रात उच्च पदावर यशस्वीरित्या कार्यरत आहेत. राज्याच्या शिक्षण उपसंचालक, शिक्षण सहसंचालकपदी देखील महाविद्यालयाचे विद्यार्थी कार्यरत होते आणि सध्याही आहेत. या सर्व बाबींचा अभिमान वाटतो.

मित्रहो, शिक्षण हे समाजसुधारणेचे साधन आहे असे म्हणत असताना शिक्षक हा समाज परिवर्तन प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे हे मान्य करावेच लागते. आजच्या शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रापुढे अनेक आव्हाने आहेत; नव्हे संपूर्ण शिक्षण क्षेत्र संक्रमण अवस्थेतून जात आहे. असे असतानाही गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देऊन चांगले शिक्षक घडविण्याची महाविद्यालयाची परंपरा मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे पुढे चालू ठेवली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवाच्या काळातच महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्व साजरा होण्याचा एक विशेष आनंद आहे. कालसुसंगत ध्येयधोरणे अंगीकारुन आणि शिक्षण क्षेत्रातील बदलांना आत्मविश्वासाने सामोरे जाऊन महाविद्यालय भविष्यात निश्चितपणे गुणवत्तेकडे झेप घेईल यात तिळमात्र शंका नाही.

जय कर्मवीर !



महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य व्ही.एस.रोकडे, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी

## संपादकीय मनोगत...

प्रा.डॉ.भागवत शिंदे

## आज सोनियाचा दिनू...

कोणतीही संस्था, महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव, शताब्दी महोत्सव ही अनेकार्थाने वैशिष्टयपूर्ण व गौरवास्पद घटना असते. पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्यासारख्या दृष्ट्या संस्थापकांचे नेतृत्व जेंव्हा त्या संस्था, महाविद्यालयाला लाभते तेंव्हा तर या गौरवशाली वाटचालीला एक वेगळेच महत्व प्राप्त होते. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी अण्णांनी कराड तालुक्यातील काले या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली आणि हजारो वर्षापासून शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजन समाजातील रयतेच्या लेकरांना शिक्षणाची दारे खुली झाली.२०१९-२० हे रयत शिक्षण संस्थेचे शताब्दी वर्ष संस्थेमार्फत वर्षभर विविध उपक्रम, कार्यक्रमांनी उत्साही वातावरणात संपन्न झाले. आपल्या संस्थेतील शाळा,महाविद्यालयांसाठी प्रशिक्षित शिक्षक असला पाहिजे हे कर्मवीर अण्णांचे सुरवातीपासूनचे स्वप्न होते.याच स्वप्नपुर्तीचा भाग म्हणून अण्णांच्या हयातीत सातारा येथे १९५५ साली पहिल्या उच्च माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण म्हणजेच बी.एड.महाविद्यालयाची स्थापना झाली तेच महाविद्यालय आज आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन या नावाने महाराष्ट्रभर नावारुपास आले आहे. पुढे कर्मवीर अण्णांच्या नंतर अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर या ठिकाणी जून १९७० मध्ये रयतेच्या दुसऱ्या शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाची अर्थात स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली. स्थापनेपासून ते आजतगायत पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक नामांकित,गुणवत्तेची उज्वल परंपरा असणारे शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय म्हणून या कॉलेजचा लौकिक आहे. अशा या गौरवशाली इतिहास लाभलेल्या अध्यापक महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षातील सहजानंद २०२०-२१ हा सुवर्णमहोत्सवी विशेषांक आपणा सर्वांपुढे सादर करताना मनस्वी आनंद होतोय.

सहजानंद या सुवर्णमहोत्सवी विशेषाकांचे संपादन करत असताना महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीतील अनेक महत्वपूर्ण घटना, प्रसंग, संदर्भांचा आढावा घेता आला. त्यातीलच एक महत्वपूर्ण बाब म्हणजे १९७०-७१ पासून ते २०१९-२० या ४९ वर्षातील महाविद्यालयाचा सहजानंद हा वार्षिक अंक ग्रंथालयातून अभ्यासावयास मिळाला. दिवसेंदिवस लेखन व वाचन संस्कृती लोप पावत जाण्याच्या आजच्या काळात केवळ १०० विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयाचा वार्षिक अंक पन्नास वर्षाच्या वाटचालीत सातत्याने दरवर्षी प्रकाशित होणे ही अनेकार्थाने महत्वपूर्ण बाब ठरते. या अंकामधून कालानुरुप शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी या महत्वपूर्ण घटकांमधील त्यांच्या भूमिका व कार्यांना अनुसरुन झालेले बदल, स्थित्यंतरे अभ्यासता आली. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाच्या दृष्टिने वर्तमानकालीन वाटचाल फारशी चांगली नसल्याने अनेक बाबतीत जुनं ते सोनं म्हणण्याची पाळी आपणा सर्वांवर आलेली आहे. याला प्रामुख्याने शासकीय धोरणे, सहा महिन्यापेक्षा अधिक काळ चालणारी व प्रत्येक टप्प्यावर अक्षरश: विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांनाही थकवणारी प्रवेश प्रक्रिया, नियमितपणे शिक्षक भरती न होणे,

सामूहिकतेपेक्षा वैयक्तिकतेचे, त्यागा पेक्षा स्वार्थी वृत्तीचे अवास्तव महत्व भयंकारी पद्धतीने वाढत जाणे अशी अनेक कारणे सांगता येतील. असो, यातूनही नजीकच्या काळात शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांना पूर्वीचे वैभवाचे दिवस प्राप्त होतील अशी आशा करुयात.

यावर्षीच्या अंकातील विभाग एक मधून महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीचे समग्र चित्र उभे राहिल यादृष्टीने लेखांची मांडणी केली आहे. यातील पहिले प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव प्रि.व्ही.एस. रोकडे, प्राचार्य प्रभाकर नानकर, प्रि.डॉ.एम.एल.जाधव व विद्यमान प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे यांचे लेख घेतले आहेत. प्रि.अनारसे व डॉ.एस.बी. गागरे या दोघांचे लेख महाविद्यालयाच्या इतर वैशिष्ट्यांची ओळख होण्यासाठी सहायक ठरले आहेत. महाविद्यालया सोबतच रयत शिक्षण संस्थेच्या शतकपूर्ती व शतकोत्तर सुरुवातीची वाटचाल समजण्याच्या दृष्टिने सचिव मा.प्रि. डॉ. विठ्ठल शिवणकर व मॅनेजिंग कौन्सिल सदस्या तथा रयत शिक्षण संकुलाच्या चेअरमन, आम्हा सर्वांच्या मार्गदर्शिका मीनाताई जगधने यांचे लेख विशेष महत्वपूर्ण ठरले आहेत.

सुवर्णमहोत्सवी विशेषकांसाठी दुसऱ्या विभागात 'शिक्षणाच्या नव्या दिशा' या आशयाला अनुसरुन सर्व लेखांची मांडणी केलेली आहे. यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अभय बंग व हेरंब कुलकर्णी यांच्या लेखातून वर्तमानकालीन शिक्षणातील प्रश्न,आव्हाने यांचे चित्र वाचकाला अस्वस्थ करुन सोडणारे आहे. ही अस्वस्थताच कदाचित शिक्षणातील नव्या दिशेने वाटचाल करावयास प्रवृत्त करणारी ठरु शकेल. या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर प्रि.डॉ. मानसी गानू यांनी प्राथमिक शिक्षणात प्रयोगशील काम करणाऱ्या सुचिता पडळकर यांची घेतलेली मुलाखत,आर.ए.कुंभार,डॉ.वर्षा कुलकर्णी व प्राथमिक शिक्षक असलेल्या बाळासाहेब सदगीर यांचे शिक्षणातील प्रयोग लक्षणीय ठरावेत असे झाले आहेत. प्राथमिकपासून ते उच्च शिक्षणातील वेगळेवेगळे प्रश्न, समस्या, आव्हाने मर्यादा न मांडता त्यावर उपाय कसे शोधता येतील यादृष्टीने या विभागातील इतर सर्व मान्यवर अभ्यासकांचे लेखही वाचनीय झाले आहेत. विचारप्रवृत्त करावयास भाग पाडणारे आहेत.

विभाग तीन मधून बी.एड.छात्राध्यपकांना त्यांच्या महाविद्यालया संबंधीच्या आठवणी,शिक्षक-विद्यार्थी नाते, शिस्त,उपक्रम, छात्रसेवाकाल अशा विविध विषयांवर अभिव्यक्त होण्याचे आवाहन केले होते. त्यातूनही आमच्या महाविद्यालया संबंधीचे समग्र चित्र अनौपचारिक शैलीत साकारले आहे. हे लेख सर्व विद्यार्थ्यांना आपले बी.एड. चे वर्ष,त्या वर्षातील महत्वपूर्ण घटना, प्रसंग यांना पुन्हा अनुभवण्यासाठी सहाय्यक ठरणार आहे.

कोरोना संसर्गाचा भयंकारी विनाश २०२० पासून आपण सर्वजण अनुभवत आहोत. त्याचा सर्वात जास्त फटका शिक्षण क्षेत्राला बसलेला आहे. त्यामुळे या सर्व पार्श्वभूमीवर या विशेषाकांसाठी मान्यवर अभ्यासक, संस्था पदाधिकारी, माजी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या सर्वाकडून लेख मिळवण्यात अनेक मर्यादा आल्या. अशाही परिस्थितीत या अंकाच्या निर्मिती व संपादनासाठी सहाय्यक ठरलेले मार्गदर्शक प्रिं.डॉ.एम.एस.पोंधे, मान्यवर लेखक, विद्यार्थी, मुखपृष्ठासाठी चित्रकार मित्र राहुल पगारे,संपादन समिती सदस्य, कार्यालयीन सेवक, जाहिरातदार तसेच श्री.स्वामी समर्थ प्रिंटर्सचे संचालक, अभय पवार या सर्वांच्या सहकार्याशिवाय हे काम पूर्णत्वास नेऊ शकलो नसतो या विनम्र जाणीवेसह सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.अंक अधिक चांगला करण्याच्या दृष्टिने झालेल्या उण्यापुऱ्या प्रयत्नांना आपण मातेच्या विशाल अंत:करणाने समजून घ्याल ही अपेक्षा.

**तरी न्यून तें पुरते । अधिक ते सरतें ।**
**करुन घेयावे हे तुमतें । विनवितु असे ।।**

–संत ज्ञानेश्वर

## विभाग एक
## महाविद्यालयाची जडणघडण




इवलेसे रोप लावियले व्दारी ।
त्याचा वेलू गेला गगनावरी ।।
मोगरा फुलला मोगरा फुलला ।
फुले वेचिताची बहरु । कळीयासी आला ।।

## ।। अनुक्रमणिका ।।

**विभाग एक**
**महाविद्यालयाची जडणघडण**


| | | |
|---|---|---|
| ०१ महाविद्यालयाचा प्रेरणादायी प्रवास | प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे | २७ |
| ०२ रयतच्या जडणघडणीत नगरचे योगदान | मीनाताई जगधने | ३४ |
| ०३ रयतची शतकोत्तर वाटचाल | प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर | ३६ |
| ०४ मागे वळूनी पाहता | प्रिं.डॉ. व्ही.एस.रोकडे | ४० |
| ०५ माझे उपक्रमशील महाविद्यालय | प्रि.डॉ.प्रभाकर नानकर | ४७ |
| ०६ महाविद्यालयाचा विस्तार सेवा कार्य | प्रिं.डॉ.एस.ए.अनारसे | ५२ |
| ०७ कृतज्ञ मी...कृतार्थ मी... | प्रिं.डॉ. एस.बी.गागरे | ५४ |
| ०८ सुवर्ण महोत्सवाच्या निमित्याने... | प्रिं.डॉ.एम.एल.जाधव | ५७ |
| ०९ ओळख स्वामी सहजानंदांची | डॉ.नामदेवराव देसाई | ६२ |

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.आपटे यांचे स्वागत करतांना प्रिं.व्ही.एस.रोकडे

# महाविद्यालयाचा प्रेरणादायी प्रवास

**प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे**
स्वामी सहजानंद भारती
कॉलेज ऑफ एज्युकेशन,
श्रीरामपूर

## प्रास्ताविक

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ साली बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. झाडाच्या शेंड्यापेक्षा बुंध्याला खत घालणे हितकारक असते या विचारातून अण्णांनी प्राथमिक शाळा सुरु करण्याचा सपाटा लावला. या शाळांमधून विद्यार्थ्यांना शिकवणारा शिक्षक हा प्रशिक्षित असला पाहिजे असा अण्णांचा आग्रह होता. अण्णांच्या याच विचारातून रयत शिक्षण संस्थेची ७ अध्यापक विद्यालये व २ अध्यापक महाविद्यालये कार्यरत आहेत. त्यातीलच एक म्हणजे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर हे महाविद्यालय होय.या लेखातून महाविद्यालयाच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेतांना प्रिं.डॉ.व्ही.एस.रोकडे यांच्या 'वटवृक्षाच्या छायेत' या पुस्तकाची खूप मदत झाली. त्याशिवाय या गौरवशाली इतिहासाचे शब्दांकन करणे कठीण झाले असते.

## पार्श्वभूमी

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार अधिक प्रमाणात होण्यास प्रारंभ झाला. शिकलेल्या मुलांना लगेच नोकऱ्या मिळू लागल्याने आपण मुलांना शिकवले पाहिजे ही जाणीव ग्रामीण भागातील पालकांत निर्माण झाली. आपल्या गावातही इंग्रजी शाळा असावी असे सर्वांना वाटू लागले. संस्थेचे संस्थापक कर्मवीर अण्णा यांनी महात्मा गांधीच्या हत्येनंतर आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धांजली सभेत १०१ माध्यमिक शाळा महाराष्ट्रात सुरु करुन त्यांना 'महात्मा गांधी विद्यालय' असे नाव देण्याची घोषणा केली होती. या सर्वांचा परिणाम होऊन सर्वत्र – अगदी छोट्या गावातही माध्यमिक विद्यालये सुरु झाली. त्यासाठी माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता भासू लागली. पद्वीधर शिक्षक फारसे मिळत नसत. ही उणीव भरुन काढण्यासाठी संस्थेने महाविद्यालयांमार्फत टी.डी. चे वर्ग सुरु केले होते. शासनानेही एस.टी.सी., सी.पी.एड. यांसारखे कोर्सेस सुरु करुन ही उणीव भरुन काढण्यासाठी प्रयत्न चालविले होते. हे कोर्सेस पूर्ण करणाऱ्यांना माध्यमिक शिक्षक म्हणून लगेच नेमणूकाही मिळू लागल्याने या कोर्सेसना पुरेसे विद्यार्थी मिळू लागले.

कालांतराने महाराष्ट्र शासनाने रु.१२०० चे आत उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण धोरण अवलंबल्याने बहुतेक मुले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करुन पदवी संपादन करु  लागली. त्यामुळे या कोर्सेसना येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ लागली. याचा परिणाम म्हणून T.D.,S.T.C.यांसारखे कोर्सेस हळूहळू बंद पडू लागले. प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता भासू लागली. यासाठी अप्रशिक्षित पदवीधरांना नियुक्त्या देण्यास शासनाने परवानगी दिली. मात्र त्यांनी ५ वर्षात प्रशिक्षण पदवी संपादन केली पाहिजे अशी अट घालण्यात आली होती.पदवीधरांना प्रशिक्षित करण्यासाठी लागणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची संख्या अत्यंत अपुरी होती. पुणे, कोल्हापूर,सातारा,मुंबई या शहरात शासनाची व खाजगी संस्थांची काही महाविद्यालये होती. प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता

होतीच. संस्थेच्या शाळा उत्तर विभागात म्हणजे नगर व नाशिक जिल्ह्यात भरपूर प्रमाणात होत्या. त्यांच्यासाठी व इतरांसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालय उत्तर विभागात असावे असे काहींना वाटू लागले. श्रीरामपूर येथील आर.बी.एन.बी. महाविद्यालयात टी.डी. चा वर्ग अनेक वर्षे चालू होता. तो १९६८ साली बंद करण्यात आला होता. तेथील प्राध्यापक वर्ग सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे काही प्रमाणात वर्ग करण्यात आला होता. इतरांना नाइलाजास्तव हायस्कूलवर शिक्षक म्हणून पाठविण्यात आले होते. टी.डी. विभागाचे ग्रंथालयही होते. त्याचे काय करावयाचे हा ही प्रश्न होता. तसेच महाविद्यालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाल्याने काही वर्ग उपलब्ध होण्यांसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्व घटनाक्रमामुळे व सोयीसुविधांची उपलब्धता असल्याने श्रीरामपूर येथे बी.एड्.कॉलेज सुरु करावे असे आर.बी.एन.बी. महाविद्यालयाचे प्राचार्य अत्तार यांना वाटू लागले. यासंदर्भात त्यांनी संस्थेकडे विचारणा केली. पण संस्थेने त्याबद्दल फारशी उत्सुकता दाखविली नाही. परंतु निराश न होता प्राचार्य अत्तार यांनी अथकपणे प्रयत्न करुन शेवटी महाविद्यालय सुरु करण्यासाठी संस्थेची परवानगी संपादन केली व विद्यापीठाकडे अर्ज करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापन करणारे प्रा. रोकडे यांच्याकडे बी.एड. महाविद्यालय सुरु करण्यासाठी लागणाऱ्या पूर्वतयारीची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.त्यानुसार महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज  करण्यासाठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन अर्ज करण्यात आला व विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही व्हावी यासाठी प्रयत्नास प्रारंभ झाला.

महाराष्ट्रात सातारा, पुणे, कोल्हापूर, मुंबई या ठिकाणी शासन व खाजगी संस्था यांची प्रशिक्षण महाविद्यालये होती. तसेच काही जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षकांचा तुटवडा भागवण्यासाठी खाजगी संस्थांनी महाविद्यालये सुरु करण्याबाबत शासनानेही उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले होते. संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांची संख्या जवळजवळ ३०० पर्यंत गेली होती. नगर जिल्ह्यात १०० पेक्षा अधिक माध्यमिक विद्यालये संस्थेमार्फत चालवली जात होती. त्यांना प्रशिक्षित शिक्षकांची गरज होतीच. माध्यमिक विद्यालयांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षक मिळावेत व शिक्षकी पेशाकडे पदवीधरांनी वळावे म्हणून शासनाने माध्यमिक विद्यालयात काम करणाऱ्या अप्रशिक्षित पदवीधरांना पूर्ण पगारी अथवा अर्धपगारी डेप्युटेशन देण्याचे धोरण स्वीकारले होते. हे शिक्षक स्वखर्चाने ही पदवी संपादन करण्यासाठी प्रवेश घेत असत. त्यांना खर्चासाठी स्टायपेंड व नियमाप्रमाणे इतर फी सवलतही शासनाकडून मिळत असे. बी.एड. झाल्यानंतर लगेच शिक्षक म्हणून नोकरी मिळण्याची शाश्वती असल्याने पदवीनंतर लगेच प्रवेश घेण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी उत्सुक असत. त्यामुळे नवीन महाविद्यालये निघण्यास अनुकूल वातावरण होते.

## महाविद्यालयाची स्थापना

श्रीरामपूर येथे बी.एड. कॉलेज निघावे यासाठी विद्यापीठांकडे अर्ज केला होताच. त्याची छाननी होऊन परवानगी द्यावी किंवा नाही यासाठी उपलब्ध सुविधांची पाहणी करण्यासाठी विद्यापीठाने कमिशनची नियुक्ती केल्याचे आर.बी.एन.बी. महाविद्यालयाला पत्र आले. त्यामुळे त्या दृष्टीने तयारीस प्रारंभ झाला.

बोरावके महाविद्यालयाच्या इमारतीचा एक भाग या नियोजित बी.एड. कॉलेजसाठी देण्याचे निश्चित करण्यात आले होते. या भागात ४०x ३० चा एक मोठा हॉल होता. त्याला लागून ३०x २० व ३०x १० अशा दोन खोल्या होत्या त्यांच्या शेजारी ५०x३० चा मोठा हॉल होता. ही इमारत नियोजित बी.एड्. कॉलेजच्या सर्व गरजा पूर्णपणे भागवण्याइतपत पुरेशी होती. परिसरातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहात ३० विद्यार्थ्यांची सोय होऊ शकेल असा स्वतंत्र विभाग उपलब्ध करुन देण्याचे ठरले. टी.डी. विभागाचे ग्रंथालय होतेच. त्यात आणखी भर टाकून ते सुसज्ज केले गेले. विद्यापीठाकडे डिपॉझिट म्हणून ठेवण्यासाठी लागणारी रक्कम रु.२५०००/- बोरावके महाविद्यालयाने उसनवार म्हणून द्यावयाची तयारी दाखवली.

प्राचार्यांच्या नियुक्तीच्या संदर्भात संस्थेकडून निश्चित असे धोरण ठरलेले नव्हते. नियुक्ती नंतर करु असे प्रा. अत्तार यांना कळविण्यात आले. या मुद्यावरुन कमिशनने परवानगी नाकारु नये असे त्यांना वाटत होते. प्राचार्य पदासाठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमांचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या असे निदर्शनास आले की शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून मान्यतेस पात्र असणारी कोणतीही व्यक्ती प्राचार्य म्हणून काम करु शकते. प्रोफेसर होण्यासाठी विषयातील द्वितीय श्रेणी व असि. प्रोफेसर म्हणून तीन वर्षाचा अनुभव व एकूण ५ वर्षांचा महाविद्यालयातील अनुभव ही पात्रता गृहीत होती. त्याचबरोबर बी.एड. पदव्युत्तर पदवीची द्वितीय श्रेणी,एम.एड. द्वितीय श्रेणी व माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून ७ वर्षाचा अनुभव असणारी व्यक्ती शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून नियुक्त होण्यास पात्र असते म्हणजेच पर्यायाने प्राचार्यपदी नियुक्ती होण्यास विद्यापीठ नियमानुसार पात्र होते असे त्यांच्या निदर्शनास आले. प्रा.रोकडे हे सर्व निकष पूर्ण करीत असल्याने त्यांनी प्राध्यापक रोकडे यांना बोलावून घेतले व सविस्तर चर्चा केली. ''प्राचार्यांची नियुक्ती नाही या मुद्यावरुन विद्यापीठाने परवानगी नाकारु नये असे मला वाटते. तुमच्याजवळ प्रोफेसर होण्यासाठी म्हणजे पर्यायाने प्राचार्य होण्यासाठी आवश्यक पात्रता असल्याने कमिशनच्या भेटीच्या वेळी तुमचे नाव सूचवू. पुढे काय होईल ते संस्थेच्या धोरणानुसार ठरेल.'' असे ते म्हणाले. प्राध्यापक रोकडेंनी देखील यास संमती दिली.

विद्यापीठाकडून कळविण्यात आलेल्या तारखेला विद्यापीठाचे कमिशन आले. त्यांनी सर्व पाहणी केली. इमारत,वसतिगृह, ग्रंथालय आदी बाबींची उपलब्धता पाहून कमिशनने समाधान व्यक्त केले. प्राचार्यांचे नियुक्तीबाबत विचारणा केली असता प्राध्यापक रोकडे यांचे नांव पुढे करण्यात आले.शैक्षणिक पात्रता व नियमानुसार माध्यमिक विद्यालयातील १० वर्षे मुख्याध्यापक म्हणून असणारा अनुभव,प्रोफेसर व प्राचार्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी योग्य आहे असे मत कमिशनने व्यक्त केले. महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाने परवानगी द्यावी अशी शिफारस विद्यापीठाकडे करण्याचे आश्वासन कमिशनने दिले. त्यानुसार ''आता जून १९७० पासून महाविद्यालय सुरु करण्याच्या तयारीला लागा.'' अशी सूचना प्राचार्य अत्तार यांनी प्राध्यापक रोकडे यांना केली.

पुणे विद्यापीठाने जून १९७० पासून महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी दिलेली होती. तसा अहवाल १ जूनपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक होते. त्यासाठी पैशाचा प्रश्न प्रमुख होता. बी.एड. प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाची गरज होतीच. त्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना पुणे, अहमदनगर,येथे न जाता श्रीरामपूर येथेच बी.एड. पदवी प्राप्त करणे शक्य होणार होते. परंतु सर्व सामान्य जनतेस हे महाविद्यालय म्हणजे काय? हे फारसे माहित नव्हते. त्यामुळे त्यांचेकडून आर्थिक मदत देणगीच्या रुपाने मिळणे शक्य नव्हते. प्रारंभी शासनाकडूनही आर्थिक साहाय्य मिळत नसे. त्यामुळे निधी उभारणे हे मोठे जिकिरीचे काम होते. या वस्तुस्थितीची जाणीव प्राचार्य अत्तार यांना असल्याने त्यांनी इमारतीचा एक भाग, वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश, टी.डी. विभागाचे ग्रंथालय याबरोबर उसनवार म्हणून रु. २५०००/- देण्याचे मान्य केले.

प्राध्यापक रोकडे यांनी १५ मे १९७० रोजी प्राचार्य म्हणून हजर होऊन अधिकृतपणे कामकाजास प्रारंभ केला. इमारत स्वतंत्र वाटावी यासाठी पार्टीशन करुन ती स्वतंत्र केली गेली.बी.एड. सिलॅबसच्या प्रती मागवून अभ्यासास प्रारंभ केला. त्यानुसार प्रत्येक विषयासाठी आवश्यक त्या संदर्भ ग्रंथांची यादी तयार करुन ऑर्डर्स नोंदवल्या. फर्निचरची ऑर्डर नोंदवली. या सर्व गोष्टी १५ जून पूर्वी होणे आवश्यक असल्याने त्या दृष्टीने नियोजन करुन शैक्षणिक व इतर मासिकांच्या वर्गण्या भरल्या. जुलैपासून ती नियमितपणे येऊ लागली.

शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे विद्यापीठाकडून माहिती गेल्यानंतर त्यांनी ६३ विद्यार्थ्यांना डेप्युटेशनवर नियुक्ती दिली. उरलेल्या जागांसाठी अर्ज मागविण्यात आले. त्यातून मेथडची गरज ध्यानात घेऊन

गुणवत्तेनसुार निवड करण्यात आली. प्रत्येक अध्यापन पद्धतीस किमान १० विद्यार्थी असतील या बाबीकडे लक्ष पुरवले. प्रवेश देण्यास प्रारंभ झाला. १५ जूनच्या आत सर्वांनी प्रवेश घ्यावेत असे सूचित करण्यात आले. ९५ टक्के प्रवेश मुदतीत पूर्ण झाले.

**सेवक वर्ग**

संस्थेने यापूर्वी टी.डी. विभागास अध्यापनाचे काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या बदल्या श्रीरामपूरच्या या बी.एड. महाविद्यालयात केल्या. त्याशिवाय विविध विषयांच्या मेथड मास्टरनाही नियुक्त्या देण्यात आल्या. सर्वजणांना पत्रे पाठवून चर्चेसाठी अगोदरच बोलावून घेण्यात आले. असि.प्रोफेसरची जागा रिकामीच होती. काही दिवसांनी सातारा येथील आझाद शिक्षणशास्त्र महाविद्यालयात असि.प्रोफेसर म्हणून काम करणारे प्रा. भंडारी यांची बदली संस्थेकडून या महाविद्यालयात करण्यात आली.

प्रशिक्षण महाविद्यालयात १० विद्यार्थ्यांमागे एक प्राध्यापक असे प्रमाण निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे प्राचार्यांसह ११ प्राध्यापक स्टाफवर होते. त्यात कला शाखेचे ७ व विज्ञान शाखेचे ३ प्राध्यापक होते. महाविद्यालयात मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, भूगोल, शास्त्र व गणित या अध्यापन पदधती शिकविण्याची सुविधा उपलब्ध होती. पूर्वीच्या टी.डी.विभागाचे प्रा.एस. ए.अनारसे, प्रा.जी.एम.चव्हाण व प्रा.सौ.कमलदेवी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. बी.ए.कोळपे, एस.बी.वंजारी व एस.बी.पवार हे साताराहून बदलून आले होते. उरलेले नव्याने नियुक्त केले होते. त्यात नजमा अत्तार,एस.टी.चव्हाण,एस.टी. शेटे, बी.जे.दळवी यांचा समावेश होता.प्रा.भंडारी यांच्या राजीनाम्यानंतर प्रा.व्ही.आर.कदम यांची बदली करण्यात आली होती. पाठांचे नियोजन करण्याचे काम प्रा.व्ही.एम.चव्हाण करीत असत. प्रा.एस.ए.अनारसे हे मूल्यमापन विभाग सांभाळत. प्राचार्यांच्या अनुपस्थितीत तेच काम पाहत असत. त्यांच्यापेक्षा सिनियर असणारे प्राध्यापक साताराहून बदलून आल्यावर लवकरात लवकर सातारा येथे परत जाण्यासाठी उत्सुक असत. त्यामुळे अध्यापनाव्यतिरिक्त नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याकडे त्यांचा कल नसे. तरीही स्टाफमध्ये परस्पर विश्वासाचे व सहकार्याचे वातावरण होते. सर्वजण नवनवीन कल्पनांचा स्वीकार करुन त्यांची कार्यवाही करण्यास तत्पर असत.पुढे नानकर, आर.ए.कुंभार, रविकिर्ती, आर.एस.बोरुडे, एस.बी.गागरे, एस.जी.पुंड, सौ.एस.पी.हिरगळ आदींनी आपापल्या कार्यकतृत्वाने महाविद्यालयाच्या नाव लौकिकात भर घातली.सध्या माझ्या बरोबर डॉ.आर.के.नान्नर, डॉ.ए.के.करवर, डॉ.शरद इंगवले, प्रा.व्ही.एस.पाटोळे, डॉ.भागवत शिंदे, प्रा.सी.एम.भोये, ग्रंथपाल नारायण मेंगाळ हे यथाशक्ती आपले योगदान देत आहेत.प्रारंभी बोरावके महाविद्यालयातील एक क्लार्क कामासाठी वर्ग करण्यात आला. कालांतराने त्यांना कायम स्वरुपी नेमणूक देण्यात आली. त्यांनाही बदली नको होती. गावात त्यांचे स्टेशनरीचे दुकान असल्याने काही दिवसातच त्यांनी राजीनामा दिला. त्यांचे जागी बोरावके महाविद्यालयातील श्री.डी.बी.ठुबे यांना बदलण्यात आले. श्री. ठुबे हे कान्हूर पठारचे विद्यार्थी होते. त्यांनी सर्व कामे मनापासून करण्यास प्रारंभ केला. मदतीसाठी आणखी दोघांना अल्पवेतनावर नेमणुका दिल्या. प्रारंभी दोन शिपाई होते. सर्व कामे त्यांनाच करावी लागत. दोन वर्षांनी विद्यापीठाच्या नियमानुसार ग्रंथपाल, ऑफिस स्टाफ व चार शिपाई यांची नेमणूक करण्यात अली. ग्रंथालय अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला. लाटणे, राजगिरे हे प्रारंभीचे शिपाई, देव्हारे, औटे हे क्लार्क यांनीही मनापासून कामे केली. एम.बी.रोमन या ११ वी पास झालेल्या मुलाची शिपाई म्हणून नेमणूक करण्यात आली होती. इंग्रजी,मराठी टायपिंग शिकून तो नंतर क्लार्क झाला.कालौघात कदम, वैद्य, गाढे, ढमढेरे, काटकर, भोसले, जोर्वेकर आदींनी महाविद्यालय प्रशासनात उल्लेखनीय कार्य केले. सध्या एन.बी चव्हाण,बाबा काळे, जगधने, पठाण, मंचरे, वाजे, हरिश्चंद्रे हे महाविद्यालय प्रशासनास मदत करीत आहेत.

### निधी उभारणीसाठी प्रयत्न

महाविद्यालयाच्या कामकाजास प्रारंभ तर झाला. बोरावके महाविद्यालयाकडून उसनवार म्हणून घेतलेली रक्कम विद्यापीठ डिपॉझिट व प्रारंभीच्या खर्चासाठी उपयोगात आणली गेली. पुढील खर्चाचे काय? असा प्रश्न निर्माण झाला. पगार, दैनंदिन खर्च, विकासात्मक कामे चालूच राहणार होती. पहिल्या वर्षी शासकीय अनुदान प्राप्त झाले नाही. फीचे उत्पन्न हेच एकमेव साधन.

शासकीय धोरणानुसार शाळा व महाविद्यालये चालवणाऱ्या संस्थांना अनुदानाव्यतिरिक्त होणारा खर्च स्वत:च्या निधीतून करावा लागत असे. संस्थेकडे स्वत:चा निधी असा खास नसेच. जनतेतून जमा होणारी देणगी हाच तूट भरुन काढण्याचा एकमेव पर्याय उपलब्ध होता. ही तूट भरुन काढण्याची जबाबदारी शाखाप्रमुखासच पार पाडावी लागत असे. त्यासाठी परिसरातून देणगी गोळा करुन हा प्रश्न सोडवणे क्रमप्राप्त होते. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या १०० होती. प्रवेश शासकीय धोरणानुसार द्यावे लागत. महाराष्ट्रातील कोणत्याही भागातून आलेल्या पात्र विद्यार्थ्यांस प्रवेश देणे बंधनकारक असे. बऱ्याच ठिकाणी निधीचा प्रश्न प्रवेशाच्या वेळीच विद्यार्थ्यांकडून देणग्या घेऊन सोडविला जात असे. तसे करणे नियमबाह्य मानले जाई. तरीही तसे करणे त्यावेळी आवश्यक होते.

विद्यार्थी-शिक्षक प्रशिक्षण घेऊन माध्यमिक विद्यालयात काम करणार होते. सेवाजेष्ठतेनुसार मुख्याध्यापक पदही त्यांना सांभाळावे लागणार होते. शाळा चालविताना परिसरातील जनतेचे सहकार्य संपादन करणे आवश्यकच असते. ते मिळविणे ही तारेवची कसरत असते या बाबींचे प्रशिक्षणही त्यांना प्राप्त व्हावे, संस्थेची भूमिका परिसरातील जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचेकडून आर्थिक व नैतिक सहकार्य प्राप्त व्हावे या हेतूने विद्यार्थ्यांनी काही जबाबदारी उचलावी व कृती करावी अशी कल्पना पुढे आली. बऱ्याच संस्था हिवाळी सुटीत निधी संकलनाचे कार्य विद्यार्थ्यांच्यावर सोपवत असत. त्यानुसार पावती पुस्तके छापून घेऊन, सुटीला जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांना एकत्रित करुन ही कल्पना त्यांचेसमोर मांडली गेली. ''तूट भरुन काढणे ही सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. ती आपण सर्वांनी मिळून पार पाडावयाची आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरातील जनतेकडून महाविद्यालयासाठी निधी संकलन करावे'', असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. निधी संकलनाचे उद्दिष्ट प्रत्येकी रु.२५०/- निश्चित करण्यात आले. याप्रमाणे कृती झाली तर एकूण रु. २५,०००/- देणगी जमा झाली असती. पण अनुभव फारसा चांगला आला नाही. प्राध्यापकांनी व्याख्यानातून आवाहन करुनही फक्त ५ टक्के विद्यार्थ्यांनी निश्चित केल्याप्रमाणे प्रत्येकी २५०/- जमवले. इतरांनी ० ते २०,४०,१००, अशा रक्कमा जमवल्या. जे विद्यार्थी रु. २५०/- ची देणगी जमवतील त्यांची नावे सूचना फलकावर लावून त्यांचे अभिनंदन करण्याची प्रथा सुरु केली गेली. पहिल्या वर्षी या पद्धतीने जमा झालेली देणगी रक्कम रु.१३,६७२/- होती. त्याशिवाय परिसरातील सोसायट्या, पंचायत समिती यांनाही आवाहन करुन त्यांच्याकडूनही देणग्या मिळविण्याचा प्रयत्न चालूच ठेवला गेला.

पंचायत समितीने रु. ५,०००/- देणगी मंजूर केली होती. पण त्याला जिल्हा परिषदेची परवानगी लागत होती. कमिशनवर कार्यालयाची परवानगी घेऊन ठरावास मान्यता देण्याचा जिल्हा परिषदेला अधिकार होता. पंचायत समितीचा ठराव घेऊन तो मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठवला गेला. त्यावेळी मा. शंकररावजी काळे हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी त्वरित लक्ष घालून प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांना कमिशनरना पत्र देण्याचे सांगितले. याशिवाय आणखी काही देणग्या जमा झाल्या. वर्षभराच्या खर्चाची तोंड मिळवणी करण्यात यश प्राप्त झाले. महाविद्यालयाचा विकास चालूच होता. भरपूर प्रमाणात आर्थिक सहकार्याची आवश्यकता भासत होती. प्रत्येक वर्षी विद्यार्थी,प्राध्यापक यांचेमार्फत परिसरातील जनतेकडून देणग्या जमविण्याची भूमिका पार पाडावी लागे.

तूट भरुन काढण्यासाठी प्रवेशाचे वेळीच इतर महाविद्यालयाप्रमाणे देणगी घ्यावी असा विचार संस्था पातळीवर काही जाण मांडत होते. त्याचा परिणाम होऊन

अनौपचारिक चर्चेत तूट भरुन काढण्यासाठी प्राचार्यांना प्रारंभीच देणगी घेण्याची परवानगी देण्यात आलीही. त्याची कार्यवाही व्हावी यासाठी महाविद्यालयीन स्तरावर दोन ज्येष्ठ प्राध्यापक व कार्यालयीन प्रमुख यांची समिती अनौपचारिकपणे नियुक्त करण्यात आली. त्यांनी प्रवेशाचे वेळी विद्यार्थ्यास आवाहन करुन त्यास देणगी देण्यास उद्युक्त करावयाचे असा हेतू होता. एखाद्या विद्यार्थ्याची अडचण असल्यास त्यास सवलत देणे, हप्त्याने रक्कम भरणे, काही रक्कम जमा करुन देणे अशी सूट दिली जात असे. त्यात मी स्वेच्छेने रयत शिक्षण संस्थेस देणगी देत आहे अशा उल्लेखाबरोबर देणगीचा आकडा अक्षरी व अंकी लिहिला जात असे. जास्तीत जास्त रु.३००/- देणगी घेतली जात असे. असे रु. ३००/- देणगी देणारांचे प्रमाण ४० टक्के होते. रीतसर पावती दिली जाई. त्यामुळे ऑडिटच्या दृष्टीने ते सोयीचे होई. अपेक्षित रक्कम जमा झाल्याने ग्रंथालयासाठी पुस्तके व प्रयोगशाळेसाठी साहित्य खरेदी करणे शक्य झाले.

चौथ्या वर्षी ही प्रथा नैतिकतेच्या दृष्टीने चालू ठेवणे योग्य न वाटल्याने बंद करण्यात आली. पावती पुस्तके खपवण्याचा उपक्रम परत सुरु करण्यात आला. मागील वर्षाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने आपल्या सद्सद्विवेक बुद्धिवर टाकलेला विश्वास आपण सार्थ ठरवला पाहिजे ही जाणीव विद्यार्थ्यामध्ये निर्माण होऊ लागली. त्यांचा प्रतिसाद चांगला होता. जमा झालेल्या रक्कमा विकास कामासाठीच खर्च केल्याने फर्निचर,प्रयोगशाळेसाठी साहित्य, अभ्यासिकेसाठी संदर्भ ग्रंथाचे संच खरेदी करता आले. इतरही भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य झाले. त्याचा परिणाम चांगला होता. महाविद्यालय आदर्शाप्रत वाटचाल करु लागले. महाविद्यालयास आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले.

**भौतिक सोयीसुविधा**

महाविद्यालयास स्वत:च्या मालकीची इमारत नव्हती. तरीही संस्थेने पुरवलेली व्यवस्था गरजा भागवू शकणारी होती. वसतिगृहात ४० विद्यार्थ्यांची सोय होती. त्यासाठी स्वतंत्र मेस असावी अशी गरज भासू लागली. वसतिगृह गावापासून दूर असल्याने विद्यार्थ्यांचा जेवणासाठी जाण्यायेण्यात बराच वेळ जात असे. त्यासाठी स्वयंपाकगृह, भोजनगृह व मिटिंग हॉल अशी इमारत बांधली. त्यामुळे मेस सुरु करणे शक्य झाले.

प्राचार्य निवास नव्हतेच. पूर्वीच्याच भाड्याचे घराचे रुपांतर प्राचार्य निवासात करण्यात आले होते. पुढे १९८०-८१ मध्ये प्राचार्य खरात यांच्या कार्यकाळामध्ये प्राचार्य निवास बांधण्यात आले. कालांतराने स्थानिक व्यवस्थापन समितीच्या बैठकीत महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत असावी अशी चर्चा जोर धरु लागली. त्यावेळी ॲड.श्री. रावसाहेब शिंदे हे समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहत होते. बोरावके महाविद्यालय व सी.डी.जैन कॉमर्स महाविद्यालयामध्ये असलेली २ एकर जागा बी.एड. महाविद्यालयासाठी देण्याचे ठरले. त्यानंतर मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. १९८५ साली नियुक्त झालेले प्राचार्य अनारसे यांनी प्लॅननुसार इमारती बांधण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

प्रथम ग्रंथालय व मुख्य इमारत बांधण्यात आली. १९९० मध्ये हे काम झाले. यु.जी.सी. अनुदानातून ग्रंथालयाच्या पहिल्या मजल्यावर प्रशस्त सेमिनार हॉल बांधण्यात आला. ग्रंथालय इमारतीचे व मुख्य इमारतीचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री मा.नामदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या शुभहस्ते झाले. १९९१ मध्ये सेवक निवासाचे बांधकाम झाले. या सेवकनिवास इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर १९९१ मध्ये सौ.शशिकलाताई शिंदे यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शन कक्ष इमारत १९९८ मध्ये बांधून पूर्ण झाली. या इमारतीचे उद्घाटन संस्थेचे तत्कालीन चेअरमन मा.एन.डी.पाटील साहेब यांच्या हस्ते झाले. सन २००० मध्ये यु.जी.सी. अनुदानातून प्रयोगशाळा इमारत उभी राहिली या इमारतीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते झाले. विद्यार्थीनी वसतिगृहाच्या उभारणीसाठी मा.ॲड रावसाहेब शिंदे व शशिकला शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून श्रीरामपूर येथील उद्योजक श्री. डाकले शेटजी यांनी वसतिगृहासाठी रु.२,००,००० इतकी मदत केली. त्यातूनच १९९५ मध्ये विद्यार्थीनीसाठी वसतिगृहाचा तळमजला बांधण्यात आला व

पुढे यु.जी.सी. अनुदानातून पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्यात आले. या वसतिगृह इमारतीचे उद्घाटन भारत सरकारचे कृषिमंत्री व रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.नामदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे शुभहस्ते २०१२ साली संपन्न झाले. सन २०१५ मध्ये अनिवासी विद्यार्थी केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आर्थिक अनुदानातून बांधण्यात आले. या इमारतीचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन मा.अनिल पाटील यांच्या हस्ते झाले.

या सर्व इमारतींच्या बांधकामासाठी निधी उभारणीकामी मा.ॲड रावसाहेब शिंदे तत्कालीन आमदार ज.य.टेकावडे,भास्करराव गलांडे पाटील, हिंद सेवा मंडळाचे दादा वामन जोशी, डाकले शेटजी तसेच अनेक थोर देणगीदार, विद्यार्थी यांचीही मोलाची मदत झाली. या सर्व इमारतीचे बांधकाम श्रीरामपूर येथील आर्किटेक्ट व सध्याचे संस्थेच्या जनरल बॉडीचे सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश निकम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली पूर्णत्वास आले. या सर्व इमारतीचे क्षेत्रफळ सुमारे ३१०० चौ.मी. इतके आहे. आज भौतिक दृष्टीने महाविद्यालय सर्व सुविधा असल्याने परिपूर्ण झाले आहे.

**समारोप**

प्रारंभापासून महाविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्ता उच्च दर्जाची असल्याने ते पुणे विद्यापीठ क्षेत्रातील एक दर्जेदार महाविद्यालय म्हणून महाराष्ट्रात आपला लौकिक प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले आहे. या गुणवत्तेमुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील नामंकित शाळांमध्ये प्राध्यान्याने सामावून घेतले जाते. सर्व विद्यार्थी आपल्या परीने शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी प्रयत्नशील असलेले  दिसतात. महाराष्ट्र राज्य सरकारच्या विविध मोठ्या व महत्वाच्या आस्थापनांवर तसेच इतर नामांकित संस्थांमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी आपले गुणवत्तापूर्ण योगदान देत आहेत. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून गुणवत्ता जोपासण्याचे व टिकवण्याचे काम प्राचार्य रोकडे, प्राचार्य खरात, प्राचार्य अनारसे, प्राचार्य नजमा अत्तार मणेर, अन्य कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांनी केले आहे व करत आहेत, हे सर्वांनाच भूषणावह आहे.

महाविद्यालयाने विकसित केलेल्या गुणवत्तेचा, मानवी व्यवस्थापन व संघटन, भौतिक सुविधा, अध्ययन अध्यापन प्रक्रिया, विस्तार कार्य या सर्वांचा विचार करुन 'नॅक'(NAAC) ने प्रथम व द्वितीय अशा दोन्ही मूल्यांकनात महाविद्यालया 'ए ग्रेड' दिलेली आहे. रयत शिक्षण संस्थेने महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालयासाठीचे 'कर्मवीर पारितोषिक' देऊन गौरविले आहे. महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा 'निर्मल महाविद्यालय पुरस्कार' देखील मिळालेला आहे.

कर्मवीर अण्णांचा आदर्श, संस्थेची ध्येयेधोरणे, सध्याच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या असलेल्या मा.मीनाताई जगधने यांचे मार्गदर्शन, इतर संस्था पदाधिकारी, कार्यकर्ते व रयत सेवकांचे सहकार्य या आधारे महाविद्यालयाची गुणवत्तापूर्ण व आश्वासक वाटचाल सुरु आहे. २०१४ साला पासून प्राचार्य म्हणून काम करण्याची जबाबदारी संस्थेने मला दिली. सुवर्ण महोत्सवी वर्षात ही जबाबदारी सांभाळतांना कार्यानंद व्दिगुणीत झाला आहे. आपणा सर्वांना सुवर्ण महोत्सवाच्या निमीत्ताने हार्दिक शुभेच्छा !

# रयतच्या उभारणीत नगरचे योगदान

**मीनाताई जगधने**
सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल,रयत शिक्षण संस्था,सातारा

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाला शिक्षण मिळावे म्हणून केलेले कार्य भुषणावह आहे. त्याकरिता त्यांनी महाराष्ट्रात पायपीट केली. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. रयतचा सर्वात मोठा विस्तार नगर जिल्ह्यात झाला. सत्यशोधक समाजाच्या विचाराशी जवळीक असलेले अनेक कार्यकर्ते कर्मवीरांनी जोडले, नंतरच्या काळात विधायक कामाला वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांनी हे काम पुढे नेले. त्यातून रयतचे काम जिल्ह्यात वाढले आहे. आता संस्था अनेक नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवत आहे.

काले (ता.कराड,जि.सातारा) येथे सत्यशोधक समाजाची परिषद झाली होती. त्या परिषदेत कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. बहुजन समाजाच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी हा निर्णय त्यांनी घेतला. १९२४ ला सातारा येथे कार्यालय सुरु झाले. १९२७ ला शाहू बोर्डिंगची स्थापना महात्मा गांधी यांच्या हस्ते करण्यात आली. संस्थेत कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून त्यांनी वंचितांना शिक्षण प्रवाहात आणले. आज संस्थेचा विस्तार राज्यात व राज्याबाहेरही झाला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाई यांचे योगदान त्याला कारणीभूत आहे. संस्थेच्या ७३७ शाखा आहेत. सातारा, सांगली, कोल्हापूर, बेळगाव, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नगर, बीड, नाशिक, नंदुरबार, पुणे, रायगड, मुंबई, ठाणे, पालघर येथे शैक्षणिक संस्था शिक्षणाचे पवित्र कार्य करत आहे. १३,५५३ सेवकवर्ग कार्यरत असून ४लाख ५८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कर्मवीरांच्या सेवाकार्याची ही फलश्रुती आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सत्यशोधक समाजाशी संबंध होता. त्यामुळे नगर जिल्ह्यातील या विचाराच्या कार्यकर्त्याशी त्यांचा स्नेह होता. बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून ज्येष्ठ नेते बापूसाहेब भापकर हे नगरला काम करत होते. त्यांच्याशी कर्मवीर अण्णांचे संबंध होते. भापकर यांच्यामुळे रयतशी अनेक जिल्ह्यातील नेते जोडले गेले. १९४८ मध्ये भापकर यांच्याकडे कर्मवीर आण्णांची कर्जतच्या दादा पाटील यांच्याशी भेट झाली. दादा पाटील हे टाकळी खंडेश्वरीचे, कर्मवीरांप्रमाणे त्यांचे कार्य होते म्हणून त्यांनाही कर्मवीर दादा पाटील असे संबोधले जाते. त्यांनीच नगर दक्षिणेत रयतच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य केले. कर्मवीरांचा सहवास, विचार व प्रेरणा यामुळे दादा पाटील यांनी १३ जून १९४९ रोजी कर्जतला रयतचे पहिले विद्यालय सुरु केले. त्याला महात्मा गांधी यांचे नाव दिले. त्यांनी संस्थेचा विस्तार करताना रयतवर बोजा पडणार नाही हे आवर्जून पाहिले. गोरगरीब व मागासवर्गीय मुलांसाठी त्यांनी कर्जतला बोर्डिंग सुरु केले. शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करुन ते बोर्डिंग चालवत असत. पुढे त्यांनी महाविद्यालय सुरु केले. त्यांच्या कार्याची दाखल घेऊन त्यांचे नाव या महाविद्यालयास देण्यात आले आहे. भापकर यांच्याकडे कर्मवीरांना भास्करराव गलांडे,पद्मश्री विठ्ठलराव विखे भेटले. श्रीरामपूरला आल्यावर अण्णा हे गलांडे, शंकरराव धुमाळ, यादवराव पवार यांच्याकडे उतरत असत. त्यातून चंद्रभान घोगरे, बाळासहोब विखे, कारभारी शिंदे आदींच्या योगदानातून जिल्ह्यात रयतचा विस्तार झाला. उत्तर विभागात आज सुमारे १५३ शाखा ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. संस्थेच्या विकासात जिल्ह्यातील शंकरराव काळे व रावसाहेब शिंदे यांचे विशेष योगदान असून त्यांनी पदाधिकारी म्हणून काम करत विस्ताराबरोबर गुणवत्तेला महत्व दिले. माजी मुख्यमंत्री शरद पवार व एन.डी.पाटील यांनी रयतला पुढे नेण्याचे व नवीन कार्यकर्ते जोडण्याचे काम केले. जिल्ह्यात शेकडो कार्यकर्ते आज शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रयतचे काम करीत आहेत.

कर्मवीर अण्णा यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून खेड्यातही विद्यालये व महाविद्यालये सुरु केली. वडाळा

महादेव येथे सुमारे दीडशे एकर जमीन मिळाली, श्रीगोंदे येथे ग्वाल्हेरचे महाराजे जिवाजीराव शिंदे यांची ८०५ एकर जमीन व पाच राजवाड्याची जागा देणगी म्हणून मिळाली. श्रीरामपूर येथे ४२ एकर जमीन सरकारने दिली. लाखो रुपयांच्या देणग्या मिळाल्या. आजही हा ओघ सुरुच आहे. बोरावके महाविद्यालयात स्व. रावसाहेब शिंदे यांनी गुणवत्तावाढी बरोबर अनेक उपक्रम सुरु केले. रयतच्या शैक्षणिक संकुलात नापासांची शाळा, संस्कार केंद्र, प्राथमिक विद्या मंदिर सुरु करता आले. संस्थापक म्हणून तेथे काम करता आले. संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर काम करता आले. अनेक उपक्रम राबवता आले आहेत. आज रयतचे आदर्श व प्रतिष्ठित संकुल म्हणून ते ओळखले जाते.दहावी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पुढे शिक्षण घेण्याची फारशी इच्छा नसते त्यामुळे नापास झाल्यावर अशी मुले कोठेतरी कामधंदा सुरु करतात व पोटाची खळगी भरण्यात आयुष्य घालवितात.अशा गोरगरीब मुलांचे आयुष्य घडावे व त्यांना पुढे शिक्षण घेता यावे यासाठी रयत शिक्षण संस्थेमार्फत प्रगती विद्यालयाच्या माध्यमातून फक्त दहावी नापास विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरु करु शकले याचे विषेश समाधान वाटते.या माध्यमातून हजारो नापास विद्यार्थ्यांच्या मनातील अपराधीपणाची भावना दूर करुन त्यांच्यातील आत्मविश्वास जागवता आला. चांगले शिक्षण घेऊन उच्च पदावर नोकरी, व्यवसाय करणारे अनेक जण या प्रगती विद्यालयात शिक्षण घेतल्याचा गौरवाने उल्लेख करतात. तेव्हा आपण करत असलेल्या कामाचे समाधान वाटते.

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे रयतचे घोषवाक्य आहे. जगातील ही एक आगळीवेगळी व अग्रगण्य संस्था आहे. कोट्यावधी गोरगरीब मुलांना शिक्षित करुन न भूतो न भविष्यती अशी शैक्षणिक क्रांती करुन रयतने समाज परिवर्तन घडवून आणले आहे. श्रमाला प्रतिष्ठा देतांना स्वावलंबन, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य ही चतु:सूत्री समोर ठेवून माणूस घडविण्याचे काम अण्णांनी केले. तेच काम संस्था गेली १०० वर्ष करीत आहे. नव्या आधुनिक काळाजी गरज ओळखून नवा विद्यार्थी निर्माण करण्याचे काम सुरु आहे. अध्यक्ष शरद पवार यांच्या दूरदृष्टीने अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम कार्यान्वित केले जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी करार केले जात आहेत. सिम्बॉयसिस स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, कूपर इंडस्ट्रीज, लुपिन अशा संस्थेच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. संगणक प्रशिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन यासाठी प्रयत्न, स्पर्धा परीक्षा तयारी असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु आहे. शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर,डॉ. रघुनाथ माशेलकर अशा आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शास्त्रज्ञांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण केला जात आहे.

शरद पवार यांचे नेतृत्व हे रयतला दिशादर्शक ठरले आहे. कर्मवीर अण्णांचे ९ मे १९५९ मध्ये निधन झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण,स्व.वसंतदादा पाटील यांनी रयतच्या विकासाला चालना दिली. १९८८ मध्ये पवारांनी अध्यक्षपद स्वीकारले. कर्मवीरांच्या विचारांचा वसा व वारसा सांभाळत संस्थेला आधुनिक शिक्षणाची जोड त्यांनी दिली आहे. आश्रमशाळांच्या माध्यमातून त्यांनी आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी कोट्यावधी रुपयांची मदत केली. संस्थेला पुढे नेण्याचे काम त्यांनी चालविले आहे. कर्मवीर क्रीडा अकादमीची स्थापना करुन अनेक खेळाडू संस्थेने निर्माण केले. रयत विज्ञान परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ बनवले जात आहे, शाहू बोर्डींगचे पुनरुज्जीवन करण्यात आले. संस्थेच्या महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकनात उत्तम दर्जा मिळाला. १३ माध्यमिक विद्यालयांना आयएसओ मानांकन मिळाले. राज्य सरकारच्या शाळा सिद्धी मूल्यांकनात ९० टक्के माध्यमिक विद्यालयांना 'अ' दर्जा मिळाला. संस्थेने ॲकेडमिक ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट हा उपक्रम सुरु केला आहे. संस्थेला देशपातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. आपल्या शंभर वर्षांची कारकीर्द यशस्वीपणे पूर्ण केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत अहमदनगर जिल्ह्याचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण ठरले आहे.

## रयतची शतकोत्तर वाटचाल...

**प्रि.डॉ.विठ्ठल शिवणकर**
सचिव, रयत शिक्षण संस्था,सातारा

शिक्षणाशिवाय मनुष्याचे जीवन पशुसमान आहे. शिक्षणाने मनुष्याला माणूसपण येते. यासाठीच शेकडो वर्षे अज्ञान, अंधकारात चाचपडणाऱ्या समाजाच्या दारी ज्ञानाचा दीप तेवत ठेवून त्यांच्या दारी प्रकाश पोहोचविण्यासाठी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

रयत शिक्षण संस्थेच्या शतकोत्तर वाटचालीत २०२०-२१ ह्या शैक्षणिक वर्षात कोविड-१९ मुळे अनेक आव्हाने व नवनवीन संधी निर्माण झाल्या, संस्थेच्या गुणवत्तापूर्ण वाटचालीत आम्हास मोलाचे मार्गदर्शन करणारे एक विवेकवादी व्यक्तिमत्व आणि द्रष्टे नेतृत्व मा. शरदरावजी पवार साहेब, संस्थेचे चेअरमन व आम्हा सर्वांचे मार्गदर्शक मा.डॉ.अनिल पाटीलसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेमध्ये गुणवत्तापूर्ण व राष्ट्रहितास प्राधान्य देणारे उपक्रम सुरु आहेत.

कोविड-१९ काळात सर्व व्यवहार ठप्प झाले असतांना व सारा देश एका विशिष्ट अशा अंधारात चाचपडत असताना संस्थेने ' रयत ऑनलाईन स्कूल एज्युकेशन' (R.O.S.E)च्या माध्यमातून लक्षावधी ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून नियोजित बहुताशी उद्दिष्टे साध्य करणे या महत्वाकांक्षी प्रकल्पामुळे शक्य झाले. शिक्षणप्रक्रिया ही अखंडित असते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाला पर्याय असूच शकत नाही. या विचाराशी आणि तत्वाशी रयत शिक्षण संस्थेने आजतागायत तडजोड केली नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा संस्थेचा श्वास आहे. ध्यास आहे. जागतिकीकरणाच्या व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या स्पर्धेत रयतचा विद्यार्थी समर्थपणे आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी सक्षमपणे उभा राहावा यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक धोरणे मा. शरदरावजी पवारसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था प्रभावीपणे राबवित आहे. म्हणून आज राष्ट्रीय पातळीवर रयत शिक्षण संस्थेची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च गुणवत्ता निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालयाचे मूल्यमापन करण्यासाठी स्थापन झालेल्या नॅक(राष्ट्रीय मानांकन एवं प्रत्यायन परिषद, बंगळूरु) कडून झालेल्या राष्ट्रीय मूल्यांकनामध्ये आजपर्यंत संस्थेच्या ७ महाविद्यालयांना 'ए+' मानांकन, १५ महाविद्यालयांना 'ए' मानांकन, ७ महाविद्यालयांना 'बी++' मानांकन आणि ६ महाविद्यालयांना 'बी+' मानांकन प्राप्त झाले आहे. हा राष्ट्रीय पातळीवरील उच्चांकच म्हणावा लागेल. १४ महाविद्यालयांना आणि १६ माध्यमिक विद्यालयांना आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाले आहे. आजपर्यंत ६ महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. ५ महाविद्यालयांना सीपीई दर्जा, १६ महाविद्यालयांमध्ये बी.व्होक अभ्यासक्रम, २ महाविद्यालयांमध्ये कम्यूनिटी कॉलेज अभ्यासक्रम,१३ महाविद्यालयांना डी.एस.टी.(फिस्ट) योजनेअंतर्गत तसेच २ महाविद्यालयांना डी.बी.टी. (स्टार) योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. ७ महाविद्यालयांना रुसा योजनेअंतर्गत करोडो रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे.

सातारा शहरातील नॅकचे 'ए+' मानांकन असलेल्या तीन महाविद्यालयांचा समूह करुन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा (समूह विद्यापीठ) स्थापन करण्यासाठीच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजूरी मिळाली आहे. ही खूप आनंदाची व महत्वाची बाब आहे.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वाढीस लागावी, उच्च दर्जाची गुणवत्ता व व्यावसायिक उंची वाढावी, सातत्याने नवनवीन संशोधने व्हावीत आणि अत्युच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी हडपसर,सातारा,खारघर (मुंबई) येथे C-III केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड व दृष्टी निर्माण व्हायची असेल तर संशोधनास आवश्यक भौतिक

सुविधांबरोबरच अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांमध्ये संशोधनाची वृत्ती वाढीस लागणे हे शिक्षण क्षेत्राच्या व राष्ट्रहिताच्या दृष्टीने मोलाचे असते हे लक्षात घेऊन संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक व देशाचे भविष्य उज्वल करणाऱ्या उद्याच्या पिढीला नेहमीच प्रोत्साहन दिले जाते. यामुळेच या शैक्षणिक वर्षात ४० प्राध्यपकांनी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांची पीएच डी. पदवी संपादन केली आहे. याबरोबरच आमच्या प्राध्यापकांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून २०९ शोधनिबंध सादर केले आहेत. संस्थेच्या विविध महाविद्यलयामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ३८,राष्ट्रीय स्तरावर १३२९, राज्यस्तरावर २४ तसेच विद्यापीठ स्तरावर ११९ चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांचे निकाल उल्लेखनीय आहेत. अनेक विद्यार्थी विद्यापीठांच्या गुणवत्ता यादीत आले आहेत. विशेष आनंदाची बाब म्हणजे विविध उपक्रम राबवून नाविन्यपूर्ण शिक्षण देणाऱ्या संस्थेतील ८१ माध्यमिक शिक्षकांना प्रत्येकी रु. १,००,०००/- व ३८९ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी २०,०००/- प्रथम वोडाफोन शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. शैक्षणिक,सामाजिक,कला व क्रीडा क्षेत्रात संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त केले आहेत.

गुणवत्तापूर्ण शिक्षणात संशोधनाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. आजपर्यंत संस्थेच्या विविध महाविद्यालयातील शिक्षकांनी स्वत: अथवा सहकारी शिक्षक/विद्यार्थ्यांसमवेत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित जर्नल्समध्ये ७७२ शोध निबंध प्रकाशित केले आहेत आणि १५८ शोधनिबंध प्रकाशनासाठी स्वीकारले आहेत. संस्थेतील शिक्षकांनी आपल्या इतर शिक्षक,विद्यार्थी सहकाऱ्यांसमवेत आपली ५३ पेटंटसुद्धा फाईल केली आहेत. त्यापैकी ९ पेटंटस् रजिस्ट्रेशन स्तरावर, २३ पब्लिकेशन स्तरावर, १० एक्झामिनेशन स्तरावर आहेत. तर ११ पेटंटसना अंतिम मंजुरी मिळालेली आहे. विशेष बाब म्हणजे यापैकी १२ पेटंटस् रयत शिक्षण संस्था आणि रयत संचलित महाविद्यालयाच्या नावे आहेत. ही संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे.

माध्यमिक स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी यासाठी संस्था स्तरावर सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे. गुरुकुल प्रकल्प,अनिवासी गुरुकुल प्रकल्प, दुरस्थ गुरुकुल प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्याचे चांगले परिणाम अनुभवावयास येत आहेत.

शिक्षणात गुणवत्तेला पर्याय असूच शकत नाही. याकरिता संस्थेने रयत गुरुकुल व मिनी गुरुकुल शाखा सुरु केल्या आहेत. याअंतर्गत इंग्रजी संभाषण,अध्ययन-अध्यापनात अनेक नावीन्यपूर्ण ॲप,सॉप्टवेअरचा वापर केला जात आहे. संस्थेच्या एकूण ५ विभागांमध्ये २८६ शाखांमध्ये गुरुकुल व १८० शाखांमध्ये मिनी गुरुकुल सुरु आहेत.

संस्थेमार्फत १७१ एक तुकडी शाखांमध्ये मिनी गुरुकुल प्रकल्प सुरु आहेत.त्यापैकी ५४ शाखा दुर्गम आहेत. या शाखातील विद्यार्थ्यांची, पालकांची परिस्थिती गरीब व हलाखीची आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या पालकांकडे मोबाईल व इंटरनेट सुविधा फारशी उपलब्ध नसल्याने दुर्गम भागातील ५४ शाखांतील विद्यार्थी कोविड-१९ काळात शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून एकूण १९० टॅबची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे ही समाधानाची बाब आहे.

जागतिकीकरणाच्या काळामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण ठरत आहे. विज्ञान शिक्षणाने लोककल्याणाची अनेक कार्ये प्रभावी व सुलभतेने होण्यास मदत होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, वैज्ञानिक दृष्टी व विवेक निर्माण होण्याच्या दृष्टीने वैज्ञानिक संशोधन, विज्ञानातील नवनवीन संकल्पनांना तंत्रज्ञानात रुपांतरीत करुन त्याचा उपयोग लोककल्याणासाठी व्हावा हा उदात्त हेतू ध्यानात घेऊन स्थापन झालेल्या रयत विज्ञान प्रकल्पाच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत. केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पामधून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यामध्ये सर्जनशीलता,कल्पकता तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण

करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीयुक्त विज्ञान प्रात्यक्षिके, नवीन तंत्रज्ञान,संशोधन वृत्ती यामध्ये वृद्धी करण्यासाठी व विविध कौशल्ये विकसित करणेसाठी 'अटल टिकरिंग लॅबची' उभारणी करण्यास आर्थिक मदत दिली जाते. आजतागायत २०१ शाखांमध्ये 'अटल टिकरिंग लॅब' मंजूर असून लॅबसाठी आयोगाकडून प्रत्येकी २० लाखांचे अनुदान टप्प्याटप्याने प्रत्येक शाखेस मिळत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली तसेच राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाअंतर्गत संस्थेच्या महाविद्यालयारना रु. ८,५१,००,०००/- (रु.आठ कोटी एकावन्न लाख फक्त) तसेच क्रीडा अनुदानाअंतर्गत रु. ५२,९०,४४४/- (रु.बावन्न लाख नव्वद हजार चारशे चौव्वेचाळीस फक्त) प्राप्त झाले आहेत.

कोविड-१९ महामारीमुळे उद्भवलेल्या संकटाचा सामना करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने राष्ट्रीय व सामाजिक बांधीलकीची जपणूक करीत संस्थेतील रयत सेवकांचा एक दिवसाचा पगार रु. २,७५,९२,८२१ इतक्या मदतीचा धनादेश संस्थेचे अध्यक्ष मा. शरदरावजी पवारसाहेब यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता मा. मुख्यमंत्री यांच्याकडे सुपूर्द केला आहे. तसेच रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थी व हंगामी सेवकांच्या कोरोनावरील उपचारासाठी होणाऱ्या खर्चास हातभार लावता यावा या उदात्त हेतूने संस्थेकडून रयत कोरोना हेल्पिंग डेस्क मार्फत आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी संस्थेच्या सेवकांनी अर्ध्या दिवसाचा पगार देऊन रु. १,१७,९०,३९५/- इतका निधी उभारला आहे. कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संकटकाळात संस्थेचे अध्यक्ष आम्हा सर्वांचे मार्गदर्शक मा.शरदरावजी पवारसाहेब यांच्या मार्गदर्शनानुसार रयत शिक्षण संस्थेच्या कार्यक्षेत्रातील निवडक ३८ शाळा व महाविद्यालयामध्ये कोविड-१९ मदत केंद्रे उभारण्यात आली आहेत. रयत सेवक, विद्यार्थी यांना मदतीचा हात देण्यासाठी रयत कार्यकर्ते, हितचिंतक नि:स्वार्थपणे काम करीत आहेत.

ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी देणगीदारांना 'Give me waste land we will turn it into best land 'असे आवाहन केले होते. यामागे शाश्वत व चिरंजीवी विकासाची दूरदृष्टी होती. आजपर्यंत रयत शिक्षण संस्थेस देणगी व बक्षीसपत्राच्या माध्यमातून ६८५ हेक्टर ०५ आर जमीन प्राप्त झाली आहे. त्यापैकी ५४० हेक्टर ३९ आर जमीन लागवडीखाली आणली जात आहे. पुढील काळात विविध शाखांमध्ये कृषी तंत्रनिकेतने सुरु करण्याचा संस्थेचा मानस आहे.

या शैक्षणिक वर्षामध्ये संस्थेच्या १४८ विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये प्लेसमेंट झाली आहे, ही आपणा सर्वांच्यासाठी आनंददायी घटना आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०१९ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतूदीविषयक तसेच सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत येणाऱ्या समस्यांबाबबत अनेक महाविद्यालये व माध्यमिक विद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे व वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,ज्येष्ठ विचारवंत, प्रा.डॉ.एन.डी.पाटीलसाहेब यांना रयत शिक्षण संस्थेसाठी प्रदीर्घ व नि:स्वार्थपणे दिलेल्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी जवळपास सात दशके मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,चेअरमन व उपाध्यक्ष या पदांच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत. कर्मवीरांचा प्रेरणादायी श्वास लाभलेल्या प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्यासारख्या ग्रामीण,श्रमकरी, कष्टकरी व बहुजन समाजात शिकणाऱ्या पहिल्या पिढीसाठी रयत शिक्षण संस्था आधारस्तंभ राहिली आहे. राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील नव्या पिढीसाठी त्यांचा आदर्श अनुकरणीय आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या कमवा आणि शिका या महत्वाकांक्षी योजनेमधून शिक्षण घेऊन स्वत:च्या कष्टावर ज्यांनी उद्योगक्षेत्रात नावलौकिक मिळविला असे संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य,माजी खासदार मा.रामशेठ ठाकूर यांना दै.शिवनेरच्या वतीने कोविड-१९ काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल कोरोना देवदूत म्हणून महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा.भगतसिंह कोश्यारी यांच्या शुभहस्ते

गौरविण्यात आले. रयत शिक्षण शिक्षण संस्थेची सामाजिक व राष्ट्रीय बांधीलकी मा.रामशेठजी ठाकूर यांच्या कार्यातून दिसून येते. याचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो.

संस्थेचे चेअरमन मा.डॉ.अनिल आप्पासाहेब पाटील यांची कोविड–१९ च्या लॉकडाऊन परिस्थितीमुळे शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करुन त्या सोडवण्यासाठी नियुक्त केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय शैक्षणिक सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली, संस्थेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष मा.प्रा.डॉ.एन.डी.पाटील व जनरल बॉडी सदस्या मा.सौ.सरोज नारायण पाटील (माई) यांना शरद –प्रतिभा हा पहिला पुरस्कार मिळाला. संस्थेचे उपाध्यक्ष स्व.गणपतराव देशमुख यांना आबासाहेब वीर सामाजिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे, तर मा.आमदार चेतन विठ्ठल तुपे यांची महाराष्ट्र राज्य मराठी भाषा समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा.डॉ.मोहन आप्पासाहेब पाटील यांना लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार, मा.शशिकांत शिंदे यांची महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेवर निवड,मा.रामराव कृष्णा शिंदे यांना गोवा स्वातंत्र्य सैनिक म्हणून महामहीम राष्ट्रपती यांच्या हस्ते गौरव,मा.अरुण गणपती लाड यांची पुणे पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेवर निवड या सर्वच घटना आम्हा सर्वांसाठी अभिमानाच्या आणि गौरवास्पद अशाच आहेत.

संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या वाटचालीत आर्थिक तरतूद ही अत्यंत गरजेची बाब आहे. संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाकडून रु. ११ कोटी मदत प्राप्त झाली. त्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री,मा.उपमुख्यमंत्री,मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांचे संस्थेच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. थोर देणगीदार,रयत हितचिंतक, कार्यकर्ते, सेवक यांच्याकडून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे अनेक दुर्बल शाखांना शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करुन देत आहोत. संस्थेतील रयत सेवकांच्याकडून मिळणाऱ्या कृतज्ञता निधी व कर्मवीर निधीच्या माध्यमातूनही सदर सुविधा निर्माण करण्यासाठी हातभार लागत आहे. त्याबद्दल सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक व इतर सर्वच देणगीदारांचे आभार व्यक्त करतो.

हा शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावत असताना या प्रवासात आमच्या अंत:करणाला वेदना देणाऱ्या काही प्रसंगानाही आम्हाला सामोरे जावे लागले. संस्थेचे काही जनरल बॉडीचे सदस्य,हितचिंतक,थोर देणगीदार आणि कार्यकर्ते यांचे दु:खद निधन झाले. संस्थेच्या उभारणीत या सर्वच मान्यवरांनी दिलेले योगदान चिरंतन आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा हा वटवृक्ष पुढे घेऊन जाण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चेअरमन, जनरल बॉडी सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, संस्थेचे सहसचिव, ऑडिटर, विभागीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष, विभागीय आधिकारी, आजीव सदस्य सभासद, रयत सेवक, संस्था हितचिंतक, कार्यकर्ते, यांप्रमाणेच थोर देणगीदारांचे बहुमोल योगदान लाभले आहे.

**प्रि.वसंतराव सावळाराम रोकडे**
माजी प्राचार्य,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

## मागे वळूनी पाहता...

स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर 'सुवर्ण महोत्सवी वर्षी' श्रीरामपूरहून आलेल्या पत्रातील या सुरुवातीच्याच शब्दांनी काळाच्या ओघात धूसर झालेल्या बी.एड. कॉलेजच्या आठवणींचा कप्पा पावसाळ्यात अंधारलेला आसमंत ज्याप्रमाणे ढगाआड लपलेला सूर्य बाहेर येताच लख्ख प्रकाशाने उजळून निघतो त्याप्रमाणे उजळून निघाला. सन १९६९ बोरावके कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर असताना प्राचार्य गनीसाहेब आत्तारांच्या मार्गदर्शना खाली शिक्षणशास्त्र महाविद्यालयासाठी केलेली पूर्वतयारी, पुणे विद्यापीठाकडे केलेला अर्ज,विद्यापीठाच्या कमिटीकडून झालेली पाहणी,मिळालेली परवानगी. तद्नंतर प्रथम प्राचार्य या नात्याने स्वीकारलेला पदभार, महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी म्हणजेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी झोकून देवून निष्ठापूर्वक केलेले काम, राबवलेले विविध उपक्रम, संस्थेच्या सहसचिवपदी रुजू होण्यासाठी घेतलेला निरोप... एक ना अनेक प्रसंग चलचित्राप्रमाणे डोळ्यासमोर सरकू लागले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेमतेम दोन दशकानंतरचा काळ.. देशाभरात प्राय:महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार अधिक प्रमाणात होण्यास प्रारंभ झाला.शिकलेल्या मुलांना लगेच नोकरी मिळू लागल्याने आपण मुलांना शिकवले पाहिजे ही जाणीव ग्रामीण भागातील पालकांत निर्माण झाली.आपल्या गावतही चांगली शाळा आसावी असे सर्वांना वाटू लागले. संस्थेचे संस्थापक कर्मवीर आण्णा यांनी महात्मा गांधींच्या हत्येनंतर आयोजित करण्यात आलेल्या श्रध्दाजंली सभेत १०१ माध्यमिक शाळा महाराष्ट्रात सूरु करुन त्यांना महात्मा गांधी विद्यालय असे नाव देण्याची घोषणा केली होती. या सर्वाचा परिणाम होऊन सर्वत्र अगदी छोट्या गावातही माध्यमिक विद्यालये सुरु झाली व त्यासाठी माध्यमिक शिक्षकांची आवश्यकता भासू लागली.पदवीधर शिक्षक फारसे मिळत नसल्याने ही उणीव भरुन काढण्यासाठी संस्थेने महाविद्यालयामार्फत टी.डी.चे वर्ग सूरु केले होते. शासनानेही एस.टी.सी.,सी.पी.एड. यासारखे कोर्सेस सुरु करुन ही उणीव भरुन काढण्यासाठी प्रयत्न चालवले होते.हे कोर्सेस पूर्ण करणाऱ्यांना माध्यमिक शिक्षक म्हणून लगेच नेमणूकाही मिळू लागल्याने या कोर्सेसना पुरेसे विद्यार्थी मिळू लागले.

कालांतराने महाराष्ट्र शासनाने रुपये बाराशेचे आत उत्पन्न आसणाऱ्या पालकांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याचे धोरण अवलंबल्याने बहुतेक मुले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करुन पदवी संपादन करु लागली. त्यामुळे वरील कोर्सेसना येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होऊ लागली. परिणामी यासारखे कोर्सेस हळूहळू बंद पडू लागली आणि शिक्षकांची कमतरतता भासू लागले. त्यामुळे अप्रशिक्षित पदविधरांना नियुक्ती देण्याबाबत शासनाकडून परवानगी देण्यात आली. मात्र त्यांना पाच वर्षात प्रशिक्षण पदवी संपादन केली पाहीजे अशी अट घालण्यात आली होती. पदवीधरांना ट्रेंड करण्यासाठी लागणाऱ्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची संख्या अत्यंत अपुरी होती. पुणे, कोल्हापुर, सातारा आणि मुंबई या शहरात शासनाची व खाजगी संस्थांची काही महाविद्यालये होती. ट्रेंड शिक्षकांची आवश्यकता मोठ्या प्रमाणात होतीचं.

संस्थेच्या शाळा उत्तर विभागात म्हणजे नगर व नाशिक जिल्हात भरपूर प्रमाणात होत्या. त्यांच्यासाठी व इतरांसाठी शिक्षण शास्त्र महाविद्यालय उत्तर विभागात असावे असे काहीना वाटू लागले. बोरावके महाविद्यालयात टी.डी.चा वर्ग अनेक वर्षे चालू होता तो १९६८ साली बंद करावा लागला व तेथील प्राध्यापक वर्ग सातारा येथे असणाऱ्या आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये काही प्रमाणात सामावून घेण्यात आला तर काहींना नाईलाजास्तव हायस्कूलवर शिक्षक म्हणून पाठविण्यात आले.विभागाचे ग्रंथालयही होते त्याचे काय करावयाचे ? हा प्रश्न उपस्थित झाला. तसेच बोरावके महाविद्यालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाल्याने बी.एड.कॉलेजसाठी काही वर्ग उपलब्ध होण्यासारखी परस्थिती निर्माण झाली. यासर्व घटनाक्रमामुळे व साधनांची उपलब्धता जाणवल्याने श्रीरामपूर येथे बी.एड कॉलेज सुरु करता येवू शकेल असा विचार प्राचार्य आत्तार यांच्या मनात डोकावला व तसा प्रस्ताव त्यांनी संस्थेकडे पाठवला. सदर प्रस्ताव संस्थेची मंजूरी मिळाल्याने विद्यापीठाकडे अर्ज करण्याचे ठरवले.बी.एड. महाविद्यालय सुरु करण्यासाठी लागणाऱ्या पूर्वतयारीची जबाबदारी प्राचार्य आत्तार यांनी माझ्यावर सोपवली असली तरी दैनंदिन कामे सांभाळूनच हे काम पार पाडावयाचे होते. त्यानुसार वेळेचे नियोजन करुन महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज करण्यसाठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन अर्ज करण्यात आला. त्याची छाननी होऊन परवानगी घ्यावी किंवा नाही यासाठी उपलब्ध सुविधांची पाहणी करण्यासाठी विद्यापीठाने कमिशनची नियुक्ती केल्याचं पत्र लवकरच महाविद्यालयाला आले. त्यादृष्टीने तपास तयारीस प्रारंभ झाला. बोरावके महाविद्यालयाचा इमारतीचा एक विभाग या नियोजित बी.एड. कॉलेजसाठी देण्याचे निश्चित करण्यात आले. प्राचार्याच्या नियुक्ती संदर्भात संस्थेकडून निश्चित असे धोरण ठरलेले नव्हते. प्राचार्यांची नियुक्ती नंतर करण्यात येईल असे प्राचार्य आत्तार यांना कळविण्यात आले व या मुद्यावरुन कमिशनने परवानगी नाकारु नेये याची त्यांना काहीशी काळजी वाटू लागली. प्राचार्य पदासाठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमाचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या असे निदर्शनास आले की शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून मान्यतेसाठी पात्र असणारी कोणतीही व्यक्ती प्राचार्य म्हणून काम करु शकते. प्रोफेसर होण्यासाठी विषयातील किमान व्दितीय श्रेणी व असिस्टंट प्रोफेसर म्हणून तीन वर्षाचा अनुभव व एकूण पाच वर्षाचा विद्यालयातील अनुभव ही प्रात्रता गृहीत धरली जाते. त्याच बरोबर बी.एड., एम.ए.व एम.एड.ला किमान व्दितीय श्रेणी व माध्यमिक विद्यालयात मुख्यध्यापक म्हणून सात वर्षाचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून नियुक्त होण्यास पात्र असते म्हणजेच पर्यायाने प्राचार्य पद नियुक्त होण्यास विद्यापीठ नियमानूसार पात्र होते. त्यानुसार त्यांनी मला बोलावून घेतले व सविस्तर चर्चा केली.

प्राचार्याची नियुक्ती केलेली नाही. या मुद्यावरुन विद्यापीठाने परवानगी नाकारु नये असे मला वाटते. तुमच्या जवळ प्रोफेसर होण्यासाठी म्हणजेच पर्यायाने प्राचार्य होण्यासाठी आवश्यक पात्रता असल्याने कमिशनच्या भेटीच्या वेळी तुमचे नाव सूचवणे संयुक्तिक ठरेल.आणि परवानगी मिळाल्यानंतर पुढे काय करायचे ते संस्थेच्या धोरणानुसार ठरेल असे ते म्हणाले. मला ही त्यात काही वावगे वाटले नाही. कारण कोणत्यातरी बी.एड. महाविद्यालयात काम करणारी व्यक्ती प्राचार्यपदी नेमली जाणार हे उघड होते.

विद्यापीठाकडून कळविण्यात आलेल्या तारखेला विद्यापीठाचे कमिशन आले.त्यांनी सर्व पाहणी केली. इमारत,वसतीगृह,ग्रंथालय आदी बाबींची उपलब्धता पाहून कमिशनने समाधान व्यक्त केले. प्राचार्याच्या नेमणूकीबाबत विचारणा केली असता माझे नाव पुढे करण्यात आले.शैक्षणिक पात्रता व नियमानुसार माध्यमिक विद्यालयातील दहा वर्षे मुख्याध्यापक म्हणून असणारा अनुभव प्रोफेसर व प्राचार्य म्हणून नियुक्त होण्यासाठी योग्य आहे. असे मत कमिशनने व्यक्त केले. महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाने परवानगी द्यावी अशी विद्यापीठाकडे शिफारस करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनामुळे मोठ्या उत्साहाने ''आता जून १९७०पासून महाविद्यालय सुरु करण्याच्या तयारीला लागा. '' अशी सूचना प्राचार्य आत्तार यांनी मला दिली.कमिशन येवून गेल्यानंतर दोन तीन दिवसांनी मुंबई व पुण्याच्या प्रमुख वृत्तपत्रातून बोरावके महाविद्यालयातील प्राध्यापक रोकडे यांची बी.एड.महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती अशी ठळक मथळा आसणारी बातमी प्रसिध्द झाली.

त्यामुळे सर्वत्र संस्थेत व परिसरात तो चर्चेचा विषय झाला आणि संमिश्र प्रतिक्रीया ऐकावयास मिळू लागल्या. पुणे विद्यापीठाने १९७० पासून महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी दिली असली तरी समोर मुख्य प्रश्न भेडसावत होता तो या उभारणीसाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीचा. प्राचार्य आत्तार यांना वस्तुस्थितीची पुर्णत: जाणीव आसल्याने त्यांनी बोरावके कॉलेजच्या इमारतीचा एक भाग,बोरावके कॉलेजच्या वसतीगृहातच बी.एड.च्या विद्यार्थ्यांना प्रवेश, टी.डी.विभागचे ग्रंथालय,याबरोबरच उसनवार म्हणून रु.२५०००/- देण्याचे मान्य केले.''कामास अतिशय जोमाने प्रारंभ करा व महाविद्यालयाला उत्कृष्टपणे चालवा.'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

परत पहिल्यापासून श्रीगणेशा!! प्रशासनाला व नवनिर्मितीला प्रारंभ .. संस्थेनी सोपविलेल्या या महत्वाच्या जबाबदारीने हिंदी विषयात पीएच.डी. करायचा विचार आता मागे पडला. आता फक्त एकच विचार शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या उत्तम वाटचालीचा.

'सदैव सैनिका पुढेच जायचे, न मागुती तुवा कधी फिरायचे' या निर्धाराने वाटचाल करणे आवश्यक होते. १५ मे १९७० रोजी प्राचार्य म्हणून हजर होण्यासाठी बोरावके कॉलेजच्या इमारतीच्या एका विभागातून दुसऱ्या विभागात प्रवेश करुन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तात्पुरत्या उभारलेल्या कार्यालयात प्राचार्यांना खुर्चीवर स्थानापन्न होवून अधिकृतरीत्या कामकाजास प्रारंभ केला. इमारत स्वतंत्र वाटावी त्यासाठी पार्टीशन करुन ती स्वतंत्र केली गेली. बी.एड.सिल्यॅबसच्या प्रती मागावून अभ्यासास प्रारंभ केला.त्यानुसार प्रत्येक विषयासाठी आवश्यक त्या संदर्भ ग्रंथाची यादी तयार करुन ऑर्डर्स नोंदवल्या. फर्निचरची ऑर्डर नोंदवली.या सर्व गोष्टी १५ जून पुर्वी पुर्ण होणे आवश्यक असल्याने त्यादृष्टीने नियोजन करुन शैक्षणिक व इतर मासिकांच्या वर्गण्या भराल्या.त्यामुळे जुलै महिण्यापासून ती नियमीतपणे येऊ लागली. शिक्षणाधिकारी,जिल्हापरिषद अहमदनगर यांच्या कडे विद्यापीठाकडून माहिती गेल्यानंतर त्यांनी ६३ विद्यार्थ्यांना डेप्युटेशनवर नियुक्ती दिली. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना विद्यार्थ्यांची सर्वांगीण माहिती प्राप्त व्हावी या हेतूने प्रवेश अर्ज तयार केला. त्यात - १.शिक्षणक्रम कसा पूर्ण केला? २.कौटुंबिक पार्श्वभूमी ३.जीवनाबद्दलचा दृष्टिकोन ४.भावी आशा -आकांक्षा याबद्दलची माहीती प्राप्त होईल अशी योजना केली. त्यामुळे माहिती भरताना विद्यार्थ्यांना तांत्रिक माहितीबरोबरच स्वत:बद्दलची माहिती खूप विचारपुर्वक भरावी लागे. अर्ज वाचल्यानंतर विद्यार्थ्यांचे सर्वकष व्यक्तिमत्व ज्ञात होण्यास मदत होई.

प्रवेश देण्यास प्रारंभ झाला. १५ जूनच्या आत सर्वांनी प्रवेश घ्यावेत अशी सूचना करण्यात आली होती. त्यामुळे ९५% प्रवेश मुदतीत पूर्ण झाले. वेळापत्रकानुसार कामकाजास प्रारंभ झाला. स्टाफची पूर्तता झाल्याने विषय व इतर कामकाजाची विभागणी, प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका,गुणदान योजना यांची माहीती दिली बी.एड.अभ्यासक्रमात शैक्षणिक मानसशास्त्र, तत्वज्ञान, अध्यापनाची मूलतत्वे, शालेय प्रशिक्षण व स्पेशल मेथड्स या विषयाचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी व्याख्यानांना नियमीतपणे उपस्थित राहवे यासाठी प्रत्येक तासास हजेरी घेणे आवश्यक होते. पहिल्या पंधरा दिवसात कॅटलॉग न पाहता क्रमांकानुसार नाव उचारुन मी विद्यार्थ्यांची हाजेरी घेत असे. त्याचा चांगला परिणाम झाला.

प्रत्येक विषयाच्या दोन ट्युटोरियल्स प्रत्येक सहामाहीत विद्यार्थ्यांनी लिहावीत आशी योजना तयार करण्यात आली. प्रत्येक ट्युटोरियलसाठी तीन प्रश्न दिले जात. पंधरा दिवस आगोदर प्रश्न समजल्याने त्यांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळत असे. ठराविक दिवशी परीक्षेच्या वातावरणात तीन प्रश्नांपैकी एक प्रश्न दिला जाई. तीस मिनिटात त्या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांनो लिहावे लागे. ते उत्तर तपासून ट्यूटोरियल शीट विद्यार्थ्यांना परत दिले जाई. या पध्दतीमुळे प्रत्येक विषयाचे १२-१२ प्रश्न विद्यार्थ्यांना अभ्यासावे लागत व आपोआपच सहामाही व पूर्वपरिक्षेचा अभ्यास आणि लिखाणाचा सरावही होत असे. या परिक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून त्या विद्यार्थ्यांना परत केल्या जात. मी स्वत: विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेत असे. मार्गदर्शन करणे, अडीअडचनी समजून घेणे व अधिक उत्साहाने काम करण्यास प्रवृत्त करणे या बाबीवर भर देत असे. वेळेचे नियोजन

कसे करावे. याचे मार्गदर्शन करीत असे.कार्यवाही होते किंवा नाही याकडे लक्ष पुरविले जाई.

अभ्यास कसा करावा यासंबधी मार्गदर्शनात मानसशास्त्रीय दृष्टीकोन, स्मरण-विस्मरण, मानसिक संतुलन, वाचनाच्या पध्दती, टिपणे काढणे यांचा समावेश असे.दिवस व रात्र आभ्यासिका सुरु करण्यात आली. रात्र अभ्यासिकेत पुस्तकाचे काही संच ठेवण्यात आले.अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थ्यां पेक्षा ४ % गुण जास्त मिळालेले आढळून आले.विद्यार्थ्यी,पालक व इतर घटक या सर्वांच्या प्रयत्नांनी महाविद्यालयाचा पहिल्या वर्षांचा निकाल -९९% लागला. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिल्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकाने तीन विद्यार्थ्यी चमकले. महाविद्यालयाचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. विद्यापीठ क्षेत्रात हे महाविद्यालय एक आग्रेसर महाविद्यालय म्हणून ओळखले जाऊ लागले.

महाविद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी महाविद्यालयास कोणा व्यक्तीचे नाव द्यायचे असे आदेश नसल्याने प्रारंभी 'शिक्षणशास्त्र महसविद्यालय' असे नाव देण्यात आले होते. श्रीरामपूर परिसरात नाऊर येथे थोर स्वांतत्र्यसैनिक स्वामी सहजानंद हे आश्रम स्थापन करून वास्तव्यास होते.१९२१ ते १९५५ या कालावधीत त्यांनी काँग्रेसचे नेतृत्व केले होते. स्वातत्र्यानंतरही त्यांनी १९५५ पर्यंत काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडली. मात्र १९५५ साली त्यांनी राजकारणातून निवृत्त होऊन अध्यात्मिक क्षेत्रात कार्यमग्न राहुन आपला उर्वरित काळ व्यतीत केला.त्यांनी अनेक कार्येकर्ते निर्माण केले.भास्करावजी गंलाडे पाटील,शंकररावजी काळे, शंकररावजी कोल्हे, आमदार बारहाते हे त्यातले प्रमुख होते.त्यांना मानणाऱ्या कार्यकर्त्यांचा फार मोठा वर्ग श्रीरामपूर परिसरात कार्यरत होता.श्रीरामपूर येथे जनता विद्यालयाच्या परिसरात स्वामींच्या वास्तव्याची सोय भास्करराव गंलाडे पाटील यांनी अशोक सहकारी साखर कारख्याच्या वतीने केली होती.१५ ऑगस्ट १९७१ रोजी स्वातंत्र्यदिनाचा सोहळा चालू असतानाच त्यांनी देहत्याग केला.२८/८/१९७१ रोजी नाऊर येथे भरलेल्या सभेत चर्चा होऊन स्वामींच्या स्मारक संबंधीचा विचार पुढे आला. श्रीरामपूर येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयास स्वामीजीचे नाव देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. तसा ठराव रयत शिक्षण संस्थेस पुढील कार्यवाहीसाठी पाठविला.२९ ऑगस्ट १९७१ रोजी मॅनेजिंग कौन्सिलने त्यास संमती दिली.सदर मान्यते नंतर महाविद्यालयास 'स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय' असे नाव प्राप्त झाले.एका निस्पृह आणि निष्ठावान स्वांतत्र्य सैनिकाचे स्मारक या महाविद्यालयाच्या रुपाने उभे राहिले.

शैक्षणिक संशोधनातून निर्माण झालेली पाठपध्दती ही चेष्टेचा विषय समजली जाई. येथील वर्षभरातील सर्वकाही परिक्षेनंतर विसरुन जायचे अशी धारणा घेऊनच बी.एड.पदवीसाठी अभ्यास करणाऱ्यांकडे बहुतांश विद्यार्थ्यांचा कल असे. आपणास काही मिळवायचे आहे या उद्देशाने येणारे 'अल्पसंख्य' या सदरात मोडत. हा दृष्टिकोन बदलवा यासाठी उदघाटनपर भाषणात कोर्सची माहिती, वर्षभरात पार पाडायच्या जबबादाऱ्या, त्यांच्या माहीती बरोबरचं प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांस स्वत:करावा लागणारा खर्च, महाविद्यालय चालवण्यासाठी शासन व परिसरातील जनतेस करावा लागणारा खर्च प्रती विद्यार्थी रु.१५,०००/- रुपये येतो, याची कल्पना दिली जाई. हा पैसा सर्व सामान्य जनतेने दिलेल्या करातून खर्च होतो. महाविद्यालयातील सर्व उपक्रम त्यांच्या हितासाठीच आहे हे वारंवार त्यांच्या मनावर बिंबवण्याचे प्रयत्न केले जात. दहा महिण्याच्या कालावधीत असे चार ते पाच व्याख्याने मी देत असे. यश हे प्रयत्नसिध्द आहे याची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी म्हणून स्वकष्टाने जीवनात यशस्वी झालेल्या परिसरातील व्यक्तिचे स्वानुभव कथनाचे कार्यक्रम त्याच्यासाठी आयोजित केले जात.१५ऑगस्ट,२६ जानेवारी हे राष्ट्रीय उत्सव,निवडक महापुरुषाच्या जयंत्या, सांस्कृतिक कार्यक्रम, काही निवडक लेखांचे सामुहिक वाचन याव्दारे विद्यार्थ्यांना सकारात्मक विचाराकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न चालू ठेवले. ''

'गार्शीयाला निरोप कोण पोहचवेल?' हा जगातील प्रमुख भाषांत भाषांतरित होऊन प्रकाशित झालेला लेख वाचनात आला.किर्लोसकर मासिकाकडून ५०० प्रति मागून त्या ग्रंथालयात ठेवण्यात आल्या. प्रत्येक विद्यार्थ्यांस एक प्रत भेट म्हणून महाविद्यालयाच्या वतीने देण्याची प्रथा पाच वर्ष

चालू ठेवली.३०नोव्हेंबर १९७५ रोजी महाविद्यालयाच्या कामकाजाच्या स्वरुपाबद्दल पत्रकार श्री.ह.शं.भदे लिखित (रसे बोलते है डिसिप्लिन.) या शीर्षकाचा लेख साप्ताहिक मनोहरमध्ये प्रकाशित झाला. सदर लेख सर्वांच्या चर्चेचा विषय बनला. तो वाचून ठिकठिकाणाहुन अभिनंदनपर पत्रे आली. नाशिक-हुन रेव्हरंडटिळक यांचे नातू श्री.अशोक देवदत्त टिळक यांनी रसग्रहनपर पत्र लिहुन त्यांनी संपादित केलेल्या 'लक्ष्मीबाई टिळकाचे आत्मचरित्र' ची प्रत भेट म्हणून पाठविली. महाविद्यालयास भेट देण्याची इच्छा प्रदर्शित केली.

महाविद्यालयातील उपक्रम, वातावरण हे उत्तेजनात्मक व हितकारक असल्याने आपण त्याचा स्वहितासाठी उपयोग करुन घेतला पाहिजे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये विकसित होत गेली. वार्षिक परिक्षेचे निकालही सकारात्मक निर्माण होण्यास सहाय्यभूत झाले. ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन साजरा केला जाई.त्यावेळी गतवर्षी वार्षिक परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादित आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात येत असे.सत्कार प्रसंगी सत्कारमुर्ती यांनी प्रशिक्षण कालावधीत प्राप्त झालेल्या अनुभवांचा उपयोग दैनंदिन अध्यापनात करुन काही विशेष प्रयोग केले असतील तर त्यांची माहिती प्रशिक्षणार्थींना द्यावी अशी अपेक्षा असे. महाविद्यालयाने सर्वांना समान न्याय, क्षमाशील वृत्ती, प्रगतीसाठी प्रोत्साहन, गुणवत्तेचे कौतुक या धोरणाचा स्वीकार केल्याने वातावरण निरामय होऊ लागले.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात विषय ज्ञानाचा सामावेश नव्हता. पण गरज भासत होती म्हणून प्रत्येक विषयासाठी विषय ज्ञानाचा अभ्याक्रम तयार केला व विषय ज्ञानाचे अध्यापन केले जाऊ लागले. कालांतराने बी.एड. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना विदूयापीठानेही विषय ज्ञानाचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत करुन अध्यापन पध्दती साठी ५० गुण व विषय ज्ञानासाठी ५० गुण असा स्वतंत्र पेपर सुरु केला.विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर आवांतर वाचनाची सवय लागावी यासाठी त्यांनी महिन्यातून किमान दोन पुस्तके वाचावित असे त्यांना सांगण्यात आले होते. वर्षा अखेरीस मुलाखतीच्यावेळी या संदर्भात बहुसंख्य विद्यार्थ्यांना फारशी माहिती देता येत नसे.दैनंदिनीत काही कोऱ्या पानांचा समावेश करण्यात आला होता. प्रत्येक आठवड्यात मासिकातून वाचलेल्या लेखापैकी आवडलेल्या लेखाचा सारांश लिहिण्याची, महिण्यातून वाचणाऱ्याला एका पुस्तकाचा आशय लिहिण्याची प्रथा सुरु करण्यात आली. महिण्यातून शेवटच्या तारखेस सर्व विद्यार्थ्यांसमोर आपण वाचलेल्या पुस्तकाविषयी माहिती देण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला.

आठवड्याचा प्रारंभ (जन गण मन ) या राष्ट्रगीताने व समाप्ती (वंदे मातरम) या गीताने व्हावी अशी योजना तयार करण्यात आली.प्रारंभी रेकॉर्ड प्लेअरच्या साह्याने व दोन महिन्यानंतर रेकॉर्ड प्लेअर शिवायही विद्यार्थी एका तालासुरात राष्ट्रगीताचे गायन करु लागले. विद्यार्थ्यांची ५ गटामध्ये विभागणी करुन प्रत्येक गटाने स्वत:चे एक समुहगीत व एक राष्ट्रभक्तीतीपर गीत निवडून त्याचे सामूहिक गायन करायचे असे निश्चित करण्यात आले. गटवार विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यास प्रोत्साहन दिले दिले. वक्तशीरपणा व वेळेचे महत्व समजून घेणे, त्याप्रमाणे प्रत्येकाने वागावे या बाबीवर कटाक्षाने लक्ष दिले जाई.शाळा व महाविद्यालय येथेच ही सवय लागली व रुजली तरच ते संस्कार घेऊन पुढील जीवनात नियमितपणे पालन होऊ शकेल या दृष्टीने हा उपक्रम सुरु केला. एका कार्यक्रमात प्रवरा कारखान्याचे अध्यक्ष खासदार श्री.बाळासाहेब विखे पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते.नियोजनानुसार पार पडलेला कार्यक्रम बघून खासदारांनी सर्वाचे कौतुक व अभिनंदन केले.चहा पाण्याच्या वेळी स्टाफची व विद्यार्थ्यांची मुक्तकंठाने स्तुती केली. प्रशिक्षण महाविद्यायाच्या उद्दिष्टांमध्ये प्रशिक्षण संशोधन व विस्तार सेवा कार्य यांचा अंतर्भाव होता. परिसरातील शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक घेऊन त्यांच्या समोर ही कल्पना मांडली. त्यांच्या संमती नुसार विद्यार्थ्यांचे हित साधणे हे प्रमुख उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यासाठी अध्यापन विषयक प्रयोग करणे,पाठांत्तर, हस्ताक्षर सुधारणे, इंग्रजी शब्द संग्रह विकास या बाबीकडे प्रारंभीचे कालावधीत लक्ष पुरविण्याचे ठरविण्यात आले.

काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांची बुध्दीमत्ताच कमी असल्याचे मोघम विधान केले. नुसता प्रतिवाद करुन काहीच उपयोग नव्हतो म्हणून एका वर्षी पाचवीच्या एका वर्गातील

विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक काढण्याचे ठरविले. सर्व विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक ९० ते १२० च्या दरम्यान असलेला आढळून आला.योग्य मार्गदर्शन लाभले तर ते किमान उतीर्ण तरी होतील हे पाहण्याची जबादारी आपली आहे. याची प्रशिक्षणार्थींना जाणीव झाली. दरवर्षी वार्षिक परीक्षा संपल्यावर विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशी थांबून घेतले. चहापाणी झाल्यावर त्यांच्याकडून प्राध्यापक, प्राचार्य यांची कथनशैली, विषयाची तयारी, आत्मविश्वास, सुधारणेला वाव,विशेष सुचना याविषयी लिखित स्वरुपात मूल्यामापन करावयास सांगितले. विद्यार्थ्यांकडून आपल्या प्रतिक्रिया स्विकारुन आम्ही सर्वांनी खिलाडूपणे स्वपरिवर्तन करण्याचे ठरविले,परिणामी सर्वामध्ये उत्तरोत्तर प्रगती होत गेली.

सूक्ष्म अध्यापन या विषयी १९६० ते १९८० च्या दरम्यान पुण्यात राष्ट्रांनी शिक्षणा विषयी नविन प्रयोग हाती घेतले. स्टनफोर्ड विद्यापीठामध्ये प्रा.ऍलन यांनी १९६३ मध्ये सूक्ष्म पाठाचे आयोजन प्रत्यक्ष विद्यार्थ्यावर केले. प्रशिक्षणार्थी पाच ते दहा विद्यार्थ्यांवर पाच-दहा मिनिटांचा एका कौशल्यावर आधारित पाठ घ्यायचा व इतरांनी त्यावर चर्चा करुन अध्यापनाचा दर्जा सुधारण्यास मदत करायची.मला ही माहिती मिळाल्यावर यावर प्राध्यापकांमध्ये चर्चा घडवून आणली. शिक्षक-विद्यार्थी यामध्ये या तंत्राविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटनमध्ये स्कॉटलंड विद्यापीठात सूक्ष्म अध्यापनासंबंधीतचा प्रयोग चालू होता.त्या विद्यापीठातील प्रा.जॉन डथी यांनी भारतात भेट देऊन भारतातील प्रयोगाची पहाणी केली.पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दोन महाविद्यालये निवडली गेली, त्यापैकी स्वामी सहजानंद भारती महाविद्यालय हे एक होते. त्यांनी सर्व कार्यक्रमाची व्यवस्थित पाहणी करुन ब्रिटीश कौन्सिल मार्फत २५ हजार रुपयांचे ग्रंथ पाठविले. पुढिल दोन वर्षेही शैक्षणिक विषयावरील पुस्तके नियमित पणे पाठविली.

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य म्हणून कार्यरत असताना महाविद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती साधत असतानाच वैयक्तिक विकासाच्या विविध संधी मला प्राप्त झाल्या. रयत शिक्षण संस्थेचा लाईफ मेंबर,लाईफ मेंबर बोर्डाचा सेक्रेटरी, संस्थेचा सहसचिव, पुणे विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभागाचा अधिष्ठाता झालो. तसेच विविध कमिट्यांचे सदस्यत्व प्राप्त झाले.माझ्या सहसचिवपदाच्या काळात प्राचार्य खरात यांनी प्राचार्य निवास बांधले.पुढे प्राचार्य अनारसे यांनी वसतीगृहे, ग्रंथालय, इमारती यांचे बांधकाम स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड्.रावसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करुन घेतले.प्राचार्य नजमा मणेर यांच्या काळात या महाविद्यालयास 'अ'दर्जा दिला.पुणे व शिवाजी विद्यापीठात 'A' Grade मिळवणारे ते एकमेव महाविद्यालय होते.पुढे प्र.प्राचार्या डॉ.शंकरराव गागरे यांनी आपल्या कालावधीत कॉलेज मध्ये विद्यापीठ व युजीसीच्या सहकार्याने सहा वर्ष विविध संशोधन प्रकल्प राबविले.मे १९७० मध्ये स्थापन झाल्यापासून ते आजपर्यंत या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची गुणवत्ता उत्तरोतर वाढती राहिली याचे मनस्वी समाधान आहे.

गेल्या पन्नास वर्षात स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यायातून अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडलेल्या बहुतांशी सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी येथे मिळालेल्या ज्ञान व अनुभवाच्या जोरावर आपल्या समोर असणाऱ्या युवा पिढीला उत्तम शिक्षणाचा, उत्तम जीवनमूल्यांच्या व उत्तम संस्काराच्या माध्यमातून प्रगती पथावर नेण्यात मोलाचा वाटा उचलून एक उत्तम शिक्षक म्हणून नाव कमावलेले आहे.त्यातील काहींनी तर आपल्या आदर्श वागणूकीने विद्यार्थ्यांच्या ह्दयात कायमचे स्थान निर्माण केले आहे.

आज महाविद्यालयाच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात मागे वळून पाहिले असता माझ्या शैक्षणिक कारकिर्दीतील एक महत्वाचा टप्पा म्हणजे स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य पद हे होय असे दिसून येते. मी पदभार सांभाळला त्या काळात असणारी साधनांची उपलब्धता आणि आजच्या काळात असणारी साधनांची उपलब्धता यामध्ये जमीन-आसमानाचा फरक दिसून येतो.

सध्या महाविद्यालयात शिक्षण घेत असणाऱ्या

विद्यार्थ्यांना व शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या भावी पिढीला विज्ञान व तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीचे शिक्षणशास्त्र शिकतांना व त्यानंतर आपला विषय विद्यार्थ्यांना शिकवताना नक्कीच अतिशय फायदा करुन घेता येईल. आपले ज्ञान परिपूर्ण असण्यासाठी व अद्यावत ठेवण्यासाठी आज पुस्तका बाहेर इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञानाचा अमर्याद खजिना उपलब्ध आहे.

पन्नास वर्षापूर्वी जेथे पत्र पोहचवण्यासाठी साधारण महिना लागत असे तेथे इंटरनेटच्या माध्यमातून काही सेंकदात जगभरात कुठेही निरोप पाहचू शकतो. आम्ही राबवलेले उपक्रम प्राय: स्थानिक पातळीवर होते. आज मनात आणले तर बरेचसे उपक्रम आपण जागतिक पातळीवर राबवू शकतो. पूर्वी काही आपवाद वगळता फक्त स्थनिक विद्यार्थी एकत्र येवून कार्यशाळा,वाचन व चर्चासत्रे पार पाडत असत. आज तंत्रज्ञानाचा उपयोग करुन जगभरातील विविध देशातील विद्यार्थी, अध्यापक घरात बसुन ऑनलाईन एकत्र येऊन विचारांचे अदानप्रदान करु शकतात,एखाद्या विषयाचे पुस्तकाचे वाचन करुन त्यावर चर्चा करु शकतात. बदलत्या काळानुरुप उपक्रमांचे स्वरुप बदलत आहे.शिक्षणाची साधने व शिक्षणाच्या पध्दती बदलत आहेत.आजचा शिक्षक आपल्या ठिकाणी असणारी कौशल्ये वापरुन, उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करुन नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणून विद्यार्थ्यांना फक्त परिक्षेत मार्क मिळविण्यासाठी नाही तर जीवनात उपयोगी पडेल असे परिपूर्ण ज्ञान देण्यात नक्कीच यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.विद्यार्थ्यांना त्या त्या विषयातील ज्ञान देण्याबरोबर त्या विषयाचा सखोल अभ्यास कसा करावा याच्या विविध पध्दतीना अवगत करणे, त्यांच्या सर्वगीण विकासाच्या दृष्टीने  विविध उपक्रम राबवणे हे आदर्श शिक्षकाचे लक्षण आहे. यामध्ये केवळ घोकंमपट्टी करुन परिक्षेत मार्क मिळविणे म्हणजे अभ्यास नव्हे हे लक्षात आणून देणे महत्वाचे वाटते.

वाचन,मनन,चितंन,लेखन व आकलन या पध्दती अभ्यास करण्यासाठी आवश्यक आहेत व विद्यार्थ्यांना त्या अंमलात आणण्याची सवय लावण्याची जबाबदारी अर्थातच शिक्षकांची आहे. आपल्या भारत देशात हजारो वर्षापासून टिकून असणारी एक महत्वाची परंपरा म्हणजे 'गुरु – शिष्य परंपरा'. या परंपरेचा पाईक होण्याचे सौभाग्य कर्मवीर आण्णांच्या सान्निध्यात राहुन मला लाभले. आज अभिमानाने सांगावे.. हा माझा विद्यार्थी आहे...ही माझी विद्यार्थीनी आहे. असे आयुष्यात खऱ्या अर्थाने यशस्वी शिष्य मोठ्या प्रमाणात घडविण्याचे सत्कार्य हातून घडले,तसेच कार्य आपणा सर्वांच्या हातून घडावे यासाठी  स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून शिक्षीत होणाऱ्या सर्वाना मनापासून शुभेच्छा !!

शुभम भवतु !!!




महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी मा.प्रिं.ए.डी.अत्तार

# माझे उपक्रमशील महाविद्यालय

**प्रभाकर नानकर**
माजी प्र.प्राचार्य,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

संपूर्ण भारतात ज्या संस्थेचा मोठा नावलौकिक आहे. ज्या संस्थेने ग्रामीण महाराष्ट्रात शिक्षण केंद्रीत केले; ज्या संस्थेने 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या मंत्राचा अहर्निश जप केला व त्याप्रमाणे वाटचाल केली, ज्या संस्थेने खेडोपाडी अज्ञानाचा अंधकार दुर करण्याचा प्रयत्न केला, ज्या संस्थेने अज्ञानी, दरिद्री व गांजलेल्या समाजाला सज्ञानी,सुशिक्षत व सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखविला त्या कर्मवीर पद्मभूषण डॉ.भाऊराव पाटील उर्फ ती.आण्णा यांनी स्थापन केलेल्या 'रयत शिक्षण संस्थेच्या' 'वटवृक्षाच्या' छायेत माझ्या आयुष्याची ३८ वर्षे घालविण्याचे भाग्य मला लाभले.या संस्थेने अनेकांची जीवने फुलविली, सुगंधित केली, त्या अनेकांपैकी मी एक आहे. माझ्या आयुष्यात जे काही थोडे फार यश मिळाले, समाजात सन्मान मिळाला, मुलांना सन्मार्गाला लावता आले ते या संस्थेमुळे, संस्थेच्या सेवकांमुळे व सहकाऱ्यांमुळे म्हणून मी या संस्थेचा अत्यंत ऋणी आहे.

**आजीव सेवकांच्या सहवासात**

तीर्थरुप आण्णांच्या हयातीत ज्यांनी संस्थेत आयुष्यभर राहण्याची व संस्थेच्या ध्येयधोरणानुसार ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचे काम करण्याची, अजीव-सभासदत्वाची शपथ घेतली आहे. मला त्या 'अजीव सभासदांच्या' हाताखाली काम करायला मिळाले, ज्यांच्या परिस्पर्शाने माझ्या जीवनाचे सोने झाले असे मला वाटते, त्यांचा नामोल्लेख करणे आज मला आवश्यक वाटते. कै.मा.आण्णासाहेब मगदूम, कै.बॅ.पी.जी.पाटील, कै.प्राचार्य एस.के.उनउने, कै.मा.प्राचार्य सुमतीबाई पाटील या दिग्गज प्राचार्याच्या हाताखाली काम करावयास मिळाले.ते सर्व आमचे प्रेरणास्त्रोत होते. ते आमचे केवळ प्राचार्यच नव्हते तर प्रेमळ मित्र व सच्चे मार्गदर्शक होते. त्यांच्या बोलण्यातून आणि वागण्यातून वेळोवेळी ती.आण्णांचे मुर्तीमंत दर्शन आम्हाला घडत होते.अत्युच्च पदावर असूनही त्यांचे ठिकाणी असीम वात्सल्य होते, करूणा होती. 'जे जे आपणासी ठावे। ते ते सकाळा शिकवावे। शहाणे करुन सोडावे। सकळजन।।' ही त्यांची वृत्ती होती.'अहंकाराचा वारा' त्यांना कधीच शिवलेला आम्ही पाहिला नाही.असे एकेक अनमोल रत्न ती.अण्णांनी घडविले होते. त्यामुळे आज १०० वर्षानंतरही संस्थेचा कारभार अतिशय उत्तम चालला आहे. समाजाबद्दल खरेखुरे प्रेम व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या लोकशाही तत्वाचा अंगीकार ही ती.अण्णांनी दिलेली शिकवण आचरणात आणण्याचा त्यांनी पुरेपूर प्रयत्न केला.या त्यांच्या संस्कारांमुळे माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली हे प्रांजळपणे कबूल करणेआवश्यक आहे.

**महाविद्यालयाचे नामकरण**

आपल्या महाविद्यालयास,'स्वामी सहजानंद भारती' यांचे नाव दिले आहे. स्वामीजी थोर तत्वचिंतक, कुशल राजकारणी व महान समाजसेवक होते.ते चारित्र्यसंपन्न निष्ठावान व नि:स्पृह कार्यकर्ते होते.राजकारणात राहुनही कोणत्याही उच्च पदाची आपेक्षा त्यांनी बाळगली नाही.अनेक राजकिय नेत्यांना त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.अनेक

युवकांना समाजसेवा करण्याची प्रेरणा दिली. खऱ्या अर्थाने स्वामीजी समाजशिक्षक होते. त्यांनी समाजातील दैन्य, दु:ख व अज्ञान दूर करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.त्यांच्या कार्याचा, समाजसेवेचा व नि:स्पृहतेचा आदर्श संपूर्ण समाजापुढे अहर्निश असावा,विषेशत: भावी काळातील शिक्षक,युवक व नेत्यांपुढे असावा म्हणून संस्थेने त्यांचे नाव या महाविद्यालयास दिले.

**महाविद्यालयाची इमारत**

सुरवातीला आपले महाविद्यालय शेजारच्या रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेजमध्ये भरत होते.बोरावके महाविद्यालयाच्या पूर्वेकडिल बाजूचे दोन मोठे हॉल,तीन रुम्स् व तळघर आम्हास वापरण्यासाठी देण्यात आले होते.एक मोठा हॉल-जनरल लेक्चर हॉल,त्यात १०० विद्यार्थ्यांची बसण्याची सोय (५० बँचेस), दुसऱ्या हॉल मध्ये ३० ते ४० विद्यार्थ्यांसाठी एक वर्ग व अर्ध्या भागात ग्रंथालय, तीन रुम पैकी एक प्राचार्यासाठी, दुसरी कार्यालयासाठी व तिसरी रुम गाईडन्स रुम चार प्राध्यापकासाठी व तळघरात पाच प्राध्यापकासाठी बैठक व्यवस्था व स्टाफ रुम करण्यात आली होती. अशाप्रकारे बोरावके महाविद्यालयाच्या इमारतीत आमचा प्रारंभिक संसार सुरु झाला. ज्या ज्या काही अडचणी येत होत्या त्या अडचणींना पहिले प्राचार्य रोकडे सर यशस्वीरित्या तोंड देत होते. कॉलेजची वाटचाल सुरु झाली.आता सर्वत्र स्वयंपूर्ण व सर्व सोयींनी युक्त महाविद्यायाची देखणी इमारत उभी झाली.या इमारती बरोबर प्रयोगशाळा,स्वतंत्र ग्रंथालय व प्राध्यापकांसाठी स्टाफ रुम व लेडीज रुम उपलब्ध आहेत,विद्यार्थी-विद्यार्थ्यींनीसाठी वसतिगृह महाविद्यालयाच्या परिसरात आहेत. या सर्व महाविद्यालयाच्या भैतिक प्रगतीसाठी कै.मा.ॲड.रावसाहेब शिंदे यांचे मार्गदर्शन व प्राचार्य शंकरराव आनारसे व प्राचार्य ए.पी.खरात यांचे अथक प्रयत्न कारणीभूत आहेत.

**शैक्षणिक गुणवत्ता**

आपल्या महाविद्यालयाने प्रथमपासूनच 'शैक्षणिक गुणवत्तेला' प्राध्यान्य दिले आहे.''राष्ट्राचे भवितव्य शाळेमध्ये आकार घेत आहे,''हा विचार डोळ्यासामोर ठेवून महाविद्यालयाने शिक्षक विद्यार्थ्यांना उत्तमरित्या प्रशिक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. गुणसंपन्न शिक्षकांच्या सहवासात गुणसंपन्न विद्यार्थी तयार होतात, कारण विद्यार्थी हे शिक्षकाचे अनुकरण करतात.विद्यार्थ्यांना समजावून घेणारे, विद्यार्थ्यांच्या अंगी कोणते गुण आहेत,हे पाहुन मार्गदर्शन करणारे विद्यार्थ्यांना सत्कार्यासाठी सतत प्रोत्साहन देणारे, विद्यार्थ्यांना कोणतेही काम निष्ठेने,एकाग्रतेने व मनापासून करण्याची प्रेरणा देणारे,आपले विषय विद्यार्थ्यांना सहजपणे समजेल व त्यांचे ठिकाणी तो विषय अभ्यासण्याची गोडी व जिज्ञासा निर्माण करणारे शिक्षक तयार करणे हे शिक्षण महाविद्यालयाचे मुख्य काम असते. या दृष्टीने आम्ही महाविद्यालयात अनेक उपक्रम राबविले. विद्यार्थ्यांना सक्षम, तत्पर व कुशल अध्यापक बनविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आमच्या महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांस कोणत्याही संस्थेत लगेच नोकरी मिळत होती. आमच्या महाविद्यालयातून बाहेर पडलेला विद्यार्थी हा परिपूर्ण शिक्षक बनला आहे.' यावर अनेक संस्था चालकांचा पूर्ण विश्वास बसला होता, म्हणून आमच्या विद्यालयात बी.एड.साठी प्रवेश मिळावा म्हणून अनेक पद्वीधर तरुण प्रयत्न करीत असत.

**विद्यार्थी विकास योजना**

आमच्या विद्यार्थ्यांचा शिक्षक म्हणून परिपूर्ण विकास व्हावा म्हणून आम्ही काही खास योजना राबवत होतो.त्यातील काही महत्वपूर्ण योजनांचा उल्लेख करणे अवश्यक वाटते.

**विद्यार्थी प्रवेश**

महाराष्ट्र शासनाने व पुणे विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमावली नुसार विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येई.बऱ्याच वेळा काही पालक, प्रवेशोच्छूक विद्यार्थी प्रवेश मिळावा म्हणून काही मान्यवरांची चिठ्ठी, पत्र किंवा तोंडी निरोप घेऊन येत. अशा वेळी पालकांना व मान्यवरांना नाराज करणे कठिण काम होते. परंतु जेव्हा मान्यवरांची भेट होत असे, त्यावेळी ते स्पष्टपणे सांगत,'आम्हाला पालकांच्या समाधानासाठी चिठ्ठी द्यावी

लागते, पण तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे काम करा'. मान्यवरांची अशी भूमिका असल्यामुळे व ते सदैव आमच्या पाठीशी उभे असल्यामुळे 'गुणवत्तेनुसार प्रवेश-प्रक्रिया' राबविणे आम्हाला शक्य होई.

**शैक्षणिक कामकाजाचे नियोजन**

प्रशिक्षण महाविद्यालयात शैक्षणिक कामकाजाचे नियोजन करणे व त्याचे वर्षभर पालन करणे आवश्यक असते.वर्षभरातील एकूण सुट्टयांचा विचार केला तर (५२ रविवार,६० दिवस उन्हाळ्याची सुट्टी,पाठपरीक्षेसाठी व लेखी परीक्षेसाठी-१५दिवस,परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी-१० दिवस,सणवार,जयंत्या,राष्ट्रीय सण-१० दिवस, सहशालेय व संस्कृतिक कार्यक्रम व खेळ-१० दिवस,१५० ते १६० दिवस)महाविद्यालयीन कामकाजासाठी २०० ते २१० दिवस मिळतात.या अल्पकालावधीत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करावयाचे असते.त्यामुळे आता बी.एड. साठी दोन वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

**विद्यार्थी प्राध्यापक परिचय**

महाविद्यालयात कामकाज सुरू होण्यापूर्वी 'विद्यार्थी-प्राध्यापकांचा एकत्रित परिचय' कार्यक्रम आयोजित केला जात असे. त्या वेळी विद्यार्थ्याचा विषय,त्यांनी पदवी परीक्षेत प्राप्त केलेले गुण, त्याच्या आवडी-निवडी-छंद,सहशालेय कार्यक्रम यातून त्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक नैपूण्य व त्याचा दृष्टिकोन लक्षात येत असे.त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य विद्यार्थ्यांना संबोधित करीत. ते संस्थेचे कार्य, महाविद्यालयाची भूमिका व प्राध्यापक यांचा परिचय करून देत.त्यानंतर विद्यार्थ्यांना वर्षभर चालणाऱ्या सर्व शैक्षणिक कामकाजाची ओळख करून देण्यात येई.

**पालक प्राध्यापक योजना**

आमच्या महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येई. प्रत्येक १० विद्यार्थ्या मागे एक प्राध्यापक याप्रमाणे १० प्राध्यापक व एक प्राचार्य अशी एकुण ११ प्राध्यापकांची टिम होती. प्रत्येक प्राध्यापकाकडे १० विद्यार्थ्यांचे पालकत्व देण्यात येई. या १० विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर अडी-अडचणी सोडविण्यासाठी संबंधित प्राध्यापकांनी मार्गदर्शन करावे,अशी अपेक्षा होती.

**विद्यार्थ्यांची हजेरी**

प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांच्या नावासह हजेरी घेण्यात येई.त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांला ओळखणे सहज शक्य होई. कोणत्याही विद्यार्थ्यांला प्राचार्यांच्या परवानगीशिवाय गैरहजर राहता येत नसे.त्यांची पूर्वपरवानगी घेऊनच अनुपस्थित राहावे असा नियम होता. एखादा विद्यार्थी पूर्वपरवानगीशिवाय अनुपस्थित राहिला तर प्राचार्य त्याला बोलावून घेऊन अनुपस्थित न राहण्याबद्दल सूचना देत.तो सतत गैरहजर राहत असला तर त्यांच्या पालकांना पत्र पाठवून कळविण्यात येई. जर विद्यार्थ्यांला मोकळा वेळ असेल किंवा त्याने निवडलेल्या अध्यापनपध्दतीचा तास नसेल तर त्यांनी ग्रंथालयात बसावे असा अलिखित नियम होता.

**टयुटोरियल – अंतर्गत मूल्यमापन**

त्यावेळी बी.एड.साठी ५०० गुणांची लेखी विद्यापीठ परीक्षा व ५०० गुण प्रात्यक्षिक कार्यासाठी व वार्षिक पाठ परिक्षेसाठी, अशी एकूण १००० गुणांची परीक्षा असे. एकूण पाच पेपर, त्याचे दोन विभाग, प्रत्येक विभागासाठी प्रत्येक सहामाही १ टयुटोरिअल १० गुण असे एकुण २०० गुणासाठी असतं. तसेच सहामाही व पूर्व परिक्षा घेत असे. कमीतकमी तीन निबंध वजा प्रश्न व दोन संक्षिप्त उत्तराचे प्रश्न असे पाच प्रश्न सुचना फलकावर लावण्यात येत.त्या प्रश्नांच्या अपेक्षित उत्तरांची चर्चा वर्गात करीत असू. प्रश्नाबरोबर त्या त्या प्रश्नांच्या उत्तरातील महत्वाच्या मुद्याचा व संदर्भ ग्रंथाचाही उल्लेख करण्यात येई. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करणे सोपे होई. प्रामुख्याने दर शनिवारी पहिला तास ट्युटोरियलसाठी असे.सहामाही व पूर्व परिक्षांच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात देत असू व चांगले गुण मिळविण्यासाठी काय करणे आवश्यक आहे हे त्यांना सांगत असू.ट्युटोरियल,सहामाही व पूर्वपरीक्षेसाठी विद्यापीठाच्या परीक्षाप्रमाणे अतिशय स्ट्रिक्ट सुपरव्हिजन करण्यात येई. त्यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या वह्या व पुस्तके हॉलच्या बाहेर

ठेवाव्या लागत.

**स्टाफ ॲकडेमी**

आम्ही बहुतेक प्राध्यापक 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा' येथील विद्यार्थी असल्यामुळे आमच्यात परस्पर स्नेह, आपुलकी व मैत्री होती.त्यामुळे कोणतेही काम करताना आम्ही अगदी मनापासून करीत असू व प्राचार्यांचा शब्द प्रमाण मानीत असू.एकंदरीत महाविद्यालयीन कामकाजात सर्वांना नियमितपणा व वक्तशीरपणा यांचे पालन करणे अनिवार्य होते व याचा अनुभव वेळोवेळी कोणालाही येत असे. याचा परिणाम विद्यार्थ्यांमध्ये आपोआप स्वयंशिस्त निर्माण होई.स्टाफ ॲकेडमी मध्ये विद्यार्थ्यांना पाठांचे मार्गदर्शन करताना,एकसूत्रीपणा असावा म्हणून आम्ही सर्व प्राध्यापक दर आठवडयाला चर्चा करीत असू. तसेच आपल्या विषयांचे अद्यायावत ज्ञान असावे म्हणून विविध विषयांवर पेपर वाचत असू .पाठ निरीक्षण कसे करावे,पाठ निरीक्षण केल्यानंतर शेरे कसे द्यावेत,विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन कसे करावे अशा मुद्दयांवर चर्चा करण्यात येई. साधारणतःप्रत्येक प्राध्यापकाने वर्षातून कमीत कमी दोन पेपर वाचावे, अशी अपेक्षा असे.वर्षाच्या प्रारंभी प्रत्येक प्राध्यापक आपल्या विशेष अध्यापन पध्दतीच्या विषयाचे 'नमुना पाठ' घेत असत. त्यावेळी त्या त्या विषयाच्या विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य व प्राध्यापकही हजर राहत. पाठ घेतल्यानंतर सर्वजण चर्चेत भाग घेत.

**इतर उपक्रम**

**राष्ट्रगीत –जनगनमन , वंदे मातरम्**

प्रत्येक आठवड्यात पहिल्या दिवशी बरोबर ११ वाजता सामूहिक 'राष्ट्रगीत–जनगनमन'म्हणत असू. सुरवातीला राष्ट्रगीताची रेकॉर्ड लावण्यात येई. पुरेसा सराव झाला म्हणजे रेकॉर्ड शिवाय राष्ट्रगीत म्हटले जाई. आठवड्याच्या शेवटी म्हणजे शनिवारी सर्व कामकाज संपल्या वर ठिक ५ वाजता सर्वजण 'वंदेमातरम्' म्हणत असू. दोन्ही राष्ट्रगीते एका सुरात म्हणावीत अशी अपेक्षा असे.यावेळी प्राचार्यांसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपस्थित राहणे सक्तीचे असे.

**हस्ताक्षर सुधारणा उपक्रम**

'फळा'हा प्रत्येक शिक्षकाचा मित्र आहे.आपल्या पाठाचे प्रत्येक मुद्दे प्रत्येक शिक्षकाला फळ्यावर लिहावे लागतात.'फलकलेखन' कसे करावे याचे विशेष मार्गदर्शन एखाद्या प्राध्यापकाकडून सर्व विद्यार्थ्यांसाठी करण्यात येई.

**इंग्रजी सुधारणा उपक्रम**

विद्यार्थ्यांचा इंग्रजी शब्द संग्रह वाढावा म्हणून प्रा.के.जे.पाटील मॅडम दररोज महाविद्यालयात आल्यावर त्यांच्या 'मेथडरुमच्या फळ्यावर' दैनंदिन व्यवहात उपयोगी पडणारे १० नवीन शब्द, काही वाक्प्रचार व म्हणी त्यांच्या अर्थासह फळ्यावर लिहीत. संबधीत विद्यार्थ्यांनी त्यासाठी स्वतंत्र वही करुन दररोज ते शब्द आपल्या वहीत लिहावेत अशी अपेक्षा असे.

**प्राध्यापकांच्या व्याख्यानांचे निरिक्षण**

मा.प्राचार्य रोकडे सर प्राध्यापकांचे वर्ग–अध्यापन सुरु असताना अधून – मधून त्यांच्या अध्यापनाचे निरिक्षण करीत. प्राध्यापकांना आवश्यक सूचना देत. नवीन नेमणूक झालेल्या प्राध्यापकांना ते वरचेवर मार्गदर्शन करीत.

**राष्ट्रीय सण व महापुरुषांच्या जयंत्या**

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे दोन दिवस मोठ्या उत्साहाने साजरे केले जात.या दिवशी करमणुकीचे व विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येई.२२ सप्टेंबर कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती विषेश उत्साहाने साजरी करण्यात येई.त्या दिवशी किंवा त्या सप्ताहात निबंध स्पर्धा, चित्रकला,रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येई. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असणारे कलागुण व्यक्त करण्यासाठी संधी मिळत असे.

**महाविद्यालयाचे निकाल**

प्रशिक्षण महाविद्यालयाचे निकाल नेहमीच चांगले लागतात. आपल्या महाविद्यालयाचा निकाल सातत्यांने शंभर टक्के लागत आला आहे.हे फारसे भुषणावह आहे असे मला वाटत नाही.तर या निकालात पन्नास टक्यापेक्षा जास्त

विद्यार्थी विशेष प्रावीण्य व प्रथम श्रेणी उत्तीर्ण झालेले आढळून येतील. तसेच विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये पहिल्या दहा विद्यार्थ्यांत आमच्या महाविद्यालयातील कमीत कमीत पाच सहा विद्यार्थ्यी पाहवयास मिळतील.अनेक वेळा आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून 'गंगू नाना पारितोषिक' मिळवले आहे. आमच्या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी उच्च पदांवर शासकिय सेवेत कार्यरत होते व काही विद्यार्थी आजही काम करीत आहेत.आमचे विद्यार्थी हेच आमचे भूषण आहे,आमचा अभिमान आहे,आमचा सन्मान आहे. अशा अनेक गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांमुळेच महाराष्ट्रात आमचे महाविद्यालय 'उत्कृष्ट महाविद्यालय' म्हणून ओळखले जाते.

**प्राध्यापक मित्रांचे सहकार्य**

कोणत्याही संस्थेचे कामकाज एकटा माणूस यशस्वीरित्या पार पाडू शकत नाही. आपल्या संस्थेचे असे वैशिष्टय आहे की प्रत्येक शाखेतील सर्व सेवक मनापासून सहकार्य करतात. त्याला आपले महाविद्यालय अपवाद नाही.आपल्या महाविद्यालयातील सर्व सेवकांनी मला वेळोवळी प्राध्यापक,प्रभारी प्राचार्य,प्राचार्य व उपप्राचार्य असताना खुप सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.काही सहकाऱ्यांची वैशिष्टे आजही मला स्मरणात आहे.त्या वैशिष्ट्याचा उल्लेख करावासा वाटतो. प्राचार्य वसंत रोकडे 'शिस्तप्रिय प्राचार्य' म्हणून ओळखले जात.ते स्वत: सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीत व इतरांकडून त्या नियमांचे पालन व्हावे अशी त्यांची रास्त अपेक्षा असे.प्राचार्य ए.पी.खरात हे आम्हा सर्वांचे मित्र व मार्गदर्शक होते.त्यांच्या अंतकरणात आम्हा सर्वांबद्दल खुप आत्मीयता, प्रेम जिव्हाळा होता. प्राचार्य शंकरराव अनारसे हे खऱ्या अर्थाने 'सौजन्यमुर्ती,' अतिशय मितभाषी, सर्वांबद्दल अतिशय प्रेम व आदर बाळगणारे होते.प्रा.सौ.के.जे.पाटील मॅडम,प्रा.जी.एम.चव्हाण व प्रा.आर.एस.बोरुडे आज हयात नाहीत पण त्यांच्या स्मृती ताज्या आहेत.हे तिघेही उत्कृष्ट शिक्षक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते.प्रा.सौ.पाटील मुर्तीमंत भारतीय स्त्रीयांचे व संस्कृतीचे चालते-बोलते प्रतिक होत्या.प्राचार्य सौ.नजमा मणेर आम्हाला आमच्या लहान बहीणीप्रमाणे,सोज्वळ,मनमिळावू सर्वांना सतत मदत करणाऱ्या होत्या. कार्यालयीन कामकाज श्री.ठूबे, श्री.कदम, श्री.वाणी उत्तम प्रकारे सांभाळत. त्यांचे हिशोब बिनचूक असत.त्यांचे सर्व व्यवहार पारदर्शक असत.

या महाविद्यालयाशी माझा जवळ-जवळ २३ वर्ष (म्हणजे १९७५ ते १९९८) जवळून संबध आला आहे. महाविद्यालयाच्या जडण-घडणीत माझा वाटा आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही परंतू माझ्या जडण-घडणीत महाविद्यालयाचा खूप मोठा वाटा आहे हे मी प्रांजळपणे सांगू इच्छितो.महाविद्यालयाने केलेले संस्कार,दिलेले ज्ञान,मी माझ्या कुवतीपप्रमाणे देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आलो आहे. याबद्दल मी संस्थेचा,महाविद्यालयाचा व सेवकांचा अत्यंत ऋणी आहे.



बी. एड्. १९९१-९२, प्राचार्य, प्राध्यापक, कार्यालयीन सेवक वर्ग व विद्यार्थी

# महाविद्यालयातील विस्तार सेवा कार्ये

**प्राचार्य एस.ए.अनारसे**
माजी प्राचार्य,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

हे महाविद्यालय जून १९७० पासून सुरु झाले.आझाद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सातारा येथून १३ जून १९७० रोजी माझी बदली झाली. तत्पूर्वी १९६९ -७० मध्ये फर्ग्युसन महाविद्यालय,पुणे येथे प्राध्यापक चर्चासत्रात उत्तम सहभागी म्हणून राज्यपांलाचे हस्ते रु.७०००/- ची भेट व सत्कार झाला. श्रीरामपूर येथे आल्यावर राज्य शिक्षणशास्त्र संस्था,पुणे येथे 'शै.मूल्यमापन' विषयीच्या चर्चासत्रास उास्थित राहुन प्रशिक्षण घेतले.

पहिलेच वर्ष असल्याने प्राचार्य रोकडे साहेब यांच्या काटेकोर नियोजनानुसार कामकाज पार पडल्यामुळे सन १९७१ बी.एड.विद्यापीठ परीक्षा निकाल ९९% लागला. विद्यापीठाच्या मेरिटमध्ये १० विद्यार्थी. पी.आर.मोरे प्रथम त्यांना प्रा.गंगूनाना कानिटकर पारितोकषिक मिळाले. ४ था दहातोंडे बी.डी.व ५वा जाधव के.आर आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकांनी येथून पुढे व्याख्यान,पाठनिरिक्षण,मानसशास्त्र प्रयोग, स्वाध्याय, मार्गदर्शन,जिमखाना इ.सर्व कामे अत्यंत उत्तम तयारीने नियोजनबध्द करणेचे ठरवून करीत होतो.वेळेवर उपस्थिती, डायरी लिखान मार्गदर्शन, प्रत्येक विद्यार्थी २-३ लेख वाचून सारांश लिहिणे सक्तीचे होते. वेळेवर उपस्थित न राहिल्यास लेखी घेत होतो.इंग्रजी शब्दवृध्दी व्हावी म्हणून दररोज ५ शब्द लिहिणे इ.कामे सुरु केली.

**भेटी**-यावर्षी कूलगुरु मा.आप्पासाहेब पवार, कोल्हापूर रयतचे मा.दादासाहेब जगताप,पंतगराव कदम,मा.आबासाहेब निबांळकर,प्राचार्य निकम,म.फुले अध्यापक विद्यालय,सातारा मा.बापुसाहेब भापकर, प्रा.ग.श्री.खेर यांच्या भेटी व मार्गदर्शन मोलाचे ठरले.सन १९७२ चा निकाल ९९.२%,विद्यापीठ मेरिटमध्ये नं.२ साधना गोखले तर ४ था.श्री.गर्जे जे.अे.

**सहभाग** - या वर्षी सहजानंद वार्षिक नियतकालिक माझ्या संपदनाखाली प्रकाशित झाले.या वर्षी कोपरगाव येथील विज्ञान प्रदर्शनाचे परिक्षक,शाळासमुह योजना, नेवासा येथे गणित मूनल्यमापन,परीक्षा व मुल्यमापन.नविन बी.एड.अभ्यासक्रम चर्चासत्र,पुणे / चर्चास शिक्षणशास्त्र संस्थेत उपस्थित,रयत शिक्षण संस्थेच्या 'रयत सेवक अंक' (१९८२-८३) शैक्षणिक समस्या निराकरण उपयुक्त साधन लेखास प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

Education Quarterly, Delhi १९८३च्या अंकात 'Inservice traning of teach'rs snd Suggestion' या विषयावर लेख प्रकाशित झाला. १९८३'भारतीय शिक्षण, नागपूर 'लोकसंख्या शिक्षण'यावर तीन लेख प्रकाशित झाले.' 'लोकसंख्या शिक्षण व भारतीय एकात्मता'या विषयी डिसेंबर ८३ मध्ये लेख प्रकाशित.'Utilization of College Vacations by teachers' यावर संस्थेच्या Research Bulletin मध्ये लेख प्रकाशित झाला. १९८४ यावेळचा जिमखाना प्रमुख होतो.महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रिय कृषीमंत्री मा.आण्णासाहेब शिंदे होते खूप मार्गदर्शन झाले.यावेळी प्राचार्य म्हणून ए.पी.खरात साहेब होते.प्राचार्य खरात साहेब यांची सातारा येथे बदली झाली.संस्थेने प्रा.पी.एल.नानकर यांची प्राचार्य पदी निवड केली (निवडसमिती शिवाय) यावर्षीही महाविद्यालयाचे सर्व कामकाज चांगले झाले. १९८४-८५ चा विद्यापीठ परीक्षा निकाल उत्कृष्टच लागला. बी.एड.९७.११ %. विद्यापीठ मिरीट मध्ये आमचे १,४,५,७,व १० क्रमांक आले. १९८३-८५ एम.एड.निकाल ६६.६०% तर डी.एच.ई.७३.१७% हे माझ्या प्राचार्य पदाच्या कालावधीचे, म्हणून महाविद्यालयाचे नाव झाले.माझी प्राचार्य पदी निवड ही शासनमान्य निवड समिती मार्फत झाली. विद्यापीठाचे प्रतिनिधी व्हा.चॅन्सलर मा.नवलगुदकर साहेब यांनी घरी येऊन अभिनंदन केले. प्रा.ग.श्री.खेर(Dean) यांनी पत्रांने विद्या विनयेन् शोभते असे लिहिले.

**शैक्षणिक विस्तार कार्य-**

यावेळी कामकाज व शिक्षण विस्तारकार्ये चांगली झाली.प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी चर्चासत्रे व अध्यापन पध्दतीसाठी मार्गदर्शन झाले.एकुण ९ -१० विषयवर शालेय शिक्षकासाठी व्याख्याने झाली. वनभोजन (छोटी सहल) सर्व प्राध्यापक, विद्यार्थी असा प्रथमच प्रयत्न झाला. यावेळी स्नेहसंमेलन प्रमुख पाहुणे म्हणून उपसंचालक,पुणे मा.चांदेकर साहेब व अध्यक्ष म्हणून मा.भास्करराव गंलाडे पाटील होते. सन१९८५-८६चा परीक्षा निकाल ९८.२ % श्री

आंधळे विदयापीठात त्यांना गंगुनाना व रयतचे बंडो गोपाळा मुकादम पारितोषिक त्याशिवाय ५ व ९ क्रमाक ही आमचाच.आमचा एम.एड. निकाल ९०% व डि.एच.ई ८६% लागला.१९८६ पासून नविन शैक्षणिक धोरण आले. आमच्या महाविद्यालयात १५ मे ते१५ जून या वेळेत ५०-५० शिक्षकासाठी ३ शिबीरे शासनाने आयोजित केली.डायरेक्टर म्हणून माझी निवड केली.प्राथमिक मा.शिक्षकासाठी सुट्टीच्या काळातही शिबीरे घेतली.सर्व प्राध्यापक सहभागी होते.कर्जत तालुका मा.शिक्षक संघटनेच्या स्मरनिकेत 'उदयोन्मुख भारतीय समाजामध्ये शिक्षकाचे स्थान' या विषयावर लेख प्रकाशित झाला.याच वर्षी इचलकरंजी येथे वक्तृत्व व वादविवाद स्पर्धे साठी आमचा संघ प्रथम पारितोषिक मिळवून आला.

सन १९८८-८९ रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.शरदराव पवार साहेब, व्हा.चेअरमन ॲड्.रावसाहेब शिंदे यांची महाविद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीवर निवड झाली. म्हणून मोठा आधार मिळाला. ॲड्.रावसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाची इमारत झाली. त्यांचे भगिरथ प्रयत्न,इतर मान्यवर,प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे योगदान महत्वाचे होते.

एम.एड.साठी 'संशोधन पध्दती व आराखडा' कृतीसत्र घेतले. त्याचे उदघाटन मा.प्राचार्य पानवळ साहेब यांच्या हस्ते झाले.प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिक्षणशास्त्र विभाचे पुणे विद्यापीठाचे डिन मा.डॉ.व्ही.एस.देशपांडे तसेच डॉ.पंडित धुळे यांची व्याख्याने झाली.कृतीसत्राचा समारोप मा.प्राचार्य शिवाजीराव भोर साहेब यांनी केला.

**शिक्षणाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण**

दि.६ मे ते १२ मे १९८९ सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षण अधिकारी व गटशिक्षण अधिकारी नविन शैक्षणिक धोरणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकासाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. महाविद्यालयाने महाराष्ट्राला शैक्षणिक मार्गदर्शन करावे अशी ॲड्.रावसाहेब शिंदे यांची अपेक्षा होती. सन १९८९-९० चा परीक्षा निकाल बी.एड.,एम.एड्.उत्तमच होते.यावर्षी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहणे शिक्षणशास्त्र संस्था,पुणे यांचे संचालक मा.डॉ.वा.ना.दांडेकर होते.अध्यक्षपद ॲड्.रावसाहेब शिंदे यांनी भुषविले. याचवेळी आमचे प्राध्यापक श्री.पी.एल.नानकर यांच्या 'सुबोध मानसशास्त्र' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. हा आमचा अभिमान ठरावा.

ग्रंथालयाच्या वरच्या हॉलचे उद्घाटन मा.राजा मंगळवेढेकर आणि मा.आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते झाले.या हॉल मध्ये ३५ बाके श्रीरामपूरच्या मा.भिमजीभाई पटेल यांनी मोफत दिले.दि.२ मार्च १९९१ रोजी प्राचार्य निवासा शेजारी दुमजली सेवक निवासाचे 'भूमिपूजन' मा.मधुकरराव देशमुख,ॲड्.रावसाहेब शिंदे यांच्या हस्ते व प्रा.भोर साहेब यांच्या अध्यक्षते खाली झाले. मा.शशिकला शिंदे यांची खुप तळमळ होती.म्हणून लगेच ४ ते ५ महिण्यात पूर्ण केले आणि त्याचे उदघाटन मा.ॲड्. रावसाहेब व शशिकला शिंदे यांच्या हस्ते आणि सौ.कमल अनारसे, वच्छिलाताई भोर,मालनताई वामन यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. दि.२१.९.१९९१ हा दिवस सेवकांना अनंदाचा ठरला.

**रिमांड होम सेवा**

हे विशेष कार्य आमचे प्राध्यापक डॉ.गागरे व इतर दररोज सायंकाळी १ तास रिमांड होम मध्ये विद्यार्थ्यांना खेळ, गाणी, गोष्टी, व्यायाम विषयी मार्गदर्शन करीत असत. १९९१ चा परीक्षा निकाल उत्तमच होते.मुलींना वसतीगृहासाठी ॲड्.रावसाहेब व शशिकला शिंदे यांनी सुरजमल शेठ डाकले यांच्या कडून रु.दोन लाखाची देणगी म्हणून दिली. म्हणून या होस्टेलची इमारत झाली.उद्घाटन सौ.विजयादेवी सुरजमल डाकले यांच्या प्रतिमेचे पूजन,के.ई.एम.हॉस्पीटलच्या प्रमुख पद्मभूषण डॉ.बानू कोयाजी यांच्या कडून झाले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.मा.पी.बी.कडू पाटील,इतर मान्यवर,प्राचार्य मंडळी उपस्थित होती.विद्यार्थी वसतीगृह इमारत सोडून महाविद्यालयाची मुख्य इमारत,ग्रंथालय इमारत,विज्ञान प्रयोगशाळा इमारत,मार्गदर्शन कक्ष इमारत या सर्व इमारती माझ्या कालावधीत पूर्ण झाल्या. प्राचार्य निवास मा.प्राचार्य खरात साहेब असतांना झाले.तसेच मार्गदर्शन कक्षाच्या इमारतीचे उदघाटन प्राचार्य नजमा मनेर मॅडमच्या वेळी झाले.या सर्वच इमारतीसाठी ॲड्.रावसाहेब शिंदे यांचा आधार व मार्गदर्शन आणि वास्तूविशारद मा.प्रकाश पाटील यांचे प्लॅन तयार करणे,मंजूर करुन आणणे, त्यांचे बजेट काढणे बांधकाम देखरेख ही सर्व कामे त्यांच्या मुळे झाली.त्यांच्या सहकार्याशिवाय ही कामे अवघडच होती.या महाविद्यालयाचे कामकाज नंतरचे प्राचार्य सौ.नजमा मणेर मॅडम त्यांच्या नंतर मा.प्राचार्य पोंधे साहेब उत्तमरित्या चालु आहे. त्यासाठी येथील संकुलाच्या अध्यक्षा व रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या आदरणीय मीनाताई जगधने या मार्गदर्शन करतात. अशीच महाविद्यालयाची भरभराट होवो ही सदिच्छा!

# कृतज्ञ मी... कृतार्थ मी ...

**डॉ.शंकर बाळकृष्ण गागरे**
माजी प्र.प्राचार्य,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण होत आहे. याचे औचित्य साधून विशेषांक काढण्याची कल्पना प्राचार्य डॉ.मुंकद पोंधे आणि सर्व सहकारी प्राध्यापक यांना सुचली याबद्दल सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन! या निमित्याने महाविद्यालयाचा अनुभव प्राचार्य, प्राध्यापक,विद्यार्थी,कार्येकर्ते यांना लिहिण्याची संधी दिली या बद्दल आभार.

शिक्षण म्हणजे स्वतःमधील सुप्तशक्तींची ओळख आणि तिचा विकास करण्याची प्रकिया. पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्वशक्तीची ओळख झाली आणि जेमतेम ६ वी पर्यत शिक्षण झालेल्या कर्मवीर आण्णांनी आशिया खंडातील सर्वात मोठी रयत शिक्षण संस्था स्थापना केली. त्यांच्या शिक्षणाच्या स्वप्नात अनेक कार्येकर्त सामिल झाले. गावोगावी शाळा, महाविद्यालये उभी राहिली. अनेकांचे प्रपंच उभे राहिले. रयत शिक्षण संस्थाही महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक, वैचारीक, आर्थिक विचारांची प्रयोशाळा बनली. येथे विविध राजकिय मतमतांतरे असलेली मंडळी होती पण रयतेच्या कार्यात ती मते बाहेर ठेऊन,तनमनधनाने आपले योगदान देतात. अनेक नावाचा उल्लेख करणे गरजेचे आहे पण लेखाच्या मर्यादेमुळे मुरड घालावी लागते.

लेख लिहिण्या बद्दल विचारणा झाली त्या क्षणी माझ्या मनात कोणता प्रश्न आला? रयत नसती तर मी कोठे असतो? क्षणात शेतावर राबणारे मजूर आई –वडिल व त्यांचे कष्टमय जीवन नजरे समोर आले. शिक्षणामुळे सुस्थिती आली. अशी लाखो करोडो कूटुंबांची रयत शिक्षण संस्था जननी झाली.

१९७४–७५ साली बी.एड.महाविद्यायात प्रवेश घेतला.प्राचार्य रोकडे, प्रा.अनारसे, प्रा.कदम, प्रा.चव्हाण, प्रा.नजमा मणेर, प्रा.बोरुडे ही मंडळी एका कुंटूबातील सदस्या प्रमाणे ज्ञानदानाचे कार्य करीत होते. आपले महाविद्यालय सर्वोत्कृष्ट असले पाहिजे यासाठी विविध नाविण्यपूर्ण योजना, प्रयोग त्यांनी राबविले. मनात येणाऱ्या कल्पना, विचार कागदावर लिहा. त्यांचा प्लॅन तयार करा. कृतीत आणा.हा प्राचार्य रोकडे यांचा सल्ला मी मनात कोरुन ठेवला. सात्रळ शाखेत काम करतांना सहज कल्पना सुचली की हुशार विद्यार्थांनी स्वता:च स्वत:च अभ्यास केला तर काय परीणाम मिळतील? यातूनच सात्रळ प्रकल्प राबविला गेला.प्रयोगशील शिक्षक म्हणून संस्थेमध्ये नाव झाले.त्यामुळेच प्राध्यापक म्हणून निवड झाली.प्रथम पंढरपूर आणि नंतर १९८७ साली या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झालो.ज्यांच्या हाताखाली ज्ञानार्जनाचे धडे गिरवले त्यांच्या समावेत विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याची भूमिका करु लागलो.

सात्रळच्या हायस्कूलमध्ये हजर होताना तेथील मुख्याध्यापक श्री.भरमगुडे सर यांना मी कोणते काम करु असा प्रश्न विचारला. ते म्हणाले, ''ज्याला मनापासून काम करायचे ते विचारीत नाहीत. तुम्ही विचारले म्हणून सांगतो, एक महिना डोळे उघडे ठेऊन सभोवती बघा, जे प्रयोग येथे चालतात ते पहा, त्यापेक्षा वेगळे तुम्हाला काय करता येते ते ठरवा आणि स्वत:ला अभिमान वाटेल. अशा रितीने त्यात झोकून द्या.''

भरमगुडे सरांचा तोच विचार घेऊन महाविद्यालयात हजर झालो.प्राचार्य अनारसे सरांची भेट घेतली.कॉलेजच्या सर्व उपक्रमामध्ये माझा सहभाग राहिला. आपले आशिर्वाद आणि मार्गदर्शन असू द्या अशी विनंती केली. अध्यापनाच्या जबाबदाऱ्या तर पुर्ण केल्याच पण विद्यार्थ्यांना विविध जीवनानुभव मिळावे यासाठी एन.एस.एस.ची श्रमशिबीरे घेतली,श्री.माणिकराव जगधने, श्री.प्राचार्य टी.ई.शेळके यांच्या शेतावर कापूस वेचणीचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. स्वत:ची ओळख व्हावी यासाठी विविध अनुभव शाळात विद्यार्थ्यांचे गट पाठवून चरित्रमालाची कार्यवाही करुन घेतली.विद्यार्थ्यी वसतीगृहाची जबाबदारी मागून घेतली. त्यानिमीत्ताने विद्यार्थ्यांची कौटुंबीक माहिती परिस्थती समजून घेता आली पाहिजे. आडचणी कितीही असू द्या ते पेलवण्याची अंत:स्फूर्ती चेतविता आली तर जीवन खुप अनंददायी बनविता येते असे अनुभव स्वत:ही घेतले व विद्यार्थ्यांनाही दिले.

या महाविद्यालयात असतांनाच एम.फील. आणि पीएच.डी. पुर्ण केली. संशोधक मार्गदर्शक म्हणून पुणे विद्यापीठ, नाशिक मुक्त विद्यापीठ येथेही भूमिका बजावली. सुरत, बडोदा, अहमदाबाद, कुरुकक्षेत्र, मुंबई,कोल्हापूर,नांदेड

नागपूर, भोपाळ येथील विद्यापीठामध्ये संशोधन परिषदांना हजर राहुन पेपर वाचन केले.महाविद्यालयात राज्य

आणि केंद्रिय स्तरावरील संशोधन परिषदाचे आयोजन केले. पुणे विद्यापीठ अनुदान आयोग, युजीसी दिल्ली यांच्या मार्फत दोन संशोधन प्रकल्प पूर्ण केले. हे सर्व करत असताना महाविद्यालयास संस्थेचे उत्कृष्ट महाविद्यालय आणि राज्य स्तरीय स्वच्छ सुंदर महाविद्यालय पुरस्कार प्राप्त झाला. ISO मानांकनाबरोबरच महाविद्यालयास नॅकचा A दर्जा प्राप्त झाला. प्राध्यापक, प्राचार्य कार्यालयीन सेवक यांचा यात वाटा तर आहेच. यासर्वांच्या मागे कार्यकर्त्यांची एक अदृश्य शक्ती कार्यरत आहे. त्याचा देखील उल्लेख केला पाहिजे.

स्व.ॲड रावसाहेब शिंदे,स्व.सुभनभाई शाह,मीनाताई जगधने,श्री प्रकाश पाटील निकम,ॲड विजयराव बनकर,ॲड भागचंद चुडीवाल, इ. कार्यकर्त्यांचे सहकार्य, मार्गदर्शन, सूचना महाविद्यालयाच्या वाटचालीत प्रेरक ठरल्या. UGC च्या ग्रँटने मुलांचे आणि मुलींची भव्य वसतिगृहे उभी राहिली. पण त्याचा पाया घातला शशिकलाताई शिंदें यांनी. डाकले परिवाराकडून मिळविलेल्या देणगीने. रयतेमधून सुसंस्कृत पिढी तयार व्हावी यासाठी शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली मीनाताई जगधने यानी स्वतःला झोकून दिले. त्या संस्कार वर्गाची सुरूवात या महाविद्यालयाच्या वास्तूतूनच झाली. बहि:शाल व्याख्यान माले अतर्गत अनेक व्याख्याने उपक्रम आयोजित करता आली. महामानव बाबा आमटे, शिवशंकर भाऊ शेगाव संस्थान यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना झाले.

महाविद्यालयातील शिक्षकांची दृष्टी अणि अनुभव विशाल बनावा यासाठी स्व.शिंदे साहेबांनी त्यांना बारामती, कोल्हापूर, नांदेड, जळगाव, शेगाव, आमरावती,औरंगाबाद आदी ठिकाणी नेऊन ज्ञानवर्धक स्थळे तेथील प्रेरणास्त्रोंता बरोबर दाखविली. या सर्वामधून प्रत्येकाला स्वशक्तीची ओळख आणि तिचा वापर करण्याची अंत:स्फूर्ती जागी झाली. बारामतीचा एक प्रसंग आठवतो.माळेवाडीचे शेती प्रतिष्ठान पाहिल्यानंतर समारोप प्रसंगी स्व.आप्पासाहेब पवार ॲड.शिंदे साहेबांना उद्देशून म्हणाले, ''रावसाहेब या हातांना अपयश माहित नाही. कारण काय; माहित आहे? या हातांनी कर्मवीराचे पाय चेपता चेपता शिक्षणा व्दारे जग जिंकण्याची त्यांची स्वप्ने ऐकली. ती स्व:ची बनवली आणि या शेती प्रतिष्ठानाच्या माध्यमातून त्या स्वप्नांना आकार दिला.''आपणही आपली स्वप्ने साकार करायची अशा उद्देशाने तेथून निरोप घेतला. निरोप घेतांना आप्पासाहेबांना नमस्कार केला.ज्या हातांनी तुम्ही कर्मवीरांची सेवा केली कृपा करुन त्या हाताला मला स्पर्श करु द्या आणि ते हात कपाळाला लावू द्या. तो स्पर्श आजही मला आठवतो.आशा अनेक प्रेरणादायी अनुभवांचा मी साक्षीदार बनलो.

प्राचार्य शेळके आणि डॉ.बाबूराव उपाध्ये यांनी रावसाहेबांना ध्यासपर्वाच्या वाचनानंतर आलेली काही पत्रे वाचायला दिली. वाचता वाचता मनात आलेल्या प्रतिक्रिया लिहुन रावसाहेबांना पाठवून दिल्या. दोन दिवसानंतर रावसाहेब महाविद्यालयात आले.प्राचार्य डॉ.मस्के, प्राचार्य डॉ.झावरे, प्राचार्य शेळके यांना बोलावून घेतले आणि मी लिहीलेल्या पत्राचे वाचन केले.तो प्रसंग मला अजूनही आठवतो.रावसाहेबांसारख्या साहित्यातील दर्दी व्यक्तीने दखल घ्यावी याचा मला खूप अनंद झाला.शेवटी रावसाहेबांनी पाठीवर शाबासकीची थाप मारली आणि म्हणाले, 'गागरे सर! लिहीते व्हा. तुमच्या लेखनीत प्रेरणेचा स्पर्श आहे.' त्यांच्या विचाराने प्रेरीत होऊन लेखनाला सुरवात केली,पत्रसंवाद, प्रतिध्यास, कर्मसिध्द, झेप आशावादाची... अशी पुस्तके लिहीली.

प्राचार्य रोकडेसाहेब यांच्या वटवृक्षाच्या छायेत या आत्मचरित्रावर आधारित 'झेप वटवृक्षाच्या पारंब्याची - वसंतझेप' चे हस्तलिखित त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री साहेबराव घाडगे यांना दाखविले. त्याचे वाचन करुन त्याचा शानदार प्रकाशन सोहळा त्यांनी त्यांच्या संस्थेत साजरा केला. या प्रसंगी रोकडे कुटुंबिय हजर राहिले.जगात आज प्रचंड गतीने सुधारण होत आहेत. प्रथम क्रांती लोकसंख्येची झाली. नंतरची औद्योगिक क्रांती आणि आताची अपेक्षांची क्रांती. जीवनमान सुधारले, अपेक्षा वाढल्या. अपेक्षांची परिणती हावरटपणामध्ये होऊ लागली. म.गांधी यांनी म्हटल्या प्रमाणे ही पृथ्वी सर्वाच्या गरजा भागवायला समर्थ आहे. पण एका हावरट माणसाचा हावरेपणा भागवायला. ती असमर्थ आहे. भारतातील एक प्रसिध्द मानसतज्ज्ञ सांगतात, स्वतःची ओळख न झाल्यामुळे मानसिक ताण वाढतात. त्यामुळे सुधारलेल्या जगात मानसोपचार तज्ज्ञाची आणि मागास देशात कुंडली भविष्य पाहणाऱ्या ज्योतीषांची चलती जोरात सुरू आहे. स्वतःची ओळख करून देणारे शिक्षण हा या समस्येवरची उपाय आहे. स्व.डॉ.अण्णसाहेब शिंदे प्राध्यापक प्रतिधिनीत मार्गदर्शन करतांना एकदा म्हणाले होते, देशातील सर्व समस्येवरची उत्तरे शाळा,महाविद्यालयातील प्राध्यापकांनी शोधली पाहिजेत.त्यांच्याच विचारांचा धागा पकडून महाविद्यालयात आल्यावर स्व.रावसाहबे म्हणायचे हे

बी.एड. महाविद्यालय देशातील शिक्षणाची प्रयोगशाळा होईल असा विद्याव्यासंग प्राध्यापकांनी केला पाहिजे. आपल्या स्वप्नांचे साथीदार विद्यार्थी बनतील असे वातावरण निर्माण केले पाहिजे. कर्मवीर अण्णांनी आपल्या हयातीत १८ विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पाठविले. प्रत्येकाला तेथे पाठविण्या अगोदर ते सांगायचे,परदेशात जाऊन तू तुझा अभ्यास पूर्ण करशीलच. पण त्याचबरोबर तेथील लोकजीवन, उधोगधंदे तू अवश्य पहा. तेथील लोक कोणत्या विचारामुळे समृध्द झाले हे येथील विद्यार्थ्यांना आल्यानंतर शिकव. त्यांच्याच विचारांचा वारसा घेऊन त्यांचे नातू डॉ.अनिल पाटील नवनवीन शिक्षणाच्या योजना राबवित आहेत. या सर्वाच्या मागे रयतचे अध्यक्ष मा.शरदचंद्रजी पवार साहेब सर्व शक्तीनिशी उभे आहेत. या सर्वाच्या स्वप्नांना बरोबर घेऊन वाटचाल मात्र शिक्षकालाच करायची आहे.रयतेमधून नव्या युगाचा माणूस घडविणे ही या महाविद्यालयाची खरी कसोटी आहे.

या महाविद्यालयात असतांना मला अनेक लाभ झाले. त्यापैकी एक स्वाध्याय परिवाराची ओळख आणि त्या कार्यावर Ph.D. संशोधन.अभ्यास करतांना असे जाणवले की अध्यात्म आणि मेंदू विज्ञान यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. ''जेव्हा एखादी कोणतीही कृती विना अपेक्षा केली जाते तेव्हा मेंदूत जी रसायने स्त्रवतात त्याचा परिणाम म्हणून माणसाचा उत्साह, कार्यशक्ती आणि स्वतःकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी वाढते.'' असा समाज घडविण्याचा संकल्प प.पू पांडुरंग शास्त्री आठवले यांचा स्वाध्याय परिवार करतो. निष्काम कर्म घडावे यासाठी योगेश्वर कृषी, मच्छगंधा हीरामंदीर, वृक्षमंदिर भावफेरी यासारखे विविध उपक्रम दिले. सहभागी होणारांचे अभ्यासक या नात्याने निरीक्षण करता आले. या महाविद्यालयाने माझ्या जीवनाला आकार दिला.नाव दिले. सर्वाविषयी अत्यंत कृतज्ञ भावाने सेवानिवृत होता आले.

नोकरीतून वयोमानानुसार सेवानिवृत व्हावेच लागते.पण जीवनातून निवृती नाही. सेवानिवृत्तीच्या दिवशी रात्री निवांत डोळे झाकून बिछान्यावर पडल्या पडल्या अनेक व्यक्ती परमेश्वरासारख्या माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्या सर्वांचे चेहरे नजरेसमोर चमकून गेले. लेखाच्या मर्यादेमुळे त्यांचा उल्लेख करणे शक्य नाही. पण सर्वाच्या ठायी एक समान गुण होता तो म्हणजे विनाअपेक्षा एखाद्याच्या पाठीशी उभे राहून सहकार्य करण्याचा, जबाबदारी घेण्याचा. माझ्या वृत्तीने ते माझ्या मदतीला आले. ही त्यांच्यासाठी एक प्रकारची झेपच होती. विविध क्षेत्रात अशी झेप घेणारी माणसे मी पाहतो. त्यामुळे मी आश्चर्यचकित होतो. माणसासारखी माणसेच ती! पण काहीनी शिक्षण, उद्योग, व्यवसाय, शेती व्यवस्थापन, तंत्रज्ञान, वैद्यक, सहकार, राजकारण आशा विविध क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर नेऊन ठेवले. कोणत्या गुणांमुळे त्यांना हे शक्य झाले हे शोधता आले तर? अशी गुणाग्रहक्ता असेल तर दुसऱ्यांचे गुण शोधता शोधता स्वत:मधील गुणांचाही शोध घेता येईल.असे प्रयत्न ओरिसन स्वेट मार्डेन यांनी विविध चरित्रांची निर्मिती करण्यासाठी जगभर प्रवास केला. प्रेरणादायी व्यक्तींच्या यशोगांथाचे लेखन केले.त्यांचे साहित्य अनुवादित करुन जपानने आपल्या शाळा, महाविद्यालये येथे पूरक वाचन संदर्भ म्हणून त्यांचा उपयोग केला. भारतातही असा प्रयत्न झाला. पण त्याचे प्रमाण वाचक वर्गापुरतेच मर्यादित राहिले. आपल्या परिसरातील यशस्वी व्यक्तींच्या जीवन गाथा सकारात्मक पध्दतीने मांडून काही प्रकल्प विद्यार्थ्यांना देता येतील काय या दृष्टीने केलेली संसोधने प्रत्यक्ष कार्यवाहीत आणावी यासाठी खूप मोठे क्षेत्र माझ्यासमोर आहे. समविचारी लोकांसमवेत चर्चा केल्यावर आपण योग्य मार्गावर आहोत याची खात्री पटते. 'वसंतझेप' च्या प्रकाशनाच्या निमित्ताने त्याचा प्रत्ययही आला आहे.'मी करतो' याऐवजी 'आम्ही करतो' या विचाराने समूहभावना तयार होते. माझ्या स्वप्नाला इतरांचेही स्वप्न बनविले तर ? पहिला प्रतिसाद मिळाला श्री. घाडगेसाहेब यांचा, दुसरा प्रतिसाद प्राचार्य शेळके टी. ई. यांचा, तिसरा प्रतिसाद श्री. सुमनभाई शाह यांचा ! व्यक्तीच्या जीवनातील सकारात्मक घटना लिहिण्याचे काम माझे, छपाई, प्रकाशन खर्च संबंधित व्यक्तीचा आणि तयार झालेले लेखनावर प्रकल्प विद्यार्थी शिकक्ष पालक यांनी तयार करायचे अशी योजना आहे. शिकता शिकता आपण कशासाठी योग्य आहोत ते शोधून नेमकी कार्यवाही कशासाठी करायची हे जीवनध्येय ठरवायला मदत करणे ही माझ्यासाठी जबाबदारी आहे असे मला वाटते.वरीलप्रमाणे विचार करायची पात्रता माझ्या रयत शिक्षण संस्थेने आणि वाचनाने माझ्यात निर्माण केली.मी रयत शिक्षण संस्थेचा ऋणी आहे.

**प्राचार्य डॉ.एम.एल.जाधव**
माजी प्राचार्य,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर



## सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने

स्वामी संहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर या महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव यावर्षी संपन्न होत आहे.ही आपणा सर्वांच्या दृष्टीने एक आनंददायी घटना आहे.रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षण – प्रशिक्षणाची सोय व्हावी व ग्रामीण भागातून दर्जेदार प्रशिक्षित शिक्षक तयार व्हावेत यादृष्टीने सन १९७० साली या महाविद्यालयाची स्थापना केली.पाहता–पाहता या महाविद्यालयाने पन्नास वर्षे पुर्ण केली. अर्धशतकी वाटचाल केली. ही बाब शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व अध्यापकांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

कर्मवीर आण्णांनी सन १९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सुरुवातील अनेक जाती–धर्माची मुले एकत्र आणून त्यांनी संमिश्र वसतिगृहाचा प्रयोग यशस्वी केला. पुढे त्यांनी आपल्या कार्याची व्याप्ती वाढवून व्हॉलंटरी शाळांचा प्रयोग हाती घेतला. ज्याठिकाणी सरकारी शाळा पोहोचत नाहीत तेथे शिक्षण पोहोचाविण्याचा त्यांचा हा प्रयोग होता. या प्रयोगातून त्यांनी एका अर्थाने ग्रामीण शिक्षणाची चळवळच हाती घेतली होती. संस्थेमार्फत त्यकाळी एकूण ५७८ व्हॉलंटरी शाळा चालविल्या जात होत्या. परंतु या शाळांमध्ये मुलांना शिकविण्यासाठी कर्मवीरांना प्रशिक्षित शिक्षकांची मोठ्या प्रमाणात गरज भासत होती. या गरजेतूनच त्यांनी संस्थेचे १९३५ मध्ये रजिस्ट्रेशन झाल्यानंतर ताबडतोब त्याचवर्षी सातारा येथे प्राथामिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. 'गाव तेथे शाळा व शाळा तेथे प्रशिक्षित शिक्षक' अशी कर्मवीर अण्णांची धारणा होती. या धारणेतूनच त्यांनी सुरूवातीपासुनच आपल्या शैक्षणिक तत्तज्ञानामध्ये श्रम, स्वावलंबन याबरोबरच शिक्षक–प्रशिक्षणला अनन्यासाधारण महत्व दिले होते. पुढे शासनाने प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदरी स्वतःकडे घेतल्यानंतर कर्मवीरांनी कसलेही कारण पुढे न करता आपल्या या शाळा त्यावेळच्या जिल्हा लोकल बोर्डाकडे सुपूर्त केल्या.

कर्मवीरांनी त्यानंतर माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करण्यास प्रारंभ केला. आगोदरच व्हॉलटरी शाळांच्या माध्यमातून कर्मवीरांचे कार्य व त्यांची ख्याती पोहोचली होती. त्यांमुळे त्यांच्या माध्यमिक शिक्षणाच्या कार्याला जनतेकडून उत्तम असे सहकार्य मिळाले. संस्थेच्या शेकडो माध्यामिक शाळा ग्रामीण भागात सुरू झाल्या.परंतु येथेही पुन्हा प्रशिक्षित माध्यामिक शिक्षकांचा प्रश्न त्यांना भेडसावू लागला. ही समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षकांच्यासाठीच्या ट्रेनिंग कॉलेज प्रमाणेच प्रशिक्षित माध्यामिक शिक्षकांसाठी सन १९५५ मध्ये सातारा येथे प्रशिक्षण महाविद्यालय सुरू केले. तेच आजचे आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा होय. स्थापनेपासून आज अखेर कर्मवीरांनी आपल्या हयातीत स्थापन केलेले हे महाविद्यालय शिक्षक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात दर्जेदार काम करीत आहे. कर्मवीर अण्णांचे शिक्षणाचे कार्य पाहून अहमदनगर जिल्ह्यातील त्यावेळचे राजकीय नेते, समाजसेवक व दानशुर व्यक्ती त्यांच्याकडे आकर्षित झाल्या. त्यांचे उत्स्फुर्त सहकार्य व जनतेचा अभुतपूर्व पाठिंबा यातून अहमदनगर जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेच्या

माध्यमिक शाळांचे जाळेच निर्माण झाले.या जिल्ह्यातील त्यावेळच्या सर्व कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे व त्यांनी देऊ केलेल्या सहकार्यामुळे संस्थे मार्फत श्रीरामपूर येथे 'स्वामी संहजानंद भारती' या सत्पुरुषाच्या नावाने प्रशिक्षण महाविद्यालय सुरु करण्यात आले.अल्पावधीच या महाविद्यालयाने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात एक दर्जेदार प्रशिक्षण महाविद्यालय म्हणून आपली ख्याती निर्माण केली.

कोणतीही शैक्षणिक संस्था अगर महाविद्यालय हे एकाएकी यशाच्या शिखरावर पोहचू शकत नाही. तर त्यासाठी अविरत परिश्रम व दिर्घ प्रयत्नांची अवश्यकता असते. या महाविद्यालयाच्या बाबातीतही आपणास असे म्हणता येईल. या महाविद्यालयाच्या विकासामध्ये महाविद्यालयास सातत्याने मार्गदर्शन करणारे संस्थेचे सेवाभावी कार्यकर्ते व हितचिंतक यांचा महत्वाचा वाटा आहे. सोबतच महाविद्यालयास स्थापने पासून आज आखेर लाभलेले प्राचार्य,आध्यापक वर्ग, सेवक वर्ग यांनी प्रामाणिक पणे केलेली सेवा, त्यांचे कष्ट, त्याग याचाही तितकाच महत्वाचा वाटा आहे. या दोन्ही घटकाच्या संयुक्त प्रयत्नातून या महाविद्यालयाची वाटचाल निश्चितच गौरवास्पद अशी ठरलेली आहे.

सन १९७० साली स्थापन झालेले हे महाविद्यालय सुरुवातीला बरीच वर्षे राव बहाद्दुर नारायणराव बोरावके महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या उत्तरेकडील असणाऱ्या चार खोल्यांमध्ये भरत होते. कॉलेजला स्वत:च्या मालकीची इमारत नव्हती. कॉलेजचे पहिले प्राचार्य श्री.व्ही.एस.रोकडे यांनी आपल्या सहकांऱ्याना बरोबर घेऊन कामास प्रारंभ केला.अचूक नियोजन, नियोजन बरहुकूम अध्यापन व अभ्यासेत्तर उपक्रमांची कार्यवाही, प्राध्यापकांना व्यावसायीक गुणवत्ता वाढीसाठी प्रोत्साहन याव्दारे त्यांनी कॉलेजचे नाव अल्पावधीच पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात उज्वल केले. स्थापनेच्या पहिल्याच वर्षी पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपले विद्यार्थी आणले. एवढेच नव्हेतर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात मानाने मानले जाणारे प्रा.गंगूनाना कानेटकर पारीतोषिक ही पटकावले. आणि खऱ्या अर्थाने महाविद्यालयाची गुणवत्तेची यशोगाथा सुरु झाली. पहिल्याच वर्षी मिळालेल्या या उज्वल यशामुळे सर्वांचेच लक्ष या महाविद्यालयाकडे केंद्रित झाले. प्रामाणिक प्रयत्न केले,कष्ठ घेतले तर त्याला ईश्वराची देखील साथ मिळते हे यातून सिध्द झाले. या यशामुळे प्राचार्य, प्राध्यापक, संस्था चालक या सर्वांनाच आणखी प्रेरणा मिळाली व उत्तरोत्तर या कॉलेजच्या प्रगतीचा आलेख अधिकच उंचावत गेला व एक गुणवत्तापुर्ण प्रशिक्षण महाविद्यालय म्हणून पुणे विद्यापीठाच्या क्षितिजावर ते उदयास आले. पुढे महाविद्यालयास प्राचार्य ए.पी.खरात,प्राचार्यपी.एल.नानकर, प्राचार्य एस.ए.अनारसे, प्राचार्य सौ.नजमा मणेर,प्र.प्राचार्य एस.बी.गागरे हे लाभले. सर्वांनी महाविद्यालयाच्या भौतिक प्रगतीसाठी व गुणवत्ता विकासासाठी भरीव योगदान दिले व कॉलेजच्या गुणवत्तेची ऐतिहासिक परंपरा जोपासण्याचे काम केले.

दि. २९ मे १९८३ रोजी माझी बदली कराड येथील सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजमधून या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून झाली आणि या महाविद्यालयाशी माझा ऋणानुबंध जोडला गेला.सन १९८६ पासून सन १९९२ पर्यंत सहा वर्षे मी या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.एस.ए.अनारसे हे होते. त्यांच्या काळात महाविद्यालयास स्वतःची स्वतंत्र अशी प्रशासकीय इमारत, ग्रंथालय इमारत, विद्यार्थिनी वसतिगृह, मार्गदर्शन कक्ष इमारत, सेवक निवास इत्यादी भौतिक सुविधा प्राप्त झाल्या. भौतिक विकासाबरोबरच गुणवत्तेचा वारसा जतन करण्याचे कामही आम्ही सर्वांनी मिळून पुढे चालू ठेवले होते. याच काळात पुणे विद्यापीठाचा सुट्टीतील बी.एड.हा कोर्स सुरू करून अप्रशिक्षित शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय तर केलीच शिवाय या कोर्सच्या माध्यमातून महाविद्यालयास आर्थिक पाठबळही मिळवून दिले. पुढे विज्ञान प्रयोगशाळा व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह या भौतिक सुविधांही पूर्ण करण्यात आल्या. आज प्राचार्य निवास व बहुद्देशीय हॉलसह सर्व भौतिक सुविधांनी हे महाविद्यालय परिपूर्ण आहे. याचे संपूर्ण श्रेय संस्थेचे माजी चेअरमन आदरणीय श्री.रावसाहेब

शिंदे यांना जाते आणि त्यासोबत महाविद्यालयाचे त्या त्या काळातील प्राचार्य,प्राध्यापक,प्रशासकीय सेवक,आजी–माजी विद्यार्थी आणि कॉलेजचे हितचिंतक यांना जाते.

अलीकडे २० व्या शतकाच्या अगदी शेवटी–शेवटी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचे सर्वार्थाने मूल्यमापन व मूल्यांकन करण्याच्या विचाराने जोर धरला. त्यासाठी नॅक (NAAC) ही संस्था स्थापन करण्यात आली. अल्पावधीत नॅक या संस्थेकडून उच्च शिक्षण देणारी सर्व महाविद्यालये व विद्यापीठाचे व तत्सम संस्थेचे मूल्यमापन व मूल्यांकन करण्याची कार्यवाही सुरू झाली. सन २००४–२००५ मध्ये या महाविद्यालयाचे नॅक तर्फे प्राचार्य सौ. नजमा मणेर यांच्या नेतृत्वाखाली प्रथम मूल्यांकन झाले. महाविद्यालयास 'A' श्रेणी प्राप्त झाली. नॅकच्या प्रथम फेरीत संस्थेच्या एकूण महाविद्यालयांपैकी ज्या दोन महाविद्यालयांना 'A' श्रेणी प्राप्त झाली त्यात या महाविद्यालयाचा समावेश होता ही महाविद्यालयाच्यादृष्टीने व आपणा सर्वांच्यादृष्टीने अभिमानाची बाब होती.

सातारा येथील आझाद कॉलेज मध्ये मी सन २००८ पासून प्राचार्य म्हणून काम करीत होतो. या कॉलेजला नॅकच्या प्रथम फेरीच्या मूल्यांकनात B++ श्रेणी मिळाली होती. या कॉलेजचे सन २०१२ मध्ये नॅक पुनर्मूल्यांकन झाले. पुनर्मूल्यांकनामध्ये या कॉलेजला 'A'श्रेणी प्राप्त झाली. आम्ही सर्वजण– आनंदोत्सव साजरा करत होतो.नॅक पुनर्मूल्यांकनात आमचे हे कॉलेज शिवाजी विद्यापीठामध्ये 'A'श्रेणी मिळविणारे एकमेव कॉलेज ठरले होते.सलग दोन वर्ष नॅकच्या कामाच्या धामधुमितून आम्ही थोडे निवांत झालो होतो. माझा सेवानिवृत्तीचा काळही अल्प म्हणजे वर्ष–सव्वा वर्षाचा रहिला होता. दगदग संपलेली असल्याने थोडासा निवांतच होतो. यादरम्यानच ध्यानीमनी नसतांना माझी बदली सातारा येथून श्रीरामपूर येथे झाली. नॅकसाठी तुमची बदली केलेली आहे असे संस्थेतर्फे सांगण्यात आले.संस्थेचे चेअरमन, व्हाईसचेअरमन व पदाधिकारी यांच्या स्तरावरून बदली झालेली असल्याने मला श्रीरामपूरला हजर होण्याशिवाय पर्यायच नव्हता. सेवानिवृत्तीच्या नजीकच्या काळात झालेल्या बदलीने एकीकडे नाराजी तर दुसरीकडे संस्थेला आपल्याकडून असलेल्या अपेक्षा, संस्थेने आपल्यावर दाखविलेला विश्वास व विश्वासाने टाकलेली जबाबदारी या द्वंदामध्ये मी सापडलो होतो. शेवटी आपले कर्तृत्त्व सिध्द करण्याची आपल्याला मिळालेली ही एक संधी आहे अशी मनाची समजूत घालून संस्थेच्या आदेशानुसार मी १६ मार्च २०१३ रोजी श्रीरामपूरच्या या कॉलेजमध्ये हजर झालो.यात आशादायक बाब एकच होती ती म्हणजे या कॉलेजचे नॅक झाल्याबरोबर लगेच तुमची बदली सातारला परत केली जाईल हा शब्द संस्थेने मला दिला होता. उन्हाळा तीव्र असल्यांने प्रकृतीची तक्रार जाणवत होती. परंतु पुढे भला मोठा नॅकच्या कामाचा डोंगर असल्याने मला सतत प्रयत्नशील राहणे आवश्यकच होते. संस्थेने तत्कालीन चेअरमन आदरणीय श्री. रावसाहेब शिंदे हे श्रीरामपूरमध्येच वास्तव्यास असल्याने त्यांची व महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्या माननीय मीनाताई जगधने यांच्या भेटी घेऊन व नंतरच्या कामाबाबत चर्चा करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली कामास प्रारंभ केला.

केवळ एका वर्षापूर्वीच माझ्या नेतृत्तवाखाली सातारा येथील आझाद कॉलेजचे नॅक पुनर्मूल्यांकन झालेले होते. त्यामुळे तेथील सर्व अनुभव माझ्या पाठीशी होता. नॅकची चांगली ग्रेड प्राप्त होण्यासाठी कोणकोणत्या बाबी महाविद्यालयात आवश्यक असतात, कोणकोणत्या गोष्टींची पूर्वतयारी करावी लागते, नॅक समिती आपल्या पाहणीमध्ये कोणकोणत्या बाबींवर भर देते याची परिपूर्ण माहिती मला होती. त्यामुळे नॅकसाठीची तयारी करण्यामध्ये मला फारशी अडचण जाणवत नव्हती. यापूर्वी कॉलेजमध्ये ६ वर्षे प्राध्यापक म्हणून काम केलेले असल्याने हे कॉलेज, येथील संपूर्ण परिसर मला नवखा नव्हता. त्यावेळचे अमचे काही सहकारी सुध्दा अजून सेवेत होते. त्यामुळे नॅकची तयारी करणे मला अधिकच सुलभ झाले. प्रश्न होता फक्त कमी कालावधीत कामे पूर्ण करण्याचा.

प्रत्येक प्राचार्याने आपले प्रशासन यशस्वी

होण्यासाठी 'लोकशाहीप्रधान प्रशासन' ही प्रशासनाची शैली स्विकारली पाहिजे. त्याने आपल्या प्रशासनात 'सामूहिक निर्णय'प्रक्रियेला महत्त्व दिले पाहिजे. तसेच प्राध्यापकांची शक्ती हीच प्राचार्यांची शक्ती असते असे मानले पाहिजे. या गोष्टी ध्यानात ठेऊन मी प्राचार्य म्हणून काम केले. या प्रशासकीय सेवक यांची एकत्रित सभा घेवुन नॅकच्या कामाची पूर्वतयारी जलदगतीने कशी करता येईल याबाबत चर्चा केली.सर्वांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. सर्वांनी संपूर्ण सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. या कॉलेजने या अगोदर संस्थेच्या आदेशानुसार स्वयंमूल्यमापन अहवाल नॅक ऑफिसला सादर केला होता. मात्र अहवाल पाठविण्याखेरीज नॅकला सामोरे जाण्यासाठी कसलीही पूर्वतयारी संस्थेने वेळोवेळी आदेश देऊनही केलेली नव्हती. पूर्वीच्या 'A' ग्रेडच्या पाऊलखूणा लोप पावलेल्या होत्या. प्राध्यापकांमध्ये नॅकच्या तयारीसंबंधी अपेक्षित जाणीव-जागृती दिसून येत नव्हती, परिसरातील अन्य महाविद्यालयांनी नॅकला सामोरे जावून 'A' श्रेणी प्राप्त केलेली होती. मूल्यामापनाची त्यांच्यामध्ये वृत्ती दिसत नव्हती. सगळीकडे नॅकच्या तयारी बाबत उदासिनता, शैथिल्य दिसून येत होते. ही सगळी मरगळ दूर करून सर्वांनाच नॅकच्या कामासाठी प्रेरीत करणे ही माझ्या समोरची सर्वांत मोठी गोष्ट होती.सर्वांना विश्वासात घेऊन आणि प्रत्येकाच्या इच्छेनुसार, आवडीनुसार व क्षमतेनुसार कामाची विभागणी करून सर्वांना या प्रक्रियेत सामावून घेऊन, परस्परांतील विश्वास वाढवून, त्यांच्यात एकोपा वाढवून नॅकची कामे पूर्ण करण्यास सुरूवात केली. अन्य कोर्सेसच्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन करून आर्थिक पाठबळही उभे केले. ज्या कामाला अधिक वेळ लागणार आहे त्या कामाचे बजेट-इस्टिमेट काढून त्यांस स्थानिक व्यवस्थापन समिती व संस्थेची मंजूरी घेऊन ती कामे अगोदर सुरू केली.

इमारतींचे रंगकाम, परिसर स्वच्छता, आरोग्यविषयक सोयीसुविधांचे नुतनीकरण, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ग्रंथालय संगणकीकरण, संगणक कक्ष नूतनीकरण व आधुनिकरण, बागेचे नूतनीकरण , आवश्यक फर्निचर, प्रवेशद्वार नूतनीकरण, अंतर्गत रस्ते, वृक्षारोपण , कार्यालय व प्राचार्य केबिन नूतनीकरण, प्राध्यापकांना स्वतंत्र केबिन व संगणक, आवश्यक बोर्डस, आवश्यक तेथे मॅटिंग ही व अशी कितीतरी भौतिक कामे सर्वांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आली. कामे हळूहळू पूर्ण होऊ लागताच प्राध्यापकांचा व सेवकांचा उत्साह द्विगुणित होऊ लागला. सर्वजण प्रेरीत झाले व एकजुटीजे कामास लागले. हे प्रशिक्षण महाविद्यालय असल्यांमुळे प्रामुख्यांने NCTE नुसार Resource centres अद्यावत व सुसज्ज करण्यावर प्रामुख्याने भर दिला. यासोबतच नॅकच्या निकषांनुसार कागदपत्रांची पूर्तता, प्राध्यापकांच्या वैयक्तीक व विभागीय फाईल्स, आजी-माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन व मार्गदर्शन, प्राध्यापकांचे वैयक्तिक सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी,प्रत्येक विभागाची पाम्प्लेटस, व्यवस्थापन समितीच्या चर्चेची पूर्वतयारी, संस्था प्रतिनिधी व शासकीय प्रतिनिधी यांच्या चर्चेची पूर्वतयारी, प्राध्यापकांशी होणाऱ्या बैठकीची पूर्वतयारी, सराव पाठ शाळा भेटीची पूर्वतयारी, यासोबतच नॅक कमिटी सदस्यांची राहण्याची व्यवस्था, प्रवासासाठी वाहन व्यवस्था अशी एक ना अनेक कामे अल्पावधीत पूर्ण करण्यात आली. या सर्व कामी प्राध्यापक व सेवक यांचे उत्तम सहकार्य लाभले. तसेच या शैक्षणिक संकुलातील रावबहादूर नारायणराव बोरावके कॉलेजचे प्राचार्य डॉ.डी.के.म्हस्के व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांचेही उत्स्फूर्त सहकार्य लाभले.

या महाविद्यालयास दि. २९ व ३० नोव्हेंबर २०१३ रोजी नॅक समिती सदस्यांनी नॅक पुनर्मूल्यांकनासाठी भेट दिली. प्रोफेसर श्री. के.के.डेका (माजी कुलगुरु, दिब्रुगढ विद्यापीठ) हे या समितीचे चेअरमन होते. प्रोफेसर श्री.एन.एस डोंगा (सौराष्ट्र विद्यापीठ,राजकोट) हे या समितीचे समन्वयक होते. तर श्रीमती रॅचेल जेबराल( प्राचार्य व सचिव सेंट ख्रिस्तोफर कॉलेज ऑफ एज्युकेशन, चैनई , तामिळनाडू) या समितीच्या सन्माननीय सदस्या होत्या. या समितीने दोन दिवस या महाविद्यालयाची सर्वांगीण पाहणी करून नॅक कार्यालयाकडे आपला अहवाल सादर केला. फेब्रुवारी

२०१४ मध्ये महाविद्यालयाला A मानांकन मिळाल्याची बातमी मिळाली. दरम्यानच्या काळात माझी बदली या कॉलेजमधून सातारा येथे झाली होती. श्रीरामपूर कॉलेजने A मानांकन मिळाल्याची बातमी मला कळविली. मनस्वी खूप आनंद झाला. अल्पावधीत केलेल्या सर्व कामांचे चीज झाल्यासारखे वाटले. आपण हे आव्हान स्वीकारले, संधीचे सोने केले, संस्थेचा विश्वास सार्थ ठरविला, संस्थेने दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली याचा आनंद वाटला. संस्थेच्या दोन्हीही प्रशिक्षण महाविद्यालयांना सलगपणे दोन वर्षात A ग्रेड मिळवून देण्याचे भाग्य मला लाभले. धन्यता वाटली. पुढे ४-५-महिन्यानंतर मी आझाद कॉलेजमधूनही सेवानिवृत्त झालो. वरील सर्व घटना पाहता आपली शिक्षणक्षेत्रातली संपूर्ण सेवा अण्णांच्या चरणी सार्थकी लागली असे वाटले. अर्थात हे सर्व श्रेय पदाधिकारी, माझे सर्व सहकारी प्राध्यापक व प्रशासकीय सेवक तसेच महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी यांचेच आहे असे मी मानतो.

या महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवास माझ्या लक्ष लक्ष शुभेच्छा! महाविद्यालया मार्फत महाराष्ट्राला दर्जेदार व सक्षम प्रशिक्षित शिक्षक पुरविण्याचे सुरू असलेले कार्य यापुढेही चालू राहो आणि या महाविद्यालयाच्या कीर्तीचा सुगंध कस्तुरीप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात असाच दरवळत राहो हीच शुभेच्छा...


**...पण आता या सर्वच गोष्टींचे न भरुन येणारे रितेपण कायमच सोबत असणार आहे.**

अंकाची निर्मिती प्रक्रिया सुरु असताना दि.५ जुन २०२१ रोजी कोरोना संसर्गाने प्रि.डॉ.एम.एल. जाधव यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने माझ्या संपादन कार्याची सुरुवात झाली होती. या सुवर्णमहोत्सवी अंकाबद्दल त्यांच्याशी जेव्हा चर्चा होई तेव्हा ते अंक अधिक चांगला होण्या संदर्भात नेहेमीच खूप मौलिक सूचना देत. आपले अनुभव सांगत.आज ते असते तर अंक पाहुन त्यांनी आनंद व समाधान व्यक्त केले असते. शाबासकीची थाप दिली असती. पण आता या सर्वच गोष्टींचे न भरुन येणारे रितेपण कायमच सोबत असणार आहे.

प्रि.डॉ.एम.एल. जाधव सरांच्या आकस्मिक जाण्याने त्यांच्या कुटुंबियावर जो दुःखाचा आघात झाला आहे.त्यातून त्यांना सावरण्याची शक्ती मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना. सरांना सर्व सहजानंद परिवारा तर्फे भावपूर्ण श्रध्दाजंली...

**- संपादक**

डॉ.नामदेवराव देसाई
ज्येष्ठ साहित्यिक,नाऊर



## ओळख स्वामी सहजानंदांची...

फुलाचा सुगंध अनुभवता येतो पण तो शब्दात व्यक्त करता येत नाही. तसेच काहीसे परमपूज्य स्वामी सहजानंद भारती यांच्या जीवन चरित्राबद्दल म्हणता येईल. ते मूळचे कुठले? त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव कोणते? गाव कोणते? प्रदेश कोणता? मातृभाषा कोणती? त्यांचे शिक्षण काय? त्यांच्या गुरुंचे नाव काय? अशी त्यांची व्यक्तिगत माहिती कधीच कोणाला कळली नाही. आई-वडील, बहीण-भाऊ,गणगोताची माहिती कोणाला कळली नाही. त्यांना स्वत:बद्दल बोलताना कधीच कुणी ऐकले नाही. ज्यांचा बायोडेटाच हाती नाही त्यांचे जीवनचरित्र कसे  लिहायचे हा प्रश्नच होता. त्यांचे सर्व जीवनच उघड्या पुस्तकासारखे होते. त्यात मीपणाला कुठेच  थारा नव्हता. संपूर्ण आयुष्यभर कंबरेला खादीची भगवी लुंगी, खादीचा भगवा पंचा, पायात लाकडी खडावा आणि एक तांब्या एवढाच दानात मिळालेला ऐवज त्यांच्याजवळ होता. प्रत्यक्ष पैशाला कधीही स्पर्श झाला नाही. असे कडकडीत वैराग्य.

वयाच्या २२ व्या वर्षी हिंदू धर्म ग्रंथांचा समग्र अभ्यास करुन स्वामीजी ही सर्वोच्च पदवी प्राप्त करुन त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतल्याचे समजते. दीक्षा घेतल्यानंतर संन्याशी समूहाने सर्व भारतभर पायी भ्रमण केले. पोटापुरतीच भिक्षा मागायची, कोणत्याही गावात चार दिवसांपेक्षा जास्त दिवस थांबायचे नाही. कुणाच्या घरात थांबायचे नाही. गावाबाहेर तात्पुरती कुटी बांधायची आणि मुक्काम करायचा. गाव सोडताना कुटी जाळून टाकायची म्हणजेच मोह जाळून टाकण्यासारखेच होते. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे भक्तांचे चार प्रकार आहेत. स्वामीजी हे परमेश्वराचे सर्वोच्च ज्ञानी भक्त होते. ते परमपदाला पोहोचले होते. वेद, उपनिषदे, गीता, भागवत, न्याय पूर्व मिमांसा,उत्तरमिमांसा, ब्रम्हसूत्रे हे ग्रंथ त्यांना केवळ मुखोद्गतच नव्हते  तर त्यांच्या कृतीत अवतरले होते. तो त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला होता. ते पंडित होते, पण त्यांनी कधीही पांडित्याचे प्रदर्शन केले नाही. इंग्रजी व संस्कृत भापषेवर त्यांचे प्रचंड प्रभूत्व होते. सॉक्रेटीस, ॲरिस्टॉल आदी सर्व जगातील कीर्तीमान तत्ववेत्यांच्या तत्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. दशनाम गोसावी या पंथातील भारतीय संप्रदायाचे ते अनुयायी होते. ते हिंदू होते. पण हिंदुत्ववादी नव्हते. इतर धर्माचा ते द्वेष करीत नव्हते. भेदभावाच्या पलीकडे ते केव्हाच जाऊन पोहोचले होते.

नाऊर (ता.श्रीरामपूर) हे गाव गोदावरी नदीकाठी वसलेले आहे. साधारणत: १९१५ साली स्वामीजींचे नाऊर येथे आगमन झाले असावे. गोदावरीला उदंड पाणी असे. नदीकाठी महादेवाचे मंदिर आहे. या मंदिरात बंब महाराज नावाचे साधू राहत असत. त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे त्या सुमारास सिंहस्थ पर्वणी होती. बंब महाराज त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ पर्वणीसाठी गेले होते. तेथे दशनाम आखाड्यात त्यांची स्वामीजींशी गाठ पडली.

स्वामीजी अत्यंत तरुण व तेजपुंज संन्यासी होते. त्यावेळी गोदाकाठी सद्गुरु गंगागिरी महाराजांनी मोठे धार्मिक परिवर्तन घडवून आणले होते. बंब महाराजांकडून गंगागिरी महाराजांच्या कार्याचे वर्णन स्वामीजींनी ऐकले आणि ते भारावून गेले.

गंगागिरी महाराजांचे थोर कार्य ऐकून खूप प्रभावित झाले  आणि त्यांनी बंब

महाराजांसमवेत नाऊर येथे येण्याचा निर्णय घेतला. नाऊर येथे आल्यानंतर ते गोदाकाठी बंब महाराजांबरोबर महादेव मंदिरात राहू लागले. गोदावरी परिसरातील परिवर्तन त्यांनी अनुभवले आणि नाऊर येथे वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. नाऊरपासून जवळच पुणतांबे गावालगत बापतरे म्हणून एक खेडेगाव आहे. तेथे दरवर्षी ह.भ.प. व्यंकट स्वामी यांचे कीर्तन होत असे. व्यंकट स्वामी हे वारकरी संप्रादायाचे थोर कीर्तनकार होते. पंढरपूर येथे त्यांचा मोठा मठ होता. बापतरे येथे व्यंकट स्वामींचे कीर्तन होते. बंब महाराज व नाऊरकरांचे बरोबर स्वामीजीही कीर्तनाला गेले होते. ते संपल्यावर व्यंकट स्वामींनी या तरुण संन्याशाशी बातचीत केली. स्वामीजींचा अध्यात्मातील अधिकार पाहून ऐंशी वर्षाचे व्यंकट स्वामी या तरुण संन्याशासमोर नतमस्तक झाले. स्वामीजींची योग्यता आणि श्रेष्ठता पाहून गावकरी चकित झाले. त्यानंतर व्यंकट स्वामींचा आणि स्वामींचा घनिष्ट संबंध शेवटपर्यंत टिकला.

नाऊर येथील शेतकरी तुकाराम देसाई यांची पत्नी स्वर्गीय कोंडाबाई या विठ्ठल भक्त होत्या. कोंडाबाईची माहेरची ५० एकर शेती होती. त्यांचे निधन झाल्यानंतर विठ्ठल, रखुमाई यांच्या मूर्ती तुकाराम देसाई यांच्याकडे आल्या. त्या मूर्ती स्वामीजींकडे अर्पण करण्याचा निर्णय तुकाराम देसाई आणि त्यांचा एकुलता एक मुलगा दामोदर यांनी घेतला. त्यासाठी आठ एकर जागा दिली. त्या जागेवर स्वामीजींनी गोदावरी आश्रमाची स्थापना केली. विठ्ठल-रखुमाईचे छोटेसे मंदिर बांधले. देणगी मिळालेली जमीन स्वामीजींनी स्वत:च्या नावावर न घेता स्थानिक पंच कमेटीच्या नावावर केली होती. देणगीदार तुकाराम देसाई हे प्रस्तुत लेखकाचे आजोबा होते व स्व.दामोदर देसाई यांचे ज्येष्ठ चिरंजीव आहेत. मूळ नाऊर येथील परंतु व्यापारासाठी कोपरगाव येथे गेलेले व्यापारी स्व. प्रेमचंदजी लोहाडे यांनी गोदावरी आश्रमासाठी १८ खणी पक्क्या इमारतीचे बांधकाम करुन दिले होते. स्वामीजींची अध्यात्मिक क्षेत्रातील विद्वता महाराष्ट्रभर गेली होती. अनेक साधू,संत त्यांच्या भेटीसाठी नाऊर येथे येऊ लागले होते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प.प्रा.सोनोपंत दांडेकर, ह.भ.प.धुंडा महाराज देगलूरकर ब्रम्हसूत्रावरील चर्चेसाठी नाऊर येथे येत असत.

सन १९३० च्या सुमारास महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्रामाचा जोर वाढला होता. संन्याशांनी या चळवळीत सहभागी व्हावे की नाही यासंबंधी स्वामीजींनी श्रृंगेरी मठाच्या शंकराचार्यांशी चर्चा केली. देशभक्ती ही ईश्वर भक्तीच आहे. असा निर्णय झाला आणि स्वामीजी स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय झाले. मिठाच्या सत्याग्रहात त्यांना अटक झाली. गोदावरी आश्रम हे स्वातंत्र्यांच्या चळवळीचे प्रमुख केंद्र झाले. श्रीरामपूर, कोपरगाव,राहाता येथे अनेक कार्यकर्ते त्यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झाले. अनेकदा त्यांना जेलवारी झाली. त्यांची निष्ठा व विद्वता पाहून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीत सदस्य म्हणून त्यांना घेण्यात आले. अहमदनगर जिल्हा काँग्रेसमध्ये ते १९५२ पर्यंत कार्यरत होते. नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, कोपरगाव मतदारासंघातून भाऊसाहेब चौगुले, रामभाऊ गिरमे यांना आमदार म्हणून पाठविण्यात स्वामीजींचा सहभाग होता. १९५२ साली झालेल्या विधानसभेत पुणतांबा येथे जगन्नाथ पाटील बारहाते यांचे नेतृत्व होते. स्वामीजी आजीवन अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणी मंडळाचे सदस्य होते.

संजीवनी साखर कारखान्याच्या नोंदणीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडून नाकारण्यात आला होता. तेव्हा शंकरराव कोल्हे हे स्वामीजींना घेऊन थेट दिल्लीला गेले. पंडितजी भारताचे पंतप्रधान होते. स्वामीजी पंडितजींना म्हणाले, जवाहरलाल प्लीज सँक्शन धीस प्रोजेक्ट आणि पंडितजी म्हणाले, सँक्शन! आणि संजीवनी सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्याकडे स्वामीजींना खूप सन्मान होता.

स्व.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी स्वामीजींचे खूप प्रेमाचे संबंध होते. कोपरगाव येथे रयतचे महाविद्यालय सुरु करण्यात स्वामीजींचा मोठा सहभाग होता. या महाविद्यालयास स्वामीजींचे नाव द्यावे अशीच सर्वांची इच्छा

होती. पण स्वामीजी प्रसिद्धीपासून नेहमीच लांब राहत होते. सद्‌गुरु गंगागिरी महाराज हे स्वामीजींचे श्रद्धास्थान होते. त्याप्रमाणे महाविद्यालयास सद्‌गुरु गंगागिरी महाराज यांचे नाव देण्यात आले. नाऊर येथील हायस्कूलला स्वामीजींनी मान्यता मिळवून दिली होती. आमचे वडील स्व. दामूआण्णा देसाई यांनी त्यासाठी दोन एकर जागा बक्षीस दिली. या शाळेलाही स्वामीजींच्या इच्छेनुसार गंगागिरी महाराज यांचेच नाव देण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकले पाहिजे. ही त्यांची कळकळ होती. त्यासाठी नगर येथे त्यांनी नवभारत छात्र ही बोर्डींग काढली होती. इंटकचे कार्यकर्ते स्व.एल.डी.गांधी बोर्डींगचे व्यवस्थापन पहात असत. त्याकाळी तालुका पातळीवर माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना बोर्डिंगचा लाभ घेता आला. प्रांगणात स्वामीजींचा पुतळा उभारण्याचा निर्णय गांधी यांनी घेतला होता. मात्र स्वामीजींनी तो नाकारला.

कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषू कदाचन.. हे गीता वचन त्यांनी कृतीत आणले होते. त्यांचे महानिर्वाण झाल्यानंतर रयत शिक्षण संस्थेने अध्यापक महाविद्यालयाला स्वामी सहजानंद भारती असे नाव दिले.

नगर येथे असताना त्यांचा मुक्काम नामदेवराव पादीर या भक्ताकडे असे. श्रीरामपूर येथे आमदार रामभाऊ यांच्याकडे, पुणतांबे येथे आमदार जगन्नाथ यांच्याकडे व कोपरगाव येथे असताना नगरपालिकेचे अध्यक्ष मिस्टर गिरमे यांच्याकडे असे. प्रवासात ग्रंथ हेच त्यांचे सोबती असत.

खांडवा (मध्यप्रदेश) येथील प्रसिद्ध उद्योजक जगन्नाथशेठ सराफ यांनी स्वामीजींनी खांडवा येथे यावे असा आग्रह धरला होता. खांडवा येथे सुसज्ज आश्रमाचा प्रस्ताव त्यांनी मांडला होता. पण गंगागिरी महाराजांची पावनभूमी सोडण्यास त्यांनी नम्रपणे नकार दिला. सराला बेट येथे सद्‌गुरु गंगागिरी माहराज बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या धर्तीवर वैदिक व वारकरी संप्रदायिक विश्व विद्यालय स्थापन करण्याचा त्यांचा मनोदय होता. देवास (मध्यप्रदेश) संस्थानच्या महाराजांनी त्यासाठी अर्थसहाय्य करण्याचे मान्य केले होते. मात्र काही तांत्रिक कारणामुळे ते स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

स्वामीजी उतारवयात नाऊर आश्रमात आले. भिक्षा मागून आलेल्या पिठातून सेवेकरी जाडीभरडी भाकरी करी. कुणी कच्ची भाजी दिली तर उकडलेली भाजी खाण्यासाठी हवी अशी तक्रारही त्यांनी कधी केली नाही. दोन वेळच्या जेवणानंतर ते लगेच वमन करीत असत. त्यांच्या आजारपणाच्या काळात स्वर्गीय भास्करराव गलांडे यांनी त्यांना श्रीरामपूर येथे आणले. त्यांच्यावर उपचार केले. हळूहळू त्यांची प्रकृती खालावत गेली. १५ ऑगस्टचा दिवस होता. त्यांचा जन्मही १५ ऑगस्टचाच होता. स्वामीजींनी क्षीण आवाजात विचारले. आज कौनसी तारीख है? १५ अगस्त है महाराज...असे कुणीतरी म्हणाले. अच्छा म्हणत त्यांनी मान टाकली आणि पार्थिवातून त्यांचा आत्मा स्वतंत्र झाला. एक स्वातंत्र्यसैनिक मुक्त झाला. भव्य महानिर्वाण महायात्रा नाऊरकडे निघाली.

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर



NAAC Re-accredited 'A' Grade · ISO 9001-2015 Certified

www.cdjcollege.com

**11 th · 12 th · B.Com · M.Com. · BBA(CA) · M.Phil. · Ph.D.**





## महाविद्यालयाची वैशिष्टये

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास
- एकोणसाठ वर्षांची समृद्ध परंपरा
- नॅक मानांकित, 'अ' दर्जा प्राप्त वाणिज्य महाविद्यालय
- आय.एस.ओ.९००१-२०१५ मानांकन प्राप्त
- उत्कृष्ट निकालाची परंपरा
- वाणिज्य विभागात उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता
- अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग
- समृध्द संगणीकृत ग्रंथालय व बुक बँकेची सोय वातानुकुलित वाचन कक्ष
- सी.ए./सी.एस.फाऊंडेशन मार्गदर्शन
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- अत्याधुनिक साधनांनी युक्त जिमखाना व भव्य क्रीडांगण.
- सर्व सोयींनीयुक्त विद्यार्थिनी वसतिगृह
- विविध शॉर्ट टर्म कोर्सेची सुविधा
- गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना
- राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना
- कोविड-१९ साथीच्या काळात ऑनलाईन अध्यापन सुरु
- विद्यार्थी पालक सुसंवाद, पालक मेळावे, माजी विद्यार्थी मेळावा
- सुसज्ज कॉमर्स लॅब, लँग्वेज लॅब
- शेअर मार्केट शॉर्ट टर्म कोर्स
- विविध सांस्कृतिक कार्यक्रम
- मराठी व इंग्रजी माध्यमात शिकण्याची सोय

**मा.मीनाताई जगधने**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा

**डॉ.सुहास निंबाळकर**
प्र.प्राचार्य

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''– कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

(स्वायत्त)



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित

नॅक मानांकन : 'अ' (CGPA 3.51) सी. पी. ई., न्यू दिल्ली रुसा कंपोनंट ८.०

रयत शिक्षण संस्थेतील गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देणारे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील अग्रगण्य महाविद्यालय म्हणून जनमाणसात आपुलकी



## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर –०६ गोल्ड मेडल विद्यार्थी, वाणिज्य शाखेचे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिल्या पाच मध्ये महाविद्यालयाचे चार विद्यार्थी. २) एन.सी.सी. मार्फत ०६ विद्यार्थी सैन्यदलात व ०१ विद्यार्थी वायुदलात दाखल. ३) क्रीडा विभागातून राष्ट्रीय स्तरावर ३५ व राज्य स्तरावर १३ विद्यार्थ्यांची निवड. ४) संशोधन केंद्रे –०७. ५) प्रशस्त इमारत. ६) अत्याधुनिक सोयींनी युक्त प्रयोगशाळा. ७) सुसज्ज ग्रंथालय. ८) मुला-मुलींच्या वसतिगृहाची सोय. ९) सर्व सोयींनी युक्त क्रीडा संकुल. १०) संगणकीय शिक्षणाची सुविधा– इंटरनेट, वाय-फाय सह. ११) कला-क्रीडा-सांस्कृतिकतेची जोपासना. १२) विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिक्षण. १३) अनुभवी, तज्ज्ञ प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवर्ग. १४) उत्कृष्ट निकालाची परंपरा. १५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र. १६) विविध लघुकालीन अभ्यासक्रम. १७) कॅम्पस इंटरव्युहद्वारे करियरच्या संधी. १८) विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचा ध्यास. १९) बी. व्होक. (फूड प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेंट), ई. सी. एस. व बी. सी. ए. प्रोफेशनल व पदव्युत्तर कोर्सेस.

**प्रिं. डॉ. कुंडलिक एच. शिंदे**

प्राचार्य

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)

**सर्व शिक्षण, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद**



रयत शिक्षण संस्थेचे



# सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस अ‍ॅण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव

ता. कोपरगाव, जि. अहमदनगर (४२३६०१)

स्थापनाः १९६५, नॅक मानांकन 'B++' श्रेणी, ISO 2009-2015

दूरध्वनीः प्राचार्य : (०२४२३) २२३१५५, २२३७५५ (कार्यालय),
Email: ssgmcoll.kop@gmail.com | College Website : www.ssgmcollege.org

## महाविद्यालयाची वैशिष्टये

- इ. ११ वी आर्टस्, कॉमर्स, सायन्स, व्यवसाय शिक्षण ते बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी., बी. सी. ए., बी. कॉम., एम. ए.– इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र व एम. कॉम., एम. एस्सी.–फिजिक्स, ऑर्गेनिक केमिस्ट्री,ॲनॅटिकल केमिस्ट्री, कॉम्प्युटर, भूगोल, मॅथेमॅटिक्स, पीएच. डी.– बॉटनी, केमिस्ट्री पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा.
- निसर्गरम्य परिसर, भव्य इमारत, सुसंस्कारक्षम वातावरण
- अनुभवी, व्यासंगी व पालकत्वाची जाणीव जोपासणारा शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग
- खेळासाठी भव्य क्रिडांगण व देशी–विदेशी खेळांची सुविधा
- समृद्ध ग्रंथालय, विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था, इंटरनेट व संगणक विभाग
- विद्यार्थी व विद्यार्थिनीकरिता सुसज्ज वसतिगृहे
- वाय फाय कॅम्पस
- स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था
- व्यवसाय शिक्षण केंद्र व मार्गदर्शन.
- राष्ट्रीय छात्रसेना (मुले व मुली)
- उज्वल यशाची परंपरा
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना'
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्राचे विविध अभ्यासक्रम



**प्रि. डॉ. शंकर थोपटे**
प्राचार्य
एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''– कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे

# आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा



## स्थापना –१९५५, नॅक मानांकन 'अ' श्रेणी (सी.जी.पी.ए. ३.१४ (२०१२))

**NCTE- WRC/APW0425/113029**

दूरध्वनी कार्यालय: ०२१६२–२३१२५७ प्राचार्य: ९८५०६०९२०२
| Email ID: azadcollegesatara@gmail.com
| Website: www.azadcollegesatara.in




## ● महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये ●

* रयत शिक्षण संस्थेचे दोन वेळा कर्मवीर पारितोषिक पुरस्कार प्राप्त सर्वोत्कृष्ट महाविद्यालय (२०१०–२०११/२०१७–२०१८)
* समृद्ध ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा
* मुलींसाठी वसतिगृहाची खास सोय
* उच्च विद्याविभूषित व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग
* मुलांच्या वसतिगृहाची विशेष सोय
* आधुनिक भाषा प्रयोगशाळा
* प्लेसमेंटची भरीव संधी
* CET, TET, TAIT व SET इ. साठी मार्गदर्शन
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक सुट्टीतील बी. एड. अभ्यासकेंद्र व शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम. (DSM)

प्राचार्या
**डॉ. सौ. वंदना शि. नलवडे**
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

**महाविद्यालय विकास समिती सदस्य, प्राध्यापक व प्रशासकीय वर्ग**

## विभाग दोन
## शिक्षणाच्या नव्या दिशा



'' मित्रांनो, याहून प्रत्ययकारी वाक्य मी शिक्षणाबाबत वाचलेले नाही. जीवन हेच शिक्षण! बाकी सगळे कृत्रिम! जीवन हेच शिक्षण असेल, तर गाव किंवा शहर हीच शाळा गावामधील जो समाज आहे, त्या समाजामध्ये जी जी कर्तव्ये आहेत, कामे चालतात, ते शेती करणे असो, गायी सांभाळणे असो, स्वयंपाक करणे असो, सुतारकाम करणे असो, मोबाइल फोन वा कॉम्प्युटर दुरुस्ती असो ही सगळे कर्तव्यकर्मे करता करता आपोआपच शिक्षण होते. गाव हीच शाळा, जीवन हेच शिक्षण. जीवन आणि शिक्षण यांना वेगवेगळे करणे अयोग्य आहे.''

डॉ.अभय बंग,गडचिरोली

# ।। अनुक्रमणिका ।।

## विभाग दोन
## शिक्षणाच्या नव्या दिशा


| | | | |
|---|---|---|---|
| 0१ | जीवनासाठी शिक्षण कसे निर्माण करावे? | डॉ. अभय बंग | ७१ |
| 0२ | शिक्षणक्षेत्रात मी अस्वस्थ, निराश का आहे? | हेरंब कुलकर्णी | ८१ |
| 0३ | सृजनशील शिक्षणयात्री सुचिता पडळकर | प्रि.डॉ.मानसी गानू | ८६ |
| 0४ | विकास प्रक्रियेच्या संदर्भात प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती : एक अवलोकन | डॉ.महेश जोशी | ९१ |
| 0५ | शिक्षक व ज्ञानप्राप्ती | प्रा.संदिप वाकचौरे | ९३ |
| 0६ | फिनलँडची शिक्षण पध्दती | डॉ.आर.के.नान्नर | ९५ |
| 0७ | माझे शिक्षणातील प्रयोग | बाळासाहेब सदगीर | १00 |
| 0८ | २१ व्या शतकातील तिसऱ्या दशकाची आंतरविद्याशाखीय ज्ञानक्षेत्रे | प्रा.डॉ.संजीव सोनवणे | १0५ |
| 0९ | नवीन शैक्षणिक धोरण २0१९: उच्च शिक्षण | डॉ.ह.ना.जगताप | १0६ |
| १0 | शिक्षक शिक्षणाची न रुळलेली वाट | डॉ.वर्षा कुलकर्णी | १0८ |
| ११ | ...ऐसे टीचर कहाँ मिलते है? | आर.ए.कुंभार | ११२ |
| १२ | विवेकनिष्ठ शिक्षण:उच्च शिक्षणाचा नवीन आयाम | डॉ.कृष्णा पाटील | ११५ |
| १३ | ज्ञानरचनावादी शिक्षणासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण | डॉ.नीलिमा सप्रे | १२0 |
| १४ | शिक्षण समाजभिमुख कसे करता येईल? | प्रि.डॉ.वंदना नलवडे | १२४ |
| १५ | शिक्षकाचे अध्यापनकार्य समृद्धी:एक चिंतन | प्रा.एस.जी.पुंड | १२८ |
| १६ | एन.ई.पी.आणि शिक्षक शिक्षण | काकासाहेब वाळूंजकर | १३१ |

# जीवनासाठी शिक्षण कसे निर्माण करावे?

**डॉ.अभय बंग**
सामाजिक कार्यकर्ते,गडचिरोली

### शिक्षणाचे रोगनिदान

आजचे शिक्षण माणूस घडविणारे आहे का? डॉक्टर असल्यामुळे मला सवय अशी, की कोणत्याही प्रश्नाचा विचार रोगनिदानाने करायचा. रोगनिदान करायचे असेल तर आम्ही डॉक्टर रोग्याला आधी काही प्रश्न विचारतो. डोके दुखते का? किती दिवसापासून दुखते? उलट्या होतात का, ताप येतो का? शिक्षणाच्या बाबतीतही काही अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांनी मी सुरुवात करतो.

महाराष्ट्रातल्या कोणत्याही गावी जा, गावाच्या बाहेर सगळ्यात जास्त पाट्या कसल्या दिसतात? तर गावामध्ये चाललेल्या कोचिंग क्लासेसच्या आणि वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांच्या! त्यांच्या विद्यार्थ्यांच्या यशाचे मोठे मोठे फलक झळकलेले दिसतात. त्यांच्या यशस्वी विद्यार्थ्यांची भली मोठी छायाचित्रे, अमुक हा आयआयटीत गेला, हा वैद्यकीय शिक्षण घेणार आहे, हा गुणवत्ता यादीत झळकला इत्यादी. गावामध्ये प्रवेश करताना शिक्षणसंस्थांच्या यशाच्या पाट्यांनी स्वागत होते, पण गावात गेल्यावर रस्त्यांवर, चौकांमध्ये, पानठेल्यावर बेरोजगार तरुण मुलांचे रिकामटेकडे जथ्थे दिसतात. हा मोठा विरोधाभास आहे.

शिक्षण हा आज भारतातील सगळ्यात मोठा उद्योग झाला असावा. शेती सोडली तर सगळ्यात जास्त तरुण मुले आणि माणसे व्यग्र आहेत, गुंतलेली आहेत; असा भारतातील सगळ्यात मोठा उद्योग बहुधा शिक्षण हाच असेल. एमपीएससी–यूपीएससीच्या परीक्षांची तयारी करुन घेणारे वर्ग जागोजागी चालताना दिसतात. सहज चौकशी केली, तर महाराष्ट्रात पाच ते सहा लक्ष युवक युवती या परीक्षांची तयारी वर्षानुवर्षे करतच असतात असे कळाले. आई–वडिल खेड्यात राहतात. मुलगा जिल्हाधिकारी होण्याचे शिक्षण घेतो आहे, असे त्यांना सांगण्यात येते. हाही बिचारा श्रम करत असतो, अभ्यास करत असतो. कोचिंग क्लासेस लावतो. वर्षानुवर्षे उत्तीर्ण होत नाही. आणि समजा झाला उत्तीर्ण तरी एमपीएससीची पदे किती भरण्यात येतात? मिळालेल्या माहितीनुसार वर्षाला सर्व मिळून दोनशे–तीनशे पदे भरण्यात येतात. सहा लक्ष मुले नोकरीला लागतात, म्हणजे ०.०५ टक्का! उरलेल्या ९९.९५ टक्के तरुणांचे काय होणार? हजारामध्ये एक या प्रमाणात देखील संधी नसलेल्या या शिक्षणामध्ये महाराष्ट्रातील पाच लक्ष युवा वर्षानुवर्षे व्यग्र आणि व्यस्त राहावेत?

मध्यंतरी उत्तर प्रदेशाच्या पोलीस विभागामध्ये कॅरिअर निरोप कॅरी करणारा–पोलीस विभागातला पोस्टमन असे समजा, या पदाची जाहिरात निघाली. एकशे शहांऐशी पदांसाठी चार लक्ष अर्ज आले! त्या चार लक्ष अर्जांमध्ये दोनशे पीएच.डी. होते हे पाहता, आजच्या शिक्षणामध्ये काहीतरी गंभीर गफलत होते आहे असे वाटत नाही का?

विद्यापीठांनी उत्तीर्ण होण्यासाठी किमान पस्तीस टक्के गुणांची अट ठेवली आहे. (आता कोरोना काळात तर सर्वच उत्तीर्ण मानले जातात.) एखादा विद्यार्थी पस्तीस टक्क्यांवर कसा काय उत्तीर्ण होतो? समजा, मी डॉक्टर म्हणून उपचार करतो आहे. माझे फक्त पस्तीस टक्के रुग्ण जगले म्हणजे पासष्ट टक्के मेले, तर तुम्ही माझे काय कराल? तुम्ही मला फाशी द्याल. पण शिक्षणाने, विद्यापीठाने आणि शिक्षण मंडळाने अतिशय सोईस्कररित्या स्वत:लाच मुळी पस्तीस टक्क्यांवर उत्तीर्ण करुन घेतले आहे. **गोल** पोस्ट इतकी खाली ठेवलेली आहे, की वस्तुत: अख्खी शिक्षणव्यवस्था ही पासष्ट टक्के नापास होते आहे. परिणाम काय होतो? जेव्हा अशी आपण **गोल** पोस्ट कमी उंचीवर ठेवतो, तेव्हा शिक्षणाचा दर्जा घसरतो. तुम्ही वर्तमानपत्रात कदाचित आकडेवारी वाचली असेल. भारतीय विद्यापीठातून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केलेले फक्त तेरा टक्के इंजिनिअर हे नोकरी–व्यवसाय करण्यासाठी पात्र आहेत. आवश्यक कौशल्ये फक्त तेरा टक्के इंजिनिअर्सना येतात. म्हणजे सत्याऐंशी टक्क्यांना येत नाहीत. मग अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये काय घडते? तरीही ही महाविद्यालये कशी चालतात? ती विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क कसे काय घेतात? विद्यापीठाची परीक्षा असो की

बारावीची परीक्षा. त्यांचे प्रमाणपत्र घेऊन मुले बाहेर येतात, तेव्हा त्यांना पुढे कुठल्याही चांगल्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा असेल तर त्यांना त्यासाठी परत दुसऱ्या प्रवेश परीक्षेची तयारी करावी लागते. हे कशाचे लक्षण आहे?

**शिक्षण व्यवस्था-एक फसवणूक?**

भारतात डॉक्टर कमी आहेत. खेडोपाडी डॉक्टर नाहीत. आणि तरी या देशातील जेवढे डॉक्टर एमबीबीएसची परीक्षा देऊन बाहेर पडतात त्यातील अर्ध्याहून जास्त तरुण डॉक्टर्स पुढे वर्ष-दोन वर्षे फक्त पुढच्या शिक्षणासाठीच्या प्रवेश परीक्षेची तयारी करत राहतात! त्यासाठी कोचिंग क्लासेस निघालेले आहेत. गंमत बघा, तो डॉक्टर एमबीबीएस उत्तीर्ण झाला म्हणजे त्याला अक्षरश: रुग्णाच्या जगण्यामरण्याचा निर्णय घेण्याचा, औषधे देण्याचा आणि उपचार करण्याचा अधिकार मिळाला. कायदेशीर आणि शास्त्रीय अधिकार मिळाला. पण त्याला पदव्युतर प्रवेश परीक्षेसाठी कोचिंग क्लास लागतो! म्हणजे त्याला स्वत:ला अभ्यास करता येत नाही, आणि म्हणे तो रुग्णांना वाचवणार आहे! इथे समाजात काम करायला डॉक्टर नाहीत आणि देशातील पन्नास हजार तरुण डॉक्टर फक्त पदव्युतर प्रवेश परीक्षेची तयारी करत आहेत!

'द इकॉनॉमिस्ट' हे जगातले अतिशय प्रतिष्ठीत असे नियतकालिक! त्यामध्ये मुखपृष्ठ कथा आली. जगभर सध्या असा प्रवाह आहे की, पदवी-पदव्युत्तर शिक्षण झाल्यानंतर इंटर्नशिप किंवा अॅप्रेंटिसशिप करावी लागते. हे जगभरच आहे. माझ्या मनात प्रश्न असा आला, की चार वर्षे व्यावसायिक प्रशिक्षण घेतल्यानंतर जर तुम्हांला अजूनही उमेदवारी (अॅप्रेंटिसशिप) करावी लागत असेल, तर मग चार वर्षे विद्यापीठात काय करीत होता? तसेच पुढचे शिक्षण असो की नोकरी, सगळ्यांसाठी आपण स्पर्धा परीक्षा घेतो. याचा अर्थ काय होतो? याचा अर्थ असा होतो की आपल्या मुलांच्या हातांत असलेली पदवी, मग ती विद्यापीठाने दिलेली असो की परीक्षा मंडळाने दिलेली; तिच्यावर आमचा अविश्वास आहे. उच्च शिक्षणाच्या सर्वोच्च संस्था या विद्यापीठांनी दिलेल्या पदवी प्रमाणपत्रांवर विश्वास ठेवत नाहीत. अशा वेळी माझ्या मनात अतिशय कठोर प्रश्न येतो, की एखाद्या पालकाने किंवा विद्यार्थ्याने ती पदवी देणाऱ्या विद्यापीठावर कलम चारशे वीसची (फसवणुकीची) केस का करु नये? की, तुम्ही मला एक प्रमाणपत्र दिले, पण त्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाशी संलग्न संस्थाही या प्रमाणपत्रावर विश्वास ठेवत नाहीत. याचा अर्थ असा, की विद्यापीठाने मला फसवले!

शिक्षण हा एक प्रचंड मोठा फसवणुकीचा कारभार सुरु आहे का, अशी मला शंका येते. शिक्षणाचा हक्क (राइट टु एज्युकेशन) आहे, पण योग्य शिक्षण (राइट एज्युकेशन) आहे का? जीवनाच्या गरजेनुसार, विद्यार्थ्यांच्या कुवती किंवा क्षमतेनुसार आणि आजूबाजूच्या परिसरानुसार शिक्षण आहे का? की कुणीतरी अभ्यासक्रम समितीने काल्पनिक अभ्यासक्रम ठरवून त्यानुसार शिक्षण दिले जात आहे?

जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठापैकी एक हार्वर्ड विद्यापीठ आहे. तसेच वॉशिंग्टनजवळ बाल्टीमोरला मेडिसिन व पब्लिक हेल्थच्या क्षेत्रामध्ये जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटी आहे. एके काळी मी या विद्यापीठात शिकलो आहे. नुकतेच, लागोपाठ दोन वर्षात मला महात्मा गांधीजींवर व्याख्यान देण्यासाठी या विद्यापीठांकडून निमंत्रणे आली. दोन्ही ठिकाणी भाषणापूर्वी मी जवळपास शंभर विद्यार्थ्यांबरोबर तासभर बसलो. ते सगळे मास्टर्स किंवा पीएच.डी. झालेले किंवा होऊ घातलेले विद्यार्थी होते. त्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला मी विचारले, ''पीएच.डी. चे प्रमाणपत्र घेऊन निघाल्यानंतर काय करणार आहेस?'' तुम्हांला सांगतो, त्या दोनशे विद्यार्थ्यांपैकी फक्त एक अपवाद वगळता, इतर एकशे नव्याण्णव जण म्हणाले,''आम्हांला माहीत नाही!'' या दोन शिक्षणसंस्था जगातील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक जागा आहेत. पण तिथे उच्च शिक्षण घेऊन निघणारे म्हणत होते, की या मिळालेल्या शिक्षणाचे काय करणार हे आम्हांला माहीत नाही. ते सगळे अंधारात चाचपडत होते. या शिक्षणाचे करायचे काय हेच त्यांना कळत नव्हते! माझ्या लक्षात आले, शिक्षणसंस्था बरीच माहिती ज्ञान म्हणून देतात, काही कौशल्येही देतात, पण या शिक्षणाचे काय करु,

याचा हेतू, उद्दिष्ट व ध्येय त्या देऊ शकत नाहीत.

अशा प्रकारच्या एका व्यापक शिक्षण व्यवस्थेत आज आपण आहोत.

ऑक्सफर्ड विद्यापीठाने एक अभ्यास केलेला आहे. वर्ष २०५० मध्ये कामाचे काय होणार? जॉब किंवा काम ही जी संकल्पना आहे, २०५० मध्ये त्याची काय स्थिती राहील? त्यांच्या अभ्यासामध्ये त्यांनी दाखविलेले आहे की, विज्ञानाची जशी प्रगती होते, तसा समाज बदलतो आहे, यंत्रे येत आहेत, कॉम्प्युटर्स येत आहेत, कृत्रिम बुद्धिमता येते आहे. त्यामुळे २०५० पर्यंत काही कामे, नोकऱ्या नामशेष होतील किंवा अतिशय कमी होतील. तर काही कामे वाढतील. टंकलेखनाचे (टायपिस्टचे) काम संपले आहे. प्रत्येक जण स्वत: वर्ड प्रोसेसिंग करेल. यापुढे वाहनचालकांच्या नोकऱ्या जातील, ड्रायव्हरलेस कार येत आहेत. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सकडून रोगनिदान सुरु झाल्यावर डॉक्टर कमी होणार. शिक्षकांच्याही नोकऱ्या संपणार. जो शिक्षक वर्गामध्ये निव्वळ माहिती देतो, त्याची गरजच काय? त्यापेक्षा गुगल अधिक चांगले काम करेल. 'खान ॲकॅडमी' नावाची एक व्हर्च्युअल ॲकॅडमी आहे. हिचा संस्थापक हा सलमान खानच, पण अमेरिकेत असलेला भारतीय इंजिनिअर. अमेरिकेत त्याच्या पुतण्यांना गंमत म्हणून घरी फिजिक्स शिकवत होता. पुतण्या म्हणाला, ''चाचा आप बहुत अच्छा सिखाते हो.'' पण त्याची बदली झाली दुसऱ्या गावात, तरी पुतणे त्याच्या मागे लागले की, तुम्हीच शिकवायचे. म्हणून तो त्यांना ई-मेलने किंवा इंटरनेटवर आपले टेप केलेले लेसन्स पाठवायला लागला. हळूहळू त्याची ती शैक्षणिक सत्रे विकसित झाली. त्याची खान ॲकॅडमी झाली. युट्युबवर 'टेडेक्स' कार्यक्रमात बिल गेट्सने या सलमान खानची मुलाखत घेतली आहे. सुरुवातीलाच बिल गेट्स जाहीरपणे सांगतो की, माझी दोन्ही मुले खान ॲकॅडमीत शिकतात! आता कल्पना करा, की गुगलवर, यूट्युबवर अशी सत्रे उपलब्ध होऊ लागली आणि त्यावरुन मुले शिकू लागली तर शिक्षक कुठे असणार?

जेथे फक्त तेरा टक्के इंजिनिअर व्यावसायिक कौशल्ये असलेले निघतात, जेथे डॉक्टरांना स्वत: अभ्यास करण्याचा आत्मविश्वास नाही, जेथे पीएच.डी. नंतरही कळत नाही की पुढे आपण काय करणार, जेथे जवळपास कुणीच अनुत्तीर्ण होऊ नये यासाठी किमान गुणांची पातळी अगदी खाली ठेवली जाते, तेथे कुणीही विचारेल, की शिक्षणसंस्था चालतात कोणासाठी? शिक्षणासाठी चालतात, विद्यार्थ्यांसाठी चालतात,की या सर्व शिक्षक, प्राध्यापकांसाठी चालणाऱ्या रोजगार हमी योजना आहेत?

**विद्यापीठे कशासाठी ?**

'द इकॉनॉमिस्ट' ची दुसरी मुखपृष्ठ कथा ही आहे, विद्यापीठे चालतात कोणासाठी? त्यांनी अनेक मुलाखती घेऊन निष्कर्ष काढला, की पालकांसाठी विद्यापीठे चालत नाहीत, किंबहुना पालकांना आपल्या मुलांना शिक्षणात काय मिळते यात स्वारस्य नाही, तर त्यांना मुलांची कटकट घरात नको आहे! पौगंडावस्थेतील मुले फार त्रासदायक असतात. घरात त्रास देण्यापेक्षा विद्यापीठात जा, असे पालकांना वाटते. विद्यार्थ्यांना विद्यापीठातील शिक्षणात स्वारस्य नाही. त्यांना रोमान्स करणे, कँटीनमध्ये जाणे, चित्रपट बघणे यामध्येच स्वारस्य आहे. ते आपले 'गुड अँड हॅपी टाइम'साठी विद्यापीठात जातात. शिक्षकांनाही शिकवण्यात स्वारस्य नाही. त्यांना प्रायव्हेट कोचिंग किंवा संशोधन प्रकल्प यात रस आहे. शिक्षण पूर्ण केल्याची प्रमाणपत्रे घेऊन जेव्हा तरुण नोकरी मागायला जातो, तेव्हा नोकरी देणाऱ्या कंपन्यांचे काय म्हणणे असते ? ते म्हणतात, ''विद्यापीठांनी त्याला काय शिकवले याच्याशी आम्हांला काहीही देणेघेणे नाही आम्ही एवढेच बघतो की, तो कोणत्या विद्यापीठातून आला. कारण प्रतिष्ठित विद्यापीठात हुशार मुले निवडली जातात हे आम्हांला माहीत आहे. आमचे आयते काम ते करतात. फक्त हुशार मुलांची निवड करण्यासाठी म्हणून आम्ही विद्यापीठाचे प्रमाणपत्र वापरतो.'' असे असल्याने प्रश्न पडतो की विद्यापीठे चालतात कोणासाठी? पूर्ण शिक्षणव्यवस्था चालते कशासाठी, असा प्रश्न आजची अर्थव्यवस्था गंभीरपणे विचारायला लागलेली आहे. म्हणूनच कदाचित शिक्षकांच्या नोकऱ्या संपतील असा अंदाज ऑक्सफर्डच्या अभ्यासाद्वारे

बांधला जात आहे.

एका नावाड्याची गोष्ट लहानपणी चांदोबामध्ये प्रत्येकाने वाचली असेल. एक मोठा पंडित होता. पंडिताला नदी पार करायची होती. नावाडी त्याला घेऊन निघतो. पंडित त्याला विचारतो, ''का रे, तू तत्वज्ञान शिकलास का?'' नावाडी म्हणतो, '' नाही साहेब, तत्वज्ञान नाही शिकलो.'' विद्वान म्हणाला,''म्हणजे तुझे पंचवीस टक्के आयुष्य वाया गेले! गणित तरी शिकलास का?'' ''नाही?'' ''मग अजून पंचवीस टक्के आयुष्य वाया गेले.'' अशी प्रश्नोत्तरे सुरु होती. नावाड्याचे नव्वद टक्के आयुष्य वाया ठरले होते. होडी नदीच्या मध्यावर पोहोचली होती. तेवढ्यात जोराचा वारा वाहू लागला. नदीच्या पात्रात खळबळ वाढली. नाव डोलायला लागली. पंडित म्हणाला,''आता कसे रे?'' नावाडी म्हणाला, ''तुम्हांला पोहता येते का?'' पंडित उतरला,''नाही, पोहता येत नही'' नावाडी म्हणाला, ''मग तुमचे तर शंभर टक्के आयुष्य वाया गेले!''

शिक्षणाच्या बाबतीत आजची अवस्था ही अशी गंभीर आहे. जीवनाच्या वादळामध्ये आपण शिक्षण दिलेले विद्यार्थी टिकू शकत आहेत का, आपण दिलेले शिक्षण कसोटीला पारीत होते आहे का, आणि ते जर होत नसेल तर आपले शिक्षण तर शंभर टक्के वायाच गेले!

मी विनोबांचे **शिक्षण विचार** हे पुस्तक वाचले आहे. या पुस्तकासारखे शिक्षणावरील अद्भुत पुस्तक मी वाचलेले नाही. शिक्षण विचार या पुस्तकामध्ये विनोबांनी साठसत्तर वर्षांपूर्वी शिक्षणाचे रोगनिदान केलेले आहे. दुर्दैवाने ते आजही लागू आहे, कदाचित जास्तच लागू आहे ही आपली शोकांतिका आहे. विनोबाजी म्हणतात, ''आपण जीवनाची विभागणी अशी करुन टाकली आहे, की आयुष्याची पहिली पंधरा-वीस वर्षे फक्त शिक्षण! त्यात जीवनाला काही संधीच नाही. एकदा ते शिक्षण घेऊन बाहेर पडला आणि जर काही कुठे काम मिळाले तर मग फक्त कमाई आणि कमाईच. तेथेही शिक्षणाचे कामच नाही.'' विनोबा म्हणतात, ''निर्जीव शिक्षण आणि निर्बुद्ध जीवन अशी आपण जीवनाची विभागणी करुन टाकली आहे.'फ

**मन,मेंदू व मनगटाचे शिक्षण**

मग पर्याय काय? उपाय काय? काही पर्यायी शिक्षण विचार आहे का? प्रयोग आहेत काय? अनुभव काय आहे? गांधीजी आणि विनोबा यांनी सुरु केलेल्या शिक्षणपद्धतीला नयी तालीम म्हणतात. मी त्याच शाळेत शिकलो. शिक्षण केवळ शाळेच्या चार वर्गांमध्ये दिलेले पुस्तकी शिक्षण किंवा नुसती माहिती नाही तर हेड, हार्ट, अँड हँडस् बुद्धी, हृदय आणि हात यांचा विकास करणारे शिक्षण मिळाले पाहिजे. या तिन्हींचा विकास झाला पाहिजे, ही नई तालीमची एक वैचारिक मान्यता. दुसरे शिक्षण हे देता येत नाही किंवा घेताही येत नाही, तर शिक्षण हे घडते. विनोबा म्हणतात की, शिक्षण ही काय वस्तू आहे, की जी एकाने दिली आणि दुसऱ्याने ती घेतली? उदाहरणार्थ, जेवण देता येते, पण पोषण देता येते का? स्वयंपाक करणारा जेवण वाढू शकतो, जेवणारा आपल्या हाताने तोंडातही घालू शकतो, पण तोंडात घातलेले पोटात जाते, आतडीत पचते, ते रक्तामध्ये शोषले जाते, ते शरीराला लागते, तेव्हा त्याला आपण पोषण म्हणतो. पोषण देता येत नाही, ते घडते! तसेच शिक्षण देता येत नाही, ते घडते. सभोवतालचा समाज, निसर्ग आणि मी, यांच्या बाबतीत जे प्रत्यक्ष अनुभवजन्य ज्ञान मिळते, त्यातून हे शिक्षण घडते. यातील पुढचे तत्व असे की, शिक्षण केवळ अभिजन वर्ग, उच्च वर्ग, बुद्धिजीवी वर्ग यांची मक्तेदारी नाही. गांधीचे तत्व असे, की शिक्षण हे सार्वत्रिक व्हायला पाहिजे. खेड्यातील गरिबांतील गरीब आणि वंचितांतील वंचित अशा सर्व मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. केवळ मुलांनाच नव्हे, तर पौढांनाही आणि तेही आयुष्यभर शिक्षण मिळायला पाहिजे. युनिव्हर्सल एज्युकेशन थ्रुआउट लाईफ!

दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स व टॉलस्टॉयवाडी आश्रमामध्ये सत्याग्रहींच्या मुलांना शिकवण्याची जबाबदारी अचानक गांधीजींवर आली. तिथे त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार आकार घ्यायला लागले. पुढे त्यांनी अहमदाबादला गुजरात विद्यापीठ स्थापन केले. नंतर वर्ध्याला पहिली नयी तालीम शिक्षण परिषद घेतली. त्या प्रसंगी भारतासाठी शिक्षणव्यवस्था कशी असावी या विषयी गांधींजींनी आपले

विचार मांडले. त्या विचारांवर आधारित शिक्षणव्यवस्थेला म्हणतात नयी तालीम. मी अनुभवलेले हे नयी तालीमचे शिक्षण कसे होते?

गांधीजींची मान्यता अशी, की नयी तालीम शिक्षणामधून विद्यार्थी आणि शिक्षक दोन्ही स्वावलंबी व्हायला पाहिजेत. अन्यथा ते कायमच सरकारी अनुदानावर अवलंबून राहतील आणि सरकार बदलेल तसे धडे बदलतील. इतिहासातील नायक-खलनायक बदलतील. तसे व्हायला नको असेल तर शिक्षण शासकिय हस्तक्षेपा पासून मुक्त व म्हणून स्वावलंबी हवे. त्यासाठी या शाळेमध्ये दररोज तीन तास उत्पादक काम करायला लागायचे. उत्पादक कामामधून शिक्षण मिळायला हवे, हा आग्रह होता. ते कसे घडायचे?

मी आठवीत असताना मला एक शेतीचा तुकडा दिला गेला. या शेतीमध्ये काय पेरायचे. कशी शेती करायची, हे मी ठरवायचे होते. मी माझ्या शेतीत वांगी लावली. पण वांग्याची रोपे काही वाढेनात. मी एका प्रगत शेतकऱ्याकडे गेलो. त्यांना विचारलं. ते म्हणाले,''झाड वाढायला नायट्रोजन लागते.'' आता नायट्रोजन कुठे मिळते? शिक्षक म्हणाले, ''रसायनशास्त्र वाच.'' नायट्रोजन हे युरियामध्ये असते हे कळले. युरिया कुठे मिळेल? शेजारी गोशाळा होती. मी गोशाळेतून बादल्या भरुन गोमूत्र घेऊन येत असे आणि माझ्या वांग्यांच्या झाडांना टाकत असे. माझे शरीरश्रमही झाले, शरीर बळकट झाले. वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र शिकलो. शेती शिकलो. आपल्याला पडलेला प्रश्न सोडवायला वाचन करणे किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणेही शिकलो. शेवटी माझी वांग्यांची झाडे सहा-सात फूट उंचीची झाली! एक वांगे पावणेदोन किलोचे निघाले. शिक्षक म्हणाले,''बाजारात जाऊन वीक.'' मी बाजारात गेलो विकायला तर कोणीच घेईना. सगळे म्हणाले, ''अहो,पावणेदोन किलो वांगे म्हणजे घरी आठवडाभार नुसतीच वांग्याचीच भाजी खावी लागणार!'' शेवटी ते वांगे शाळेच्या मेसमध्ये वापरले. तर माझे शेतीशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, मार्केटिंग आणि शेतकऱ्याची अवस्था हे सगळे अनुभवजन्य शिक्षण हे वांग्याची शेती करताना, आठवीमध्ये झाले.

समाजामध्ये जी जी आवश्यक कामे असतात ती तुम्ही करायची. ती करता करता तुमचे शिक्षण घडणार-अशी या मागची मान्यता. जीवनामध्ये, समाजामध्ये जी आवश्यक कामे आहेत, कर्तव्ये आहेत, गरजा आहेत, त्या कुणालातरी पूर्ण कराव्या लागतात. आपल्या समाजाने सोईस्करपणे ते काम खालच्या वर्गाच्या लोकांना देऊन टाकले किंवा ते काम करणाऱ्यांना खालच्या दर्जाचे म्हटले. गांधीजींनी आपल्या शिक्षणव्यवस्थेत एका फटक्यात, श्रम करणारा आणि बुद्धिवंत यांच्यातील अंतरच मिटवून टाकले. कर्म आणि शिक्षण यांच्यातील अंतर मिटवून टाकले. ते करताना भारतीय समाजरचनेतील कामानुसार उच्च-नीच श्रेणी हा वर्णभेद, जातिभेद मिटवून टाकण्याची किल्ली त्यांनी आपल्या हाती दिली. समता ही प्रत्यक्ष जगण्यात आणली. आणि हे करताना शिक्षणही मिळाले. ते शिक्षण हेड, हार्ट अँड हँड्स तिन्हींमधून प्राप्त झाले.

**जीवन हेतू उमगला**

समाज म्हणजे काय, हे विद्यार्थ्यांना कळावे म्हणून त्या शाळेचे आम्ही सर्व विद्यार्थी दरवर्षी दहा दिवस भूदान पदयात्रेवर जात असू. खेड्यापाड्यांमध्ये पायी फिरायचे. डोक्यावरती ओझे, थंडीचे दिवस, घोंगडे घेऊन फिरावे लागायचे. रोज पाच-सहा मैल चालत एका नव्या गावात जायचे. दवंडी द्यायची, गावकऱ्यांची सभा घ्यायची. शेतमजुराची गरिबी कशी आहे, म्हणून मग शेतकऱ्याने शेतमजुराला भूमिदान द्यावे, असे आवाहन करायचे. यामागचा क्रांतीचा विचार, सामाजिक समतेचा विचार, शेतकऱ्यांचा प्रश्न, भूमिहीन मजुराचा प्रश्न, खेड्यात शेतकरी कसा राहतो, हे सर्व समजण्याची संधी मिळायची, शेवटी आम्हांला कोणा शेतकऱ्याच्या घरी राहावे लागायचे. त्याच्या घरचे अतिशय तिखट जेवण शेतकऱ्याची बायको आम्हांला स्वयंपाक करुन खाऊ घालायची. त्याची सवय नसलेले आम्ही तोंड 'सूंसू' करत पुढच्या गावाला, पुढची पदयात्रा! भारतातील खेडी कशी जगतात याचे कविकल्पित वर्णन नाही, तर ते स्वत:च प्रत्यक्ष जगण्याचा अनुभव,

समाजाचा अनुभव देखील या शाळेत मिळायचा!

परिणाम काय झाला? थोडेसे व्यक्तिगत सांगतो. वर्ष १९६३–६४ होते. वयाच्या चौदाव्या वर्षी मी आणि माझा भाऊ अशोक सायकलने चाललो होतो. वर्ध्याजवळच्या पिपरी नावाच्या एका खेड्याजवळून जात होतो. दम घ्यायला थांबलो. माझा भाऊ मला म्हणाला, ''अभय, आपण आता मोठे झालो. आपण जीवनात काय करायचे ते ठरवून टाकू.'' मी म्हणालो, ''हो ठरवून टाकू.'' बाजूला खेडे होते. आम्ही भूदान पदयात्रेतून नुकतेच आलो होतो. आमचे एकमत झाले की, भारताच्या खेड्यांमध्ये शेतकऱ्याची अवस्था फार वाईट आहे. त्या वेळी भारतामध्ये अन्नधान्याची फार कमतरता होती. शेती सुधारली पाहिजे आणि मुले, माणसे आजारी दिसत आहेत. बारकी, रोगीष्ट आहेत. आरोग्य सुधारले पाहिजे. माझा भाऊ मला म्हणाला, ''मी शेती सुधारतो.'' मी म्हटले, ''ठीक आहे, मी भारताचे आरोग्य सुधारतो.'' आता तेरा वर्षांच्या मुलाला समज काय असेल याची कल्पना तुम्ही करु शकता. पण आम्ही दोन्ही भावांनी त्या दिवशी जे ठरवले, आयुष्यभर नेमके तेच केले. माझा भाऊ शेती शिकला. प्रा. स्वामिनाथन यांचा विद्यार्थी झाला. शेती शिकून तो गेली चाळीस वर्षे वर्धा जिल्ह्यामध्ये ज्यांच्याकडे ओलीत नाही अशी शेती कशी करता येईल, याचे प्रयोग करतो आहे. मी डॉक्टर बनून आयुष्यभर खेड्यातल्या आरोग्याचे काम करत राहिलो.

बघा, हार्वर्ड–हॉपकिन्स विद्यापीठांतल्या पीएच.डी. झालेल्यांना अजूनही कळत नाही की, मिळालेल्या शिक्षणाचे काय करु, या जीवनाचे काय करु. पण नयी तालीममध्ये शिकल्यामुळे मला चौदाव्या वर्षीच माझे लाइफ मिशन सापडून गेले. अँड दॅट मेड ऑल द डिफरन्स !

**गडचिरोली**

आपण शोधत होतो, की सध्याच्या शिक्षणाला पर्याय काय असू शकतो? म्हणून 'नयी तालीम' ची शाळा कशी होती याचे थोडेस वर्णन केले. याचा पुढे काही उपयोग झाला का?

त्यानंतर चाळीस वर्षांनंतरचा प्रसंग. गडचिरोलीतील बालमृत्यूचे प्रमाण कसे कमी करायचे, हे आव्हान आढळले. त्या वेळी भारतामध्ये दरवर्षी २५ लाख बालमृत्यू होत होते. आम्ही दोन उपाय शोधले. प्रथम न्युमोनियामुळे होणारे बालमृत्यू कसे कमी करता येतील हे शोधले. आता उर्वरित सगळ्यात जास्त म्हणजे निम्मे बालमृत्यू जन्मानंतरच्या पहिल्या एका महिन्यात होत होते. हे नवजात बालमृत्यू कमी करण्यासाठी एक शास्त्रीय पद्धत मी आखली. पुढचा प्रश्न होता की, ही खेड्यांमध्ये अमलात कशी आणायची?

एकोणचाळीस खेड्यांतील एकोणचाळीस बाया निवडल्या. त्या गावागावांतील अर्धसाक्षर बाया होत्या. त्यांना प्रशिक्षण देऊन गावाची बालरोगतज्ज्ञ बनवायचे होते. आता या शिक्षणाचे उद्दिष्ट अगदी स्पष्ट होते, गावातील बालमृत्यू कमी करणे. त्या बाईला काय काय करावे लागणार आहे. आणि समाजाची गरज काय आहे, हे अगदी स्पष्ट होते. यावरुन तिचा अभ्यासक्रम ठरवला. दुसरे असे, की गावाचा वास्तविक संदर्भ होता. ती ज्या गावात राहते, त्याच गावामध्ये तिला काम करायचे होते. या बायांना शिकवण्यासाठी मी नयी तालीमची प्रत्यक्ष कर्म करुन अनुभवातून शिका ही पद्धती अवलंबिली. दर महिन्याला तीन दिवस ती बाई (तिला आम्ही आरोग्यदूत असे नाव दिले) आमच्याकडे येणार. तिला आम्ही नवजात बाळाच्या काळजी विषयी एक पायरी सांगणार. आता तिने ते आपल्या गावात जाऊन ते प्रत्यक्ष करायचे. महिनाभर ते केले, की परत पुढचे तीन दिवस ती आमच्याकडे येणार,अजून एक पायरी शिकणार. पायरीपायरीने तिला गावामध्ये गृहभेटी कशा करायच्या, गरोदर बाईला कसे तपासायचे–इथपासून ते नवजात बाळाचे वजन कसे करायचे, आजारपण कसे ओळखायचे, न्युमोनियाचा उपचार कसा करायचा, नवजात बाळाला इंजेक्शन कसे द्यायचे, बाळ जन्माला आले पण श्वासच घेतला नाही, रडलेच नाही तर त्याच्यावर उपचार कसे करायचे–हे सगळे वैद्यकशास्त्र तिला आम्ही तीन–तीन दिवस करत एकूण तीस दिवसांत शिकवले. ते तिने आपल्या गावात खरेखुरे कामात आणले. त्यानंतर भारतातील सगळ्यांत वरिष्ठ दहा नवजात बालरोग तज्ज्ञांकडून आम्ही या बायकांचे

मूल्यांकन करुन घेतले. त्या तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष, डॉ. मेहरबान सिंग, जे त्यावेळी एम्स (ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस) दिल्लीमध्ये बालरोग विभागप्रमुख होते, ते म्हणाले–गडचिरोलीतील या अर्धसाक्षर पण प्रशिक्षित आरोग्यदूत, यांची नवजात बाळांचा उपचार करण्याची क्षमता ही एम्स मधून निघणाऱ्या एमबीबीएस डॉक्टरांपेक्षा जास्त चांगली आहे!

आम्ही हा जो शिक्षण प्रयोग केला ते शिक्षण नयी तालीमच होते. कर्म आणि ज्ञान दोन्ही सोबत होते. वीस वर्षे वर्गामध्ये बसून कागदावर शिक्षण व नंतर समाजाची गरज भागवेन, असे विभाजन नाही. कर्म करता करता ज्ञान मिळते. कर्म करण्यातून ज्ञान मिळते, ज्ञानाचे रुपांतर तत्काळ कर्मात होते आणि समाजाची एक गरजही भागते.

पुढे भारत सरकारने एक निर्णय घेतला. गडचिरोलीमध्ये यशस्वी झालेल्या यापद्धतीने बाल आरोग्य सेवा देशातील सर्व गावांमध्ये द्यायची. आम्ही या एकोणचाळीस आरोग्यदूतांना घेऊन जी पद्धत विकसित केली. तीच पद्धत आम्ही भारतातील नऊ लाख **आशा** साठी वापरुन त्यानांही माता अणि नवजात बालकाची काळजी कशी घ्यायची हे प्रशिक्षण दिले. गेल्या वर्षी या प्रशिक्षित **आशांनी** एक कोटी नवजात बालकांना घरोघरी सेवा दिली. नयी तालीम काय चमत्कार करु शकते ते पाहा. हे शिक्षण नुसते एका माणसापुरते नाही, एकोणचाळीस आरोग्यदूतांपुरते नाही, तर त्याचा देशव्यापी प्रयोग करु शकला!

**मॅकमास्टरचा प्रयोग**

कॅनडामध्ये एक विद्यापीठ आहे, मॅकमास्टर विद्यापीठ. तेथे एक शैक्षणिक प्रयोग जवळपास गेली तीस वर्षे केला जात आहे. दोन हजार वर्षांपूर्वी युरोपमध्ये होऊन गेलेल्या हिप्पोक्रेटिस, गेलनच्या काळापासून अगदी सन १९०० पर्यंत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्यांना मृतदेहांची चिरफाड करुन शिक्षण घ्यावे लागत होते. १९०० च्या दरम्यान विल्सन ऑस्लर या डॉक्टरने जॉन्स हॉपकिन्समध्ये वैद्यकीय विद्यार्थ्यांना मृतदेहाऐवजी प्रत्यक्ष रुग्ण तपासून वैद्यकीय शिक्षण द्यायला सुरुवात केली. तरीही अजून पहिली दीड वर्षे फक्त मृतदेहावरच शिकवतात. त्याला प्री– क्लिनिकल ट्रेनिंग किंवा पूर्वतयारी म्हणतात. हे मृतदेहावर मिळणारे शिक्षण अतिशय मृत असतं. वस्तुत: जिवंत रुग्णांचा उपचार करण्याचं शिक्षण मृतदेहावरुन का सुरु करायचं? मॅकमास्टर विद्यापीठाने ही पद्धत बदलली. वैद्यकीय शिक्षणाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना सरळ रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये पाठवले जाते. वॉर्डमध्ये जो रुग्ण असेल, त्याचा आजार पाहून त्या संबंधी वाचायचे आणि शिकायचे. त्या रुग्णावर तज्ज्ञ डॉक्टरांसोबत प्रत्यक्ष उपचार करताना अनुभव घेत शिकायचे. त्यानंतर दुसरा रुग्ण, दुसरा आजार. गंमत अशी, की त्यांचे एमबीबीएस तीन वर्षांत पूर्ण होते आणि आपल्याला साडेचार वर्षे लागतात आणि मी अस्वस्थ होऊन त्यांना विचाराले, की तुम्ही सुरुवातीस पूर्ण शरीराची रचना (ॲनाटामी) शिकवत नाही. समजा असे झाले, की डाव्या पायाच्या करंगळीच्या टोकाचे हाड, टर्मिनल फॅलिंग्ज, त्याचा रोगी त्याने न बघितल्यास त्या हाडाची रचना कशी असते हे कदाचित तो कधी शिकणारच नाही, मग त्याचे वैद्यकीय शिक्षण अपुरे राहिले ना? तर त्यांनी मला गमतीशिर उत्तर दिले. म्हणाले, ''या सातशे बेडच्या रुग्णालयामध्ये तीन वर्षे काम केल्यानंतर, त्याला जर डाव्या पायाच्या करंगळीच्या टर्मिनल फॅलिंग्जची एकही केस मिळाली नाही, तर ते शिकण्याची गरजच नाही!'' मी हेका सोडला नाही. म्हटले, ''तरीपण, डॉक्टरच्या आयुष्यात अचानक अशी एखादी केस आलीच तर?'' ते म्हणाले, ''हो. असे घडू शकते. पण आम्ही प्रत्येकाला स्वशिक्षणाचे धडे दिले आहेत. तो गरज पडेल तेव्हा वाचू शकतोच की!''

दुर्दैवाने आपल्या शिक्षणपद्धतीत जे शिकण्याची गरज नाही असे खूप काही अभ्यसक्रमामध्ये असते. आपण दहा–बारा वर्षे जे शालेय शिक्षण देतो, त्यात जीवनात गरज नाही असे बरेच शिक्षण देत असतो. यापेक्षा वेगळे, पर्यायी शिक्षण संभव आहे. ते शिक्षण कसे देता येते, हे मी काही उदाहरणांनी सांगितले. विनोबांनी त्यांच्या **शिक्षण विचार** या पुस्तकांमध्ये नयी तालीमची तत्वे अतिशय उत्कृष्टपणे मांडली आहेत. त्यांचाच माझ्या बुद्धीनुसार विस्तार करुन ती आपल्यापुढे

मांडतो.

**नयी तालीमचे आधार**

पहिला आधार–शिक्षण कोणाचे? तर हे शिक्षण स्व चे आहे. हा स्व कोण? आपल्या आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये अशी कल्पना आहे, की हा 'स्व' एक रिकामा डबा आहे. त्या रिकाम्या डब्यामध्ये म्हणजे डोक्यामध्ये माहितीचा माल टाकायचा काही उपयोगी, काही निरुपयोगी. तो माल नीट भरला की नाही याची परीक्षा घ्यायची. नयी तालीममधील स्व ची अशी कल्पना आहे की, हा साक्षात आत्मा आहे! तो स्वयंप्रकाशी आहे. त्यावरचं फक्त झाकण तेवढं शिक्षणाने काढायचं आहे. मायकेल अँजेलो म्हणायचा की, मी मूर्ती घडवत नाही, ती त्या दगडात आधीपासून असते. मी फक्त त्या दगडाचा अनावश्यक भाग काढतो, उरते ती मूर्ती. विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील माणूस आजही आहेच. निरुपद्रवी सालपटे बाजूला केली पाहिजेत. शिक्षकाने माळ्याची भूमिका घेतली पाहिजे. माळी बीजामधून झाड काढतो का? मग झाड कुठून येते? ते बीजात असतेच! माळी फक्त त्या झाडाला आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करतो. झाड स्वत:च वाढते.

नयी तालीमचा दुसरा आधार– स्वत:ला ओळखणे म्हणजे शिक्षण. हे स्वत:ला ओळखणे कसे व्हावे? भारतीय परंपरेत अजून एक शब्द आहे, स्वधर्म. स्वधर्म म्हणजे समाजामध्ये माझे इतरांच्या प्रति असलेले कर्तव्य. समाजामध्ये स्वधर्म करता करता मला जे शिक्षण मिळते, ते नयी तालीमचे शिक्षण. विद्यार्थ्याला स्वधर्म करण्याची संधी दिली जाते. या शिक्षणप्रक्रियेत कृतिहीन ज्ञान नाही, कृतीसोबत ज्ञान जोडले आहे. स्वधर्माचे कर्तव्यकर्म ज्ञानमय होऊन जाते. येथे ज्ञानही मिळते आणि कौशल्येही. वांगेही वाढते आणि विद्यार्थ्यांचे ज्ञानही!

शिक्षणाविषयी एक अतिशय सुंदर वाक्य वाचले. 'सेल्फ इज लाइक अ रे ऑफ लाइट..!'' स्व म्हणजे प्रकाशाचा किरण. भौतिकशास्त्र आपल्याला सांगत की प्रकाशाचा किरण दिसत नाही. तो कोणत्यातरी अडथळ्यावर पडला, की दृग्गोचर होतो. मी कोण आहे? हा 'मी' आपल्याला दिसत नाही. आपण केवळ कल्पना करतो की मी असा आहे, तसा आहे. शिक्षणाद्वारे तो 'स्व' मला कळायला पाहिजे. – सेल्फ इट मीट्स अ चॅलेंज, ॲन ऑब्स्टॅकल. देन द सेल्फ बिकम्स व्हिजिबल टु युवरसेल्फ– शिक्षणामध्ये नेमके असेच घडते. एका सामाजिक आव्हानाला मी सामोरा जातो तेव्हा माझ्यातील क्षमता, माझ्यातील गुण, माझ्या मर्यादा, मला काय करायला आवडते, मला काय करायला जमते, माझा कल काय, माझी ॲटिट्यूड्स काय, माझी कुवत काय–हे सगळे मला दिसू लागते. म्हणून स्वधर्म करता करता, जे स्व विषयी ज्ञान प्राप्त होते ते शिक्षण.

तिसरा आधार–स्वधर्म करायचा कुठे? मी जिथे आहे तिथे! मी जिथे राहतो त्याला गांधीच्या परिभाषेत स्वदेश म्हणतात. हा स्वदेश म्हणजे भारतमाता नाही. तुम्ही ज्या जागेशी बांधलेले आहात, तो समाज, ती जागा, तो निसर्ग, ते गाव, ती भूमी, त्याला स्वदेश म्हणतात. तर, स्वधर्म स्वदेशात करायला पाहिजे. ज्या समाजाचा मी भाग आहे, ज्याचे मी देणे लागतो, तिथे मी माझे कर्तव्यकर्म, म्हणजे स्वधर्म करता करता जे मला स्वत:विषयी ज्ञान प्राप्त होते, ते शिक्षण.

नयी तालीमचा चौथा आधार– या पद्धतीने शिक्षणासोबतच आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन झाले पाहिजे. कारण स्वावलंबन नसेल तर जीवनामध्ये स्वातंत्र्य टिकू शकत नाही. आर्थिक परावलंबी शेवटी परतंत्रच राहणार. नयी तालीम जेव्हा स्वावलंबन देते, तेव्हा ती स्वातंत्र्यही देते. नयी तालीमद्वारा विद्यार्थ्याला काय शिकायला मिळावे? विनोबांच्या शब्दांत : योग (आत्म–अनुशासन), उद्योग (कर्म कौशल्य) व सहयोग करण्याची सामूहिक वृत्ती मिळावी.गांधीजींनी ही जी शाळा सुरु केली होती, या शाळेमधील पहिले शिक्षक रवींद्रनाथ टागोरांनी पाठवले होते. न्यूयॉर्कमध्ये पीएच.डी. झालेले व रवींद्रनाथांचे दहा वर्षे वैयक्तिक सचिव असलेले आर्यनायकम व संस्कृतमध्ये पदव्युतर शिक्षण झालेल्या त्यांच्या पत्नी आशादेवी येथे शिक्षक म्हणून आले होते. अशी ही शाळा गांधींजींच्या

प्रत्यक्ष नजरेखाली त्यांच्या आश्रमाच्या बाजूलाच विकसित झाली. माझी आई त्या शाळेची पुढे मुख्याध्यापिका होती. शोकांतिका अशी, की स्वातंत्र्यानंतर त्या क्रांतिकारी प्रयोग असलेल्या शाळेला महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाची मान्यता नव्हती. नयी तालीम ही शिक्षकांना परवडण्यासारखी पद्धत नव्हती. त्यांचे स्वत:चे शिक्षण झाले होते. औपचारिक व्यवस्थेमध्ये. त्यात कर्मातून शिक्षण कुठे होते? त्यामुळे नयी तालीम शिक्षकांना पेलवली नव्हती. ती स्वतंत्र होती. म्हणून सरकारलाही पेलवली नाही. शिक्षण विभाग म्हणायचा, ही असेल गांधीजी, टागोर यांची शाळा; पण आमच्या अभ्यासक्रमाच्या चौकटीत ती नाही, म्हणून मान्यता देता येणार नाही. एके दिवशी ती शाळा बंद झाली.अनेक वर्षानंतर आनंद निकेतन विद्यालय, म्हणून सेवाग्राम येथे ती शाळा पुनरुज्जीवित करण्यात आलेली आहे. पण तोपर्यंत त्या शिक्षणपद्धतीचा जनक खूप पुढे गेला होता.

**जीवन हेच शिक्षण**

पाच-सहा वर्षांपूर्वी सोवग्रामला एका बैठकीसाठी गेलो होतो. सकाळी नारायणभाई देसाई यांच्याबरोबर आश्रमाच्या बाजूच्या रस्त्याने फिरायला निघालो. नारायण देसाई हे गांधीजींचे पुत्रतुल्य सचिव महादेव देसाई यांचे पुत्र गांधीजींच्या आश्रमात त्यांच्या अंगाखांद्यावर वाढलेले. पुढे ते नयी तालीम चे मोठे आचार्य झाले. गांधीविचारांचे प्रमुख व्याख्याते झाले. ते माझे गुरु होते. त्या दिवशी त्यांनी मला एक आठवण सांगितली. म्हणाले, ''मी अठरा-वीस वर्षांचा होतो. मला वाटले की, आता सेवाग्राम सोडावे. गांधींच्या छायेत मी वाढतो आहे. वाढ होणार नाही. म्हणून मी बापूंना म्हटले की, ''बापू मुझे सेवाग्राम छोडना है!'' - तर बापू म्हणाले, ''बहोत अच्छाः जरुर छोडो! तो फिर क्या करोगे? कल सुबह मेरे साथ घूमने चलो.'' नारायणभाई दुसऱ्या दिवशी सकाळी गांधीजींबरोबर फिरायला निघाले. गांधींनी विचारले, ''नारायण, तुम्हें क्या करना है?'' नारायणभाई म्हणाले, मुझे ''नयी तालीम का काम करना है?'' गांधी म्हणाले, ''बहुत अच्छे!! लेकिन ये जो मेरी नयी तालीम स्कूल है, ऐसा नहीं करना!'' नारायणभाईंना काही समजले नाही! गांधींनी निर्माण केलेली नयी तालीम शाळा आणि स्वत: म्हणत आहे की, अशी नयी तालीम शाळा करु नकोस. चकित होऊन त्यांनी विचारले, ''बापू आप क्या कह रहे हो?'' गांधीजींचे पुढचे वाक्य अजूनच चकित करणारे होते, म्हणाले,'' मेरा बस चले तो इस स्कूल को जला के राख कर दूँ।'' नारायणभाईंनी ही घटना सांगितली त्या रात्री मला झोप आली नाही. माझ्यासाठी हा भूकंपाचा अनुभव होता. दुसऱ्या दिवशी मी नारायणभाईंना पुन्हा भेटलो. विचारले, ''मला काही कळले नाही, गांधीजी असे का म्हणाले?'' स्वत:च निर्माण केलेली शाळा आणि स्वत:च म्हणतात की, इसको जलाके राख करदूँ। नारायणभाईंनी स्पष्टीकरण दिले, की गांधी हा इतक्या झपाट्याने विकास करणारा डायनॅमिक माणूस होता. १९३७ मध्ये त्यांनी या शाळेची कल्पना मांडली. पण पुढे नऊ वर्षात ती शाळा विकसित होत असताना गांधीची कल्पना त्या शाळेच्या किती तरी पुढे गेली होती. ती शाळा त्या गतीने पुढे जात नव्हती म्हणून गांधींना ती शाळादेखील मागासलेली वाटायला लागली. जी शाळा त्या वेळच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये किती तरी पुढे होती आणि आजही पुढे राहील, पण गांधीजी त्यापुढे निघून गेले होते.

**मग गांधीना काय हवे होते?**

नारायणभाईंनी मला सांगितले-गांधीचे म्हणणे होते, की गाव हीच शाळा व्हायला पाहिजे. वेगळी कोणती शाळा नावाची कुंपणभिंतीतील वास्तूच अस्तित्वात राहायला नको! हा क्रांतिकारी विचार होता. त्या काळामध्ये 'नयी तालीम' ची व्याख्या अशी केली जायची की जीवनासाठी, जीवनाद्वारे शिक्षण म्हणजे नयी तालीम. विनोबा 'शिक्षण विचार' मध्ये लिहितात, की ही व्याख्यादेखील मला मंजूर नाही. कारण जीवनाचे शिक्षण, जीवनाद्वारे शिक्षण यामध्ये अजूनही द्वैत आहे. जीवन वेगळे व शिक्षण वेगळे आहे. माझी व्याख्या आहे, जीवन हेच शिक्षण!

मित्रांनो, याहून प्रत्ययकारी वाक्य मी शिक्षणाबाबत वाचलेले नाही. जीवन हेच शिक्षण! बाकी सगळे कृत्रिम! जीवन हेच शिक्षण असेल, तर गाव किंवा शहर हीच शाळा गावामधील जो समाज आहे, त्या समाजामध्ये जी जी कर्तव्ये

आहेत, कामे चालतात, ते शेती करणे असो, गायी सांभाळणे असो, स्वयंपाक करणे असो, सुतारकाम करणे असो, मोबाइल फोन वा कॉम्प्युटर दुरुस्ती असो ही सगळे कर्तव्यकर्मे करता करता आपोआपच शिक्षण होते. गाव हीच शाळा, जीवन हेच शिक्षण. जीवन आणि शिक्षण यांना वेगवेगळे करणे अयोग्य आहे.

आज शिक्षण म्हणजे जणू काही जीवनाची चाललेली केवळ पूर्वतयारी वस्तुत: शिक्षक, शिक्षणसंस्था व शाळा यांच्या सोयीसाठी बनविलेले हे विभाजन आहे. म्हणून इवान इलीच यांनी १९७० च्या दशकात 'डी-स्कूलिंग सोसायटी' अशी कल्पना मांडली. शाळामुक्त समाज, समाजातून शाळा रद्द केल्या पाहिजेत. एव्हरेट राइमर तर त्याही पुढे गेला. सत्तरच्या दशकात त्याने पुस्तक लिहिले, 'स्कूल इज डेड!' शाळा मेली आहे. पण ती काही मेली नाही! या शिक्षणव्यवस्थेची मुळे पक्की रुतलेली आहेत.

माझ्या शिक्षक मित्रांनो! आजची ही शिक्षणपद्धती शिक्षणापासून असलेली किमान अपेक्षाही पूर्ण करीत नाही असे निष्कर्ष असलेले पाहणी अहवाल आपण अधूनमधून वाचतो. जर किमानदेखील घडत नसेल, तर या शिक्षणव्यवस्थेत गतीने परिवर्तन करण्याची, अगदी क्रांती करण्याची गरज आहे. ते क्रांतिकारी चिंतन गांधीजींनी या देशासाठी करुन ठेवले आहे. त्यांनी त्याचे प्रयोगही केले. त्याचे मॉडेल्सही निर्माण केले. स्वत: गांधीजी त्याही पलीकडे जाऊ इच्छित होते. आता आपल्याला इंटरनेट, गुगल, ॲप्स आणि मोबाइलमुळे निव्वळ माहितीसाठी शिक्षण घेण्याची गरजच उरलेली नाही. माहिती कशी शोधायची याचे शिक्षण पाहिजे. माहिती नको, माहिती हे ओझे आहे. म्हणून शिक्षणामध्ये नव्या क्रांतीची गरज आहे किंवा ती येऊ घातली आहे. ती क्रांती जर आली नाही तर विद्यार्थी बरबाद होतीलच; पण शिक्षकही बरबाद होतील. कारण ते लवकरच आउटडेटेड होणार आहेत. तुम्ही विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याची जबरदस्ती करणार असाल तर ती त्यांच्यासाठी कारावासाची शिक्षा ठरेल,ते विद्रोह करतील. करत नसतील तर त्यांनी करावा.

कोरोना विषाणूंने एक उपकार केला. शाळा न भरता शिक्षण द्यायला भाग पाडले. आपण ते रडतरडत, मजबुरी म्हणून केले. वस्तुत: शालाविरहीत शिक्षणाचे प्रयोग करण्याची, नवीन शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याची ती एक संधी आहे. एवीतेवी शाळा भरु शकत नव्हत्या. मोबाइल फोनचा वापर करुन शाळेचा तोच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या माथी मारायच्या ऐवजी भारतातील दहा कोटी विद्यार्थ्यांना जीवन जगता जगता शिक्षण आपल्याला आखता येईल.

आपल्याला शिक्षणात एका क्रांतीची गरज आहे. जीवन हेच शिक्षण, गाव ही शाळा आणि विश्व ही प्रयोगशाळा व्हायला हवी, त्याहीपुढे जात मी म्हणेन,''विश्व ही शाळा आणि 'स्व' ही प्रयोगशाळा व्हायला हवी.''

(साप्ताहिक साधनामधून साभार)

## शिक्षणक्षेत्रात मी अस्वस्थ,निराश का आहे?

**हेरंब कुलकर्णी**
प्रयोगशील शिक्षक,अकोले

अनेकांना वाटेल की आणखी खूप काम करायचे असूनही, अनुभव घ्यायचे असूनही कशासाठी इतक्या कमी काळावर लिहीले? हे काय आत्मचरित्र आहे का? नक्कीच नाही. हे आत्मचरित्र नाही तर दशकभराच्या प्रवासाच्या आठवणी आहेत...या १० वर्षात मला जितके फिरता आले आणि अनुभव घेता आले ते इतके विविधांगी आहेत आणि समाज आरपार तळातून दाखविणारे आहेत. सजग वाचकाला शिक्षण हे समाजाचे कसे चित्रण असते? आणि शाळेच्या एका खोलीत घडणाऱ्या साध्यासुध्या शिक्षण प्रक्रियेवर परिणाम करणारे किती तरी घटक असतात याचे भान हे सारे अनुभव देतील. राजकारण, सामाजिक प्रश्न, नोकरशाहीची मानसिकता, भ्रष्टाचार,सांस्कृतिक वेगळेपण, दारिद्र्याचा शिक्षणावर होणारा परिणाम हे सारे सारे तानेबाणे उलगडत जातील. त्यामुळे शिक्षणात काम करणाऱ्यांना,सामाजिक भान असणाऱ्यांना, वाचकांना, समाजचिंतक आणि कार्यकर्त्यांना आणि मुख्य म्हणजे धोरण ठरविणाऱ्या प्रशासनाला उपयुक्त ठरावे म्हणून हे सारे अनुभव ललित शैलीत मांडले आहेत. जाणीवपूर्वक शिक्षणाचे तात्विक विश्लेषण करणे टाळले आहे. हेतु हा की ते अनुभवच वाचकांशी बोलावेत आणि त्यातून शिक्षणाचे एक चित्र उभे राहावे. घटनेला एक कर्ता असावा म्हणून फक्त त्यात मी आलो आहे अन्यथा तो कर्ता हा या देशातील अनुभव घेणारा सामान्य नागरिकच आहे. नर्मदा परिक्रमा करणारी व्यक्ती ही व्यवहारात कोणत्याही पदावर असली तरीही परिक्रमा करताना तिची ओळख ही साधक किंवा परिक्रमावासी हीच तर असते. तसे या रस्त्यावरुन जाणारा कुणीही म्हणजे मी आहे इतकेच. त्यात मी किती फिरलो आहे? मी किती लिहिले आहे? हा अभिनिवेश नक्कीच नाही. या १० वर्षाच्या भटकंतीतून काय पदरात पडले? असा विचार करतो की साधक नर्मदा परिक्रमा करताना नर्मदेला काही देवू शकत नाही तर नर्मदाच त्याला एका उच्च अनुभवाने समृद्ध करते. इतक्या विस्तीर्ण प्रदेशातील शिक्षणव्यवस्थेत आपण काही बदल घडवू शकतो हा अहंकार तर नक्कीच नव्हता. पण या माझ्यामुळे शिक्षण बदलले नसले तरी मी मात्र या अनुभवांनी समृद्ध झालोय. माझ्या जीवनविषयक धारणा मुळातून हलल्या आणि या व्यापक अनुभवातून व्यापक पट सतत अनुभवविश्वाला खुणावत राहतो. कोणत्याही प्रश्नाचा विचार करताना नंदुरबारच्या टेकड्या दिसतात. मेळघाटातील ती केविलवाणे माणसे दिसतात. गडचिरोलीचे विस्तीर्ण जंगल दिसते आणि शहरी भागातील मोठ्या पुलाखाली झोपलेली माणसेही दिसतात. खरं तर मी एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलो. तिथे गरीबी वगैरे काही माहीत असायचे कारणच नव्हते. मध्यमवर्गीय मुलांच्या जशा करियरच्या कल्पना असतात तशा कल्पना माझ्याही होत्या. पण पुढे वाचन करताना सामाजिक वास्तवाची जाणीव सखोल होत गेली आणि प्रत्यक्ष नोकरीत आल्यावर जेव्हा झोपडपट्टी बघितली तेव्हा मध्यमवर्गीय संस्कारांना धक्के बसू लागले. आपण जगतो त्यापलीकडे एक अभावाचे जग आहे याने हललो. त्यातून एक कायमचा तुलना करणारा अपराधीभाव असलेला मी झालो. नोकरीला लागलो तेव्हा पाचवा वेतन आयोग आला. त्याकाळात या अपराधीभावनेने मला वेतनवाढ घेणे बोचू लागले. त्यातून मी मला

मिळणारी वेतनवाढ नको असे प्रतिज्ञापत्र शासनाला पाठवले. त्यात भाबडेपणा होता. अपराधीपणा होता. माझं वय तेव्हा अवघ २७ वर्षाचे. शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. पण त्या कृतीने सारा संघटित वर्ग माझ्यावर तुटून पडला. शिव्यापासून विविध टोकाचे अनुभव घेतले. हादरुन गेलो. पण त्यानिमित्ताने सर्व सामाजिक चळवळींशी नकळत जोडला गेलो. 'नाही रे' वर्गाचे विश्व परिचित झाले. त्यानंतर सामाजिक ललित लेखन करायला लागलो. विविध राजकीय सामाजिक विषयावर विडंबन कविता करायचो, विनोदी लेखन करायचो. त्यातून खूप लोकप्रियता मिळाली. त्यातच लेखन करियर नक्की झाले. वृत्तपत्रीय लेखन आणि विनोदी कविता याच परिघात फिरु लागलो. पण दिवंगत नरेंद्र दाभोळकर यांनी मला वंचितांचे शिक्षण या अंकाचे संपादन करण्याची जबाबदारी दिली. त्यातून पुढे सर्व शिक्षण अभियानात काम करण्याची संधी मिळाली. विविध निमित्ताने महाराष्ट्रात फिरता आले. दुर्गम अदविासी भाग बघता आला आणि माझे अनुभवविश्वच बदलून गेले. एका व्यापक परिघावर सारे काही बघू लागलो. माझ्यासाठी ही फार मोठी उपलब्धी आहे. माझ्यासारखा इंडियात जगणारा माणूस भारताशी जोडला गेला. हे श्रेय या माझ्या शिक्षणपरिक्रमेला आहे. मी जर वंचितांचे शिक्षण या विषयाकडे वळलो नसतो तर खूप भरकटलो असतो. विनोदी लेखन करताना केवळ स्वान्तसुखाय लिहीत राहिलो असतो आणि मध्यमवर्गाचे मनोरंजन करीत राहिलो असतो. अधिक आत्मकेंद्रित होत जाऊन माझी प्रतिभा केवळ पैसा, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी खर्ची घातली असती आणि हा व्यापक परीघ न बघता जर शिक्षणात आलो असतो तरी मग मुलांच्या दप्तराचे ओझे, मुलांच्या डब्यात काय द्यावे? क्लासेसला मुलांना पाठवावे की नाही? अशा विषयांवर बोलत राहिलो असतो. पण या वास्तवाच्या साक्षात्काराने माझ्या सर्व बोलण्याला लिहिण्याला आणि कामाला एक दिशा आली. प्रत्येक व्यक्त होण्यामागे हा परीघ सतत कार्यरत राहिला आणि सतत या नाकारलेल्या माणसांसाठी आपण काम करावे ही प्रेरणा हलवत राहिली.

लेखन ही माझी या परिक्रमेतील सांत्वना आहे. लेखन हीच माझी ओळख आहे. लेखन हीच माझी ओळख आहे. लेखन हीच माझी ऊर्जा आहे. मी काम खूप कमी केले पण लेखनातून सतत व्यक्त होत राहिलो. या लेखनातून आपण सर्वदुर पोहोचतो. एखाद्या प्रश्नाला गती मिळते हे जसे मी अनुभवले त्याचप्रमाणे अनेकदा ठिकठिकाणी गेल्यावर लक्षात आले की ज्या ज्या माणसांना विशिष्ट प्रेरणेने काम करताना एकटेपणा वाटतो  त्या त्या माणसांसाठी माझे लेखन एक सांत्वना आणि सोबत म्हणून काम करते आहे. आपण जे बोलू शकत नाही ते प्रश्न या लेखनात वाचायला मिळतात अशी भावना अनेकदा ऐकायला मिळाली. लेखनातून अनेक लेख कापून ठेवलेले कात्रणे दाखवतात. कोणत्या लेखात मी काय म्हटले होते? हे सांगतात तेव्हा खूप भरुन येते. तुमचे लेख वाचून नैराश्य गेले वगैरे ऐकून आपले नैराश्य जाते. या परिक्रमेत माझा सारा संताप, नैराश्य या लेखनात विसर्जित झाला. एक प्रकारचे विरेचन झाले आहे. या विरेचनाने मी नॉर्मल राहिलो. अन्यथा फुटून गेलो असतो. आजच इतक्या कमी वयात डायबेटीस जडलाय लेखनाचे विरेचन नसते तर काय झाले असते?वामन निंबाळकरांची कविता माझ्यासाठी अगदी खरी आहे .

**स्वत:वरचा जगावरचा विश्वास जेव्हा उडून जातो**

**तेव्हा माऊलीची कूस बनून शब्दच मला जवळ घेतात**

माझ्यासाठी या लेखनाने हे काम नक्कीच केले आहे. याचे कारण एखाद्या दुर्गम गावाला भेट दिल्यावर, आश्रमशाळेला भेट दिल्यावर, आश्रमशाळेला भेट दिल्यावर पर्यटकांच्या आनंदात तुम्ही परत येवू शकत नाही आश्रमशाळेत जेवण आणि शिक्षण न मिळणारी मुले बघून. दुर्गम भागातील अमानुषतेने उध्वस्त केलेले जगणे बघून तुम्ही संतापाने थरथरता, तुमच्याला माणूस अश्रूंचा आधार शोधायला लागतो आणि आपण हे बदलण्यासाठी फार काही करु शकत नाही. या आपल्या अगतिकतेने चडफडत राहतो. ते बघून आपण अस्वस्थ होतो. दिवसेंदिवस ते वास्तव आपल्याला विषण्ण करुन टाकते. आपल्या स्वत:च्या मर्यादा आपल्याला आपलीच चीड आणतात.

अशावेळी लेखन आपल्याला आधार देते. सांत्वना देते आणि विरेचन करते. या लेखनाने मला समतोल ठेवले आहे. वेदना इतरांपर्यंत पोहोचवून त्यांना या वेदनेचे भागीदार बनविले आहे.

लेखनाचा एक महत्वाचा फायदा माझ्या लक्षात आला. माझे लेखक मित्र शांताराम गजे नेहमी म्हणतात की एखादा प्रश्न जर सुटायचा असेल तर त्या विषयाचे साहित्य निर्माण व्हावे लागते. त्यामुळे तो प्रश्न सुटायला मदत होते. दलित साहित्य निर्माण झाले आणि त्याने दलित चळवळ उभी राहायला खूप मदत केली. मला नेहमी वाटते की शिक्षण हा सामाजिक महत्वाचा प्रश्न, व्हायचा असेल तर ग्रामीण भागातील शिक्षणाचे प्रश्न आश्रमशाळा, शालाबाह्य मुले ग्रामीण शिक्षणाचे प्रश्न हे समाजाच्या केंद्रस्थानी येण्यासाठी ते प्रश्न साहित्यात यायला हवेत. याचे कारण असे की समाजातील मध्यमवर्ग आणि बोलका वर्ग हा शहरात राहतो. हे प्रश्न त्यांच्या अनुभवाचा भाग नाही. त्यामुळे शहरी माणसांच्या खेड्यातील शिक्षणाच्या काहीशा रोमँटिक कल्पना असतात. खेड्यात शाळा कुठेतरी झाडाखाली शाळा भरतात इथपासून अनेक कल्पना, त्यामुळे या सहानुभूतीखाली खरे चित्र आणि प्रश्न झाकले जातात. वस्तुनिष्ठ चित्र पोहोचत नाही. ग्रामीण राजकारण, अध्यापन पद्धती, कार्यसंस्कृती, संघटना, सरकारचे दुर्लक्ष, ग्रामीण माणसांची शिक्षणातील समज वाढविणे, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण शाळातील कमी सुविधा असे सारे कवेत घेणारे साहित्य निर्माण व्हायला हवे. लेखन करताना ही साक्षरता शहरी मध्यमवर्गीय वाचकात निर्माण व्हायला मदत झाली अस मला इतके वर्ष सतत लिहिल्याने नम्रपणे वाटते आहे. जे कार्यकर्ते अणि नेते प्रत्यक्ष कामासोबत लेखन करु शकले त्यांचे काम अधिक प्रभावी झाले हे आपल्याला गांधी,आंबेडकर,शरद जोशी ते महाश्वेतादेवीपर्यंत लक्षात येते.

पण लेखनाच्या काही मर्यादाही अलीकडे त्रास देतात. लेखन करताना आपण एखादा प्रश्न मांडतो. त्यामुळे तो लेख सरकारी अधिकाऱ्यांनी वाचावा आणि त्यावर काहीतरी करावे असे वाटणे स्वाभाविक आहे पण सरकारी अधिकारी महत्वाच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले लेख वाचतसुद्धा नाहीत असा अनेकदा अनुभव येतो. त्यावर कृती तर दूर राहिली. अशावेळी निराशा येते. ज्या समाजाच्या प्रबोधनासाठी आपण हे सारे लिहितो ते ही त्यावर व्यक्त होत नाहीत. पूर्वी सामाजिक संघटना नावाचा एक घटक असायचा. एखादा लेख आला की त्यावर लगेच काहीतरी कृती करायचे. पण आज त्यामुळे लेखनात फक्त आपण ओरडलो आणि आपला अपराधीभाव कमी झाला इतकेच फक्त समाधान उरते. एक उदाहरण देतो. शिक्षक संघटना त्यांच्या अधिवेशनाच्या काळात अधिकृत शासकीय सुट्टी मिळवतात. त्यासाठी पावती फाडून शिक्षकांकडून पैसे गोळा करतात आणि महाराष्ट्रातील शाळा एक आठवडा बंद राहतात. हा प्रश्न आतापर्यंत प्रत्येक अधिवेशन काळात मी मांडला. त्यावर लिहिले. टीव्हीच्या चर्चेच्या कार्यक्रमात मांडला. पण त्यावर ज्यांची मुले तिथे शिकतात त्या गावातील गावकऱ्यांनी आक्रमक व्हायला हवे होते. जाब विचारायला हवा. पण काहीही घडले नाही. याउलट शिक्षक संघटना आक्रमक आणि संघटीत होत्या. त्यांनी विरोध करणाऱ्यांना टार्गेट करीत सोशल मिडियात मेसेज फिरवले. अशावेळी लेखन परिणाम करीत नाही असे वाटते. सोशल मिडियात आपण लेख टाकावेत तर न वाचताच Like येतात किंवा कमी वाचले जाते. आपण भ्रष्टाचार किंवा इतर आक्रमक विषयांवर लिहून जेव्हा त्याची दखल घेतली जात नाही तेव्हा उद्‌विग्नता येते. हे केवळ शिक्षणविषयक नाही तर सर्वच सामाजिक विषयांबाबत खरे आहे.

त्यामुळे इतके लिहूनही आणि लेखन ही ओळख असूनही लेखन कमी करुन प्रत्यक्ष रस्त्यावर उतरावे असे वाटू लागते. इतर माध्यमे फारशी नसताना लेखन जितके समाजाला आणि शासनावर जितके प्रभाव टाकत होते तेवढी त्यांची परिणामकारकता कमी कमी होते आहे. लेखनाचा जाणीवजागृतीसाठी नक्की उपयोग होतो आहे पण प्रत्यक्ष एखादा प्रश्न सोडवायला कमी उपयोग होतो आहे. ही खंत ही परिक्रमेवरुन परतताना मनात आहे. आचार्य अत्रे एक गोष्ट

सांगायचे. एकदा जंगलातून एक व्यापारी आणि त्याची बायको जाताना एक गुंड आला. तो तिच्या सोबत चालत छेडछाड करायला लागला आणि व्यापाऱ्याला दोघांच्या डोक्यावर छत्री धरायला सांगितले. जंगल संपल्यावर तो गुंड पळून गेला. ती नवऱ्यावर खूप संतापली. त्याला म्हणाली की तुम्ही माझा नवरा असून काहीच विरोध केला नाही..? तेव्हा तो म्हणाला, असे कसे म्हणतेस? मी खूप विरोध करीत होतो. जेव्हा तो तुला छेडत होता तेव्हा मी छत्री हलवून त्याला उन्हाचे चटके देत होतो.''कोटयावधीचे भ्रष्टाचार, आश्रमशाळेतील अत्याचार, शिक्षणातील असंवेदनशीलता यावर माझे लेखन  कधीकधी मला केवळ उन्हाचे दिलेले चटके वाटू लागतात. आपण या भ्रष्ट माणसांना थेट शिक्षा करु शकत नाही. हे अत्याचार थांबवू शकत नाही. याने केवळ उद्‌विग्नता येत राहते. आपला हा दखल घेतला न जाणारा प्रतिकार खूप केविलवाणा वाटू लागतो. थेट हे सारे थांबवून रस्त्यावर उतरावे की स्वत:ला पणाला लावावे असे वाटायला लागते. सार्त्रने नोबेल पुरस्कार मिळाल्यावर थेट कृतीसाठी कम्युनिष्ट पक्ष निवडला होता व मोर्च्यात सहभागी झाल्याचे वाचले होते. आपणही लेखनापलीकडे लेखन करताना प्रत्यक्ष कृती करायला हवी असे आता वाटू लागले आहे. शाळा वेगाने बदलू लागल्यात, शिक्षणाच्या प्रश्नाबाबत लोकांत जागृती होऊ लागली आणि पण तरीसुद्धा गेल्या १० वर्षात शहरी आणि ग्रामीण भागातील शिक्षण सुविधा आणि वेग यात खूप अंतर पडते आहे. ते भारत आणि इंडिया यातील अंतर सांधण्यापलीकडे जाऊ लागले आहे. हे मात्र तीव्रतेने जाणवते आहे. एकीकडे आमची पुण्या मुंबईत एका एका बिल्डिंगमधली अनेक पोरं सिलिकॉन व्हॅलीत शिकताना तिकडे आदिवासी पोरं मेळघाट व्हॅलीत पाखरं मारीत आहेत. आपली पोर हातात लॅपटॉप घेवून बसताना तिकडे आदिवासी खेड्यात अजून धड पाटीवर पोरं अक्षरही गिरवत नाहीत. इकडे आमची पोरं फास्ट फूड खाताना तिकडे पोरांना आश्रमशाळेत नीट खायला मिळत नाही आणि आमची पोरं वेगवेगळ्या प्रवेश परीक्षा देताना तिकडे अनेक आदिवासी गावात पन्नास वर्षे शाळा असूनही धड ७ वी शिकलेला पोरगा सापडत नाही. हे अंतर कसे सांधायचे ही माझी चिंता आहे. एकच उदाहरण देतो. मेळघाटात फिरताना एका गावाबाहेर एका तरुण मुलाने गाडीला हात केला. त्याला गाडीत घेतले आणि त्याचे गाव येईपर्यंत गप्पा मारल्या. तो निरक्षर होता. डोक्याला रुमाल बांधलेला. त्याला मग मी पंतप्रधान आणि मुख्यमंत्री कोण हे विचारले. त्याला फक्त गावचा सरपंच माहीत होता. त्याने सर्वात मोठे शहर म्हणजे फक्त जवळचे अमरावती शहर बघितले होते. हॉटेलात आजपर्यंत काय खाल्ले तेव्हा त्याने भेळ आणि गुडीशेव सांगितले आणि एकदा सिनेमागृहात जाऊन सिनेमा बघितला होता. अनेक धक्के बसल्यावर मी त्याला शेवटचा प्रश्न विचारला की लोक कधी भारत म्हणतात तर कधी इंडिया म्हणतात तर मग हे एक देश आहेत की दोन देश आहेत? तो गंभीरपणे म्हणाला, साहब, नाम दो है, इसका मतलब देश भी दो होगे ना. पुढे त्याला काहीच विचारायची हिंमत झाली नाही. हे वास्तव आणि या दोन जगात पडलेलं अंतर कसं सांधायचे हा मला पडलेला प्रश्न आहे. मी मोबाईलमधून सेल्फी कधीच काढली नाही पण एक सेल्फी काढण्याचा मला मोह होतो. स्मार्टसिटी आणि बुलेटट्रेनच्या घोषणा असलेल्या बोर्डखाली मला भेटलेला हा तरुण आणि मुंबईतल्या इंटरनॅशनल स्कूलमधला पास झालेला मुलगा यांच्यासोबत मला एक सेल्फी काढायची आहे. शिक्षण आरोग्यापासून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात हा भारत इंडिया भेद कसा मिटवायचा हा खरा प्रश्न आहे.

शिक्षणात इतके विदारक अनुभव घेतल्यामुळे माझ्या एकूण व्यक्त होण्यात काहीसा कडवटपणा आणि तिरकसपणा आला आहे. इतके वाईट  वास्तवाचे अवतार बघितल्यामुळे सरकार नावाची यंत्रणा काही बदलू शकेल असे वाटतच  नाही किंवा जरी तो बदलू शकेल असे असले तरी तिला ते बदलवण्यासाठी हलवण्याचे काम आपल्या आवाक्याबाहेरचे आहे असे वाटू लागले आहे. ही निराशा असेल किंवा अगतिकता पण माझ्यासारख्या मन:स्थितीतून आज सर्व क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते जात आहेत. सरकारी यंत्रणा आज सर्व विभागात ज्याप्रकारे काम करते

आहे त्याचे समर्थन करणे मुश्किल आहे आणि त्याला पर्याय म्हणून खाजगी व्यवस्थेचे समर्थन करणे अवघड जाते. या कोंडीत आज कार्यकर्ते सापडलेत. सरकारी शाळा नीट चालेनात म्हणून लोक इंग्रजी शाळेकडे जातात. सरकारी दवाखान्यात डॉक्टर भेटेना म्हणून लोक खाजगी दवाखान्यात जातात. पोस्टाचे टपाल वेळेत मिळेना म्हणून लोक कुरीयर शोधू लागतात. असे सर्व सेवांबाबत होऊ लागले आहे. खाजगी पर्याय हा लूटमार करु लागतो आणि सरकारी पर्याय हा अकार्यक्षमतेने नाकारला जातो. हे कसे समजून घ्यायचे? आज झोपडपट्टीतली माणसे सरकारी शाळेत पुस्तके आणि जेवण मिळतं असूनही खाजगी शाळेचा पर्याय निवडला जात आहे. याचा अर्थ तो पर्याय दर्जेदार नाही पण ती प्रतिक्रिया आहे. तेव्हा गावातील या सेवा सुधारण्यात कार्यकर्त्यांनी आयुष्य घालायचे की काय? त्यामुळे सरळ सरकारने व्हाऊचर दयावेत आणि बाजूला व्हावे या टोकाच्या निष्कर्षावर येवून परिक्रमेच्या शेवटी मी थांबलो आहे. मला मान्य आहे की यात धोके आहेत पण असंवेदनशील प्रशासन, उत्तरदायित्व नक्की नसलेली यंत्रणा आणि राजकीय व्यवस्था नावाचा धोका घेण्याची जास्त भीती वाटते. दोन अधिक दोन हे उत्तर नसलेल्या वळणावर येवून मी उभा आहे. नर्मदेत उडी मारुन स्वत:तील हा संघर्ष संपवून टाकावे असे कधीकधी वाटते पण एखाद्या वाडीवस्तीवरचा प्रयोगशील शिक्षक, एखादा ध्येयवेडा अधिकारी मला हाकारतो आणि निराशेच्या डोहाकडून मी पुन्हा मागे फिरतो आणि परिक्रमेला पुन्हा नव्या उमेदीने चालायला लागतो.उत्तर न सापडलेली ही माझी प्रश्नयात्रा आहे. हे माझे आत्मचरित्र नाही. या केवळ आठवणी,निरीक्षणे आहेत माझ्या शिक्षण क्षेत्रातील भटकंतीची. फक्त मला खूप विविधांगी अनुभव घेता आले म्हणून लिहिलेत. आश्रमशाळा पासून तर इंटरनॅशनल स्कूलपर्यंत. गावाच्या चावडीपासून तर केंद्रीय नियोजन आयोगापर्यंत, केंद्र संमेलनापासून तर पंचतारांकित परिषदांपर्यंत, सरपंचापासून तर मुख्यमंत्र्यापर्यंत, ही विविधांगी अनुभव शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या कुणालाही उपयोगी पडतील. नर्मदा परिक्रमेसारखी ही शिक्षण परिक्रमा नदी सारखी शतकानुशतके वाहतेच आहे. माझ्यासारखे हजारो पथिक परिक्रमा करीतच आहेत मी फक्त कही घाट उतरुन पाण्यात उतरलो इतकेच. शिक्षणाची ही नदी लाखो पांथस्थांना तृप्त करते आहे.या वाटेवरुन चालताना अनेकदा नैराश्य आले. पण चालत राहिलो. या परिक्रमेने आपण इतरांना काही देवू की नाही हे माहीत नाही पण आपण खूप समृद्ध झाल्याची भावना आहे. हा शिक्षणाचा शतकानुशतकाचा प्रवाह...गुरुकुलापासून आता online होमस्कुलिंग पर्यंत वाहतोच आहे. मी चालतोच आहे. काठाकाठाने नर्मदा परिक्रमेत कुठेतरी एकदा भळभळती जखम वाहणारा अश्वत्थामा एकदा भेटतो अशी श्रध्दा आहे. मला या शिक्षणपरिक्रमेत या देशातील शेवटचा माणूस त्याच्या डोक्यावर चिरंतन दारिद्र्याची भळभळती जखम वाहत असलेला भेटला...त्या जमखमेवर तेल घालायला उर्वरित आयुष्यात समर्पित व्हावे असे वाटते आहे.

(माझी शिक्षण परिक्रमा, या राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकातून साभार.)

# सृजनशील शिक्षणयात्री सुचिता पडळकर

**प्रि.डॉ.मानसी गानू**
प्राचार्या कन्या महाविद्यालय,सांगली

सकाळी उठल्यापासून रात्रीचे बारा वाजेपर्यंत स्पर्धेच्या युगात वावरणाऱ्या छोटुकल्यांच्या आयुष्यातून स्पर्धाच काढून टाकली तर काय होईल? त्यांच जीवन आहे त्याहून अधिक सौंदर्यदायी बनेल. पण ते शक्य आहे आहे का? ते कोण करु शकेल? आई-वडीलच जिथे मुलांच्या करिअरबाबत आग्रही असतात. तिथे त्यांना मोकळा श्वास कोण घेऊ देईल? पण हे शक्य आहे. ठरवलं तर एक आई अर्थात स्त्रीच हे करु शकेल.

सुचिता पडळकर यांचं वास्तव्य कोल्हापूरमध्ये. त्यांचं कार्यक्षेत्र बालवाडी फुलोरा आणि सृजन आनंद विदयालय. स्त्रीचे हक्क, स्वातंत्र्य याविषयी तर महिलादिनाला आवर्जून चर्चा होतात. पण लहानग्यांसाठी काम करणाऱ्या सुचिता पडळकर स्त्रीचं आणि सृजनाचं वेगळं नातं सांगतात.

**प्रश्न : तुमचं बालपण कुठे गेलं? कुटुंबातील वातावरण कसं होतं?**

उत्तर : चाळीस वर्षापूर्वी एखाद्या मध्यवमवर्गीय कुटंबातील वातावरणासारखंच! वर्ध्याला गांधी-विनोबांच्या प्रेरणेने स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलींसाठी सुरु झालेल्या महिलाश्रमात माझं बालपण गेलं. माझे आजोबा तिथं संगीत शिक्षक होते. तिथलं शिक्षण म्हणजे विविध भारतीय भाषा, कला, संस्कृती,सण,कृषीपरंपरा, लोककला यांचं संमेलन होतं.

**प्रश्न : महाविद्यालयीन शिक्षण कुठे झालं? ते दिवस कसे होते?**

उत्तर : वडिलांच्या बदलीमुळे माझं ग्रॅज्युएशनपर्यंतच शिक्षण external होत गेलं. पुढे वर्ध्याला राज्यशास्त्र विषयात एम.ए.ची. सोय नव्हती, त्यामुळे एम.ए.ही external केलं. नागपूर विद्यापीठाचं! यावेळी नाशिक - वर्धा इथे मी राष्ट्रसेवादलाचं काम करायचे. याच कामासाठी बिहारमध्ये मी महाराष्ट्राचं प्रतिनिधीत्व केलं. एम.एम.जोशी, आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, नानासाहेब गोरे,जयप्रकाश नारायण ही सगळी मोठी माणसं मला जवळून बघायला मिळाली. बाबा आमटे यांचा सहवासही घडला. या वातावरणाचा माझ्या मनावरील संस्कारांत वाटा आहे.

**प्रश्न : लहान मुलांसाठी काम करावं असं कधी वाटले?**

उत्तर : लग्नानंतर कोल्हापूरला आले. त्या काळी बायकांनी शिकून नोकरी करावी. घराबाहेर पडून आपण काहीतरी वेगळं करिअर करावं असा विचार फारसा नव्हता. पण माझी मोठी मुलगी शमीन बालवाडीतत जायला लागली आणि दीड-दोन महिन्यांतच ती शाळेत जाणार नाही असं म्हणू लागली. तेव्हा शाळेविषयीच्या तिच्या तक्रारी खऱ्या आहेत का ते पाहण्यासाठी मी मुख्याध्यापकांच्या परवानगीनं आठवडाभर तिच्या वर्गात बसले. तिच्या म्हणण्यात तथ्य होतं. पण रुढ बाल शिक्षणाबद्दल मला फारसं काही माहीत नव्हतं, म्हणून मी शिवाजी विद्यापीठात, बालवाडी शिक्षक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला. ती आणि मी घरातच अभ्यास करु लागलो. या काळात समविचारी अशा ज्या मैत्रिणी भेटल्या त्या आणि मी मिळून सगळ्यांनी आपल्या मुलांना आपणच शिकवायचं असं ठरलं आणि या कामाला सुरुवात झाली.

**प्रश्न : पहिल्यांदा कुठे शाळा सुरु केली ?**

उत्तर : कोल्हापूरला माकडवाल्यांच्या वसाहतीत. श्री. सुरेश शिपुरकर, श्री. व्यंकप्पा भोसले यांच्याबरोबर बालवाडी सुरु करण्यात माझाही सहभाग होता. भटक्या-विमुक्त जमातीतील मुलं पहिल्यांदा या शाळेत आली. पुढे चार-पाच वर्षांनी ती शाळा बंद झाली. माझ्या मुलीच्या बालवाडी शिक्षणाच्या वेळी मग आम्ही फुलोरा सुरु केली.

**प्रश्न : फुलोरा मधील अभ्यासक्रम कसा आहे ?**

उत्तर : आमच्या बालपणी आम्ही ज्या शाळांतून शिकलो त्यांचा आज विचार केला तर लक्षात येतं की तिथं फक्त मुलांना साक्षर केलं जात होतं. ठोकळेबाज अभ्यास पद्धत होती. त्यामुळे आपला वेळ त्याच त्या निरर्थक गोष्टी करण्यात गेला असं वाटतं. म्हणूनच फुलोरा मध्ये रुढ अभ्यासक्रम नाही. आजही शाळेचा प्रत्येक दिवसाचा दिनक्रम वेगवेगळा असतो. रोज नवं करायचं या उर्मीतून मुलांना नवे अनुभव घेण्याची संधी आम्ही उपलब्ध करुन देतो. त्यातून तीही वेगळं काही बघायला करायला शिकतात.

**प्रश्न : इतर शाळांतील मुलं आणि फुलोरातील मुलं यांत काही फरक जाणवतो का ?**

उत्तर : नक्कीच ! एका वेगळ्या अंगानं पुढे निघालेली ही शाळा गेली वीस वर्ष चालू आहे. आमची शाळा मराठी माध्यमाची आहे. महत्त्वाचं म्हणजे इतर रुढ शाळांमध्ये पालकांचा सहभाग मुलांना दिलेलं होम वर्क करुन घेणं, फार तर पाल्याची चौकशी करणं, मीटिंग अटेंड करणं एवढाच असतो. आमच्या शाळेत शिक्षकांइतका पालकांचा सहभाग असतो. मुलांना विविधरंगी अनुभव घेण्याची संधी दयायला पालक उत्साहानं पुढे असतात. ते देखील त्यांच्याबरोबर तो अनुभव घेतात, त्यावर बोलतात. त्यांना उपक्रमात मदत करतात. त्यामुळे मुलांना शाळा म्हणजे शिक्षक आणि पालक यांनी चालवलेलं कुटुंब वाटतं. शाळा ही नुसती माहितीनं भरलेली बंद खोली नसून जीवनाकडे रोज नव्यानं पाहायला शिकवणारी एक खिडकी आहे. याचा प्रत्यय आल्यानं शाळेत यायला ती खूष असतात. शाळेत पालकांनी चालवलेलं वाचनालयाही आहे.

**प्रश्न : हे सगळं करताना घरच्यांची मदत कितपत झाली ?**

उत्तर : माहेरी सामाजिक कार्याचे संस्कार होते. सासरीही माझ्या कामाला पाठिंबा आहे. बऱ्याचदा, एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमाला मी हजर राहू शकत नाही. तरीही कौतुकानं घरात माझ्या कामाचा उल्लेख केला जातो आणि मला वेळ नसतो हे त्यांनी गृहीत धरलंय.

**प्रश्न : तुम्ही हे काम एकही पैसा न घेता करता. तुमची ती आवड आहे. पण घरी, नातेवाईकांमध्ये मोबदल्याची अपेक्षा केली जाते का ?**

उत्तर : हो. काही वेळा होत असं. नातेवाईकांमध्ये माझ्या वयाच्या ज्या बायका नोकरी करतात, त्यांना त्यांच्या श्रमाचे पैसे मिळतात. पण माझ्या श्रमाचे, वेळेचे पैसे मला मिळत नाहीत, अशी प्रतिक्रिया पूर्वी व्यक्त व्हायची. सुरुवातीला थोडं खटकायचं, पण अशा गोष्टींकडे मी दुर्लक्ष करते. मला कामातून मिळणारा आनंद महत्त्वाचा वाटतो.

**प्रश्न : तुम्हाला दोन मुली आहेत. त्यांचा तुमच्या कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे ?**

उत्तर : माझी मोठी मुलगी शमीन होमी भाभा संस्थेत सायन्स एज्युकेशनमध्ये पीएच.डी. करते. धाकटी रसिया पर्यावरणशास्त्रात एम.एस्सी. करते. त्या दोघींनी आईचा शाळेसाठी जाणारा वेळ पहिल्यापासून स्वीकारलाय. महत्त्वाचं म्हणजे सामाजिक काम करणं ही विशेष गोष्ट आहे असे त्यांना वाटत नाही. ते करायचं असतं, स्वाभाविकपणे! असं त्यांचंही मत आहे. त्या दोघी फुलोरा शाळेच्या माजी विद्यार्थिनी आहेत. त्याचबरोबर त्या सृजन आनंद विद्यालयातही शिकलेल्या आहेत. आजकाल शिक्षणामध्ये होणारे नवे बदल त्यांच्याद्वारे माझ्यापर्यंत पोचतात. मला अडचण आली तर मी त्यांच्याशी चर्चा करते. त्यांची मतं घेते, त्यामुळे त्यांची वैचारिक मदत तर मला खूप वेळा होते आणि जेव्हा जेव्हा प्रत्यक्ष मदत लागली तेव्हा त्यांनी तीही केली. जे जे नवीन येईल ते ते शाळेत आलं पाहिजे असं त्यांना वाटतं. त्यांची आई शाळेत आहे म्हणून नव्हे तर आपण त्या शाळेत शिकलो या भावनेतून शाळेबद्दल त्यांना

वेगळं आकर्षण आहे.

**प्रश्न : सृजन आनंद विद्यालयाबद्दल थोडं सांगा.**

उत्तर : प्राचार्य लीलाताई पाटील यांनी कोल्हापुरात १९८५ मध्ये सृजन आनंद विद्यालय सुरु केलं. ही शाळा मराठी माध्यमाची, फक्त प्राथमिक शिक्षण देणारी आणि प्रयोगशील आहे. ती विनाअनुदानित आहे. माझ्या मुलीचं बालवाडीनंतरच शिक्षण तिथं झालं. मी विद्यालयात प्रथम पालक म्हणून सहभागी झाले. इथं रुढ शिक्षणातील क्रमिक पुस्तकं शिकवली जातात. फक्त शिकवण्याची पध्दत मात्र रुढ नाही. ती प्रायोगिक अनुभवांवर आधारित आहे. मी फुलोरा बरोबर याही शाळेत शिकवते.

**प्रश्न : आजचं युग स्पर्धेचं आहे. जो तो कळायला लागण्याआधी स्पर्धेत उतरतो. त्याला उतरवलं जातं. टिकण्यासाठी, प्रगती करण्यासाठी स्पर्धा अपरिहार्य आहे असंही म्हटलं जातं, पण तुमच्या शाळांमधील उल्लेखनीय बाब म्हणजे तुमच्याकडे स्पर्धा नाही. त्याविषयी काही सांगा.**

उत्तर : स्पर्धा नाही. त्यामुळे बक्षिसांचंही आमिष नाही. फुलोरा मध्ये एकदा मुलांची अडथळ्याची दौड सुरु होती. सगळे पालक प्रेक्षक होते. चार खेळाडूंपैकी प्रियदर्शन या मुलाचा हात फ्रॅक्चर झाल्यामुळे प्लास्टरमध्ये होता. तरीही हारजितीचं भय नसल्यानं तो खेळणार होता. अनेक अडथळ्यांपैकी डोक्यातून रिंग घालायचा एक अडथळा होता. डोक्यातून रिंग घालायची. पायातून काढायची आणि पुढे पळायचं. प्रियदर्शन डोक्यातून रिंग घातली पण ती प्लॅस्टर घातलेल्या आडव्या हातामुळे त्याला खाली घेता येईना. यावेळी उरलेले तीन खेळाडू त्याच्या मदतीला आले. सगळ्यांनी मिळून त्याची रिंग खाली घेतली आणि त्याला पळायला सांगितलं. केवळ स्पर्धा नसल्यानं हे शक्य झालं.

स्पर्धेमुळे एकमेकांना मागे खेचण्याची वृत्ती लहानपणापासून आपल्या मनावर बिंबते. आम्ही हे बदलण्याचा प्रयत्न केला. सृजन आनंद विद्यालयात ही स्पर्धा नाही. फक्त बौध्दिक आणि खेळ याविषयीची परीक्षा वर्षातून एकदा होते. तिथंही स्पर्धेनंतर प्रत्येकाचं मूल्यमापन अधिक चांगल्या प्रकारे केलं जातं. नंबरापेक्षा त्याचे गुण व कमतरता यांवर चर्चा अधिक होते. फुलोरा आणि सृजन आनंद दोन्ही ठिकाणी बक्षीस म्हणून काही देताना एखादं फळ किंवा भाजीची पेंडी असं दिलं जातं. मुलं घरी जाऊन आपल्याला बक्षीस मिळालेल्या पालकाची भाजी खातात, तेव्हा त्यांना वेगळाच आनंद मिळतो.

**प्रश्न : तुम्ही म्हणतात, फुलोरात रोज नवा अभ्यासक्रम असतो. तो तुम्ही कसा ठरवता ?**

उत्तर : पूर्वी माझ्याबरोबर काही पालकांची मुलं सृजन आनंद विद्यालयात शिकत होती. आमची मोठी मुलं त्या शाळेत जात होती. विद्यालयाचे शिकवण्याचे हेतू, पध्दती, नवनवे उपक्रम यांकडे मी ओढली गेले. लीलाताई आमच्या आदर्श होत्या. त्यांच्या सहवासात आम्हाला शिक्षणाकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली आणि आमच्या क्षमताही गवसत गेल्या. त्यामुळे आत्मविश्वास वाढला. असं काम बालशिक्षणातही करता येईल असं वाटलं, मग आम्ही पालकच फुलोराचे शिक्षकही झालो. कुणी मुलांसाठी गाणी रचू लागल्या. कुणी चित्र काढू लागल्या. कुणी नाटक बसवू लागल्या. कुणी हस्तकला शिकवू लागल्या आणि रोज नवा अभ्यासक्रम तयार होऊ लागला.

**प्रश्न : फुलोरा व सृजन आनंद या दोन्ही शाळांची ॲडमिशन प्रोसेस कशी आहे ?**

उत्तर : फुलोरामध्ये येणाऱ्या पहिल्या वीस मुलांना व सृजन आनंद मध्ये येणाऱ्या पहिल्या पस्तीस मुलांना ॲडमिशन मिळते. संख्या एवढीच मर्यादित आहे. बाकी जात धर्म– आर्थिक परिस्थिती मेरिट काहीही बघितलं जात नाही.

**प्रश्न : आपल्याकडे** Slow Learner **मुलांची थोडी पंचाईत होते, कारण ती रुढार्थाने मतिमंद नसतात पण** Normal **मुलांसारखीही नसतात. अशी मुलं तुमच्याकडे येतात का ? त्यांना तुम्ही ॲडमिशन देता का ?**

उत्तर : आमच्याकडेही अशी मुलं क्वचित येतात. आम्ही त्यांना ॲडमिशन देतो. आमचा अनुभव असा आहे की आमच्या शाळेत शिक्षण घेताना त्यांचा आत्मविश्वास वाढायला खूपच मदत होते.

**प्रश्न : शिक्षकांची निवड तुम्ही कशी करता?**

उत्तर : फुलोरा व सृजन आनंद, दोन्ही ठिकाणी शिक्षक निवडण्याची पद्धतही रुढ पध्दतीसारखी नाही. फुलोरामध्ये क्रमिक पुस्तके नसतात. ती बालवाडीच आहे. पण सृजन आनंदमध्ये जिथं क्रमिक अभ्यासक्रम शिकवायचा असतो, तिथं नव्या शिक्षकाला आम्ही सहा महिने आमच्या वर्गाचं निरीक्षण करायला सांगतो. त्याचबरोबर त्याच्या आवडी-निवडी,कौशल्य,कलात्मकता, अभ्यास, सगळे गुण जोखूनच वर्ग त्याच्या हातात सोपवतो. शिवाय, दोन्ही शाळांत सगळे शिकवतात. याचा फायदा असा होतो, की बालशिक्षणात असणारा माणूसच आमच्याकडे येतो.आमच्याकडे एक निवृत्त प्राचार्य चौथीला इंग्रजी शिकवतात. एक आर्किटेक्ट मॅडम विज्ञान शिकवतात. अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील माणसांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मुलांना मिळतो.

**प्रश्न : सृजन आनंद विद्यालयाला सरकारी अनुदान नाही. मग शाळेचे आर्थिक प्रश्न तुम्ही कसे सोडवता?**

उत्तर : सरकारी अनुदान नसलं तरी, मी आधी म्हटल्याप्रमाणे पालक आमच्याबरोबर असतात. पालक आपला वेळ देतात. तसंच पैसा, समाजातील त्यांचे संबंध,प्रतिष्ठा,सगळं ते शाळेसाठी वापरतात. आणि तसं, आम्ही शुल्क मुलांकडून घेतो.

**प्रश्न : तुमच्या शाळेत शिकलेली मुलं इतरत्र ॲडमिशन घेऊ शकतात का?**

उत्तर : होय.चौथीनंतर मुलं रुढ शाळांमध्येच जातात. अनुदान नसलं तरी सरकारची मान्यता आहे, आमच शाळांना आणि दुसरं एक सांगते - फुलोरा, सृजन आनंद यासारख्या शाळांमध्ये ज्या पध्दतीचं शिक्षण दिलं जातं त्या पध्दतीनं आपली मुलं शिकावीत असं ज्यांना वाटतं, असे समविचारी लोक एकत्र येऊन कुठेही अशा प्रकारची केंद्र चालवू शकतात. मुलाचं अनुभवविश्व समृध्द करण्यासाठी आपण कुठेही प्रयत्न करु शकतो ना!

**प्रश्न : फुलोरा शाळेला वीस वर्ष झाली. तुमची पहिली बॅच आता ग्रॅज्युएट झाली असेल. ती मुलं तुम्हाला भेटायला येतात का? येतात तेव्हा शाळेबद्दल ती कोणत्या भावना व्यक्त करतात?**

उत्तर : येतात ना. मागे आम्ही Get together ठेवलं होतं त्याचं. ती आवर्जुन येतात. ती मुलं आम्ही दिलेल्या शिकवणुकीच्या प्रकाशात आजही वाटचाल करतात. शाळेनं तुम्हाला काय दिलं असं विचारताच एक मुलगा म्हणाला, आजकालच्या काही तरुण मुलांसारखा मुलींबाबत सवंग विचार आम्ही करत नाही. म्हणजे आम्हाला मैत्री करावीशी वाटते, पण मुलींमागे व्यर्थ फिरणं, त्यांना त्रास देणं असं काही करण्याचं आमच्या मनात येत नाही. मी त्याला म्हटलं, हा तुझा वैयक्तिक गुण असू शकतो. तो म्हणाला, नाही मीच नव्हे तर माझ्याबरोबरची सगळी मुलं हाच विचार करतात. म्हणजे त्यात शाळेनं केलेल्या संस्काराचा भाग असणारच.

**प्रश्न : आजकाल मुली शिकतात. करिअरला महत्व देतात. त्यांना तुम्ही काय सांगाल? एक शिक्षिका म्हणून?**

उत्तर : आपल्याला आवडणाऱ्या कोणत्याही क्षेत्रात आपण करिअर करावं. परंतु शिक्षण घेत असताना त्या प्रक्रियेकडे डोळसपणे पाहावं. शिक्षण घेणं नुसती माहिती डोक्यात साठवणं नव्हे, तर इथं आतून बाहेर येण्याची प्रक्रिया झाली पाहिजे. शिक्षण घेणं म्हणजे आपल्या हातून काही निर्मिती होऊ शकेल.

**प्रश्न : शाळा हा तुमच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहे. शाळेव्यतिरिक्त तुम्ही काय करता? किंवा इतर छंद आहेत का?**

उत्तर : आम्ही वर्ध्याला राहायचो. तिथं त्या काळी अभ्यासाव्यतिरिक्त कलाचं प्रशिक्षण देणारे असे काही वर्ग नव्हते. कोल्हापूरला आल्यावर शमीनबरोबर मी थोडे दिवस कथ्थक शिकले. अगदी परीक्षा वगैरे दिल्या. पोहायला शिकले. हे सगळं मी तिशीच्या आसपास केलं. आजही कॉम्प्युटर शिकण्यात वेळ जातो. आजकालची मुलं नवीन तंत्रज्ञान किती पटापट शिकतात! नव्या वेगाशी जुळवून घेताना फार धावावं लागलं. पण मला आवडतं हे सगळं करायला.

**प्रश्न : मुलांसाठी काम करत असताना रोज नवे प्रयोग करावे लागतात त्याविषयी शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी हे पुस्तक तुम्ही लिहिलंत. सध्या काही लेखन चालू आहे का?**

उत्तर : आहे ना. फलटणला अशी Centre for Language Literacy and Communication भाषाशिक्षणात काम करणारी संस्था आहे. या विषयात काम करण्यासाठी ही संस्था फेलोशिप देते. मी ती घेतलीय. भाषा चांगली आली की बाकीचे सगळे विषय चांगल्या पध्दतीनं शिकता येतात. हे तर सिध्दच झालेलं आहे. पण इतर विषयांमुळेही भाषा कशी समृध्द होते यावर सध्या मी अभ्यास करते. त्यासाठी भूगोल हा विषय मी निवडला. या निमित्तानं शाळांमधून जाणं, संबंधित व्यक्तींना भेटणं, बोलणं, मुलांबरोबर प्रयोग करणं चालू असतं.

**प्रश्न : स्त्रीस्वातंत्र्याबद्दल आपण सगळेच फार वेळा बोलतो. तुम्ही स्त्रियांशी निगडित असं काही काम केलंय का?**

उत्तर : कोल्हापूरला आल्यावर सुरुवातीला, मी महिलादक्षता समितीचं काम करत होते. तिथं कुटुंबीयांच्या त्रासानं घर सोडून आलेल्या, घराबाहेर काढल्या गेलेल्या, वेगवेगळ्या प्रश्नांनी, अडचणींनी ग्रासलेल्या स्त्रिया यायच्या. त्यांची कुटुंबामध्ये परत जाण्याची धडपड असायची; ती बघून मी अस्वस्थ व्हायचे. निम्न स्तरावरील स्त्रिया इथं मोठ्या प्रमाणात यायच्या. कितीही त्रास झाला तरी कुटुंबाचा एक भाग बनूनच जगण्याची त्यांची इच्छा कायम असायची तिथं काम करताना मला खूप त्रास व्हायचा. तिथं मी फार दिवस काम करु शकले नाही. मी माझं कार्यक्षेत्र बदललं आणि आज बोलायचं तर स्त्रियांची घर आणि करिअर सांभाळताना फार ओढाताण होते. पण त्यांनी काही ना काही केलं पाहिजे.

**प्रश्न : फुलोरा, सृजन आनंद यांसारख्या शाळांची समाजाला खरी गरज आहे. पुस्तकं, दफ्तरं, परीक्षा, शिक्षा,क्लास अशा वेगवेगळ्या वजनांच्या ओझ्यांनी वाकलेली आजची मुलं तुमच्या शाळेत यायला एका पायावर तयार होतील. तुमच्या शाळेला शुभेच्छा देऊन शेवटचा एक प्रश्न विचारते. शाळेबद्दलच्या तुमच्या भविष्यातील योजना काय आहेत? किंवा तुमची स्वप्नं काय आहेत?**

उत्तर : शाळा हा माझ्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे. मी मुलांमध्ये रमते. मी त्यांच्या कुटुंबाचा एक भाग आहे. शाळेबाहेर आल्यावरही माझ्या डोक्यात शाळा असतेच. पण ज्या दिवशी हे सगळं करण्याचा माझा उत्साह संपेल त्या दिवशी मी थांबेन. आज शाळेसाठी नवं करण्याचा ध्यास आहे, पण हे काम मी नाईलाजानं ओढत राहणार नाही. कामात तोचतोपणा आला की ते काम थांबवलेलं चांगलं असं मला वाटतं.

भविष्यातील मोठमोठ्या योजना, स्वप्नं अनेकजण सांगतात. पण आनंद मिळेपर्यंतच काम. हा कामातील प्रामाणिकपणा आणि मोकळेपणा सुचितातार्ईंच्या लोभस व्यक्तिमत्त्वाला खुलवतो. आणि त्यांचा उत्साह कधी मावळेल असं वाटतच नाही. रोज उठून आपल्या मुलाचं भविष्य कसं घडणार? या चिंतेत असणाऱ्या आयांना मुलांच्या बालपणीच त्यांच्या अंतरंगात डोकावून सृजनाचे नवे रंग शोधणाऱ्या सुचिता पडळकर नक्कीच प्रेरणादायी ठरतील.

# विकास प्रक्रियेच्या संदर्भात प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती: एक अवलोकन

**डॉ. महेश मा.जोशी**
सहायक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

विकास ही एक व्यापक, बहूआयामी व बहूसंदर्भात्मक अशी प्रक्रिया आहे. तिचे सैद्धांतिकीकरण व संस्थाकरण करताना परस्परविरोधी अशा दृष्टींचा देखील अवलंब केला जातो. औद्योगिक क्रांतीचा संदर्भ घेवून प्रदीर्घ काळपर्यंत ती अर्थशास्त्रीय राहिली. परंतु दोन्ही जागतिक महायुद्धांच्या पार्श्वभूमीवर विकासाचा संबंध आर्थिक न राहता तो आरोग्य, शिक्षण व सांस्कृतिक स्वरुपाचा होतो आहे. आता सामान्यत: **इष्ट असे अधिक्य** या अर्थाने किंवा कोणत्याही क्षेत्रात कमाल उत्कर्ष या दृष्टीने विकास हा शब्द (संज्ञा) योजिला जातो. अर्थात सर्वच क्षेत्रात विकास हे ध्येय मानले तरी त्याची संकल्पना, अन्वय व पद्धती याबाबतच्या मत भिन्नताही तीव्र स्वरुपाच्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धांच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र झालेल्या देशाच्या संसाधनांचा, उपलब्धतांचा विचार करुन अमेरिका व युरोपीय देशांच्या तुलनेत प्रगती कशी करावी? ती करण्यासाठीची जी विश्लेषणे व कारणीमीमांसा झाली त्यातून विकास प्रक्रियेची प्रतिमाने उदयाला आली. या प्रतिमानानुसार वाटचाल करणे हे नवस्वतंत्र देशांचे कार्य झाले/मानले गेले.

विकासाच्या प्रतिमानांची उत्क्रांती ही अशी घडली असली तरी त्यातल्या अनेक घटकांची, संकल्पनांची पुनर्रचना होत राहते. परंतु विकासाचे विशिष्ट मूर्त व अमूर्त प्रतिमान समोर ठेवून त्यानुसार वाटचाल करणे, तशी वाटचाल करणारे मनुष्यबळ तयार करणारे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. त्याचा स्वभाविक परिणाम विकास हे साध्य व शिक्षण हे त्याचे साधन झाले. परिणामी शिक्षण प्रक्रियेच्या सक्षमतेचा, गुणवत्तेचा व उपयुक्ततेचा आर्थिक उत्पादकता हा निकष बनला व तो अद्यापर्यंत स्थिरावलेला आहे. फार तर त्या संबंधीच्या परिभाषांमध्ये बद्दल घडताना दिसून येतो.

प्रारंभी म्हटल्या प्रमाणे विकासाची संकल्पना जटील, बहूसदंर्भीय व भिन्न स्वरुपाचा अन्वयार्थ घेवून येणारी असते. म्हणून विकास कसा घडतो याची सरधोपट स्वरुपाची कारणमीमांसा करता येत नाही. विकासावर परिणाम करणारे अनेक आर्थिक, सामाजिक, वैज्ञानिक, औद्यागिक, व राजकीय घटक असतात. या घटकांचा पस्परांवर दबाव, प्रभाव, सहकार्य, संघर्ष अशा स्वरुपांचा संबंध असतो. त्यातून विकास आकाराला येतो. आता या संबंधांना जागतिकीरण, उदारीकरण, खाजगीकरण असे नवे संदर्भ प्राप्त झाले आहेत. या संबंधानी व संदर्भांनी विकास व शिक्षण यांच्या परस्पर संबंधावर बरे-वाईट असे प्रभाव टाकले आहेत.

आपली संसाधने व त्यांचे नियमन याबाबतचा अधिकार मोठ्या प्रमाणात शासनाकडे असल्यामुळे विकासाच्या प्रक्रियेचे नियंत्रण शासनाकडे आहे. त्यामुळे शासनकर्ते विकासाचे कोणते प्रतिमान स्वीकारतात यावर त्यांचे शिक्षण विषयक वर्तन, धोरणे, दृष्टिकोण अवलंबून आहे. तात्पर्य, शिक्षण हे एक तत्वता स्वायत्त क्षेत्र असले तरी त्याची ध्येये, अभ्यासक्रम, ते देण्याच्या पद्धती, त्याचे मूल्यमापन, त्याचे उत्पादन, वितरण व उपभोग याबाबत शिक्षण

प्रणाली पराधीन आहे.

महाराष्ट्रासारख्या शिक्षण विषयक चळवळीची प्रदीर्घ परंपरा व वारसा असलेल्या राज्यात आज जाणवणाऱ्या शैक्षणिक समस्यांचे मूळ शिक्षण व्यवस्थेने राजकीय आर्थिक व औद्योगिक शक्तींच्या दबावातील वातावरणात आहे. आमच्या शिक्षण विषयक धोरणे आखणाऱ्या सद्यकालिन कोणत्याही समितीकडे दृष्टीक्षेप टाकला तर ही बाब लक्षात येवू शकेल.

शिक्षणाचे कार्य प्रामुख्याने नागरीकरण, मनुष्यबळ विकास, उत्पादकता व सामाजिक स्वास्थ्य यांच्याशी जोडलेले असते. म्हणून शिक्षणाने दोन प्रकारची कार्ये करणे अभिप्रेत आहे.

१. विकासाची योग्य संकल्पना शोधणे व ती रुजवणे

२.विकासाच्या संकल्पनेनुसार शिक्षणप्रणालीची साधनरुप यंत्रणा तयार करणे

परंतु प्रत्यक्षात शिक्षणाला पहिले कार्य करण्याचा अवसरच दिला जात नाही याचा परिणाम आपल्याला पुढील बाबींच्या संदर्भात पाहायला मिळू शकतो.

१. विशिष्ट विषयांना अनावश्यक महत्व मिळणे

२. विशिष्ट भाषा, प्रणाली यांना महत्व मिळणे

३.ग्रामीण भागात इंग्रजी शाळांसाठी पालकांचा अट्टाहास, त्यासाठी शहरांकडे स्थलांतर व निम्न मध्यमवर्गीय पालकांची आर्थिक तणावग्रस्तता

४. जाणीवपूर्वक शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती

त्यामुळे ज्या प्रकारच्या विकासाची प्रक्रिया समाजात सुरु आहे ती प्रक्रिया आणि शिक्षण यांच्यात ताळमेळ/समन्वय आपल्याला दिसत नाही. परंतु, यातील सदोषता ही विकास प्रक्रियेची, तिच्या प्रतिमानाची आहे का? याची तपासणीकरता शिक्षण प्रणालीची सदोषता, अपूर्णता व मर्यादा आपण अधोरेखीत करतो आहोत. सारांशाने, शिक्षण विषयक प्रश्नांचे आकलन, त्यांचा अन्वय व त्यांची सोडवणूक शैक्षणिक दृष्टिकोनातून होत नसून ती औद्योगिक, आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातून होत आहे.

महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याची परिस्थिती ही एक जिनसी स्वरुपाची नाही ती बहूजिनसी स्वरुपाची आहे. तिथल्या विकास प्रक्रियांचा वेग व स्वरुप केवळ भिन्न नाही. कित्येक बाबतीत ते विषमतापूर्ण आहे. विकास व शिक्षण या दोन्ही बाबतच्या विषमता या परस्पर पूरक ठरताना दिसतात. नागरीकरण व सामाजिक स्वास्थ्य ही शिक्षणाची दोन प्रमुख कार्ये प्राथमिक शिक्षणांशी जोडलेली असल्यामुळे प्राथमिक शिक्षणाशी संबंधीत निरीक्षणे इथे नमूद केली आहेत.

ही निरीक्षणे शिक्षणासंबंधी आमचा दृष्टिकोन व विकासासंबंधी सद्यस्थिती दर्शवितात, महाराष्ट्र शैक्षणिक विकासाच्या निर्देशकांचे विश्लेषण केले तर हे अधिक स्पष्ट होवू शकेल.

शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी आकलन करताना उद्‌भवणाऱ्या काही समस्या/तार्किक सदोषतांचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे.

१.प्रश्नांची सोडवणूक केवळ प्रेरकतेच्या मार्गाने सोडविण्याचा आशावाद

२. उपक्रमांचे संस्थाकरण होताना येणारा यांत्रिकपणा

३. विकासाचा प्राधान्यक्रम व त्यातील संघर्ष

४. प्रश्नांचे मामुलीकरण करण्याची प्रवृत्ती व त्यामुळे प्रश्नातील गांभीर्य हरविण्याची शक्यता / सोपे विश्लेषण

५. नियमनांची यंत्रणा

६. डावे-उजवे व शिक्षण तज्ञांचे आकलन/विश्लेषण विशिष्ट विचारसरणीचा पुरस्कार दुराग्रहीपणे केला जाण्याची शक्यता

७. दूषित शालेय संस्कृती

स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा! रयत शिक्षण संस्था आणि कर्मवीरांचा ध्येयवादी वारसा प्रवाही ठेवणाऱ्या या महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव ही केवळ वर्षांची संख्यात्मक पूर्तता नसते. त्याला सामाजिक, सांस्कृतिक, दार्शनिक मूल्य असते. या निमित्ताने शिक्षणाच्या संदर्भातील चर्चा या विशेषांकाव्दारे घडवून आणली जात आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. आपल्या सर्वांनाच दिशादर्शक प्रेरणा त्यातून गवसतील अशी अशा करुयात.

# शिक्षक आणि ज्ञानप्राप्ती

**प्रा.संदीप वाकचौरे**
अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,संगमनेर

जग वेगाने पुढे जात आहे. नित्यनवे संशोधने सुरु आहेत. माहितीचा प्रस्फोट होतो आहे. शिक्षणशास्त्रात देखील वेगाने विविध संशोधने होताना दिसत आहे. त्यामुळे जुन्या माहिती, ज्ञानावरती अवलंबून राहत पुढे जात असतांना शिक्षकांना ज्ञानाची साधना करणे अपरिहार्य बनत आहे. कोणताही समाज आणि राष्ट्र हे प्रगती करते ते शिक्षक़ांच्या योगदानावरतीच. त्यामुळे जो देश प्रगत असतो तेथील शिक्षण व्यवस्था आणि शिक्षक अधिक उंचीचे असतात हे सिध्द झाले आहे. प्रगतीचे पंख लेवून भरारी घेण्याची क्षमता शिक्षकांनी निर्माण करायची असते. ती प्रेरणा निर्माण करण्यासाठी त्याला ज्ञानसाधकच बनावे लागेल. त्यामुळे केवळ शिक्षक होण्यासाठीची पदवी आपल्याला पुरेशी ठरणार नाही, तर त्यासाठी या पेशात येणाऱ्या प्रत्येकाला अखंड ज्ञानसाधनेची वाट धरावी लागणार आहे. जग कितीही वेगाने बदलत असले तरी समाज मनातील शिक्षकांचे स्थान मात्र अढळ आहे. जेथे शिक्षकांची उंची खालावलेली असते तेथे त्याचा सन्मान देखील हरवलेला असतो. त्यामुळे आपणाला पुन्हा एकदा इतिहासातील शिक्षकांएवढी उंची प्राप्त करायची असेल तर स्वत:ची उंची वाढवावी लागेल.

सध्या शिक्षकी पेशाबाबत व्यवस्थेतून वेगवेगळी मते व्यक्त होत आहेत. या पेशात मान,सन्मान मिळत नाही. पूर्वीसारखा आदरही उरला नाही. समाज शिक्षकी पेशाबद्दल सन्मानजनक भावना व्यक्त करीत नाही. हा साधारण आक्षेप या क्षेत्रात घेतला जात असतो. त्यातील काही भावना खऱ्याही आहेत. मात्र जेव्हा समाज अशा स्वरुपाचे वर्तन करीत असेल तेव्हा आपण आपल्या क्षेत्रात नेमके काय सुरु आहे याचाही विचार करण्याची गरज आहे. मुळत: आपण इतिहास जाणून घेतला तर समाज नेहमी ज्ञान आणि त्याग यांचा आदर करीत आला आहे. जी माणसं ज्ञानाची साधना करतात त्यांचा समाज नेहमीच आदर करीत आल्याचा इतिहास आहे. त्याप्रमाणे वर्तमानही आहे. आपण आजही ज्या ऋषीमुनींचे नाव घेतो त्यांच्याकडे नेमके काय होते? ते तर जंगलात राहत होते, संपत्ती नव्हती आणि महाल नव्हते पण ते सतत समाजात आदराला पात्र राहिले आहेत. त्याचे कारण त्यांच्याकडे ज्ञान होते. कधी काळी आपण आपल्या देशातील माणसं आणि विद्यापीठे यांची उंची मोजणे अशक्य होते, एक माणूस म्हणजे एक विद्यापीठ होते. अखंड ज्ञानसाधनेत ही माणसं स्वत:ला गाढून घेत होती. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांच्या प्रति आणि समाजही शिक्षकांच्या प्रति आदर व्यक्त करीत होता. खरेतर शिक्षक व विद्यार्थी यांच्या ज्ञानात जितके म्हणून अंतर असेल तितका आदर वाढत जाणार आहे. जगप्रसिद्ध विचारवंत भगवान रजनीश म्हणत असत की, ''शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या ज्ञानातील अंतर जर पस्तीस मिनिटे इतकेच असणार असेल, तर विद्यार्थी केवळ पस्तीस मिनिटे इतकाच आदर करणार आहेत. जर हे अंतर पस्तीस वर्ष इतके असणार असेल तर विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील आदराची भावना अधिक काळ व्यवस्थेत टिकणार आहे''

कधीकाळी शिक्षकांसाठी ज्ञानाची साधने खूप मर्यादित होती. पारंपारिक पद्धतीने ज्ञानाचे वहन होत होते, ज्ञानाचे वहन करण्यासाठी देखील काळाच्या, स्थळाच्या देखील मर्यादा होत्या. मात्र सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावरती ज्ञानप्राप्तीच्या सिमा तुटल्या आहेत. त्याच बरोबर ज्ञान निर्मितीची प्रक्रिया होते आहे आणि त्या ज्ञानाची देवाणघेवाण देखील वेगाने घडत आहे. ज्ञान प्राप्त करताना आपण कमी पडू इतका वेग सध्या ज्ञाननिर्मितीचा आहे. आपण सध्या विज्ञान युगात जगत असतांना कोरोना महामारीने जगात हाहाकार माजला आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी वेगाने संशोधने झाली. आणि जगभर तात्काळ लस उपलब्ध झाली. याचा अर्थ ज्ञानाच्या निर्मितीचा वेग किती आहे हे सहजतेने लक्षात येईल. त्यामुळे आपण ज्ञानासाठी आतूर झालो नाही तर आपण जगाच्या

मुख्य प्रवाहाच्या बाहेर पडण्याचा धोका अधिक आहे. सध्या जगात महासत्तेची स्पर्धा आहे. यापूर्वी देखील स्पर्धा होतीच ती औद्योगिक प्रक्रियेच्या अनुषंगाने, जगावर राज्य करण्याच्या संकल्पना होत्या. त्यासाठी जगभर स्पर्धा होती. मात्र अलिकडे आपणाला जगावर राज्य करायचे असेल तर आपण केवळ उद्योग धंद्यावरती राज्य प्रस्थापित नाही करु शकणार. त्यासाठी अर्थव्यवस्था भक्कम करावी लागेल हे खरेच, पण ती अर्थव्यवस्था ही ज्ञानमय अर्थव्यवस्था असावी लागेल. त्यामुळे जगावर राज्य करण्यासाठी अधिक प्रगत राज्ये ज्ञानमय अर्थव्यवस्थेचा विचार करीत आहेत. ती ज्ञानमय अर्थव्यवस्थेकरीता आपले शिक्षण आणि शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो दर्जा आपण जोपासला नाही तर आपण विकसित राष्ट्राच्या पंगतीत बसू शकणार नाही. त्यामुळे शिक्षणातून अधिक ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया घडायला हवी. शाळेच्या चार भिंतीच्या आतमध्ये केवळ पाठयपुस्तकातील आशय आणि माहितीचे अध्यापन करुन आपण भारताला ज्ञानसंपन्न राष्ट्र म्हणून निर्माण करु शकणार नाही. जगभरात संशोधने, विद्यापीठांची दर्जेदार निर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षक, शिक्षणाची गतीमान व प्रभावी प्रक्रिया याबाबत जग जागृत झाले आहे. शिक्षक शिक्षण प्रक्रिया गुणवत्तापूर्ण करण्यासाठी नवनवीन प्रयोग करत आहेत. गावागावात प्रयोगशीलता जोपासतांना होणारे प्रयोग शिक्षणाची दिशा स्पष्ट करत आहेत. त्यामुळे शिक्षक म्हणून आपणाला अधिक संपन्नता प्राप्त करावी लागेल.

शिक्षक म्हणून नव्या युगाची भाषा आत्मसात करावी लागणार आहे. त्यासाठी विद्यार्थापर्यंत फक्त पुस्तकातील आशय पोहचून चालणार नाही. अलिकडे माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावरती मुले त्या तंत्रज्ञानाशी जोडून घेत असल्याने ते माहितीच्या बाबतीत अधिक परीपूर्ण होत आहेत. त्यामुळे शिक्षक म्हणून आपल्याला त्याबाबतीत अधिक जागृत रहावे लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न पडतांना आपण पाहतो, त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा विचार करावा लागेल. मुळत: शिकविणे याचा अर्थ मुलांच्या मनात प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी त्याने सातत्याने पाठपुरावा करीत राहणे, त्यासाठी नवनवीन वाटा शोधणे महत्वाचे आहे. त्यासाठीचे स्त्रोत निर्माण करुन देणे शिक्षकाचे काम आहे. मात्र उत्तरापर्यंत त्याला जावू देणे महत्वाचे आहे. त्यासाठीचा रस्ता मार्गदर्शक शिक्षक असणार आहे. नव्या युगात शिक्षक हा सुलभक आहे. त्याचे जबाबदारीचे स्वरुप बदलत आहे. त्या दृष्टीने नवा विचार आत्मसात करणे महत्वाचे आहे.

त्यासाठी शिक्षक याचा अर्थ पाठयपुस्तकापुरता घटक शिकविणारा व्यक्ती असत नाही तर त्यात दडलेला दोन ओळीतील अर्थ उलगडून दाखविणारा, जीवनाशी जोडून माहितीचा अर्थाचा उलगडा करणारी व्यक्ती असा असायला हवा. शिक्षकांना त्यासाठी ज्ञान प्राप्त करण्याशिवाय असा दुसरा पर्याय नाही. त्यामुळे शिक्षक म्हणून आपल्याला स्वत:लाच समृद्ध करावे लागेल. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात योगदान देणारे योगी अरविंद हे ज्या महाविद्यालयात शिकवत होते त्या महाविद्यालयात ते तासिका घेताना जीव ओतून अध्यापन करीत होते. त्यासाठी अभ्यासाची साधना होती. प्रचंड अभ्यास करुन ते आपल्या विषयाची मांडणी करीत, मुलांच्या अंतकरणास ते भिडत असे.

# फिनलँडची शिक्षण पद्धती

प्रा.डॉ.आर.के.नान्नर
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

**प्रास्ताविक**

मानवी संस्कृतीसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या पाठ्यपुराव्यास नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले गेले आहे. शिक्षण हेच आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करते, आपल्याला संकटांपासून मुक्त करते आणि समाजाच्या भल्यासाठी कार्य करण्याची शक्ती देते. प्रत्येक देशाची एक अनोखी शिक्षण व्यवस्था आहे. परंतु त्यापैकी काही इतक्या मनोरंजक आणि सुव्यवस्थित आहेत की ते जगातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या अधिक जवळ आहेत. प्रत्येक देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे स्वत:चे फायदे आणि तोटे असतात. एक देश पायाभूत सुविधांवर चांगले गुण मिळवू शकतो, तर दुसरा पदवी कार्यक्रम देऊ शकतो की जो नवीन आणि अद्वितीय आहे. उदाहरणार्थ जर आपण राहणीमानाची गुणवत्ता, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर आणि अभ्यासासाठी सार्वजनिक संसाधनांची उपलब्धता यासारख्या बाबी विचारात घेतल्या तर या यादीमध्ये फिनलँड, डेन्मार्क, नॉर्वे, जपान, रशिया इत्यादी आधुनिक शिक्षणाला आकार देणाऱ्या देशांचा समावेश होईल.कोणता देश उच्च दर्जाचे शिक्षण देतो हे ठरवणे थोडे कठीण असू शकते. प्रत्येक देशाची शिक्षण पद्धती वेगळी असू शकते. कालानुरुप त्यात बदलही होत असतात. या देशांच्या शिक्षण पद्धती जाणून घेणे महत्वाचे ठरते. या देशांपैकी फिनलँडमधील शिक्षण पद्धती विषयी मांडणी करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

फिनलँड हा देश १९१७ मध्ये स्वतंत्र झाला. १९९५ पासून युरोपियन युनियनचा सदस्य आहे. एकूण क्षेत्र ३३८.००० किमी, अधिकृत भाषा : फिनिश ९२%,स्वीडिश ६%,(सामी ०.०३%) ७४.६% लोकसंख्येने (वय २५ ते ६४) उच्च माध्यमिक किंवा तृतीयक शिक्षण पूर्ण केले आहे. ३३.२% मध्ये विद्यापीठ किंवा इतर तृतीय पात्रता आहे. मुख्य निर्यात:इलेक्ट्रॉनिक्स,धातू आणि अभियांत्रिकी,वन उद्योग. ८६% स्त्रिया (वय २५ ते ६४) घराबाहेर कार्यरत आहेत.फिनलँडमधील शिक्षण पद्धती जगातील सर्वोत्तम शिक्षण पद्धतीपैकी एक आहे. फिनलँड अनेक वर्षांपासून सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय शिक्षण पद्धतीच्या क्रमवारीत अग्रेसर आहे. कौटुंबिक पार्श्वभूमी, सामाजिक-आर्थिक स्थिती किंवा क्षमतेची पर्वा न करता सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी फिनिश शाळा प्रयत्न करतात. फिनलँडमध्ये शिक्षणातील गळतीचे प्रमाणे कमी आहे. (९९%लोकांचे मूलभूत शिक्षण पूर्ण) फिनलँडमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण खूपच जास्त आहे. पाच तरुणांपैकी तीन तरुण उच्च शिक्षण घेतात इतर ओईसाडी देशांसह विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाच्या आंतरराष्ट्रीय मूल्यांकनांमध्ये सातत्याने उच्च कामगिरी दिसून येते. शिवाय शैक्षणिक खर्च सर्वसाधारणच केला जातो.

**शिक्षण धोरण : प्रशासन आणि शिक्षणाचा निधी**

शिक्षण ही शिक्षण आणि संस्कृती मंत्रालयाची जबाबदारी आहे. फिनिश नॅशनल बोर्ड ऑफ एज्युकेशन (FNBE) प्राथमिक, माध्यमिक आणि प्रौढ शिक्षणासाठी शैक्षणिक उद्दिष्ट्ये, सामग्री आणि पद्धती विकसित करण्यासाठी शिक्षण मंत्रालयासोबत काम करते. स्थानिक प्रशासन ही स्थानिक प्राधिकरणांची (नगरपालिका) जबाबदारी आहे. जी शिक्षण प्रदाते म्हणून प्रमुख भूमिका बजावते. मूलभूत आणि उच्च माध्यमिक स्तराचे शिक्षण देणाऱ्या बहुतांश संस्थांची देखभाल स्थानिक अधिकारी किंवा संयुक्त नगरपालिका मंडळे करतात. सर्व नागरिकांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी समान संधी प्रदान करणे हे फिनिश शिक्षण धोरणाचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. फिनिश शिक्षण धोरणातील कीवर्ड गुणवत्ता, कार्यक्षमता, इक्विटी आणि आंतरराष्ट्रीयकरण आहेत. शिक्षण आणि संस्कृतीचा मूलभूत अधिकार घटनेत नोंदवला गेला आहे. आजीवन शिक्षण आणि मोफत शिक्षण या तत्वांवर धोरण तयार केले आहे. शिक्षणाकडे समाजातील स्पर्धात्मकता

आणि कल्याणाची गुरुकिल्ली म्हणून पाहिले जाते. शिक्षण धोरणाच्या मुख्य स्तंभांवर व्यापक सहमती आहे आणि धोरण क्रांतीऐवजी सहकार्य आणि सातत्य-उत्क्रांती द्वारे दर्शविले जाते. सरकार,कामगार संघटना आणि नियोक्ता संघटनांमध्ये त्रिपक्षीय भागीदारी हा धोरणनिर्मितीचा एकात्मिक भाग आहे. विविध भागधारकांचा विस्तृत सहभाग आणि सल्लामसलत शैक्षणिक सुधारणांमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावते. शिक्षण आणि ट्रेड युनियन ऑफ एज्युकेशन हे त्यांचे प्रतिनिधी म्हणून शिक्षणाच्या विकासात महत्वाचे खेडाळू आहेत. धोरणाची मुख्य उद्दिष्टे आणि विस्तृत आराखडा केंद्रीय स्तरावर पारिभाषित केली जातात, परंतु त्याची अंमलबजावणी ही स्थानिक पातळीची जबाबदारी आहे. फिनिश शिक्षण धोरणातील मुख्य सुकाणू दस्तऐवज म्हणेज शिक्षण आणि संशोधनासाठी सरकारची विकास योजना.

फिनिश शिक्षण धोरणाचा मुख्य हेतू सर्व नागरिकांना शिक्षण प्राप्त करण्यासाठी समान संधी प्रदान करणे आहे. शिक्षण पद्धतीची रचना ही तत्वे प्रतिबिंबित करते. ही प्रणाली अत्यंत पारगम्य आहे, म्हणजे उच्च पातळीच्या शिक्षणाच्या प्रगतीस प्रतिबंध करणारी कोणतीही अंतिम मूल्ये नाहीत. शिक्षणाचा फोकस परीक्षा घेण्यापेक्षा शिकण्यावर आहे. फिनलँडमध्ये मूलभूत शिक्षणाच्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही राष्ट्रीय परीक्षा नाहीत. त्याऐवजी, अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांच्या आधारे शिक्षक आपापल्या विषयांमध्ये मूल्यांकनासाठी जबाबदार असतात. एकमेव राष्ट्रीय परीक्षा, मॅट्रिक परीक्षा सामान्य उच्च माध्यमिक शिक्षणाच्या शेवटी आयोजित केली जाते. सामान्यत: उच्च शिक्षणात प्रवेश हा मॅट्रिक परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या निकालांवर आधारित असतो.

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून विकेंद्रीकरणाच्या तत्वावर कारभार चालला आहे. व्यावहारिक शिक्षण व्यवस्था तसेच प्रदान केलेल्या शिक्षणाची प्रभावीता आणि गुणवत्ता यासाठी शिक्षण प्रदाते जबाबदार आहेत. स्थानिक अधिकारी शाळांना किती स्वायत्तता दिली जाते हे देखील निर्धारित करतात.उदाहरणार्थ बजेट व्यवस्थापन,अधिग्रहण आणि भरती ही अनेकदा शाळांची जबाबदारी असते. पॉलिटेक्निक आणि विद्यापीठे व्यापक स्वायत्ततेचा आनंद घेतात. पॉलिटेक्निक आणि विद्यापीठे दोन्हीचे कामकाज शिक्षण आणि संशोधनाच्या स्वातंत्र्यावर आधारित आहे. ते त्यांचे स्वत:चे प्रशासन आयोजित करतात, विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर निर्णय घेतात आणि पदवी कार्यक्रमांची सामग्री तयार करतात.

बहुतांश शिक्षण आणि प्रशिक्षण सार्वजनिकरित्या अर्थसहाय्यित आहे. शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर शिक्षण शुल्क नाही. मूलभूत शिक्षणात शालेय साहित्य, शालेय जेवण आणि ये-जा मोफत दिली जाते. उच्च माध्यमिक शिक्षणात, विद्यार्थी त्यांच्या पुस्तके आणि वाहतुकीसाठी पैसे देतात. याव्यतिरिक्त, अभ्यास अनुदान आणि कर्जाची एक सुविकसित प्रणाली आहे. उच्च माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षणात पूर्ण वेळ अभ्यासासाठी आर्थिक मदत दिली जाऊ शकते. २०१७ मध्ये शिक्षणावर एकूण सार्वजनिक खर्च फिनलँडचा सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ५.३% होता.

**बाल शिक्षण**

बाल शिक्षणाची योजना आणि अंमलबजावणी फिनिश नॅशनल एजन्सी फॉर एज्युकेशनने मंजूर केलेल्या संबंधित राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक तत्वांद्वारे मार्गदर्शन केले जाते. बाल शिक्षणाचा सुरुवातीच्या शिक्षणात समावेश होतो. ऐच्छिक बालपण शिक्षण आणि काळजी (ECEC) (०-५ वर्ष) किंवा अनिवार्य पूर्व प्राथमिक शिक्षण(०१ वर्ष) असे दोन भाग असतात.

स्थानिक प्राधिकरणांनी आयोजित केलेल्या ECEC सेवांसाठी क्लायंट शुल्क आकारले जाते. कुटुंबाना स्थानिक प्राधिकरणांकडून अनुदान दिले जाते. आणि त्यांना सरासरी १४% खर्चाची आवश्यकता असते. खाजगी ईसीईसी सेवांसाठी शुल्क संधित सेवा प्रदात्याद्वारे निश्चित केले जाते आणि हे खर्च भरुन काढण्यासाठी कुटुंब सरकारकडून बाल संगोपन भत्यांसाठी अर्ज करु शकते. ईसीईसी मुलांना बाहेर

खेळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जास्त महत्व देते, कारण मुलांच्या आरोग्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांसाठी मैदानी क्रियाकलापांना खूप महत्व दिले जाते.नगरपालिका आणि खाजगी सेवा प्रदात्यांनी केद्र-आधारित प्रारंभिक शिक्षण उपक्रम आणि कुटंब - आधारित डे केअर ॲक्टिव्हिज म्हणून प्रदान किंवा व्यवस्था केली आहे. फिनलँडमध्ये,ईसीईसीचा सर्वसाधारण उपस्थिती आठवड्याला २० तास आहे. तरीही कुटुंब पूर्णवेळा प्रारंभिक शिक्षणासाठी अर्ज करु शकतात. ECEC अनिवार्य नसतांना, ३-५ वयोगटातील मुलांसाठी नावनोंदणीचा दर २०१६ मध्ये ८०% च्या उच्चांकावर होता. जेव्हा मुले सहा वर्षांची होतील, तेव्हा त्यांचे मुलभूत शिक्षण सुरु होण्यापूर्वी त्यांना विनामूल्य आणि अनिवार्य एक वर्षाचे पूर्व प्राथमिक शिक्षण मिळेल. पूर्व प्राथमिक शिक्षण साधारणपणे सोमवार ते शुक्रवार, दिवसातून चार तास आयोजित केले जाते. मुले शाळेत उपयुक्त कौशल्ये शिकू लागतात.

### मुलभूत शिक्षण

फिनलँडमध्ये, व्यापक शाळांद्वारे ७-१६ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत आणि अनिवार्य मूलभूत शिक्षण दिले जाते. एक सर्वसमावेशक शाळा ग्रेड -६ मध्ये प्राथमिक शिक्षण आणि ७-९ ग्रेड मध्ये निम्न माध्यमिक शिक्षण प्रदान करते. राष्ट्रीय आणि स्थानिक दोन्ही अभ्यासक्रमांवर आधारित मूलभूत शिक्षणाचे आयोजन करण्यासाठी स्थानिक अधिकारी जबाबदार आहेत. मूलभूत शालेय शिक्षण ऑगस्टमध्ये सुरु होते आणि मेच्या अखेरीस किंवा जूनच्या सुरुवातीला जून आणि जुलैमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीसह संपते. विद्यार्थ्यांना दर आठवड्याला सुमारे २० तास शिकवणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. वैयक्तिक धडे साधारणपणे ४५ मिनिटे घेतात. एकाग्रतेमध्ये रीफ्रेशमेंट आणि मदत प्रदान करण्यासाठी धड्यांच्या दरम्यान १५ मिनिटांच्या विश्रांती आहेत.

राष्ट्रीय कोर अभ्यासक्रमाच्या चौकटीत, स्थानिक अधिकारी किंवा शाळा स्वत: प्रत्येक वर्षी वैयक्तिक विषयांसाठी धडयांच्या वाटपाचा निर्णय घेण्यास मोकळे असतात. ग्रेड १-६ मध्ये, प्रत्येक विद्यार्थ्याने मुळात समान शिक्षण घेतले पाहिजे,परंतु लवचिक वेळ वाटपामुळे शाळा वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळ्या प्रकारे लक्ष केंद्रित करु शकतात. ग्रेड ७-९ मध्ये सामान्य आणि ऐच्छिक दोन्ही विषय समाविष्ट केले आहेत. नऊ वर्षाच्या शालेय शिक्षणानंतर विद्यार्थी उच्च माध्यमिक स्तरावर त्यांच्या अभ्यासाची चांगली तयारी करण्यासाठी स्वेच्छेने अतिरिक्त वर्षाच्या शिक्षणाची निवड करु शकतात. फिनिश शाळा प्रणाली स्थलांतरीत मुलांना मूलभूत शिक्षण घेण्यापूर्वी एक वर्षाचा मोफत तयारीचा शिक्षण कार्यक्रम प्रदान करते.

### सामान्य उच्च माध्यमिक शिक्षण

अनिवार्य मुलभूत शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी उच्च सार्वजनिक माध्यमिक शिक्षण, सामान्य उच्च माध्यमिक शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण प्राप्त करण्यास पात्र आहेत. उच्च माध्यमिक शिक्षण सक्तीचे नसले तरी comprehensive पेक्षा जास्त शालेय पदवीधरांचे उच्च माध्यमिक शिक्षण होते. सामान्य उच्च माध्यमिक शाळा राष्ट्रीय मॅट्रिक परीक्षेला बसण्याची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण शिक्षण देतात. अभ्यासक्रमाची व्याप्ती तीन वर्षांची आहे आणि अध्यापन मॉड्युलर स्वरुपात आयोजित केले जाते आणि वर्षाच्या वर्गाशी जोडलेले नाही. विद्यार्थी दोन, तीन किंवा चार वर्षांत अभ्यास पूर्ण करु शकतात. प्रत्येक अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर त्याचे मूल्यांकन केले जाते. जेव्हा एखाद्या विद्यार्थ्याने आवश्यक संख्येचे अभ्यासक्रम पूर्ण केले, तेव्हा त्याला सामान्य उच्च माध्यमिक शाळेचे प्रमाणपत्र मिळेल आणि राष्ट्रीय मॅट्रिकच्या परीक्षेला बसेल. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते विद्यापीठ किंवा उपयोजित विज्ञान विद्यापीठांमध्ये पुढील अभ्यासासाठी पात्र आहेत.

### व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण

सामान्य उच्च माध्यमिक शिक्षण घेण्याला पर्याय म्हणून Comprehensive शाळा सोडणारे, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण याची निवड करु शकतात. व्यावसायिक संस्थेत पूर्णवेळ अध्ययन तसेच किमान अर्ध्यावर्षासाठी कामाच्या ठिकाणी नोकरी करत शिकण

किंवा प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेऊ शकतात. व्यावसायिक संस्थांमध्ये दिले जाणारे शिक्षण आणि प्रशिक्षण अतिशय व्यावहारिक आहे आणि कामगार बाजाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणामध्ये अनेक क्षेत्रे व १०० पेक्षा जास्त अभ्यास कार्यक्रम आणि ५० हून अधिक व्यावसायिक पात्रतेचे कोर्सेस समाविष्ट करते. अभ्यासाच्या संपूर्ण कालावधीत, पात्रतांसाठी फिनिश राष्ट्रीय फ्रेमवर्कच्या आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि प्राप्त क्षमतांचे मूल्यांकन केले जाते.

**उच्च शिक्षण**

विद्यापीठे आणि उपयोजित विज्ञान विद्यापीठे फिनिश विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देतात. विद्यापीठे शिक्षण आणि संशोधन दोन्हीमध्ये गुंतलेली आहेत. उपयोजित विज्ञान विद्यापीठे अधिक व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारतात ज्यामध्ये व्यावहारिक प्रशिक्षण किंवा कामाच्या ठिकाणांचा समावेश असतो. जेणेकरुन विद्यार्थ्यांना व्यावसायिक कार्य जीवनासाठी शिक्षित केले जाईल. दोन्ही विद्यापीठे आणि उपयोजित विज्ञान विद्यापीठे बॅचलर आणि मास्टर डिग्री प्रदान करतात. परवाना आणि डॉक्टरेट पदव्या केवळ विद्यापीठाकडून दिल्या जातात. विद्यापीठांमध्ये बॅचलर पदवी पूर्ण होण्यास साधारणपणे तीन वर्षे लागतात. तर पदव्युत्तर पदवीला दोन वर्षे लागतात. उपयोजित विज्ञान विद्यापीठांनी दिलेली पदवी पूर्ण करण्यासाठी सहसा ३.५-४ वर्षे लागतात. पदवीनंतर उमेदवाराने पदव्युत्तर पदवी कार्यक्रमासाठी अर्ज करण्यापूर्वी किमान तीन वर्षांचा अनुभव घेणे आवश्यक आहे, जे अर्ज केलेल्या विद्यापीठांमध्ये १-१.५ वर्षे टिकते.

**शिक्षक प्रशिक्षण**

शिक्षक प्रशिक्षण हे समवर्ती, अध्यापनशास्त्रीय प्रशिक्षणासह मास्टरमध्ये समाकलित कार्यक्रम, किंवा सलग, शैक्षणिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रारंभिक पदवी या स्वरुपाचे असते. शिक्षणाच्या बहुतांश स्तरावर, शिक्षकांना दरवर्षी सेवा प्रशिक्षणात सहभागी होणे आवश्यक आहे. फिनलँडमधील शिक्षक अत्यंत प्रशिक्षित आहे. सर्व शिक्षकांना पदव्युत्तर पदवी आवश्यक आहे आणि सुरुवातीच्या शिक्षक प्रशिक्षणात व्यावहारिक शिक्षण प्रशिक्षण समाविष्ट आहे. डे-केअर सेंटरमधील अध्यापन आणि मार्गदर्शन कर्मचाऱ्यांकडे सामान्यत: बॅचलर डिग्री असते. विद्यापीठातील शिक्षकांना सामान्यत-डॉक्टरेट किंवा दुसरी पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक असते.

**फिनलँडच्या शिक्षण पद्धतीबद्दल वेगळेपण**

मुले ७ वर्षांची होईपर्यंत शाळा सुरु करत नाहीत. इतर प्रणालीप्रमाणे फिल्पिश विद्यार्थ्यांना केवळ वयाच्या १६ व्या वर्षी केंद्रीकृत परीक्षेला बसावे लागते. हायस्कूलच्या शेवटी एकच परीक्षा होईपर्यंत फिनलँडमध्ये कोणत्याही अनिवार्य परीक्षा नाही परंतु गृहपाठ व्यवस्था आहे. सर्व मुलांना, क्षमतेची पर्वा न करता, एका वर्गात शिकवले जाते. शिक्षणात मागे असलेले तसेच अपंग मुले मागे पडणार नाहीत याची खात्री करण्यासाठी, शाळा शिक्षकांच्या प्रयत्नांना पूरक म्हणून अतिरिक्त अध्यापन सहाय्यकांची नेमणूक करतात. फिनलँडमधील मुलांना त्यांच्या शिक्षणाच्या पहिल्या सहा वर्षांपर्यंत अजिबात मूल्यमापन नाही. ६६% विद्यार्थी महाविद्यालयात जातात. आजपर्यंतच्या युरोपमधील सर्वाधिक ९३% लोक पदवीधर तर ४३% व्यावसायिक शाळेत शिकतात.

वयाच्या १६ व्या वर्षी विद्यार्थ्यांना विद्यापीठासाठी तयार होण्यासाठी हायस्कूलच्या मध्ये जायचे आहे की व्यावसायिक प्रशिक्षणात प्रवेश घ्यायचा हे ते ठरवू शकतात. विद्यार्थी शाळेत अधिक भाषा शिकतात. फिनिश भाषेचे शिक्षण शाळेच्या पहिल्या दिवशी सुरु होते. वयाच्या नवव्या वर्षापासून विद्यार्थी स्वीडिश (फिनलंडची दुसरी अधिकृत भाषा) सुरु करतात आणि अकराव्या वर्षी ते तिसरी भाषा शिकू लागतात. सहसा इंग्रजी. बरेच विद्यार्थी तेरा वर्षांच्या आसपास चौथी भाषा घेतात. विद्यार्थ्यांच्या विद्यापीठातील नियुक्तीसाठी मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांच्या पहिल्या दोन भाषांची चाचणी घेतली जाते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना फिनलँडमध्ये दिवसभरात ७५ मिनिटे सुट्टी

मिळते. त्यांना प्रत्येक तासिकेनंतर पंधरा मिनिटाचा ब्रेक देखील मिळतो. बाहेरच्या शारीरिक हालचालींना खूप प्रोत्साहन दिले जाते आणि काही धडे बाहेर शिकवले जातात. शिक्षक दिवसातून फक्त चार तास वर्गात घालवतात आणि व्यावसायिक विकासासाठी आठवड्यातून २ तास घेतात. शिक्षक किमान दोन तास अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी घालवतात. कमी शिकवण्याच्या तासांमुळे, विद्यार्थी वर्गाने भंडावून जात नाहीत आणि शिक्षक तयारीसाठी धडपडत नाहीत.

फिनलँडमधील सर्व शिक्षकांना पदव्युतर पदवी असणे आवश्यक आहे, जे पूर्णपणे अनुदानित आहे. फिनलँडमध्ये शिकवण्यासाठी तुम्हाला बॅचलर डिग्री आणि अध्यापन प्रमाणपत्र जास्त आवश्यक आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम केवळ एक विस्तृत मार्गदर्शक आहे. शिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्तम शैक्षणिक पद्धती ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे. शिक्षकांना काय शिकवायचे याचे मार्गदर्शन दिले जाते. पण ते कसे शिकवायचे याचे नियम दिले जात नाहीत. हे उच्च प्रशिक्षित शिक्षकांना त्यांच्या अद्वितीय गटाला शिकवण्याच्या दिशेने तयार केलेला अभ्यासक्रम विकसित करण्यास अनुमती देते. उच्च गुणवत्ता धारक पदवीधरांच्या १०% मधून शिक्षकांची निवड केली जाते. शिक्षकांना डॉक्टर आणि वकील यांचे प्रमाणे समान दर्जा दिला जातो.

**समारोप**

उच्च दर्जाचे शिक्षक संघटन, मोफत न्याय आणि दर्जेदार शिक्षण, विद्यार्थ्यांचे व्यापक समर्थन, परीक्षा-मुक्त शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांसाठी लवचिक मार्ग या बाबींमुळे या देशाची शिक्षण पद्धती ही इतर अनेक विकसित देशांमधील शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळी ठरते. सर्व स्तरांवर मोफत आणि न्याय्य शिक्षण. मोफत शिक्षणाव्यतिरिक्त पूर्व प्राथमिक आणि मूलभूत शिक्षणातील विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके, दैनंदिन जेवण आणि वाहतुकीचा हक्क आहे. प्रत्येकासाठी अभ्यासाच्या संधी अधिक सुनिश्चित करण्यासाठी, अभ्यास अनुदान आणि कर्जाची एक विकसित प्रणाली आहे. तरी खाजगी शाळांना सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. फिनिश शाळा केवळ शिक्षणच देत नाहीत, तर संलग्न सेवा जसे की शिक्षण मार्गदर्शन, मानसशास्त्रीय सल्ला, तसेच आरोग्य सेवा, दंत सेवा आणि विद्यार्थ्यांच्या पोषण, शारीरिक आरोग्य आणि मानसिक गरजा पूर्ण करण्यासाठी मानसिक आरोग्य सेवाही पुरवितात. सर्वसमावेशक शाळांमध्ये वर्गात फक्त वीस विद्यार्थी असतात. सर्वसमावेशक शाळेतील फिनिश विद्यार्थ्याला साधारणपणे दररोज ४-५ तास शिकवणी किंवा दर आठवड्याला सुमारे २० तास मिळतात. शाळेनंतर विद्यार्थी शाळा, शैक्षणिक किंवा करमणूक क्लब किंवा युवक आणि क्रीडा संघटनांनी आयोजित केलेल्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात. जे त्यांच्या एकूण शिक्षण आणि वाढीसाठी फायदेशीर असतात. काही विकसित अर्थव्यवस्थांमधील शिक्षकांनी दिलेल्या १०८० तासांच्या वर्गातील शिक्षणाच्या तुलनेत सरासरी फिनिश शिक्षक दरवर्षी ६०० तास शिकवतात. थोडक्यात सुव्यवस्थित शिक्षण व्यवस्था, नियोजनाचे अजब कसब, शिक्षणतज्ज्ञ व शासन यांचे महत्वपूर्ण योगदान हे फिनिश शिक्षणपद्धतीच्या यशाचे गमक आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

## माझे शिक्षणातील प्रयोग

**बाळासाहेब सदगीर**
जि.प.प्रा.शाळा,पिंपळे

नमस्कार, मी बाळासाहेब सदगीर, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, पिंपळे येथे मागील दहा वर्षांपासून कार्यरत आहे. खरं तर मशीन इंजिनिअरिंगची आवड असणारा सामान्य मध्यम कुटुंबातील मुलगा परिस्थितीमुळे शिक्षक झालेला अशी माझी ओळख. परंतु आज असे वाटते जे झाले ते अतिशय योग्यच. कारण शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात माझ्या तील इंजिनियरचा सामाजिक इंजिअनीरिंगसाठी उपयोग होत आहे आणि होत राहणार याचे कारण शिक्षक म्हणून मी २०११ मध्ये शाळेवर रुजू झालो. तेव्हा वाटले आपली डी.एड. ची दोन वर्षे फुकट गेली. कारण प्रत्यक्ष अनुभव आणि डी.एड. यात जमीन- अस्मानाचा फरक. मनात नवीन काहीतरी करावे, शाळेचा चेहरा मोहरा बदलून टाकावा. मुलांना उत्तमातील उत्तम शिक्षण दयावे अशी अनेक स्वप्ने मी बघायचो. पहिली तीन वर्षे माझी मुलांना समजून घेण्यातच गेली आणि माझे खरे डी.एड. या तीन वर्षांत पूर्ण झाले! हे सर्व घडत असताना माझ्यातला इंजिनियर शांत बसू शकत नव्हता. कुठून काही नवीन मिळते का? मुल कसे शिकतं? मुलांना कसे शिकवावे म्हणजे ती आपली परिस्थिती बदलू शकतील? असे अनेक प्रश्न मला नियमित पडत. यातून मला जिथे नवीन काही दिसे त्याठिकाणी पूर्ण वेळ उपस्थित राहून ते समजून घेई. असे करत असतना अनेक उपक्रमशील शिक्षक, अधिकारी व शाळा यांच्याशी माझा जवळचा संबंध आला. कारण माझा खऱ्या शिक्षणाचा शोध सुरुच होता. हे सर्व घडत असताना माझ्या वाचनात आलेले अनेक शिक्षणतज्ज्ञ, उपक्रमशील शिक्षक यांच्यामुळे आज मी नवनवीन प्रयोग करत इथपर्यंत आलो आहे. अजूनही माझा खऱ्या शिक्षणाचा शोध सुरुच आहे. या प्रवासात मला आलेले अनुभव आणि मी राबवलेले उपक्रम आपल्या सोबत शेअर करत आहे. सदरचे उपक्रम आपणास एक नवीन विचार देतील हीच अपेक्षा. सदरचा लेख ज्यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनामुळे आपणासमोर येत आहे ते म्हणजे मला लाभलेले एम.ए. एज्युकेशन चे प्राध्यापक डॉ. भागवत शिंदे सर यांचे प्रारंभीच मनापासून धन्यवाद व्यक्त करतो.

खर तर सुरुवात कोठून करावी यासाठी मला खूप विचार करावा लागला. कारण मी राबवलेले उपक्रम व त्यांचे संकलन करणे, त्यातील मोजकेच निवडणे माझ्यासाठी थोडे कठीणच होते. तरी सुरुवात आपण माझ्या एका छोट्याशा सामाजिक उपक्रमातून करुया. साल होते २०१२. तेव्हा शाळेत शिक्षण परिषद हा उपक्रम आयोजित केला जायचा. त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली असायची. सदर उपक्रमात विद्यार्थ्यांचे स्टॉल लावून विज्ञान, गणित व भाषा या संबंधी माहिती दयायची असे सांगण्यात आले, परंतु यातून साध्य किती असे मला वाटले आणि आपण यात नवीन काही तरी करावे यासाठी मी ज्या गावात शिक्षक म्हणून कार्यरत होतो त्या गावात एक मोठी समस्या होती ती म्हणजे अंधश्रद्धा. आपण यासाठी काय करु शकतो असा विचार सुरु असताना मला एक कल्पना सुचली ती म्हणजे व्याख्यान आयोजित करणे. यासाठी माझ्या परिचयातील प्राध्यापक व उत्कृष्ट वक्ते म्हणजे श्री. पाचपुते सर यांना विनंती केली आणि त्यांचे व्याख्यान शाळेवर आयोजित केले. सरांनी वैज्ञानिक प्रयोगांतून जादूटोणा, अंगात येणे, भानामती, मुठ मारणे यासारख्या अशास्त्रीय गोष्टींचा उलगडा अगदी सोप्या प्रयोगांच्या माध्यमांतून विद्यार्थी व ग्रामस्थांना करुन दाखवला आणि माझा उपक्रम काही अंशी यशस्वी झाला. कारण त्याच्या दुसऱ्याच दिवशी काही लोकांनी या कार्यक्रमा विषयी तिखट प्रतिक्रिया दिली. परंतु मी ज्यांच्यासाठी सदरचा कार्यक्रम आयोजित केला त्यांना नक्कीच याचा फायदा झाला हे काही काळाने समजले. अशीच एक आणखी घटना गावात घडली. एक ३५ ते ४० वयाचे गृहस्थ गावात सर्प पकडतात असे मला समजले. आज पर्यंत त्यांनी अनेक सर्प पकडले होते, परंतु एक दिवस अचानक मुलांकडून त्यांच्या निधनाची बातमी ऐकून मला धक्काच बसला. कारण त्यांचा मृत्यू एक विषारी सर्प चावल्यामुळे झाला होता. मी मुलांकडे विचारणा केली असता कळाले की गावातील लोक सर्पदंश झाल्यावर प्रथम मंदिरात नेऊन स्थानिक एका व्यक्तीकडून मंत्र मारुन घेतात. फरक न

पडल्यास दवाखान्यात जातात, असे समजताच मला एक कल्पना सुचली आमच्या गल्लीतील काही मुले सर्प मित्र म्हणून काम करतात. मी त्यांना शाळेत नेण्याचे निश्चित केले आणि दिवस निवडला २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन! या दिवशी संबंधित सर्प मित्रांना आपल्या परिसरात आढळणारे सर्व प्रकारचे विषारी व बिनविषारी सर्प घेऊन येण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे ते सर्व सकाळी वेळेवर उपस्थित झाले आणि कार्यक्रम सुरु झाला. कार्यक्रमाचा उद्‌देश फक्त एकच, सर्पांची माहिती देणे व गैरसमज दूर करणे. मुलांनी माहिती घेतली तर काहींनी प्रत्यक्ष हातात बिनविषारी सर्प घेऊन खात्री केली. यातून मुलांना सर्पांची माहिती तर मिळालीच परंतु सर्प दंश झाल्यावर प्रथम कोठे जावे? व का? हे सांगावे लागले नाही. कारण त्यांना समजले होते आणि मुलांना याची माहिती घरी देण्यास सांगितले. परंतु घरचे ऐकतील का? हा प्रश्न तर होताच म्हणून दुसऱ्या वेळेला हाच कार्यक्रम सकाळच्या वेळेला गावातील चावडीवर घेतला आणि बऱ्याच लोकांपर्यंत सर्प : समज व गैरसमज कार्यक्रम पोहचला. माझा उद्‌देश पूर्ण झाला. लोकांना सर्प चावल्यावर काय करायला हवे? विषारी व बिनविषारी सर्प कसा ओळखावा? विषारी सर्प चावल्यास काय करावे? हे परत सांगावे लागले नाही. मुलांनीही दुसऱ्या दिवशी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आणि त्या सर्व माझ्यासाठी पुढील कार्यासाठी ऊर्जा देणाऱ्या ठरल्या.

चला थोड आणखी पुढे जाऊयात. शिक्षणातील हे माझे छोटे छोटे उपक्रम मला नेहमी नवीन काहीतरी करण्याची प्रेरणा देत होते. म्हणतात ना गरज ही शोधाची जननी असते असेच माझे उपक्रम मुल आणि त्यांची गरज लक्षात घेऊन वाढत गेले. असाच एक प्रसंग माझ्या शिक्षक होण्याच्या उद्‌देशाला प्रेरणा देऊन गेला. मी ज्या डी.एड. कॉलेजमध्ये शिकलो त्या कॉलेजचे प्राचार्य म्हणून डॉ. गजानन पाटील सरांची नियुक्ती झाली होती. आणि माझ्या नंतर माझी बहिण तेथे शिक्षण घेत होती त्यामुळे माझा सरांच्या कार्याशी तिच्यामुळे संपर्क आला. त्या वेळेला माझे शिक्षक सेवक म्हणून कार्य चालू होते. सरांनी त्यांच्या उपक्रमाच्या काही सीडीज बनवल्या होत्या आणि त्या माझ्या पर्यंत पोहचल्या. म्हणतात ना, 'इच्छा तेथे मार्ग' असेच काहीशे घडले आणि माझ्यातला शिक्षणतज्ज्ञ जागा झाला. ही थोडी अतिशयोक्ती होईल. परंतु असेच काही उपक्रम माझ्या मनाला खूप भावले आणि मी जीवन कौशल्यांचा अभ्यास सुरु केला. यातून मला समजले की खरे शिक्षण कशास म्हणावे. शिक्षणाचा खरा अर्थ मला यावेळी सापडला आणि माझा पुढचा प्रयोग सुरु झाला. आपल्या अभ्यासक्रमाचा भाग असलेली १० जीवन कौशल्ये मी निवडली आणि मुलांमध्ये ती कशी रुजतील यावर विचार सुरु केला. यातील एक म्हणजे समानानुभूती या जीवन कौशल्याची मी निवड केली आणि तो रुजवण्यासाठी उपक्रम निश्चित केला. तो म्हणजे दिवाळीचा सण शाळेला सुट्टी लागायला एक आठवडा बाकी होता. मी मुलांना माझी कल्पना सांगायचे ठरवले. मुलं नाही म्हणणार नाही याची मला पूर्ण खात्री होती. पण सहभागी होतील का नाही? पालक परवानगी देतील का नाही? या सारख्या प्रश्नांनी डोक वर काढायला सुरुवात केली. पण उपक्रम तडीस नेण्याचे मी ठरवले आणि मुलांना त्याची रुपरेषा सांगितली. सर्व मुले अपेक्षेप्रमाणे तयार झाली. पण माझ्या मनात उपक्रमाचा उद्‌देश निश्चित होता. पिंपळे याच गावाची छोटीशी वाडी मेनखिंड, संपूर्ण आदिवासी जमात असलेली मोजक्याच घरांची वस्ती, याठिकाणी जाऊन दिवाळी साजरी करायची. आदिवासी लोकांची दिवाळी कशी होते? तो अनुभव मुलांना दयायचा. आपण मुलांना फटाके फोडू नका म्हणून सांगतो. पण साध्य किती? मी अनुभव देण्याचे ठरवले. सांगण्यापेक्षा अनुभवातून मुलं अधिक चांगल शिकतात. मग आपण तिथे का जायचे? खरचं फटाक्यांनी पैसे वाया जाता का? आदिवासी लोक दिवाळी साजरी कशी करतात? यासारख्या प्रश्नांनी मुलं गोंधळून जाऊ नये म्हणून मी त्याची उत्तरं त्यांना समजतील अशा भाषेत देण्याचे ठरवले.

आमच्याच शाळेतील पण दुसऱ्या (पाचवी) इयत्तेच्या मेनखिंड या ठिकाणी राहणाऱ्या दोन मुलींना मी वर्गात बोलवले. वर्गात सगळीकडे शांतता. इतरवेळी गडबड गोंधळ करणारी मुले आज मात्र टाचणी पडावी आणि आवाज ऐकू यावा इतकी धीरगंभीर होऊन माझं आणि त्या दोन मुलीचं संभाषण ऐकत होती. मी ही मुद्दामहून त्यांना ऐकू जाव

म्हणून मोठ्याने पण अनौपचारीकपणे त्या दोघींशी संवाद साधत होतो. १५ ते २० मिनिटे चालणारा आमचा संवाद मुलांना त्या दोघींच्या घरी साजरी होणाऱ्या दिवाळीची एक वास्तव जगाची (गरिबीची) नकळत जाणीव करुन देत होता. जेवणात फक्त शाळेतच दिसणारी डाळ, क्वचित खायला मिळणारी पालेभाजी, नवीन कपड्यांसाठी लागणारी ओढ भागवणारा फक्त मामा. फराळासाठी कोणाची तरी पहावी लागणारी वाट, फटाक्यांचा दुरुनच सुखावणारा आवाज. या प्रत्यक्ष अनुभवामुळे वर्गातील काही मुलांच्या डोळ्यात पाणी आलं. ती आपले अश्रू दिसू नये म्हणून चेहरे लपवू लागली. हेच माझ्या उपक्रमाच निम्म फलित होत. आमचं संभाषण संपल आणि त्या दोघी आपल्या वर्गात गेल्या. मुलांना आता फटाके का फोडायचे नाही हे मला सांगाव लागल नाही. दुसऱ्या दिवशी वर्गातील एका मुलीने त्या दोघींसाठी आपल्या शेतातून भाजी आणली. तो क्षण माझ्यासाठी खूप आनंदाचा होता. असे सलग दोन-तीन दिवस ती भाजी आणत राहिली. इतरही गरजूंना देऊ लागली.

आता मी पालकांना या उपक्रमाची कल्पना दिली. पालकही कोणतेही कारण न सांगता आनंदाने तयार झाली. सोबत फराळ बनवून देण्याचेही सांगितले. आदल्या दिवसापासूनच माझी लगबग सुरु होती. आमच्या गल्लीतील लोकांकडून काही फराळ गोळा करुन मी सर्व तयारी केली. शेवटी तो दिवाळीचा दिवस आला. सकाळपासूनच माझी तयारी सुरु होती. त्याचबरोबर मनातील शंकाही काही केल्या जात नव्हत्या. ज्यांच्यासाठी हा उपक्रम आहे तीच मुलं आली नाही तर? अशा अनेक विचारांनी मनात घर केलं. पण मी जाणार, मुलं पण येणार अशी मी स्वत:ची समजूत घालत होतो. मी आणि माझा मित्र गाडी घेवून निघालो. जसजशी गाडी शाळेच्या जवळ जात होती मनाची धाकधूक आणखीनच वाढत गेली. शाळेच्या अगदी जवळ पोहचताच कुठून तरी आवाज आला ''सर आले, सर आले, सर आले,'' तो आवाज ऐकताच कोणी तरी आपला जिवलग आपल्याला अचानक भेटल्यावर होणारा आनंद मला झाला. ती माझी लाडकी मुलं होती. जी चातकासारखी आपल्या गुरजींची वाट पाहत शाळेच्या आवारात येऊन बसली होती. शाळेत पोहचल्यावर त्या १०-१२ मुलांसाठी आम्ही गाडी शोधली आणि आम्ही सर्व मेनखिंड याठिकाणी पोहोचलो. तिथे गेल्यावर लोकांना शाळेच्या आवारात गोळा केलं.या उपक्रमात ज्यांनी स्वखुशीन भाग घेऊन लोकांना मार्गदर्शन केले ते माझे सहकारी शिक्षक श्री. बोडके सर हेही उपस्थित राहिले. लोक जमा झाल्यावर मी आणि भरत बोडके सरांनी उपस्थितांना शिक्षणाचे महत्त्व, आपली परिस्थिती, व्यसनाचे दुष्परिणाम, या सारख्या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व ग्रामस्थांना मुलांना चांगले शिक्षण दयावे असे आवाहन केले. नंतर शाळेतील मुलांच्या हस्ते ग्रामस्थ व त्यांच्या मुलांना फराळ वाटप करण्यात आले. फराळ पाहून होणारा आनंद तेथील उपस्थित मुलांच्या डोळ्यात ठळक दिसत होता सोबत त्यांच्या परिस्थितीची नकळत आमच्या मुलांना जाणीवही करुन देत होता.

कार्यक्रम संपला होता. आम्ही आता परतीच्या प्रवासाला लागलो होतो. कार्यक्रम व्यवस्थित पार पडल्याचा आनंद माझ्या मनाला सुखावत होता. पण म्हणतात ना ''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन.'' या उक्तीप्रमाणे मी माझ कर्म करत गेलो व त्याच फळही मला कोणतीही जास्त अपेक्षा न धरता मिळाल होतं. ते म्हणजे सुट्टी संपली, शाळा सुरु झाली. पहिल्याच दिवशी मुलं शाळेत आली आणि आपापले अनुभव सांगू लागली, अनेकांनी फटाके फोडलेली नव्हती. काहींनी पुस्तके विकत घेतली होती. तर काहींनी आपल्या घरी येणाऱ्या गरिबांना फराळ व जुनी कपडे दिली होती. मेनखिंड येथील काही कारणास्तव शाळा बुडवणारी मुलंही शाळेत नियमित येऊ लागली. इतरांमध्ये सहज मिळून मिसळून राहू लागली. शिक्षकांशी मनमोकळेपणाने बोलू लागली. हा बदल या उपक्रमानंतर दिसून आला. हाच या उपक्रमाचा उद्देश व फलीत नाही का?

अशा प्रकारे मी सदरचा उपक्रम राबवला. परंतु सदरचा उपक्रम आपल्या शिक्षक बांधवापर्यंत पोहचावा म्हणून प्रथमच लेखणी हाती घेतली आणि माझा अनुभव लिहून जीवन शिक्षण मासिकासाठी पाठवला, जो मी वर व्यक्त केला आहे आणि माझा पहिलाच प्रयत्न यशस्वी झाला. दिवाळी अंकात माझा उपक्रम छापून आला.

अनेकांनी फोन करुन अभिनंदन केले. अनेकांना सदरचा लेख आवडला आणि मलाही आणखी लेखन करण्यास उर्जा मिळाली. अशाच प्रकारे मी सर्जनशीलता हे जीवन कौशल्य मुलामध्ये रुजवण्यासाठी सलग तीन वर्षे मुलांच्या कल्पकतेला, त्यांच्यातील सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी पुस्तकांची निर्मिती केली. ज्याचा उद्देश मुलांमधील सुप्त गुणांचा विकास व्हावा व मुले अधिक सर्जनशील बनावी हाच होता. इयत्ता चौथीत असताना माझ्या मुलांनी **कल्पक मी आहे** या पुस्तकासाठी लेखन केले, यात त्यांनी एक विषय निवडून त्यावर ते काय करतील या विषयी आपले विचार मांडले. हीच मुलं जेव्हा पाचवीला गेली तेव्हा त्यांनी सुंदर व सोप्या कविता रचल्या. भाषा विकास व सर्जनशील विचारांची सवय लागावी यासाठी सदरचा उपक्रम राबवला आणि 'मुक्तांगण' हा कविता संग्रह प्रकाशित केला. हे सर्व चालू असताना दरवर्षी आपण मुलांना काही नवीन दयावे जे जीवन कौशल्याशी संबंधित असेल यासाठी मी प्रयत्नशील राहिलो. हीच मुल पुढे सहावीत गेली. साल होते २०१९. तेव्हा तालुकास्तरीय स्वरचित कवितांचे वाचन या स्पर्धेचे आयोजन एका खाजगी संस्थेमार्फत करण्यात आले होते. ही स्पर्धा असल्याने मी माझ्या वर्गातील ज्यांच्यावर मी कविता रचनेचा प्रयोग केला होता त्यांना या गटात सहभागी होण्यास सांगितले. यात माझ्या कविता रचनेचा प्रयोग केला होता त्यांना या गटात सहभागी होण्यास सांगितले. यात माझ्या शाळेतील एकूण ९ विदयार्थी सहभागी झाले.प्रत्येकाने स्वरचित एक कविता रचली होती आणि ही वेळ माझ्या आजपर्यंत राबवलेल्या सर्जनशील उपक्रमाची परीक्षाच होती. जेव्हा मी मुलांना घेऊन स्पर्धेला गेलो तेव्हा स्पर्धकांना आपापले गट व परीक्षक वाटून देण्यात आले. यात एक गोष्ट अभिमानाची होती ती म्हणजे ५ ते ८ या गटात ग्रामीण भागातून माझ्याच शाळेचे विदयार्थी अधिक होते. स्पर्धा जसजशी पुढे सरकत होती. तसतशी माझी उत्सुकता वाढत चालली होती. माझ्या मनात अनेक प्रश्न येऊन जात होते. एकदाची स्पर्धा संपली आणि सर्व मुले बाहेर आली. त्यांच्याशी चर्चा केल्यावर समजले की त्यांनी खूप काही अनुभवले होते. आता निकालाची प्रतीक्षा होती. स्पर्धकांचा विचार करता माझ्या एका तरी मुलाचा क्रमांक येईल असे मला खूप मनापासून वाटत होते. अंतिम निकाल आला निखील तुकाराम भनगिर या विदयार्थ्याचा त्याच्या गटात तृतीय क्रमांक आला. याचा मला खूप आनंद झाला. कारण मी आजवर केलेल्या प्रत्यनांचे हे फळ होते.

माझा पुढचा उपक्रम म्हणजे मला जाणवलेली आणखी एक समस्या प्लास्टिकचा अतिवापर आणि त्याचा पर्यावरणावर होणारा घातक परिणाम. याविषयी काही कृतियुक्त व्हावे जेणेकरुन मुलांमध्ये व समाजामध्ये प्लास्टिकच्या वापराविषयी जनजागृती होईल. आणि मुलांमध्ये अपेक्षित वर्तन बदल होईल. माझे विचारचक्र सुरु झाले आणि माझ्या डोक्यात एक भन्नाट कल्पना येऊन गेली. योजना ठरली.काही दिवसांवर गांधी जयंती होती आणि त्या निमित्ताने मी मुलांना कार्यानुभव या विषयाअंतर्गत टाकाऊ कागदापासून (वृत्तपत्र) वापरण्यायोग्य कागदी पिशवी कशी बनवावी याविषयी मार्गदर्शन केले. जवळपास माझ्या वर्गातील ४४ विद्यार्थ्यांनी ६० कागदी पिशव्या बनवल्या. त्या सर्व टाकाऊ वस्तूपासून बनवण्यात आल्या होत्या. तशी अटच मी घातली होती. आता तो दिवस आला ज्याची आम्ही तयारी केली होती. इयत्ता सहावीच्या मराठीच्या पुस्तकात असणारा प्लास्टिक बंदी वर आधारित पथनाट्य मी मुलांकडून बसवून घेतले होते. गावातील मंदिराजवळ सकाळी सर्व लोक जमत. तेच आमच्या कार्यक्रमांचे ठिकाण. मी निश्चित केले सकाळी सर्व शाळेतील मुल घेऊन आम्ही सर्व शिक्षक तेथे गेलो. माझ्या मुलांनी सुंदर असे पथनाट्य सादर केले आणि त्यानंतर गावातील हॉटेल चालवणारे भाऊसाहेब बिन्नर जे प्लास्टिकच्या पिशव्यामध्ये गिऱ्हाईकांना खादय पदार्थ देत त्यांना मुलांनी बनवलेल्या कागदी पिशव्या मुख्याध्यापकांच्या हस्ते देण्यात आल्या. ही खरी गांधी जयंती नव्हे का!

असेच एकदा समस्या निराकरण या जीवन कौशल्या विषयी काय उपक्रम राबवता येईल जेणेकरुन मुलांमध्ये ते कौशल्य रुजेल म्हणून मी विचार करत असताना मला एक समस्या आठवली. जी मी सर्व प्रयत्न करुनही सुटू शकली नाही, ती समस्या मुलांना देण्याचे ठरले आणि माझे काम सुरु

झाले.

सदरची घटना सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील ५ वीत शिकणाऱ्या अमिनाची (नाव बदलेले आहे). अमिना ही ग्रामीण भागातील एका सामान्य मुस्लीम कुटुंबातील मुलगी. शाळेची आवड असणारी, अभ्यासात हुशार व गायनाची आवड असणारी मैत्रिणीमध्ये सहज मिसळणारी अशी हरहुन्नरी मुलगी. बरेच दिवस ती शाळेत न आल्याचे पाहून मी मुलांकडे चौकशी केली असता समजले की, तिचे वडील तिला पुढच्या वर्षी (म्हणजे सहावीला) मदरशात घालणार होते. परंतु तिला आपल्या मित्र-मैत्रिणींना सोडून कुठेही जायचे नव्हते. हे मला समजताच मी तिच्या वडीलांना शाळेत बोलावले व याविषयी चर्चा केली. परंतु ते आपल्या निर्णयावर ठाम होते.

मुलांना त्यांच्या आवडीनुसार शिक्षण द्यावे, त्यांच्यातील सुप्त गुणांना पोषक वातावरण निर्माण करावे असे असताना माझ्याच वर्गातील एका हुशार मुलीचे स्वप्न दूर जातानाचे पाहू शकत नव्हतो. म्हणून मी हाच विषय व्यवस्थापन समितीकडे नेण्याचे ठरवले. त्याचाही काही परिणाम होत नसल्याचे पाहून मी तिच्याच वडिलांचे शिक्षक जे आमच्या शाळेत कार्यरत आहेत त्यांना आणि माझे काही सहकारी शिक्षक व पालक यांना घेऊन त्यांच्या घरी गेलो व त्यांची समजूत घालून मुलीला याच शाळेत शिकू दया असे समजावले. परंतु पालकाने यास स्पष्ट नकार दिला व ते तिला मदरशाला पाठवण्यावर ठाम राहिले.

यानंतर आमिना वर्गात शांत राहत असे. मुलांमध्ये जास्त न मिसळता एकटी बसून राही. याच काळात तिला आपल्या पालकाच्या हट्टासाठी शाळाही बुडवावी लागत असे. हे सर्व माझ्या समोर घडत असताना मलाही काय करावे सुचेना. यातून मला एक कल्पना सुचली ती म्हणजे मी राबवत असलेल्या जीवन कौशल्याशी संबंधित उपक्रम राबवावा. त्यासाठी शेवटचा एक प्रयत्न करायचे ठरले. आमिनाला तिच्या इच्छेप्रमाणे शिकता यावे हे मी आता ठरवले होते. यासाठी वर्गातील मुलांची मदत घेण्यासाठी मी सर्वप्रथम त्यांचे गट केले. प्रत्येक गटात एक नेतृत्व करेल असा विदयार्थी ठेवला व त्यांना आमिनाची समस्या तुम्ही कशी सोडवाल या विषयी गटातील विदयसार्थ्यांसोबत चर्चा करुन काही मुद्दे काढायला सांगितले व त्यानंतर त्याचे सादरीकरण केले. अतिशय सुंदर असे उपाय मुलांनी यात मांडलेले दिसले. त्या नंतर मुलांना मी आपण सुचवलेल्या उपायांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास सांगितले. दुसऱ्याच दिवशी काही मुले आणि मुली तिच्या घरी गेल्या आणि तिच्या पालकांना तिच्या विषयी सांगू लागली. आमिना हुशार आहे, तिला याच शाळेत शिकायला आवडते. तिला इथेच शिकू दया वगैरे. तर काय आश्चर्य त्या नंतर आमिना नियमित व आनंदाने शाळेत यायला लागली. तिला एक दिवस सहज विचारले की तुझे वडील तुला मदरशाला पाठवणार नाहीत का? तिचे उत्तरे ऐकून सर्व मुलांना व मला खूपच आनंद झाला कारण तिच्या वडिलांनी त्यांचा निर्णय बदलला होता व तिला याच शाळेत पुढे शिकवण्याचे ठरवले होते.

जे मोठ्या माणसांना नाही जमले ते या छोट्या मुलांनी करुन दाखवले. आणि यातून माझ्या समस्या निराकरण या प्रयोगाचा शेवट गोड झाला.

आणखी एक छोटासा व शेवटचा उपक्रम म्हणजे कोरोना काळात मी पालक व शिक्षकांसाठी **मुल समजून घेताना** या कार्यशाळेचे आयोजन केले. त्यास पालक व शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

अशा अनेक उपक्रमांचा या ठिकाणी उल्लेख करता येईल. जे शिक्षणाची खरी व्याख्या करतील. परंतु शब्दांची मर्यादा असल्याने याठिकाणी मी मोजकेच परंतु मला आवश्यक वाटणारे शिक्षणातील माझे प्रयोग आपणासमोर मांडले आहेत ते आपणास नक्कीच भावतील ही अपेक्षा.

# २१ व्या शतकातील तिसऱ्या दशकाची आंतरविद्याशाखीय ज्ञानक्षेत्रे

**प्रा.डॉ.संजीव सोनवणे**
अधिष्ठाता,आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा,सा.फु.पु.वि.पुणे

मानव ज्या जगता वास्तव्य करतो ते जग समजून घेऊन त्याचा विकास करण्याच्या क्षमता शिक्षणाद्वारे प्राप्त केल्या जातात. समस्यामुक्त, वादविवाद विरहीत जग प्रस्थापित करणे हे एक मोठे आव्हान आहे. कारण समस्यांचे व वादाचे सर्व संमत समाधान शोधणे ही एक गुंतागुतींची प्रक्रिया आहे. मुळात समस्या म्हणजे अपेक्षा व वस्तुस्थिती यातील तफावत होय. ही तफावत ज्ञाननिर्मिती करुन, या ज्ञानाचे समर्पक उपयोजन करुन दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु समस्यांचे स्वरुप विश्लेषित केले असता एका विषयाचे ज्ञान अथवा एका विद्याशाखेचे ज्ञान एखाद्या समस्येचे उत्तर शोधण्यास अपुरे ठरते. एकाच विषयाचे अथवा विद्याशाखेचे आशयज्ञान प्राप्ती व सुमार दर्जाच्या विचार क्षमता व कौशल्य हे एकल विद्याशाखेच्या पदवीधर व पदव्युत्तर पदवीधरांच्या मर्यादा जगभर लक्षात आल्यामुळे आंतर विद्याशाखा अभ्यासक्रमांना २० व्या शतकाच्या उत्तरार्धात व २१ व्या शतकात मोठ्या प्रमाणात महत्व प्राप्त झाले व त्याप्रमाणे अभ्यासक्रम बदल व नवे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश विद्यापीठामध्ये करण्यात येऊ लागला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१७ मध्ये तर स्वतंत्र विद्याशाखा नव्याने निर्माण करण्यात आली. येऊ घातलेल्या नव्या शिक्षण धोरणाच्या मसूद्यामध्ये एकल किंवा स्वतंत्र विद्याशाखा तसेच विद्यापीठाऐवजी आंतर विद्याशाखा अभ्यासाची जोरदार शिफारस करण्यात आली आहे.

आंतरविद्याशाखा अभ्यास ही संकल्पना नवी नसली तरी बदलत्या जगाच्या वास्तव समस्यांच्या समाधानासाठी एकल व विशेष विषय अभ्यासाच्या मर्यादा समोर आल्यानंतर आंतरविद्याशाखेचा जोरदार पुरस्कार करण्यात येऊ लागला. मानव अथवा प्राण्यांच्या शरीरामधील तसेच वनस्पती मधील रसायनांचा म्हणजे सजीवामध्ये असलेल्या रसायनांचा अभ्यास स्वतंत्रपणे जीवशास्त्र अथवा रसायनशास्त्र यांच्याद्वारे करता येत नाही म्हणून जीवरसायन शास्त्र या नव्या विषयाचा उदय झाला, विद्यापीठामध्ये स्वतंत्र विभाग प्रस्थापित झाले. तसेच जीवरसायन शास्त्र आधारित व्यवसाय सुध्दा सुरु झाले. जीवरसायन शास्त्र हे आंतरविद्याशाखेचे उत्तम उदाहरण आहे. येथे दोन ज्ञानक्षेत्रांचे एकत्रीकरण होऊन एकत्रीत असे हे नवे ज्ञानक्षेत्र म्हणजेच जीवरसायनशास्त्र उदयास आले.

अशाच प्रकारे जीव भौतिकशास्त्र विशेष करुन हालचाल करताना बलस्नायूंचा उपयोग अभ्यासकांसाठी नवे दालन निर्माण झाले, क्रीडाक्षेत्रामध्ये जीवयांत्रिकी शास्त्र क्रीडा प्राविण्य विकासासाठी नवे खेळतंत्रे विकासासाठी मोठे योगदान देत आहे व तसे अभ्यासक्रम नव्याने विद्यापीठामध्ये येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये जीवमाहिती शास्त्र हे केंद्र भारतामध्ये प्रथम सुरु झाले. त्याद्वारे जीवमाहिती एकत्रीत करणे, विश्लेषित करणे व त्यातून अनेक संशोधने सुरु आहेत. तसेच जैवतंत्रज्ञान विभाग ही प्रत्येक विद्यापीठमध्ये आता सुरु झाले आहेत. जैववैद्यकशास्त्र तसेच तंत्रज्ञान भाषा, सामाजिकशास्त्रे, गणित, मानव्यशास्त्र अशी मोठी यादी आहे. ज्यामध्ये आता आंतरविद्याशाखीय अभ्यास हा मध्यवर्ती झाला आहे. अभ्यासासाठी अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.

आंतरविद्याशाखा अभ्यासामुळे ज्ञानात्मक गरज भासणाऱ्या क्षेत्रांचा स्वत: अभ्यास करण्याची क्षमता विकसित होऊन विविध विषयांच्या ज्ञानाची जोडणी एकात्मिक स्वरुपात करुन नवज्ञान करुन उपयोजन करण्याची क्षमता विकसित होते. २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात मानवी जीवनातील तंत्रज्ञानाचा, विज्ञानाचा, अवकाश विज्ञानाचा विशेष करुन स्वयंचलित यंत्राचा वापर वाढत जाणार आहे. त्यामुळे आर्थिक व सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासासाठी मानवी जीवनाशी निगडीत अनेक नवनवीन आंतरविद्याशाखीय ज्ञानक्षेत्रांची दालने वाट पहात आहेत. या नव्या ज्ञानक्षेत्राच्या दालनात लिलया वावरण्यासाठी वा अशी दालने विकसित करण्यासाठी आजच्या विद्यार्थी पिढीला सिद्ध व्हावे लागेल. तरच भारत जगातील तिसरी आर्थिक शक्ती होऊ शकेल.

# नवीन शैक्षणिक धोरण २०१९:उच्च शिक्षण

**डॉ.ह.ना.जगताप**
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य
माध्यमिक शिक्षक प्रशिक्षक परिषद

केंद्र शासनाने के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून त्या समितीच्या शिफारशींच्या आधारे नवीन शैक्षणिक धोरणाचा मसुदा केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने मान्य केलेला आहे. या मसुद्यातील केवळ उच्च शिक्षणासंबंधीच्या शिफारशी व त्यासंबंधीचा विचार करण्यापुरताच हा लेखन प्रपंच.

यापूर्वी अगदी नजीकच्या म्हणजेच २०१७ यावर्षी केलेल्या सर्वेक्षणानुसार मिळालेल्या माहितीचा देखील आधार हे धोरण ठरवतांना केलेला आहे. यानुसार सध्या विद्यापीठांची संख्या ८६४ इतकी (आज ही संख्या १००० पर्यंत पोहोचली आहे) असून महाविद्यालयाची संख्या चाळीस हजार सव्वीस इतकी आहे. यामध्ये ३५.७ दशांश दशलक्ष विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. या संस्थांपैकी ७८ टक्के महाविद्यालय व ४०% विद्यापीठे खाजगी क्षेत्राकडे आहेत. तसेच या महाविद्यालयापैकी ४०% महाविद्यालये केवळ एकच अभ्यासक्रम (जसे की आर्टस् किंवा कॉमर्स किंवा सायन्स) राबवितात. तर २० टक्के महाविद्यालये अशी आहेत की तेथील विद्यार्थी संख्या १०० पेक्षा कमी असून त्यामध्ये अभावानेच शिक्षक नेमलेले दिसून येतात. गेल्या काही दशकांमध्ये उच्च शिक्षणात खूप संख्यात्मक वाढ झालेली असली तरी ती पुरेशी नाही असे या समितीला वाटते. सध्या महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून देखील अध्यापनावर अधिक भर आहे. उपलब्ध ज्ञानाचे संक्रमण केले जात आहे. परंतु ज्ञाननिर्मिती कडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. शिक्षण भाई व्यक्ती, संस्था,शासन यांची अभ्यासक्रम, शिक्षक नेमणुका इतकेच काय परंतु दैनंदिन कार्यक्रमात देखील खूप मोठ्या प्रमाणात ढवळाढवळ होत आहे.

या सर्व बाबी लक्षात घेऊन या समितीने काही शिफारशी सुचविल्या आहेत. त्यापैकी काही ठळक शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. देशात तीन प्रकारच्या उच्च शिक्षण संस्था कार्यरत राहतील. पहिल्या प्रकारांमध्ये संशोधन विद्यापीठे व संस्थांचा समावेश असेल. यामध्ये संशोधन व उत्तम प्रतीच्या अध्यापनाचे काम चालू राहील. अशा विद्यापीठांमध्ये पदवी पासून ते पीएच.डी. पर्यंतचे वर्ग असतील म्हणेजच सध्याची संलग्न विद्यापीठाची कल्पना मोडीत निघेल. या अशा विद्यापीठांमध्ये पाच हजार ते २५ हजार पर्यंत विद्यार्थी संख्या असेल. पुढील दोन दशकांमध्ये अशा दीडशे ते दोनशे संस्था स्थापन कराव्यात ही अपेक्षा आहे.

दुसऱ्या प्रकरामध्ये अशा संस्था असतील की तेथे प्रामुख्याने अध्यापनावर भर असेल. अशा संस्थांमध्ये पदवीपूर्व वर्ग, डिप्लोमा व विविध व्यावसायिक कोर्सेस चालतील व काही प्रमाणात संशोधनासाठी डॉक्टर कोर्सेस देखील असतील. परंतु या संस्थांचा केंद्रबिंदू अध्यापनावर असेल. अशा संस्थांमध्ये देखील पाच हजार ते २५ हजार विद्यार्थी असतील. पुढी दोन दशकांमध्ये अशा संस्थांची संख्या एक हजार ते दोन हजार व्हावी अशी अपेक्षा आहे. म्हणजेच ही देखील विद्यापीठेच असणार आहेत. अशा काही संस्थांचे ध्येय

पहिल्या प्रकारच्या संस्था होणे हे असेल. म्हणजेच आपणास असे म्हणता येईल की, पहिला प्रकार म्हणजे संशोधन विद्यापीठे तर दुसरा प्रकार म्हणजे अध्यापन विद्यापीठे होय.

तिसरा प्रकार म्हणजे, स्वायत्त महाविद्यालये, या महाविद्यालयामधून देखील संशोधन होईल. परंतु महाविद्यालयात अध्यापनावर भर असेल. अत्यंत लहान १००-२०० संख्या असणारी महाविद्यालये यापुढे राहणार नाहीत. त्यामुळे कदाचित ग्रामीण किंवा अतिदुर्गम भागातील मुलांच्या शिक्षणावर याचा परिणाम होईल असे वाटते. महाविद्यालयामध्ये अशी व्यवस्था असणार आहे. विद्यार्थी केवळ एक वर्ष शिकून सर्टिफिकेट कोर्स म्हणून प्रमाणपत्र मिळवेल तर दोन वर्षे पूर्ण केल्यास डिप्लोमा प्राप्त करील. त्यामुळे उच्च शिक्षण पदवीपर्यंत घेवून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची चांगली सोय होणार आहे. याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श विद्यापीठ स्थापन करण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे मुक्तस्वातंत्र्य असणार आहे. आपापल्या आवडीच्या विषयांचे अध्ययन करुन त्यांचे क्रेडीट साठवण्याची सोय केली जाणार आहे.तसेच ही क्रेडिटस पाहिजे त्यावेळी वापरता देखील येणार आहेत.

२. मुक्त व दूरस्थ शिक्षण या प्रकारच्या कोर्सेसची गुणवत्ता अत्यंत उच्च दर्जाची असेल. यांचा विस्तार करुन त्यामध्ये उच्च शिक्षण,व्यवसायिक शिक्षण, अजन्म शिक्षण तसेच लोकांच्या जीवनासंबंधीचे शिक्षण यांचा समावेश केला जाईल. यासाठी MOOC चा विस्तार केला जाईल व त्यासाठी नुकत्याच विकसित केलेल्या SWAYAM चा उपयोग केला जाईल.

३. उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणास उत्तेजन: सध्या दरवर्षी केवळ ११५०० परदेशी विद्यार्थी भारतात उच्च शिक्षण घेतात. जगामध्ये विद्यार्थ्यांची मोबिलिटी आहे त्याच्या एक टक्यापेक्षा देखील हे प्रमाण कमी आहे.

परदेशी विद्यार्थी अकर्षित करण्यासाठी जागतिक दृष्ट्या महत्वाच्या विषयांचा समावेश अभ्यासक्रमात करणे अपेक्षित आहे. तसेच भारतीय भाषा, संस्कृती, इतिहास, परंपरा यांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न व्हायला हवा. विविध देशातील नामांकित संस्थांशी आपल्या उच्च शिक्षण संस्थांनी संपर्क साधायला हवा. यासाठी केंद्रीय मुनष्यबळ विकास मंत्रालय विविध संस्थांशी करार करेल. अमेरिका, युरोपमधील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण भारतामध्ये कमी किमतीत मिळेल अशी व्यवस्था केली जाईल. विद्यार्थ्यांच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन दिले जाईल. परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत तसेच शिष्यवृत्त्या दिल्या जातील.

४. विद्यापीठ अनुदान आयोगा ऐवजी आता National Higher Education Regulatory Authority (NHERA) ही संस्था सर्व प्रकारच्या उच्चशिक्षणाचे नियमन व नियंत्रण करेल. AICTE,NCTE या संस्थांचे स्वरुप बदलून त्या Professional Standard Setting Bodies मध्ये रुपांतरित केल्या जातील. तसेच सर्वात मोठा बदल म्हणजे न्याय ही संस्था आता महाविद्यालयांना कोणतीही श्रेणी न देता महाविद्यालय चालू राहण्यास पात्र अथवा अपात्र असे वर्गीकरण करेल.

हे सर्वच धोरण खूपच महत्वाकांक्षी आहे परंतु याची अंमलबजावणी आपण कशी करतो यावर बरेच अवलंबून आहे. तसेच या धोरणातील काही मुद्यांबाबत खूप सखोल चर्चा व्हायला हवी असे वाटते. उच्च शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी याचा गंभीरपणे विचार करावा व या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावा.

**डॉ.वर्षा उदयन कुलकर्णी**
शिक्षक प्रशिक्षक, ग्राममंगल

## शिक्षक शिक्षणाची न रुळलेली वाट...

शिक्षकाने पाठ्यपुस्तकात अडकून पडता कामा नये, पुस्तकाच्या बाहेरचे अनुभव मुलांना दिले गेले पाहिजेत, असे नेहमीच म्हटले जाते. ते उचितही आहे. कारण शिक्षणातून साध्य करावयाची उद्दिष्टे केवळ पाठ्यपुस्तकावर अवलंबून राहून साध्य होणार नाहीत. पाठ्यपुस्तके ही उद्दिष्टे साध्य करायला केवळ मार्गदर्शन करतात, दिशा देतात. शिकण्याचा आशय तर जीवनात सगळीकडे भरुन राहिलेला आहे. त्याला भिडायचे असेल तर क्रमिक पुस्तकांसोबतच त्याच्या बाहेरही शोध घेणे आवश्यक आहे. परंतु, पाठ्यपुस्तका बाहेर पडायचे म्हणजे नेमके काय आणि कसे करायचे याचे प्रशिक्षण शिक्षकाला कुठून मिळणार?

शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या शिक्षकांच्या अंगी हे कसब निर्माण करणे, ही या प्रशिक्षण महाविद्यालयांची जबाबदारी आहे. कारण, जो शिक्षक पाठ्यक्रमाचा बंदिस्तपणा ओलांडून बाहेर पडू शकेल त्यालाच शिकवण्यातल्या मुक्तीचा आनंद मिळेल. हा आनंद जितका अधिक तितके त्याचे शिकवणे प्रभावी, मुलांवर छाप पाडणारे, मुलांना शिकते करणारे. आपल्या आयुष्यात आजवर अनेक शिक्षक येऊन गेलेले आहेत. पण त्यातले काही मोजकेच शिक्षक (चांगल्या अर्थाने) लक्षात राहिलेले असतात. आपल्या आठवणीत राहिलेल्या शिक्षकांचा आपण विचार केला तर असे लक्षात येते की, त्यांनी ही मुक्तता अनुभवली आहे. त्यांचा आनंद विद्यार्थ्यांपर्यंत पाझरला आहे. म्हणूनच आज इतक्या वर्षांनी ते आपल्या स्मरणात आहेत. असे शिक्षक निर्माण करणे, हे खरे तर डी.एड. किंवा बी.एड.च्या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी स्वत: शिक्षक प्रशिक्षकांनी (डी.एड.बी.एड. किंवा एम.एड.महाविद्यालयात शिकवणारे शिक्षक) विद्यापीठाने नेमून दिलेल्या पुस्तकाच्या बाहेर पडणे आवश्यक आहे. आजवरच्या मराठी साहित्याचा आढावा घेतला तरी अभ्यासक्रमाची बंदिस्तता ओलांडण्याचा एक मार्ग दिसू लागतो. मराठीतल्या प्रतिभावंत साहित्यिकांनी लिहिलेली आत्मचरित्रे, ललित साहित्य यांमध्ये याच्या खुणा दिसून येतात.

''लहानपणी शिक्षक केसकर मास्तरांसारखा असावा असे मी म्हणेन. इंग्रजी पहिली, दुसरी आणि तिसरी-तीन वर्षे वर्गशिक्षक म्हणून मला त्यांची अधिक जवळून प्रचिती आली. किडकिडीत अंगकाठी, काळ्यातला काळा वर्ण, खडबडीत चेहरा, डोळे (कदाचित लहानपणी देवी येऊन गेल्यामुळे) थोडे फिकट, पिचपिचीत- या सर्वांसकट ते एक देवमाणूस होते. त्यांनी वेगवेगळ्या तऱ्हेने प्रत्येकाला आपापल्या प्रवृत्तीत रस घेऊन स्वत:चा आणि आजूबाजूचा सहज शोध घ्यायला लावले. लहान सहान गोष्टीतही त्यांना अमाप आनंद दिसे. जे शिकवले ते अचूक की तेवढ्यानेच पुढच्या संबंध जीवनाचा पाया रोवला गेला. लिहिताना टांक कसा धरायचा, निबाचा कोण किती असला पाहिजे, कागदापासून डोके आणि डोळे किती अंतरावर हवेत-इथपासून तो घरी, शाळेत आणि बाहेर वागायचे कसे याचे शिक्षण - त्यांनी दिले. इंग्रजी आणि गणित हे विषयही ते शिकवीत. पण हेही शिक्षण सहज झाले. त्यांचा कोणताच भाग कधी शिक्षा म्हणून भासला नाही.'' - पु.शि.रेगे (मातृका,१९४८)

पु.शि.रेगे हे मराठीतले थोर लेखक, कवी. ते वयाच्या साठीच्या आसपास असताना लिहिलेल्या आत्मचरित्रात त्यांनी त्यांच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकाविषयी हे लिहिले आहे. रेगे यांना लहान वयात लाभलेले केसकर मास्तर. पहिली ते तिसरी असा तीन वर्षे त्यांना केसकर मास्तरांचा सहवास मिळाला. या तीन वर्षांत जे जे घडून गेले असेल त्यापैकी ज्याचा ठसा या मुलाच्या मनावर उमटला, तो आहे शिक्षकाचा प्रेमळपणा आणि त्यांनी दिलेली जीवनविषयक दृष्टी. केसकर मास्तरांची शिकवण्याची शैलीही वैशिष्ट्यपूर्ण होती. आज ज्याला रचनावादी शिक्षणपद्धती असे नाव आहे, त्याचा अवलंब या केसकर मास्तरांनी जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी केलेला दिसतो. 'त्यांनी वेगवेगळ्या तऱ्हेने प्रत्येकाला आपापल्या प्रवृत्तीत रस घेऊन स्वत:चा आणि आजूबाजूचा सहज शोध घ्यायला लावले.' अशी त्यांच्याविषयी केलेली टिपणी याची साक्ष देते. त्यामुळे इंग्रजी आणि गणितासारखे सहसा अवघड वाटणारे विषयही मुलांना सहजपणे शिकवलेले वाटले. या त्यांच्या वैशिष्ट्यांमध्ये अगदी वरच्या टोकाला आहे, तो 'विश्वास', मुलांना आपल्या शिक्षकाविषयी वाटणारा! पु.शि.रेगे म्हणतात, त्यांचा कोणताच भाग कधी शिक्षा म्हणून वाटला नाही. याचा अर्थ कधी कधी केसकर मास्तर कडक बोललेही असतील, पण मुले त्याने कधी दुखावली गेली नाहीत. मुलाच्या कोवळ्या वयात मिळालेले काळ्या रंगाचे, खडबडीत चेहऱ्याचे हे मास्तर आयुष्यभर मुलाच्या लक्षात राहतात. एका शिक्षकाला अजून काय हवे?

चंद्रमोहन कुलकर्णी हे असेच एक प्रतिभावान चित्रकार. अगदी अलीकडे **बिटविन द लाइन्स** हे त्यांचे मराठी पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी त्यांच्या शिक्षकाचे वर्णन केले आहे. चित्रकलेचा अभ्यासक्रम शिकत असताना त्यांना गजानन मंगेश रेगे नावाचे एक शिक्षक 'ॲडव्हरटायझिंग' नावाचा विषय शिकवायचे.

'रेगे सरांचा अक्षरश: दांडगा अभ्यास. एखाद्या माणसाचा त्याच्या विषयाचा अभ्यास इतका असतो की, त्याचे विद्यार्थी त्या विषयात आपोआपच रस घेऊ लागतात! माहिती, किस्से, गमतीजमती, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित भरगच्च लेक्चर्स अखंड तीनचार दिवस चालत. भविष्यात आपण जगातल्या एका महत्वाच्या क्षेत्रात काम करणार आहोत आणि त्या जगाच्या उंबरठ्यावर उभे राहून हा आपला महान शिक्षक आपल्याला त्या इंद्रधनुषी जगाची ओळख करुन देत आहे-असं काहीसं भारलेलं वातावरण आठवलं की, अंगावर आजही रोमांच उभे राहतात!' असे त्यांच्याविषयी पुस्तकात लिहिले आहे. शिक्षकाचे हे वर्णनही लेखकाने त्याच्या साठीमध्ये लिहिलेले आहे. चित्रकार लेखकाच्या तरुण, उमेदीच्या वयात शिक्षकाकडून झालेला संस्कार इतक्या वर्षांनंतरही साथ देतो आहे, आनंद देतो आहे. चंद्रमोहन कुलकर्णी हे रुढार्थाने शिक्षणशास्त्र शिकलेले नाहीत. पण त्यांच्या या लेखनातून शिक्षणातील काही तत्वे त्यांनी सहजतेने उलगडली आहेत.

''एखाद्या माणसाचा त्याच्या विषयाचा अभ्यास इतका असतो की, त्याचे विद्यार्थी त्या विषयात आपोआपच रस घेऊ लागतात!'' याचाच अर्थ कोणताही विषय मुलांच्या आवडीचा होऊ शकतो फक्त, शिक्षकाची आपल्या विषयातल्या आशयावर हुकमत असायला हवी. तसेच, त्यांच्या वर्गातले वातावरण भारलेले कशामुळे होत असे, याचेही वर्णन त्यांनी केले आहे; माहिती, किस्से, गमतीजमती याने भरलेली व्याख्याने. ही एक प्रकारे शिकवण्याची पद्धतच ते सांगत आहेत. शिकवण्याचा आशय आणि तो मुलापर्यंत पोचवण्याची हातोटी (ज्याला शिक्षणशास्त्राच्या भाषेत अध्यापन पद्धती असे नाव आहे) यांची बेमालूम सांगड घालण्याचे कौशल्य या रेगे सरांमध्ये दिसून येते.

वरील दोन परिच्छेद म्हणजे दोन प्रतिभावान कलाकारांनी त्यांच्या वयाच्या साठीमध्ये त्यांच्या आठवणीत राहिलेल्या शिक्षकांचे केलेले वर्णन आहे.

पु.शि.रेगे यांचे केसकर सर आणि चंद्रमोहन कुलकर्णी यांचे रेगे सर या दोन्ही शिक्षकांनी मुलांना त्यांच्या वाढीच्या वयात जे संस्कार दिले आहेत, ते त्यांना आयुष्यभर पुरले. त्या शिदोरीवर या मुलांनी स्वत:चे वैयक्तिक आयुष्य समृद्ध

तर केलेच. शिवाय समाजालाही काही देणे दिले, जे पुन्हा पुढच्या अनेक पिढ्यांना पुरणार आहे, आनंद देणार आहे. पु.शि.रेगे आणि चंद्रमोहन कुलकर्णी यांनी त्यांच्या या शिक्षकांना साहित्यरुपाने जिवंत ठेवले आहे.

केवळ शिक्षकांची विद्यार्थ्यांनी केलेली वर्णने 'शिकण्या-शिकवण्यासंबंधी' दृष्टी देतात असे नाही, तर, लेखकांनी केलेल्या समाजाविषयीच्या वर्णनातूनही शिक्षकाला काहीतरी मिळत जाते. याचे एक उदाहरण वागनीदाखल देण्याचा मोह होतो आहे. डॉ. सुलभा ब्रम्हनाळकर या व्यवसायाने बालरोगतज्ज्ञ आहेत. त्यांनी देश विदेशात केलेल्या पर्यटनाचे अनुभव **बंद खिडकीबाहेर** या त्यांच्या पुस्तकात मांडले आहेत. त्यातले किमान दोन प्रसंग हे शिक्षणात काम करणाऱ्या व्यक्तींनी आवर्जून वाचावेत असे आहेत; नॉर्वे या देशात प्रवास करताना आलेला अनुभव त्यांनी लिहिला आहे. या देशात रस्ते इतके स्वच्छ कसे? असे प्रवासा दरम्यान सतत लेखिकेच्या मनात येत असणार. शेवटी एकदा न राहवून या डॉक्टर लेखिका त्यांच्या गाडीच्या ड्रायव्हरला विचारतात, "How do you keep the roads so clean?" यावर तो म्हणतो "Why? We like it that way." पुढे तो म्हणतो, "Can you see that thing there? You wont's see it after ten minutes. The first person who will see it, will pick it up." नॉर्वे देशातले रस्ते इतके स्वच्छ कसे, तर ज्या कुणा व्यक्तीला पहिल्यांदा कचरा दिसेल ती व्यक्ती तो उचलतो, अशी माहिती तिथला ड्रायव्हर देतो. आपल्या आजूबाजूला दिसणारा कचरा कुणी टाकला आहे, याचा विचार न करता ज्याला दिसेल त्याने तो उचलावा, हा संस्कार प्रत्येक व्यक्तीमध्ये कसा रुजला असेल?

दुसरा एक प्रसंग याच देशातला आहे. रस्त्याच्या कडेला स्ट्रोबेरी विकणारी मुलगी लेखिकेला विचारते, "Where do you come from?" त्यावर "India" हे ऐकून ती म्हणते, "Oh!It is far off." ''तुम्ही कुठून आलात?'' असा तिचा प्रश्न.आणि भारत हे त्यावरचे उत्तर ऐकून ती लहानगी अगदी सहजपणे दोन देशातले अंतर सांगते. या एवढ्याशा चिमुरडीला भारत हा देश तिच्या देशापासून फार लांब आहे, हे माहीत होते. जगाच्या नकाशाचे भान इतक्या लहान वयातच या मुलीला आहे याचे भारतात राहणाऱ्या लेखिकेला आश्चर्य वाटते. हे वाचून आपल्याही मनामध्ये नकळतपणे आपल्या देशातल्या चिमुरड्या मुलांशी या मुलीची तुलना होत राहते. शिक्षणविषयक अशी अंतर्दृष्टी देणारे विपुल साहित्य आज उपलब्ध आहे. या ठिकाणी उल्लेख केलेली पुस्तके ही माझ्या मर्यादित वाचनातून मला आढळलेली आहेत. केवळ मराठी भाषेचा विचार केला तरी साहित्याचा तळ लागणे ही अवघड गोष्ट आहे. इतके दर्जेदार लेखन आजवर झालेले आहे. शिक्षक प्रशिक्षकांनी त्याचा शोध घेत राहिले पाहिजे. अशी सर्व पुस्तके म्हणजे शिक्षक प्रशिक्षकाची शैक्षणिक साधनेच आहेत. शिक्षक होणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्याप्रकारे साधने तयार करण्यासाठी उद्युक्त केले जाते, तसेच त्यांना शिकवणाऱ्या प्राध्यापकांनीही वेगवेगळी पुस्तके, कात्रणे जमवणे गरजेचे आहे. शिक्षक प्रशिक्षक जितका बहुश्रुत, तितके तो प्रशिक्षणार्थी शिक्षकाला साधने तयार करायला, आशय रंजक करायला उद्युक्त करु शकेल. नाहीतर, आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार या न्यायाने त्याच्या समोरच्या प्रशिक्षाणार्थ्याला देण्यासारखे त्याच्याकडे काहीच नसेल. केवळ विद्यापीठाने सुचवलेली संदर्भ पुस्तके इतपतच तो मजल मारु शकेल.

वर उल्लेख केलेले प्रसंग, वर्णने वाचली की, यातून आपल्या शिक्षक प्रशिक्षणाला काही दिशा मिळू शकेल असे मनात येते. दोन वर्षाच्या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात सगळे विषय शिकवले जातात, सर्व प्रात्यक्षिके पूर्ण करुन घेतली जातात. पण शिक्षक होऊन बाहेर पडताना समाज त्यांच्याकडे कोणत्या आशेने पाहत आहे, याची चर्चा (झालीच तर) मात्र फारच काठावरुन होते. वर्गातील हजेरी, प्रात्यक्षिकाचे तास, श्रेणी हे विषय प्रामुख्याने चर्चेत असतात. वस्तुत: या सर्व गोष्टी काठाकाठाने आल्या तरी परवडतील. पण, सामाजिक बांधिलकी आणि विषयज्ञान हे मुद्दे मात्र अ-तडजोडक्षम आहेत.

मुलांचे रस्त्यातले थुंकणे, वाहतुकीचे नियम न पाळणे या गोष्टी सरकारने किंवा घरात पालकांनी बघून

घ्याव्यात असे आता शिक्षक म्हणून शकत नाही. कारण "to act as agents of modernization and social change" हे शिक्षक प्रशिक्षणाचे एक उद्दिष्ट आहे. आपला विद्यार्थी या प्रकारचे वर्तन करणार नाही, ही जबाबदारी शिक्षकाची आहे. विद्यार्थ्याला नागरिकशास्त्रात केवळ भरपूर गुण मिळाले म्हणजे शिक्षकाचे काम संपत नाही. नागरिकत्वाचे गुण विद्यार्थ्याच्या अंगी किती रुजले यावरुन शिक्षकाच्या कामाचे खरे मूल्यामापन होते. तसे घडत नसेल तर तो शिक्षकाने आपला अपमान मानला पाहिजे.

स्वीडन हा देश शून्य अपघतांचा देश म्हणून जेव्हा घोषित करण्यात आला तेव्हा एका वर्तमानपत्रात लेख छापून आला होता.या लेखात अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी या देशाने कोणते प्रयत्न केले याची माहिती होती. तिथल्या प्रशसकीय यंत्रणा, त्यांचे नियम यांचे विस्तृत वर्णन यात आले होते. शेवटी एक अत्यंत महत्वाचा मुद्दा त्यात मांडला होता; देशात एखादा अपघात घडला तर तिथल्या नागरिकांना तो त्यांचा अपमान वाटतो. आमच्या देशात अपघात घडूच कसा शकतो, असे झाले तर ते आमचे अपयश आहे, असे त्यांना वाटते.

हीच गोष्ट शिक्षकांच्या बाबतीत घडायला हवी आहे. माझा विद्यार्थी नियम मोडेलच कसा, भ्रष्टाचार करेलच कसा, असे शिक्षकाला वाटायला हवे आहे. कारण नीतिमान विद्यार्थी तयार करणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट आहे आणि नीतिमान शिक्षक तयार करणे, हे शिक्षक प्रशिक्षणाचे.

असे नीतिमान शिक्षक तयार करण्याच्या हेतूने रयत शिक्षण संस्थेने शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांची स्थापना केली आहे. ज्या संस्थेला कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्याचा वारसा आहे त्या संस्थेतील शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक हे सामाजिक कार्य करण्याच्या हेतूनेच संस्थेत दाखल झाले आहेत असा विश्वास सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात आहे. या संस्थेच्या स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या नावातच सहजता आणि आनंद या शिक्षणाच्या गाभ्याशी असणाऱ्या दोन्ही गोष्टी आहेत. या महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने या गाभ्यापर्यंत पोचण्यासाठी आपण करत असलेल्या प्रयत्नांना मन:पूर्वक शुभेच्छा !



१९७०-७१
ग्रामीण शिक्षण विभाग – प्राचार्य व प्राध्यापक यांचे समवेत.

# ...ऐसे टीचर कहाँ मिलते है?

**आर.ए.कुंभार**
माजी प्राध्यापक,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

१५ जून २००२. महाविद्यालय सुरु झालं. नवीन चेहरे. बरेचसे एकमेकांशी अनोळखी. महाराष्ट्रभरातून आलेले. ज्यांच्या पूर्वी ओळखी होत्या तेवढे फक्त एकमेकांशी बोलत होते. बाकीचे शोधक नजरेने सर्वत्र पाहत होते. आम्हा शिक्षकांना हे चित्र नवीन नव्हतं. असं दृश्य दरवर्षाच्या सुरुवातीस असतं. कारण बी.एड. कोर्स एक वर्षाचा. त्यामुळे दरवर्षी नवीन प्रवेश. नवीन विद्यार्थी.

दुपारच्या सुट्टीत एक मध्यमवयीन गृहस्थ एका विद्यार्थ्याला घेऊन माझ्या खोलीत आले. त्यांनी स्वत:चा परिचय करुन दिला. ते आंध्र प्रदेशातील, त्यांच्या सोबत आलेल्या मुलाचे ते मामा. मुलाचं नाव एस. राजकिरण रेड्डी, अर्थातच आंध्र प्रदेशातील Other State च्या कोट्यातून प्रवेश मिळालेला. धरुन आणल्यासारखा माझ्यापुढे उभा होता. त्याचे मामा मात्र सुशिक्षित वाटत होते. ते सांगू लागले, ''सर, ये आपके मेथडका स्टुटंड है। वैसे तो इंग्लिश इसका सब्जेक्ट नही है, सोशॅलॉजी और पोलिटिकल सायन्स है, वो भी तेलगु मिडियम मे। मराठी तो बिलकूल आता नही, इसीलिए इंग्लिश मेथड लिया है। जरा संभल के लेना।''

मी मुलाकडे पाहिलं. तो काहीच बोलत नव्हता. कुठेतरी शून्यात बघत होता. शर्ट–पँट मळलेली, त्वचा काळवंडलेली, पायात स्लिपर, मी त्याच्या मामास ''ठिक है'', म्हणालो आणि त्यांना निरोप दिला. ते निघून गेले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो मुलगा बघत होता. मी त्याच्याकडे पाहत होतो. आंध्र प्रदेशातील मराठी न बोलता येणारा एक मुलगा महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या एका बी.एड. महाविद्यालयात दाखल झाला होता. इंग्लिश मिडियम आणि इंग्लिश मेथड घेऊन!

दुसऱ्याच आठवड्यात आमचे सूक्ष्म अध्यापनाचे पाठ सुरु झाले. रेड्डी माझ्याच मेथडचा विद्यार्थी असल्याने अर्थातच तो माझ्या गटामध्ये आला. गेल्या आठवड्यात त्याच्या अंगावर जो शर्ट होता, तोच आताही होता. प्रथम ओळखीचा कार्यक्रम झाला. मुलांनी आपापल्या ओळखी इंग्रजीतून करुन दिल्या. रेड्डी जेव्हा उठला तेव्हा त्याचे पाय थरथर कापत होते. तोंडातून शब्द फुटत नव्हता. कसंबसं त्याने आपले नाव व शैक्षणिक पात्रता सांगितली. शेवटच्या मुलासच काय पण मलासुद्धा तो काय म्हणाला ते नीट ऐकू आलं नाही. मी त्याला जवळ बोलावलं आणि म्हटलं, "Reddy, we all are your friends. We are like you. We are here to learn how to teach." यावर त्याची प्रतिक्रिया काहीच नाही. तो केवळ माझ्याकडे पाहत होता. घाबरलेल्या अवस्थेत.

दुसऱ्या दिवशी होस्टेलच्या विद्यार्थ्यांकडे त्याच्याबाबत चौकशी केली. मुलांनी सांगितलं की तो काहीच बोलत नाही. होस्टेलमध्ये आणि कॉलेजमध्ये न बोलणारा विद्यार्थी बी.एड. कसा होणार? कारण बी.एड. तर बोलण्याचाच कोर्स म्हटलं तरी चालेल. मी ग्रंथालयात बसून विचार करु लागलो.

१९७५-७६ ची गोष्ट, मी पुण्यात बी.एड. करीत होतो. विज्ञान शाखेचे विद्यार्थी आणि इंग्लिश मेथड घेणारे विद्यार्थी यांना सक्तीचे इंग्लिश मिडियम. माझी इंग्लिश मेथड म्हणून इंग्लिश मिडियमच्या तुकडीत माझं नाव, इंग्लिश चांगलं म्हणून नव्हे! माझं इंग्लिश चांगलं नव्हतंच. माझ्यासारखे खेड्यातून आलेले असे बरेच विद्यार्थी होते. साधे कपडे, पायात साध्या चपला किंवा स्लिपर, चेहरे रापल्यासारखे. आम्ही सगळे मागे बसायचो. आमच्या तुकडीत पुण्यातील इंग्लिश मिडियमध्ये शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी संख्येने जास्त होते. ते हाय-फाय इंग्लिश बोलायचे. प्राध्यापक इंग्रजीतून लेक्चर्स द्यायचे. आम्हाला काही कळायंच नाही. आम्ही वर्षभरात त्यांच्याशी कधी बोललो नाही. ते समोरुन आले तरी ती वाट सोडून आम्ही डावी-उजवीकडे वाट दिसेल तिकडे निसटायचो. सत्तावीस वर्षापूर्वीचे माझे बी.एड. चित्रपटाप्रमाणे माझ्या अंत:चक्षू समोरुन फिरु लागले आणि रेड्डीची आणि माझी वेव्हलेंग्थ जुळली.

दुपारच्या सत्रात पुन्हा सूक्ष्म अध्यापनाचं कामकाज सुरु झालं. विद्यार्थी जमेल तसे पाठ घेऊ लागले. मी त्यांना मार्गदर्शन करु लागलो. रेड्डीचा नंबर आला. त्याचं नाव पुकारताच तो फक्त जागेवर उभा राहिला. त्यास मी पुढे बोलावलं. तो पुढे आला आणि पुन्हा उभा राहिला. मी म्हटलं, "Write the name of the subject on the board." त्यानं कसंबसं लिहिलं. त्याचा थरथरता हात माझ्या नजरेतून सुटला नाही. पुन्हा माझ्याकडे बघू लागला. मी त्याच्या जवळ गेलो. पुन्हा म्हणालो, "Say Good afternoon class." तो कसाबसा पुटपुटला. मग पुढची वाक्ये - "Dear pupils, listen. We know animals. We know birds. What is this..." तो घाबरत, चाचरत कसाबसा माझ्यामागून बोलत होता. हा त्याचा पहिला लेसन!

दुसऱ्या दिवशी रेड्डी अचानक माझ्या खोलीवर! माझ्यासमोर उभा राहिला. मी त्यास Good morning म्हटलं. त्याचा प्रतिसाद नाही. मी त्यास विचारलं,"What's the matter? क्या बात है?'' (त्याला थोडं हिंदी समजत होतं) तर त्याच्या डोळ्यात पाणी. त्याने माझे पाय धरले. मी म्हणालो,''ये क्या कर रहे हो? आखिर बात क्या है? आणि त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "Going home." खोलीच्या बाहेर दरवाजाजवळ त्याने बॅग ठेवलेली दिसली.

क्षणभर काय बोलावं ते मला सुचेना. थोडा धीर धरुन मी त्याला खाली बसावयास सांगितलं. पण तो काही बसेना. हाताला धरुन मला त्याला खाली बसवावं लागलं. मग मस्करीच्या भाषेत त्याला समजावून सांगितलं,''घर जाके क्या करोगे? कोशिश करो, सबकुछ ठीक हो जाएगा!'' पण याचा त्याच्यावर काहीही परिणाम झाल्याचं आढळलं नाही. '' मै जा रहा हूँ Going home'' एवढंच फक्त म्हणत होता. पुढे एका गोष्टीचा मात्र त्याच्यावर अगदी झटकन परिणाम झाला. मी त्याला म्हणालो, ''अरे, मै हूँ ना तुम्हारे साथ। हम यहाँ - मेरे रुम मे स्टडी करेंगे। मैं तुम्हे बताऊंगा सब। लेकिन घर जानेका दोबारा मत बोलो। ठिक है?' त्याचा चेहरा थोडा उजळला. त्याचा किंचितसा सतेज चेहरा मी आज प्रथमच पाहत होतो. त्याची हॉस्टेलमधून बाहेर निघालेली बॅग पुन्हा हॉस्टेलमध्ये गेली.सूक्ष्म पाठाची तयारी मग आम्ही घरी सुरु केली. Good atfernoon class पासून In this way today we have studied this lesson, thank you all पर्यंत. मी पुढे म्हणायचे व तो पाठीमागून म्हणयचा. यात नवीन शब्दांचा परिचय कसा करुन द्यायचा, स्पष्टीकरण कसं करायचं, प्रश्न कसे विचारायचे, फलक लेखन कसं करायचं या सर्वांचा अंतर्भाव असायचा. गटातही मी बाकीच्या विद्यार्थ्यांना सांगून ठेवलं होतं की, आपण याला सहकार्य करायचं; हसायचं नाही. रेड्डीला आत्मविश्वास येऊ लागला. तो थोडं थोडं बोलू लागला. एका वाक्यापासून त्याचं बोलणं दहा वाक्यापर्यंत गेलं, पुढे दहा मिनिट तो विद्यार्थ्यांसमोर उभा राहू लागला. आता तीस मिनिटं त्याला वर्गापुढं उभं करणं मला शक्य वाटू लागलं.

पुढे हा नित्यक्रम झाला. लेसन लागला की रेड्डी घरी यायचां. मग लेसन नोटस् काढणं, शैक्षणिक साहित्य तयार

करणं आणि संपूर्ण पाठ म्हणून घेणं. अशी तयारी आम्ही करु लागलो. ट्युटोरियल असलं की त्याचं घरी येणं आणि उत्तराची तयारी करणं हेही नित्याचंच झालं. घरात येताना हात जोडूनच तो प्रवेश करायचा आणि जाताना पाया पडायचा. त्याच्या या कृती मला पटेनाशा झाल्या. एके दिवशी मी त्याचे खांदे धरुन त्याला म्हटलं, ''ये हररोज क्या है, ऐसा नही करना!'' यावर तो जे म्हणाला ते ऐकून मी अवाकच झालो. तो म्हणाला, ''सर, आपके सीवा मेरा यहाँ है ही कोन ? You are my god''

मला आता त्याच्यासाठी खूपच प्रयत्न करावे लागणार होते. कॉलेजमधील लेक्चर्सचा त्याला काही उपयोग नव्हता. कारण ती मराठीत होती. त्याची तयारी मला इंग्रजीत करुन घ्यावी लागणार होती. याचं तर इंग्रजीही कच्चं होतं. म्हणजे ते सोप्या इंग्रजीत तयार करणं व त्याला समजून देणं ही आता माझी जबाबदारी होती. मी जर त्यात कमी पडलो तर त्याने कॉलेज सोडलंच, याची मला खात्री होती. पण सुदैवाने आम्ही दोघेही कंटाळलो नाही. नित्यक्रम आम्ही सोडला नाही. आणि रेड्डी प्रथम सत्र परीक्षेस सामोरा गेला. परीक्षा काळात त्याचं दररोज घरी येणं, पेपरची तयारी करणं अगदी न चुकता झालं. मला नको असतानाही पेपरला जाताना तो पाया पडायला कधी विसरला नाही तसंच पेपर सुटल्यानंतरही भेटल्याशिवाय गेला नाही. ''पेपर अच्छा था,'' असं जाताना म्हणायचा. मला बरं वाटायचं.

दिवाळी सुट्टीनंतर प्रथम सत्र परीक्षेचा निकाल लागला. रेड्डी सेकंड क्लासमध्ये पास झाला होता! त्याच्या आनंदाला तर पारावर नव्हताच, पण मलाही हुरुप आला. त्याचं यश हे जणू माझंच यश असं मला वाटू लागलं. अजून पुढं बरंच काम करायचं होतं. विविध कार्यशाळा, छात्रसेवाकाळ आणि प्रात्यक्षिक यामध्ये त्याला भाषेमुळे अडचणी येत होत्या. तो भेटायचा, विचारायचा आणि मला जमेल तसं मी त्याला सांगायचो. असं करत-करत एकदाचा तो या सर्व कामातून मोकळा झाला. राहिली फक्त वार्षिक परीक्षा. आम्ही नोटस् काढल्या, महत्त्वाचे प्रश्न काढले, उत्तरे तयार केली. रेड्डी परीक्षेस सामोरा गेला. माझ्या काही अडचणींमुळे मी फक्त पहिले चार दिवस पर्यवेक्षणाच काम स्वीकारलं होतं. नंतर मी गावी गेलो. परतलो तेव्हा परीक्षा संपली होती व विद्यार्थी आपापल्या गावी गेले होते. ग्रंथपालाकडून समजलं की रेड्डी माझी खूप चौकशी करत होता. मेसवर गेलो तर मेस मालकाने सांगितले की रेड्डी माझ्यासाठी एक फ्लॉवर पॉट ठेवून गेलाय. तो त्यांनी मला दिला. त्यात एक छोटीसी चिठ्ठी होती. मी ती उघडली- लिहिलं होतं - 'To my Godlike teacher.'

मे महिन्यात विद्यापीठ परीक्षेचा निकाल लागला. रेड्डी बी प्लस मध्ये पास झाला होता. मी सुट्टी असल्याने गावीच होतो. एके दिवशी त्याचा फोन आला,''सर मैं पास हो गया....'' त्याचा गळा दाटून आल्याचं त्याच्या आवाजावरुन जाणवत होते. मी त्याला 'Congratulations' म्हणून खत लिखते रहना असं सांगितलं, त्यानं विचारले, ''सर आपको गिफ्ट मिली क्या?'' हाँ, हाँ, मिली तो, मी म्हणालो, ''लेकिन चिठ्ठी में आपने Godlike teacher... लिखा है, मैं तो कोई God नही हूँ!'' यावर तो म्हणाला, ''सर, अब मैं क्या बोलू? लेकिन ऐसे टीचर कहाँ मिलते है?''

# विवेकनिष्ठ शिक्षण : उच्च शिक्षणाचा नवीन आयाम

**डॉ. कृष्णा भा. पाटील**
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**प्रस्तावना :**

शिक्षण प्रक्रियेत प्रामुख्याने बोधात्मक, क्रियात्मक व भावात्मक या तीन क्षेत्रानुसार विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यावर भर द्यावा असे अनेक शिक्षण आयोगांनी आपल्या शिफारशीमध्ये नमूद केले आहे. पण आजची परिस्थिती बघितली तर बोधात्मक व क्रियात्मक क्षेत्राचाच विकास करण्यावर शिक्षक व पालक यांचा अधिक भर असलेला दिसून येतो. यातून विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडे दूर्लक्ष होते हे नुकत्याच महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या मानसशास्त्रीय शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या नवीन अद्यादेशाद्वारे निश्चित सिद्ध होतेय.

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय. यामध्ये बौद्धिक, भावनिक, क्रियात्मक, सामाजिक व शारीरिक विकास घडत असतो.यामधील बौध्दिक व भावनिक विकास हा व्यक्तीच्या विवेकनिष्ठ किंवा अविवेकनिष्ठ विचारांवर अवलंबून असतो. विवेकनिष्ठ विचार हा शिक्षणाची इतर ध्येये साध्य करण्यासाठी गरजेचा आहे. अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन या सर्वांना योग्य दिशा देण्यासाठी या विवेकनिष्ठ विचारांची गरज आहे. विद्यार्थ्यांना अशा विवेकनिष्ठ विचारातून योग्य दिशा मिळाल्याने त्यांना भावनिक व मानसिक त्रासातून दूर करता येईल. यामुळे समाजाचा व राष्ट्राचा विकास साधता येईल.

**विवेकनिष्ठ विचार :**

अल्बर्ट एलिस यांचे मते आपल्या जीवनात घडणाऱ्या घटनांपेक्षाही त्या घटनांचा आपण जो अर्थ लावत असतो व त्याचे काही मूल्यमापन करत असतो, त्यानुसार आपल्या भावना व वर्तन घडत असते त्यालाच विवेकनिष्ठ विचार म्हणतात. विवेकनिष्ठ विचार हे कृतीयुक्त, बोधात्मक व वास्तविक विचार असतात. तसेच ते तर्कशुद्ध,ध्येय सुनियोजीत, लवचिक व वास्तववादी असतात.

**विवेकनिष्ठ शिक्षण :**

अविवेकनिष्ठ विचारांच्या जागी विवेकनिष्ठ विचार रुजवून त्यांना विवेकनिष्ठ विचारांचे प्रशिक्षण देवून त्यांची भावनिक अस्वस्थता दूर करु शकतो. यासाठी डॉ. अल्बर्ट एलिस यांनी विवेकनिष्ठ मानोसपचाराचे उपयोजन वेगवेगळ्या स्तरावर, घटनावर तसेच इतर मानसिक,भावनिक प्रश्न दूर करण्यासाठी केले आहे. यामधील एक म्हणजे विवेकनिष्ठ शिक्षण होय. या प्रयोगामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांमधील विवेकनिष्ठ विचार विकसनासाठी अनेक उपक्रम तयार करुन विद्यार्थ्यांमध्ये कशा प्रकारे विवेकनिष्ठ विचार विकसित होतात हे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. याचा वापर आपणांस अभ्यासक्रमामध्ये वर्गअध्यापणामध्ये कार्यकृती देवून करता येईल. विद्यार्थ्यांमध्ये विवेकनिष्ठ विचार रुजवण्यास त्याची निश्चितच मदत होईल.

**विवेकनिष्ठ शिक्षणाची गरज :**

विद्यार्थी स्तरावर मनात अनेक भावनिक कलह सुरु असतात. यातूनच ते विवेकनिष्ठ

अथवा अविवेकनिष्ठ दृष्टीकोन जोपासतात. विद्यार्थ्यांच्या मनात आत्मघातकी भावना निर्माण करणाऱ्या अविवेकनिष्ठ विचारांची जाणीव त्यांना करुन देवून त्यांच उच्चाटन करणं, स्वत:मधल्या गुणदोषासकट स्वत:चा स्विकार करण, इतरांशी सलोख्याचे संबंध राखणे आणि मार्गात येणाऱ्या अडचणींशी आत्मविश्वासपूर्वक मुकाबला करणे यासाठी विवेकनिष्ठ विचारच मदत करत असतात. त्यामुळे त्यांच्यामधील अशा विवेकनिष्ठ विचारांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे.

विवेकनिष्ठ शिक्षण हे विवेकनिष्ठ विचार पद्धतीचे माध्यम वा प्रक्रियात्मक साधन आहे. विवेकनिष्ठ मानोपचार पद्धती ही भावनिक असुंतलनावर उपाय निर्माण करणारी परंतू सर्वसामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या मानसशास्त्रीय आणि इतर वर्तनवादी पध्दतीपेक्षा वेगळी उपचार पध्दती आहे. वेगवेगळ्या क्लृपत्त्या, तंत्रे, योजना यांचा वापर करुन मानवामध्ये मूळात निर्माण असलेल्या भिन्न विचारप्रक्रियेचा उपयोग करुन विचारशैली तसेच वर्तनशैली यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणून भावनिक संतुलन कायम राखण्यास मदत करते.

**अल्बर्ट एलिस यांचे एबीसी प्रतिमान :**

डॉ. अल्बर्ट एलिस यांनी मांडलेल्या एबीसी प्रतिमानानुसार विचार, भावना आणि वर्तन ही वेगवेगळी कार्ये नाहीत तर एकमेकांवर आधारीत कार्ये आहेत. एबीसी प्रतिमान हा एक आशावादी दृष्टीकोन आहे की जो व्यक्तीच्या स्वगतामधून निर्माण होणारा ताण तसेच स्वत:मध्ये असणारी परीक्षण क्षमता यावर भाष्य करतो. हा दृष्टीकोन मनातील चिंता, नैराश्य,राग इ. भावनांचे परीक्षण आणि त्याच्यावर उपचारात्मक योजना करुन अविवेकी वर्तनावर नियंत्रण ठेवू शकतो. मूळात अविवेकी वर्तन हे आपल्या अविवेकी धारणामुळे घडत असते. आणि या धारणांची निर्मिती आपण एखाद्या घटनेकडे ज्या दृष्टीकोनातून पाहतो त्यावरुन तयार होत असते. मूळात आपला दृष्टीकोनच अविवेकी असतो हे लक्षात घेतले पाहिजे.

अल्बर्ट एलिस यांच्या एबीसी प्रतिमानुसार अ टप्प्यावरच्या घटनेचा ब टप्यावर आपण जो अर्थ लावतो व त्याचं जे मूल्यमापन करतो यावरच आपल्या भावना प्रामुख्याने अवलंबून असतात. यासाठी ब टप्प्यावरच्या मानसिक प्रक्रिया सर्वाधिक महत्वाच्या ठरतात. प्रत्येक मनुष्य मनात जोपासलेल्या दृष्टीकोनातून विचार करत असतो ते दोन प्रकारचे असतात. १ विवेकनिष्ठ व २ अविवेकनिष्ठ हे असे विचार आपल्या मनात तयार होतात. कारण विशिष्ठ दृष्टीकोन आत्मसात करण्याकडे माणसाचा जन्मजात कल असतो. भोवतालच्या समाजातून चांगल–वाईट, योग्य–अयोग्य,हितकारक–अहितकारक त्याला मिळत असलेली शिकवण आणि आपण स्वत:च स्वत:चे ठरविलेले दृष्टीकोन, आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटना, परिस्थिती,भोवतालच्या व्यक्ती यांना हवे तसे बदलणे आपल्याला जवळजवळ अशक्य असते. परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणं शक्य आहे. आपण त्या घटनेकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो हे फार महत्वाचे आहे. कारण त्यावरच आपले वर्तन घडत असते. प्रसंग एकच असला तरी वेगवेगळ्या दृष्टीकोनामुळे आपण जो अर्थ लावतो व त्याच मूल्यमापन करतो यावरच आपल्या भावना प्रामुख्याने अवलंबून असतात, हे स्पष्ट होते. आपले सर्व विचार हे भावना उद्दिपित करत नाहीत. ज्या विचारात मूल्यमापन असते, असे विचारच भावना निर्माण करतात. या मूल्यमापनानुसार ही भावना उपयुक्त किंवा आत्मघातकी ठरु शकते.

डॉ अल्बर्ट एलिस यांनी आपल्या प्रदिर्घ अभ्यासाअंती मानसिक समस्यांच्या मूळाशी काही विशिष्ट तर्कदुष्ट व अवास्तव दृष्टीकोन आहेत असे नमूद केल आहे. सर्वसामान्य माणसाच्या मनात नेमके कोणते अविवेकी दृष्टिकोन दृढमूल झालेले असतात त्याचे वर्गीकरण सारणी क्र.१ मध्ये दिले आहे.

### सारणी क्र.१ विवेकी व अविवेकी दृष्टिकोन

| अ.नं. | अविवेकी दृष्टिकोन | विवेकी दृष्टिकोन |
|---|---|---|
| १ | आपल्या सभोवतालच्या सर्व लोकांची मर्जी संपादन करणे व त्यांच्याकडून प्रत्येक गोष्टीत प्रशंसा मिळविणे व सर्वतोपरी त्यांच्या पसंतीस उतरणे ही अत्यावश्यक गोष्ट आहे. | लोकांची मर्जी संपादन करणे व त्यांची प्रशंसा मिळविणे ही गोष्ट स्पृहणीय आहे. उपयुक्त आहे. परंतु अगदी अत्यावश्यक नाही. सतत सर्व गोष्टींच्या बाबतीत सर्वांची मर्जी संपादन करण्याच्या खटपटीत मनुष्य आपले स्वत्वच गमावून बसेल व इतरांचा गुलाम होईल. |
| २ | काही माणसे दुष्ट,दुर्गुणी नीच व पाजी असतात आणि म्हणून अशा माणसांच्या कृत्यांबद्दल त्यांना जबरदस्त शासन हे झालेच पाहिजे. | अशी कृत्ये मूर्खपणा,अज्ञान अथवा भावनिक अपक्कता यांचे द्योतक असतात आणि त्याबद्दल त्यांना जबरदस्त शिक्षा करुन ती माणसे सुधारणे दुरापास्त असते. |
| ३ | जीवनातील घटना आपल्याला हव्या तशा घडत नाहीत ही एक कमालीची घोर आपत्ती आहे. | घटना आपल्याला हव्या तशा न घडणे हे त्रासदायक असते. परिस्थितीत जेवढा बदल करता येईल तेवढा करण्याचा प्रयत्न जरुर करावा. पण जर परिस्थिती आपल्या आवाक्याबाहेर असेल तर छाती पिटून घेवून काही फायदा नाही. |
| ४ | आपले दु:ख आपल्यावर सभोवतालच्या परिस्थितीने व इतर माणसांनी लादलेले असते व आपण त्याबाबत काहीच करु शकत नाही. | बहुतेक वेळा आपले दु:ख आपण बाहय जगातील घटनांकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो त्यावर अवलंबून असते व ते नष्ट करणे आपल्याच हातात असते. |
| ५ | एखादे संकट त्याबद्दल सतत काळजी करुन दूर होईल. | एखादे संकट उभे असेल तर त्याच्या निवारणार्थ काही विधायक प्रयत्न करणे योग्य आहे. परंतु काही करता येण्यासारखे नसेल तर त्याबद्दल काळजी करीत बसून काही फायदा होणार नाही उलट तोटाच होईल. |
| ६ | जीवनातील अडचणी व जबाबदाऱ्या यांना तोंड देण्याऐवजी त्या टाळणे हे चांगले. | असा हा वरवर पाहता सोपा दिसणारा मार्ग दुरदृष्टीने विचार केला तर फारच कष्टदायक असल्याचे कळून चुकते. त्यापेक्षा अशा गोष्टीला सरळसळ सामोरे गेलेले बरे. नाही तर आत्मविश्वास कुठून येणार? |
| ७ | सर्व क्षेत्रात आपण संपूर्णपणे कार्यक्षम, निष्णात,पराक्रमी व यशस्वी असणे आवश्यक आहे. | ही गोष्ट अशक्य आहे. संपूर्ण निर्दोष व परिपूर्ण कोणीच नसतो. आपल्या या मर्यादा मान्य कराव्यात हेच उत्तम. |
| ८ | भूतकाळातील घटनांचा व अनुभवांचा आपल्या जीवनावर इतका जबदरस्त परिणाम झालेला असतो की त्यातून सुटका करुन घेणे अशक्य असते. | अशी सुटका करुन घेणे अवघड असले तरी अशक्य नसते. |
| ९ | सुख म्हणजे  निरुद्योग व निष्क्रियता. | कोणत्यातरी कामात अथवा प्रकल्पात मनापासून तल्लीन झालेली माणसेच जास्त सुखी असतात. |
| १० | आपल्या हातून काही चूक झाली अथवा काही प्रमाद घडला, तर त्याबद्दल स्वत:ला सतत दोष द्यावा व अपराधी भावना बाळगावी. | काही चूक झाली अथवा काही प्रमाद घडला तर तसे मान्य करावे व नंतर ती चूक सुधारावी आणि आलेल्या अनुभवांवरुन स्वत:चा विकास करुन घ्यावा पण केवळ स्वत:ला दोष देण्याने व अपराधी भावनेच्या अधीन जाण्याने काही फायदा होणार नाही. |
| ११ | जीवनातील प्रत्येक समस्या सोडविण्याचा एखादा अगदी अचूक व  परिपूर्ण मार्ग असतो तसा मार्ग सापडला नाही तर भलतेच अरिष्ट कोसळते. | सर्व प्रश्नांना अशी एकमेव व अचूक उत्तरे न मिळाल्याने जे परिणाम घडतील असे वाटत असते ते परिणाम अवास्तव व कपोलकल्पित असतात. शिवाय अशा एका परिपूर्ण उत्तराच्या व्यर्थ शोधाने मनुष्य चिंताग्रस्त व हतबल होतो. |
| १२ | आपण दुसऱ्यावर अवलंबून राहावे आणि आपला भार आपल्यापेक्षा कोणा तरी जास्त सामर्थ्यवान व्यक्तीवर टाकावा. | एका अर्थी आपण सर्व जणच दुसऱ्यांवर अवलंबून असतो हे खरे परंतु म्हणून हे परावलंबन संपूर्ण नसावे. |

कोणतीही प्रौढ व्यक्ती किंवा बालक जो विवेकनिष्ठ शैक्षणिक तंत्रे,क्लृपत्या, प्रयोग, समस्या निराकरण, अध्ययन अनुभव, भूमिकापालन, प्रबलन, स्वाध्याय इ. गोष्टीमध्ये स्वत:ला गुंतवून घेतो त्यांना दैनंदिन जीवनामध्ये घटनेबरोबर वेळोवेळी समायोजन साधता येते. अर्थातच विवेकनिष्ठ विचारपद्धती ही अध्ययनशील व्यक्तीला कोणत्याही औपचारिक प्रशिक्षणाशिवाय स्वयंअध्ययनास प्रवृत्त करते. याबरोबर इतर व्यक्तीच्या विचार, वर्तन आणि निरीक्षणातून अमूल्य माहितीची देवाणघेवाण केल्यास व्यक्ती शिस्तबद्ध तसेच विवेकनिष्ठ विचार करण्यास प्रवृत्त होतो.

**विवेकनिष्ठ शिक्षणाचे स्वरुप :**

पदवी स्तरावरील विद्यार्थी हे जीवनाच्या एका विशिष्ट टप्प्यावर आलेले असतात. उद्याच्या उज्वल भविष्याचा वेध घेण्यासाठी ते तयार असतात. अशावेळी त्यांना विवेकनिष्ठ विचारांची गरज लक्षात घेवून त्यांना या स्तरावरच विवेकनिष्ठ शिक्षणाच्या माध्यमातून ही गरज पूर्ण करता येऊ शकते. यासाठी विविध शैक्षणिक तंत्रे, क्लृपत्या, अध्ययन अनुभव, भूमिका पालन, प्रबलन, स्वाध्याय इ. गोष्टीचा वापर करता येतो. या विवेकनिष्ठ शिक्षणाचे स्वरुप सारणी क्रमांक २ मध्ये नमूद केले आहे.

**सारणी क्र.२**

**विवेकनिष्ठ शिक्षणाचे घटक व स्वरुप**

| अ.क्र. | विवेकनिष्ठ शिक्षण प्रक्रियेचे घटक | कृतीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | सॉक्रेटिसचे प्रश्नोत्तररुपी तंत्र | शिक्षक या तंत्राचा अवलंब करुन मानसिकरित्या अस्वस्थ झालेल्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतील व त्याच्या शंकांचे निरसन करतील. |
| २ | अनुकरणीय आदर्श | शिक्षक विविध विवेकनिष्ठ विचारवंत, व्यक्ती यांच्या विवेकनिष्ठ वर्तनाचे आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवतील. |
| ३ | फायद्या–तोट्याचे गणित | शिक्षक विद्यार्थ्यांना गृहपाठ देतील ज्यामध्ये दोन स्वतंत्र कागदांवर अविवेकी धारणा अंगिकारल्यामुळे झालेले तोटे व अविवेकी धारणांच्या जागी विवेकी धारणांचा वापर केल्यामुळे झालेले फायदे लिहण्यास सांगतील व त्याची चर्चा करतील. |
| ४ | विवेकनिष्ठ मानसचित्राचे रेखाटन | माणसाच्या मनात ज्या प्रक्रिया चालतात त्या केवळ शब्द व वाक्यामार्फत घडत नसतात तर मानसचित्रा मार्फतही घडत असतात. हे मानसचित्र विवेकी दृष्टीकोनातून तयार होण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांकडून विविध उदाहरणांचा वापर करुन कृती करतील. |
| ५ | स्वअनुभव प्रकटीकरण | यामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना एखादा अनुभव कथन करायला सांगतील. त्यानंतर शिक्षक विद्यार्थ्यांच्या घटनेशी साधर्म्य असणारा प्रसंग कथन करतील. त्याप्रसंगी स्वत:च्या भावनिक अस्वास्थतेसंबंधी मोकळपेणाने भाष्य केले जाईल. त्यामुळे समस्या या सर्वांसमोर आहेत याची विद्यार्थ्यांना जाणीव होईल. |
| ६ | नाट्यसादरीकरण | विद्यार्थ्यांनी एखाद्या प्रसंगावर नाट्य सादरीकरण करावे. सादरीकरणानंतर शिक्षकांनी अविवेकी विचार व दृष्टिकोन यांची छाननी करावी. मार्गदर्शन करावे. |
| ७ | विवेकी जीवन तत्वज्ञान | शिक्षकांनी विवेकनिष्ठ शिक्षण प्रक्रियेचा विस्तृत अभ्यास करुन कौशल्ये आत्मसात करावी. वेळोवेळी प्रसंगानुरुप विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. |

पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये विवेकनिष्ठ दृष्टीकोन विकसित करण्याच्या दृष्टीने सारणी क्र.२ मध्ये नमूद केलेल्या घटकांसदर्भात अध्ययन कृतीचे आयोजन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यास त्यामुळे त्याच्या जीवनात घडणाऱ्या विविध घटनांचे स्वरुप,घटनेबद्दलचा दृष्टीकोन, या दृष्टीकोनातून निर्माण होणाऱ्या भावना, वर्तन यांचे आकलन होवून अविवेकी धारणांच्या जागी विवेकी धारणांची रुजवणूक करण्यास मदत होईल.

**समारोप :**

एकूणच आपल्या शिक्षण व्यवस्थेचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे साध्य करावयाचे असल्यास बोधात्मक व क्रियात्मक शिक्षणाकडे शिक्षक व पालकांचे जितके लक्ष आहे तिकेच लक्ष मुलांच्या भावनात्मक क्षेत्राकडे असण्याची गरज अधोरेखित होत आहे आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी विवेकनिष्ठ शिक्षण हा शिक्षण प्रक्रियेचा नवा आयाम म्हणून पुढे येत आहे. अर्थात गरज आहे ती विवेकनिष्ठ शिक्षण प्रक्रियेचे स्वरुप लक्षात घेवून शिक्षकांनी त्याचे आयोजन करण्याची. त्याचप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी यांनी यामध्ये सहभागी होवून कृती कराव्यात जेणे करुन या विवेकनिष्ठ शिक्षण प्रक्रियेतून विद्यार्थ्यास आपल्या विवेकनिष्ठ विचारसरणीचा उपयोग आपली ध्येये साकारण्यासाठी करता येईल.



महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आ.पा.खरात,प्राध्यापक व शिक्षकेत्तर सेवक




विद्यार्थी सत्कार प्रसंगी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य एस.ए.अनारसे व इतर मान्यवर

# ज्ञानरचनावादी शिक्षणासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण

**डॉ.नीलिमा सप्रे**
माजी सहायक प्राध्यापिका
शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

अध्यापक शिक्षण विद्यालय / महाविद्यालय येथील दोन प्रसंग.जरा विचार करुया.

**प्रसंग १:**

प्राचार्य – यंदा ज्ञानरचनावादानुसार पाठ हे कृतिसत्र घ्यायचे राहिले आहे ना?

प्राध्यापक – हो. आता पुढील आठवड्यात लावले आहे. मागील वर्षाचे शेड्युल तयारच आहे. तसेच घेऊ. सैध्दांतिक भागाची व्याख्याने आणि त्यासाठी ३० मिनिटांचे पाठ.

प्राचार्य – काही बदल करायला हवा का?

प्राध्यापक – तसं गरजेचं वाटत नाही.

याप्रमाणे कृतीसत्र घेतले जाते. अध्यापकांकडे मागील वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांच्या फाईल्स असतातच. Simulation मध्येच पाठ घेतले जातात. प्रात्यक्षिक पूर्ण!

**प्रसंग २ :**

महाविद्यालयामध्ये ज्ञानरचनावाद या विषयावर व्याख्यान देण्यासाठी तज्ज्ञांना आमंत्रित केलेले आहे. त्यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आणि पाठाचे दिग्दर्शन झाले. त्यांच्याबरोबर तेथील प्राध्यापकांची चर्चा.

प्राध्यापक १ – आपण खूपच मौलिक मार्गदर्शन केले. पाठही छान. असेच format करायचे ना सगळ्या विषयांसाठी?

प्राध्यापक २ – हो, छात्राध्यपकांना एखादा नमुना समोर असेल की Plan काढणं सोपं जातं. एखादा format पाहिजेच.

तज्ज्ञ – अहो, असा एकसारखा format सगळ्याच पाठांसाठी कसा चालेल?

प्राध्यापक ३– पण साहेब, आता ज्ञानरचनावाद अभ्यासक्रमातून काढला ना? तर मग कशाला हा नसता उपद्व्याप!

एक शिक्षक प्रशिक्षक या नात्याने असे प्रसंग खूप वेळा अनुभवावे लागतात. या प्रसंगाचे वाचन केल्यानंतर काही प्रश्न तयार झाले का तुमच्या मनात? माझ्या डोक्यात तर प्रश्नांची मालिकाच तयार झाली. बघा तुमचेही प्रश्न माझ्या प्रश्नांशी जुळतात का?

- केवळ शासनाने जाहीर केला तरच अभ्यासक्रम ज्ञानरचना आधारित असतो का?
- शिक्षक शिकवतात आणि विद्यार्थी शिकतात, म्हणजे नेमकी प्रक्रिया कशी घडते?
- केवळ माहिती देणे, पाठ्यक्रम संपवणे म्हणजे शिकलो आणि प्रश्नांची उत्तरे लिहिणे म्हणजे शिकणे का?
- शिकताना वेगवेगळ्या बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक कौशल्यांचा विकास होणे गरजेचे आहे. कोणतेही कौशल्य आत्मसात करण्याचा आराखडा मेंदूमध्ये कसा तयार होतो. ज्ञानरचना म्हणजे हेच जाणून घेणे का?
- सर्व विषयांच्या, नव्हे तर एकाच विषयातील वेगवेगळ्या पाठ्यघटकांच्या ज्ञानरचना

एकसारख्या कशा असतील ?

- ❖ प्रत्येक विद्यार्थी वेगवेगळी ज्ञानरचना करणार हे सत्य स्विकाराचे की, सब घोडे बारा टक्के या न्यायाने एकाच छापाचे विद्यार्थी शिक्षणानंतर तयार करायचे ?
- ❖ ज्ञानरचना निर्मिती ही निष्पती की प्रक्रिया ?
- ❖ ज्ञानरचना निर्मितीसाठी नेमकी कोणकोणती कौशल्ये आवश्यक आहेत ?
- ❖ या कौशल्याविकसनासाठी अध्यापन नियोजन कसे असावे ? Lesson Plan चा पंचपदीसारखा एकच format पुरेसा आहे का ?
- ❖ ज्ञानरचना निर्मिती ही यांत्रिक प्रक्रिया आहे का ?

छे ! विचार करु तेवढी ही यादी वाढतच चालली आहे. तुम्हालाही पटले ना? मग आता या प्रश्नांना आपल्यालाच उत्तरे द्यावी लागतील. या उत्तरांमधून आपल्याला मिळेल सक्षमीकरणाचा मार्ग !

प्रथमत: ज्ञानरचना निर्मितीसाठी कोणत्या गोष्टी कराव्या लागतात याचा परिचय करुन घेऊ.

**ज्ञानरचनानिर्मितीसाठी आवश्यक कृती :**

- ❖ आशयामधील ज्ञानरचनांचा शोध
- ❖ ज्ञानरचना परिचयासाठी अध्यन अनुभवांचा शोध आणि निश्चिती
- ❖ आवश्यक पूर्वज्ञानाची निश्चिती व जागृती
- ❖ योग्य व पूरक अध्ययन वातावरण निर्मिती
- ❖ आवश्यक अध्ययन कौशल्य निश्चिती
- ❖ ज्ञानरचना निर्मिती कार्यक्रम अंमलबजावणी
- ❖ ज्ञानरचना पडताळणी

या कृतींसाठी अध्यापन प्रशिक्षणामध्ये अमूलाग्र बदल करावे लागतील. प्रशिक्षणाचा आराखडा पुढीलप्रमाणे आयोजित करता येईल.

**ज्ञानरचना आधारित अध्यापन प्रशिक्षण आराखडा :**

गेली कित्येक वर्षे शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमामधून अध्यापनाचे प्रशिक्षण छात्राध्यपकांना दिले जाते. मात्र त्यामध्ये काळानुसार,अध्ययन संकल्पनेनुसार आणि विद्यार्थ्यांच्या तसेच समाजाच्या बदलत्या गरजांनुसार जे बदल होणे गरजेचे होते ते झालेले नाहीत. हे संशोधनामधून दिसून येते. त्यामुळे या प्रशिक्षणामागील कोणकोणती गृहीतकेच बदलली आहेत, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. १९८० नंतर मानवी मेंदूतली रचना व कार्ये या क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात संशोधने झाली. ती वैद्यकीय क्षेत्रात झाली असली तरी त्याचा प्रभाव शिक्षणक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाला. त्यामुळे ही बदलेली गृहीतके शिक्षक  शिक्षणाने विचारात घेणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष आराखड्यापूर्वी ही गृहीतके पाहू.

**अध्यापन प्रशिक्षणासंदर्भात बदलेली गृहीतके:**

१. शिक्षकाने शिकविले तरच विद्यार्थी शिकतो या गृहीतकाप्रमाणे शिकविणे ही पक्रिया शिकण्यापेक्षा महत्वाची मानली जात होती. मात्र आता हे सिध्द झाले आहे की, शिकणे नैसर्गिक असते. शिकणे म्हणजे केवळ दृश्य वर्तन बदल नसून त्यामागे मेंदूमध्ये घडणारी विचारप्रक्रिया, माहिती प्रक्रिया, मेंदूमध्ये घडणाऱ्या विविध रासायनिक प्रक्रिया महत्वाच्या असतात. शिकणे शिकवण्यापेक्षा जास्त महत्वाचे असते. त्यामुळे शिक्षणात विद्यार्थ्यांची मनोशारीरिक तयारी जास्त महत्वाची आहे.

२. शिकवण्यासाठी बौद्धिक/बोधात्मक तयारी बरोबरच भावनिक तयारी (Emotional Readiness)खूप गरजेची असते. त्यासाठी शिकविणारा शिक्षक आणि शिकणारा विद्यार्थी या दोघांमधील नाते मित्रत्वाचे, विश्वासाचे व आधाराचे असावे लागते. यादृष्टीने बोलणे, वागणे, कृती करणे यासारख्या संप्रेषणाच्या कृतीमध्ये अमूलाग्र बदल करावा लागतो. विद्यार्थ्याला शिकवण्याला प्रेरित करणे गरजेचे आहे.

३. एकदा शिकायला प्रेरित केल्यानंतर त्याचा शिकण्याचा उत्साह टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी कुतूहल, उत्सुकता, जिज्ञासा, आव्हानात्मक प्रश्नांना भिडण्याची वृत्ती यांना सातत्याने चालना देणे आवश्यक आहे.

४. वर्गामध्ये विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्ययन वातावरण

निर्मिती करणे, हे शिक्षकाचे काम आहे. त्यासाठी आवश्यक अध्ययन कार्यनीती (Learning tasks), उच्च दर्जाचे प्रश्न, परस्परांमधील आंतरक्रिया कशा आयोजित करता येतील, हे पहावे.

५. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे, हे शिक्षकाचे काम नाही कारण डिजीटल टेक्नॉलॉजीमुळे माहितीचे आगणित स्त्रोत सर्वांनाच उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना या माहितीवर प्रक्रिया कशी करायची यासाठी मार्गदर्शन करणे महत्वाचे असते.

६. मूल्यमापन करताना विद्यार्थ्याने तयार केलेल्या ज्ञानरचना तपासणे महत्वाचे असते. ज्ञानरचना (knowledge structures) बरोबर,चूक असत नाही. त्याने केलेली रचना त्याच्यादृष्टीने योग्यच असते.

आता आपण प्रत्यक्ष प्रशिक्षण आराखड्याकडे वळूया. प्रशिक्षणासाठी खालील टप्प्यांचा वापर करावा लागेल.

**टप्पा – १ पूर्वतयारी ।** – यामध्ये संबंधित विषयाचा अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करावा, अशी अपेक्षा आहे. यासाठी छात्राध्यापकांनी पदवीचा मुख्य विषय, पहिली अध्यापन पध्दती निवडावी. गटकार्य, गृहकार्य या आधारे हा टप्पा पूर्ण करता येईल. यामध्ये खालील कृती कराव्यात.

१. अभ्यासक्रम – अकलन युक्त वाचन– ध्येये, उद्दिष्टे,
वाचन–चर्चा– वर्ग आणि वर्गबाह्य कृती–वाचन,चर्चा

२. पाठ्यक्रम – वरील सर्व कृती

३. पाठ्यपुस्तके – सर्व इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे वाचन – इयत्तावर पाठ्यघटक आणि आशय यांच्या क्रमबद्धतेचा, रचनेचा अभ्यास व चर्चा– पाठ्यपुस्तकातील घटकांच्या स्वाध्यायांची पाहणी व चर्चा.

या कृती एका अध्यापन पद्धतीच्या विद्यार्थ्यांचे गट करुन गटकाम, चर्चा आणि ग्रहकार्य या पद्धतीने पूर्ण करता येईल.

**टप्पा – २ ज्ञानरचना निश्चिती प्रशिक्षण**

–पाठ्यपुस्तकातील सूक्ष्म सखोल अभ्यासासाठीचे घटक शोधणे, मार्गदर्शन चर्चा

–पाठ्यांशातील संबोध/संकल्पना शोधणे – लहान गट कार्य– पाठ्यांशामधील थीम/तपशील शोधणे – लहान गट कार्य– संबोध/थीम या आधारे ज्ञानरचनांची निश्चिती करणारे गटकार्य.

**टप्पा – ३ पूर्वतयारी ॥– अध्ययन वातावरण निर्मिती प्रशिक्षण**

१. अध्ययन वातावरण Learning Environment
संकल्पना, घटक,व्याख्या – काही नमुन्यांचे दिग्दर्शन
चर्चा– गृहकार्य

२. अध्ययन कार्य – Learning Tasks – व्याख्यान
– निर्मिती कृती – चर्चा– गृहकार्य

३. माहिती स्त्रोत – Information Resources –
प्रकार,निवड– दिग्दर्शनपर व्याख्यान– कृती–गृहकार्य

४.वर्गकृती –Engagement Activities –चर्चा
दिशांकित,विद्यार्थी शोधात्मक– प्रश्न निर्मिती–
उच्चस्तरीय,विचार प्रवर्तक प्रश्न– गटकार्य,गृहकार्य

५. मूल्यमापन प्रक्रिया – Evaluation साधने निर्मिती

**टप्पा ४ – प्रत्यक्ष नियोजन प्रशिक्षण**

१. ज्ञानरचना निश्चिती

२.प्रत्येक ज्ञानरचनेसाठीचे नियोजन –

**अ.आवश्यक पूर्वज्ञान निश्चिती**

– पूर्वज्ञानाची सांगड नवीन आशयाशी घालणे

–यासाठी आवश्यक माहिती स्त्रोतांचे नियोजन,
आवश्यक कृतींचे नियोजन, पूर्वज्ञान रचना पडताळणी

**ब.प्रत्येक ज्ञानरचने नंतर सर्व ज्ञानरचनांनुसार या पायऱ्या पुन:पुन्हा वापरणे.**

ज्ञानरचना १– अध्ययन–अध्यापन कृतींचे नियोजन, आशय सुलभीकरण, आवश्यक माहिती स्त्रोत नियोजन, अध्ययन कृती, वैयक्तिक, लहानगट, मोठा गट, कृती नियोजन, चर्चा, नियोजन, ज्ञानरचना पडताळणी

३. साकारिक मूल्यमापन नियोजन

**टप्पा ५ – प्रत्यक्ष अध्यापन प्रशिक्षण – पूर्वज्ञान जागृती– अध्ययन अध्यापन**

परंपरागत अध्यापन प्रशिक्षणापेक्षा हे प्रशिक्षण थोडे कटकटीचे व क्लीष्ट वाटेल. पण शिक्षक सक्षमीकरणासाठी छात्राध्यापकांनी एवढा त्रास घेणे आवश्यक आहे. आता यामधून आपल्याला सुरुवातीला उपस्थित केलेल्या काही प्रश्नांची उत्तरे नक्की मिळतील. ज्ञानरचना विषय आणि त्यातील समाविष्ट आशय यावर अवलंबून असतात. त्याप्रमाणे स्त्रोत, कृती,प्रश्न सगळेच बदलेल. म्हणून या पाठनियोजनातही विविधता आहे. काही भाग अध्यापन पद्धतीप्रमाणे, काही भाग प्रतिमानांप्रमाणे तर काही तंत्राप्रमाणे बदलणार ही लवचिकता लक्षात घ्यावी, एकच एक साचा बनवू नये.

या पद्धतीने अभ्यासक्रम कसा संपेल, हा शिक्षकांचा नेहमीचा प्रश्न यालाही उत्तर द्यावे लागेल. मुळात प्रत्येक इयत्तेत प्रत्येक विषयात प्रत्येक धडा, घटक यापद्धतीने शिकवायचाच नाही. प्रत्येक विषयात काही घटक केवळ माहितीसाठी स्थूल अभ्यासासाठी असतात. यामध्ये ज्ञानरचनांची सखोल निर्मिती आवश्यक नसते. असे घटक फक्त त्याच इयत्तापुरते असतात. याउलट काही घटक समकेंद्री पद्धतीने मांडलेले असतात. पुढील इयत्तांच्या अभ्यासासाठी या ज्ञानरचना अचूक अणि पक्क्या होणे आवश्यक असते. अशा घटकांपैकी एक किंवा दोन घटक निवडून इतके सविस्तर आणि सखोल प्रशिक्षण शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिले तर या प्रकारच्या अध्ययनासाठी लागणाऱ्या सवयी व कौशल्ये यांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास होतो. पुढील कृती विद्यार्थी उत्साहाने करतात.

हे पूर्णत: विद्यार्थीकेंद्रित अध्ययन–अध्यापन असले पाहिजे. आपल्या समोरच्या विद्यार्थ्यांच्या विविध क्षमता प्रत्येक विद्यार्थी शिक्षकाला ओळखता आल्या पाहिजेत. त्याच्या विविध क्षमता, पूर्वज्ञान, अभ्याससवयी, गटकाम करण्याची वृत्ती शिक्षकाला कळली पाहिजे. त्यासाठी शिक्षक विद्यार्थी संवाद, जवळीक निरोगी आणि विश्वासार्हता असावी लागते.

या डिजिटल युगामध्ये समाज विशेषत: नवीन येणारा विद्यार्थी फारच वेगाने बदलतोय. त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, पालकांचा शिक्षणामधील सहभाग, उपलब्ध माहितीचे स्त्रोत, डिजिटल कौशल्ये यामध्ये विलक्षण बदल आहे. शिक्षकांपेक्षा डिजिटल तंत्रज्ञानामध्ये विद्यार्थी प्रगत आहे. समाजातील विद्यार्थी आणि परंपरागत शिक्षक यामधील अंतर वाढत आहे. म्हणूनच शिक्षकाचे सक्षमीकरण ही काळाची गरज आहे.

# शिक्षण समाजाभिमुख कसे करता येईल?

**डॉ. वंदना शिवाजीराव नलवडे**
प्राचार्या, आझाद कॉलेज
ऑफ एज्युकेशन,सातारा

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाचा विकास चांगल्या पद्धतीने करायचा असेल तर त्या देशातील शिक्षण प्रक्रिया चांगली असणे गरजेचे असते. शिक्षण प्रक्रिया जर चांगली असेल तर देशाचा विकास गतीने करता येतो. समाजाचा विकास चांगला करता येतो. राष्ट्राचा विकास हा समाजाच्या विकासावर अवलंबून असतो. सदर लेखामध्ये शिक्षण समाजाभिमुख कसे करता येईल? यावरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**शिक्षणातून सामाजिक समस्या सोडविण्याची ताकद निर्माण व्हावी :**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये समस्या असतात, तसेच समाजात सुध्दा काही समस्या असतात. समस्या विरहित समाजाचा आपण सध्या विचार सुद्धा करु शकत नाही. समाजामध्ये अस्पृश्यता, जातीयवाद, धार्मिकवाद, अंधश्रद्धा,निरक्षरता,हुंडाबळी, लोकसंख्यावाढ,बेकारी,दारिद्र्य या सामाजिक समस्या आहेत. या समस्या सोडविण्याची ताकद शिक्षणाच्या माध्यमातून ज्यावेळेस निर्माण होईल, त्यावेळेस शिक्षण समाजाभिमुख झाले असे म्हणता येईल.

**माणसाला माणूस म्हणून घडवणं हा शिक्षणाचा मुख्य हेतू असावा :**

शिक्षणाचा हेतू माणसाला माणूस म्हणून घडवणं हा आहे. त्याला जीवनासाठी घडवणं, त्याच्या मनाची मशागत करणं हा आहे. शिक्षणाचं उद्दिष्ट आहे असा माणूस घडवणं जो संवेदनशील आहे, जिज्ञासू आहे, ज्याला योग्य प्रश्न पडतात आणि ते विचारण्याचं धाडस त्याच्यामध्ये आहे. असा माणूस की ज्याच्यामध्ये स्वावलंबी होण्याचं ज्ञान, कसब आणि कौशल्य तर आहेच पण आपल्याबरोबर आपल्या परिवाराची, आपल्या समाजाची काळजी करण्याचं सामर्थ्यही त्याच्यात आहे. असा माणूस जो चांगला नागरिक आहे, सामाजिक प्रक्रियांमध्ये जो सहभागी होतो. माणसाला सर्वांगीण प्रगतीच्या वाटेनं नेण्याचं, शहाणं करण्याचा अणि व्यापक विचार करायला लावण्याचं काम शिक्षण करतं.शिक्षण माणसाच्या बौद्धिक, वैचारिक, सामाजिक, अध्यात्मिक, भावात्मक, सृजनशील क्षमता विकसित करतं. शिक्षण ही अशी गोष्ट आहे जी माणसाला पुढे नेते. शिक्षण माणसाच्या मनात प्रश्न निर्माण करतं. शिक्षण माणसाला जगाकडे कसं पहायचं ह्याची दृष्टी देतं. हे जग कसं हवं हे समजण्याची आणि त्याची कल्पना करण्याची ताकद शिक्षण घेतं. एकंदरितच जगण्याला भिडण्याची, वास्तवाला सामोरं जाण्याची ऊर्जा शिक्षण देतं. चहूबाजूनी माणसाला घडवतं, त्याला पैलू पाडतं.

**समाजातील विविध घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून न्याय मिळाला पाहिजे :**

आपल्या भारत देशामध्ये अनेक जाती-धर्माचे लोक राहतात. भारतीय राज्यघटनेनुसार जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळणे हा त्याचा मूलभूत हक्कच आहे. समाजातील प्रत्येक घटकाला त्याच्या क्षमता व गरजेनुसार शिक्षण हे मिळालेच पाहिजे.

आपल्या राज्यघटनेत सार्वत्रिक व मोफत शिक्षणाचे तत्व आहे; परंतु हा हक्क आजही प्रत्येक व्यक्तीला प्राप्त झालेला नाही. समाजातील उपेक्षित, असंघटित, दलित, आदिवासी, शेतकरी, कामगार या घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून न्याय मिळाला पाहिजे; परंतु या घटकांना न्याय मिळताना दिसत नाही. या सर्व घटकांना ज्यावेळेस शिक्षणाच्या माध्यमातून न्याय मिळेल त्यावेळेस खऱ्या अर्थाने शिक्षण समाजाभिमुख झाले असे म्हणता येईल.

**अन्याय,अत्याचार आणि चुकीच्या धोरणांना शिक्षणाने वाचा फोडली पाहिजे :**

समाजातील पिढ्यान पिढ्या काही लोकांच्यावरती अन्याय आणि अत्याचार होत आला आहे. समाजातीलच काही घटक वर्षानुवर्षे त्यांच्यावरती अन्याय आणि अत्याचार करीत असतात. अन्याय, अत्याचार या समाजामध्ये ज्या चुकीच्या गोष्टी राबविल्या जाताहेत त्या गोष्टींना प्रखरपणे विरोध शिक्षणाच्या माध्यमातून केला पाहिजे.

**शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शिक्षणातून दिली गेली पाहिजे :**

समाजातील निराधार, वृध्द व्यक्ती, अंध, अपंग, शारीरिक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती, निराधार विधवा, परित्यक्ता, देवदासी महिला, अनाथ बालके इत्यादींचे जीवनमान सुसह्य करण्यासाठी त्यांना विविध योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनामार्फत मासिक अर्थसहाय्य देण्यात येते. यापैकी काही योजना स्वतंत्रपणे राज्य शासनामार्फत राबविण्यात येतात; तर काही योजना केंद्र शासनामार्फत राबविण्यात येतात. काही योजना केंद्र आणि राज्य शासन यांच्याकडून संयुक्तरित्या राबविण्यात येतात. या योजनांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत, समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत शिक्षणाच्या माध्यमातून पोहोचवली पाहिजे.

**राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणारे उपक्रम शिक्षणाच्या माध्यमातून राबविले पाहिजेत :**

भारतामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात. प्रत्येक जाती धर्मातील लोकांच्या चाली,रीती,परंपरेमध्ये विविधता असली तरी सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्रित राहतात. आपापल्या धर्मातील सण-उत्सव साजरे करतात. राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून विविध संस्कृतीचे दर्शन घडविणारे, विविध धार्मिक परंपरेचे, सण-उत्सवाचे दर्शन घडविणारे सांस्कृतिक परंपरा जोपासणारे उपक्रम राबविले पाहिजेत. आपले राष्ट्र,राष्ट्राचा इतिहास, राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रीय प्रतीके याबाबत लोकांमध्ये प्रेम निर्माण करणारे विविध उपक्रम शिक्षणाच्या माध्यमातून राबविले पाहिजेत.

**सुजाण नागरिकत्वाची निर्मिती शिक्षणाच्या माध्यमातून झाली पाहिजे :**

भारतीय राज्य घटनेनुसार प्रत्येक नागरिकाला अनेक हक्क आणि अधिकार दिलेले आहेत. त्याचबरोबर भारतीय नागरिकाने कोणती कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याचाही उल्लेख केला आहे. परंतु दुर्दैवाने आपण हक्क आणि अधिकाराबाबत जेवढे जागरुक असतो तेवढे कर्तव्याच्या बाबतीत जागरुक नसतो. समाजातील जे कायदे आहेत, नीतिनियम आहेत ते पाळणे कायद्यानेच बंधनकारक असते, आणि इतरांच्या अधिकारांचे भान रहावे अशा प्रकारे लोक वागतील आणि इतरांना प्रतिष्ठेने वागवतील याचीही तजवीज कायदयाने केलेली असतेच. अनेक वेळा सामाजिक नीतिनियमांचे कायदयांमध्ये रुपांतर करुन तो प्रश्नही सोडवला जातो; पण समाजाचे नीतिनियम जर कायद्यात लिहिलेले नसतील तर आणि असले तरीही, ते नीतिनियम अयोग्य आहेत म्हणून झुगारुन दिले जाण्याचे प्रसंग घडतात. अशा वेळी सामाजिक नीतिनियम आणि व्यक्तीचा विशेषाधिकार यांच्यात संघर्ष उभा राहतो. म्हणून समाजातील प्रत्येक नागरिकाने सुजाण नागरिकत्वाची जबाबदारी पार पाडली पाहिजे. समाजाने ठरवून दिलेले नीतिनियम व आचारसंहितेचे पालन आपल्याकडून काटेकोरपणे होईल याची दक्षता घेतली पाहिजे.

**शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक संघटनाचे काम झाले पाहिजे :**

विघटनापासून सामाजिक समस्यांची निर्मिती होते.

सामाजिक संघटन समाजातील सरलता टिकवून ठेवीत असले तरी नेहमी तसेच चालू राहते असे नाही. समाजातील प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून भिन्न असते. तिच्या आवडी निवडी भिन्न असतात; सार्वजनिक नियमांचे पालन करण्याची वृत्ती भिन्न असते. यामुळे मतभेद होऊन संघर्ष उद्भवतो आणि फाटाफूट वाढत जाते. माणसे परस्परविरोधी वर्तन करतात. त्यामुळे हितसंबंध बिघडतात. हेवेदावे, भांडणे, कटकारस्थाने सुरु होतात. संघटन मोडते, ऐक्याला धोका निर्माण होतो आणि समाजात अशांतता निर्माण होते. मतभेद ताणले जाऊन समूहांमध्ये भेदभाव निर्माण होतात, त्याला सामाजिक विघटन म्हणतात.

सामाजिक विघटनामुळे समाजाचे नुकसान होते. संघर्षात हिंसा,आक्रमण, क्रूरता अशा समाज विघातक कृती व वर्तनांचा अवलंब केला जातो. कुटुंब,नातेवाईक,शेजारी, गाव या साऱ्या समूहांचे अतोनात नुकसान होते. म्हणून संघटन समाजव्यवस्थेला, समाज विकासाला उपकारक असते. उदा. राजकीय संघटना, कामगार संघटना, विदयार्थी व शिक्षक संघटना इत्यादी. त्या अन्याय झाल्यास वाचा फोडतात. धार्मिक क्षेत्रातही मंदिरे, उत्सव आणि सामुदायिक प्रार्थना इ. मार्गांनी लोक संघटित होतात आणि त्या क्षेत्राचे अध:पतन रोखले जाते. समाजनिर्मिती, समाजसंगोपन आणि समाज-प्रवृत्ती या सर्वांसाठी एका समान सूत्रानुसार संघटना निर्माण होतात आणि वाढतात. ती गरज संपली की, संघटना विघटित होतात आणि त्यांच्या जागी नव्या संघटना उदयास येऊन त्या काळाची व परिस्थितीची गरज भागवितात. सामाजिक संघटन-सहकार्य-समन्वय आणि परस्परालंबन हे सर्व मानवी व्यवहार आहेत आणि त्यामुळेच मानवी समाज संघटित राहून विकसनशील रहातो. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक संघटनांचे काम झाले पाहिजे.

**शिक्षणाने सामाजिक विकासाचा विचार झाला पाहिजे:**

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे. शिक्षणामुळे समाजात शांतीयुक्त क्रांती निर्माण होते. आजच्या प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल घडला पाहिजे, याविषयी सर्वांचेच एकमत आहे. हे परिवर्तन घडत असताना भारताचा धार्मिक व सांस्कृतिक वारसा, इतिहास, ज्ञान-परंपरा यांच्या बरोबरीनेच आधुनिक जगातील वैज्ञानिक प्रगती आणि भविष्यकाळाची आव्हाने यांचाही समग्रतेने विचार होण्याची आवश्यकता आहे. केवळ एकांगी विज्ञान शिक्षण देऊन शिक्षणाचे काम संपत नाही व तशा प्रकारच्या शिक्षणामुळे राष्ट्राचे पुनर्निर्माणही होत नाही. हे गेल्या काही वर्षातील शैक्षणिक इतिहासातून आपण शिकलो आहोत. शिक्षणाला अध्यात्माची साथसंगत हवी हे अधोरेखित झाले आहे. केवळ विज्ञान शिक्षणामुळे वैज्ञानिक अंधश्रद्धा वाढते. त्यामुळे माणूस भौतिक सुखाच्या व चैनीच्या मागे लागतो. तो सुखलोलुप बनतो. तो आपल्या गावापासून दूर शहरात किंवा अन्य देशांत स्थलांतरित होतो. त्याला आपल्याच देशातील पूर्वापार परंपरा, चालीरिती याविषयी घृणा वाटू लागते. म्हणून विद्यार्थ्याला त्याच्या परिसराशी जोडणाऱ्या, जोडून ठेवणाऱ्या सामाजिक बांधीलकीचे भाव जपणाऱ्या शिक्षणाची गरज आहे.

**जीवनाभिमुख शिक्षण देण्याची गरज :**

माणसाच्या जीवनात अनेकविध समस्या भेडसावतात. त्यांना तोंड देत जगणे अपरिहार्य असते. अगदी गुहेत राहणाऱ्या माणसालासुद्धा अन्न, वस्त्र,निवारा, संरक्षण यासाठी धडपडावे लागते. आजही बहुतांश मानवजात त्याच गोष्टींभोवती फिरत आहे. यासाठी शिक्षणाची व्यवस्था पहिल्या बुद्धिमान मानवी सभ्यतेने केली. शिक्षण अर्थातच सुरुवातीला संरक्षण केंद्रित असणार, त्यानंतर त्याचे ध्येय असेल शिकार. पुढच्या सभ्यता एक पाऊल पुढे जाऊन शेतीकडे गेल्या असणार. आजही खरे जीवनाभिमुख शिक्षण बहुंशी त्यावरच केंद्रित असणे अपेक्षित आहे. कारण या समस्या मूलत: बदललेल्या नाहीत. जीवनाश्यक बाबी मिळवणे आणि पुढे जाऊन समाजाचा विचार करुन जगण्यासाठी जे शिक्षण माणसाला तयार करते तेच खरे जीवनाभिमुख शिक्षण होय. सध्या माणूस जरी आधुनिक झाला, सुशिक्षित झाला तरी आदिम अशा असुरी मानवी वृत्तीवर विजय प्राप्त करु शकला नाही. या सगळ्या आदिम आणि आधुनिक अशा समस्यांना तोंड देत, निसर्गाला तोंड

देत माणूस जगण्याचा प्रयत्न करतो आहे. यासाठी माणसाला तयार करु शकणारे ते जीवनाभिमुख शिक्षण देण्याची गरज आहे.

**समारोप :**

खऱ्या अर्थाने समाज हा केंद्रबिंदू मानून शिक्षणाची योजना तयार केली पाहिजे. समाजाचा विचार करुन जगण्यासाठी विचार करुन जगण्यासाठी जे शिक्षण माणसाला तयार करते ते जीवनाभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाशी नाळ जोडली पाहिजे. समाजातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातून केला पाहिजे. समाजात असणाऱ्या समस्या सोडविण्याची ताकद शिक्षणाच्या माध्यमातून ज्यावेळेस निर्माण होईल त्यावेळेस शिक्षण समाजाभिमुख झाले असे आपणास म्हणता येईल. चांगला नागरिक शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यावेळेस समाजातील लोकांच्यावर होणार अन्याय,अत्याचार बंद होईल, शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शिक्षणाच्या माध्यमातून लोकांच्यापर्यंत पोहोचेल, सुजाण नागरिकत्वाची निर्मिती शिक्षणाच्या माध्यमातून होईल त्यावेळेस शिक्षण समाजाभिमुख झाले असे आपणास म्हणता येईल.त्यासाठी शिक्षणाचे प्राध्यान्य बिंदू खालील प्रमाणे आसायला हवेत.

- ❖ प्रत्येक घटकासाठी सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी शिक्षण सहाय्यभूत झाले पाहिजे.
- ❖ आपल्या देशाची शिक्षण व्यवस्था आपल्या राष्ट्रीय मूल्यांशी जोडलेली असली पाहिजे.
- ❖ देशाच्या उद्दिष्टानुसार शैक्षणिक व्यवस्थेत बदल व्हायला हवेत.
- ❖ देशाची शिक्षणव्यवस्था आपल्या आजच्या आणि येणाऱ्या पिढ्यांचं भविष्य घडवणारी, भविष्यासाठी त्यांना तयार करणारी असावी.
- ❖ शिक्षण एकेविसाव्या शतकातील नव्या भारताचा पाया तयार करणारे असावे.
- ❖ शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना समाजातील समस्या सोडविण्याची कौशल्ये विकसित करण्यावर भर दयावा.
- ❖ शिक्षणाच्या माध्यमातून भारताला सक्षम बनवण्यासाठी विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचवण्यासाठी, भारताच्या नगरिकांना आणखी सक्षम करण्यासाठी आणि त्यांना येणाऱ्या अनेक संधींसाठी सज्ज बनवण्यासाठी शिक्षण सक्षम असावे.
- ❖ समाजातील जनसामान्यांच्या प्रश्नांचे प्रतिबिंब शिक्षणात पडले पाहिजे.

# शिक्षकाचे अध्यापनकार्य समृद्धी : एक चिंतन

प्रा.एस.जी.पुंड
माजी प्राध्यापक,स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

एखाद्या देशाचा विकास हा त्या देशातील विकसित मनुष्यबळावर अवलंबून असतो. आणि मनुष्य बळाचा विकास हा त्या देशातील शिक्षण प्रक्रियेवर अवलंबून असतो. यासंबंधी विविध शैक्षणिक आयोग आणि शैक्षणिक धोरणे यांचे विचार मननीय आहेत.

भारताचे भवितव्य वर्गावर्गातून आकार घेत आहे असे कोठारी आयोगाने (१९६४-६६) आपल्या अहवालात नमूद केले आहे. सदरचे काम प्रामुख्याने शिक्षक करीत असतात म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) च्या अहवालात शिक्षकाला शिक्षणप्रक्रियेत सर्वोच्च स्थान देण्यात आलेले आहे. या अहवालात असेही नमूद करण्यात आलेले आहे की, ''शिक्षण ही राष्ट्रविकासासाठी एकमेवाद्वितीय भांडवली गुंतवणूक आहे.''

**आयुष्यभर अध्ययन** हे शिक्षणाच्या प्रक्रियेने उराशी बाळगलेले उद्दिष्ट आहे, म्हणून शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाचे व्यक्तिमत्व, त्याचे अध्यापन व त्याचा विद्यार्थ्यांविषयीचा दृष्टिकोन याला अनन्यसाधारण महत्व आहे.

**अध्यापन एक सेवाभावी व्यवसाय :**

अध्यापन हा एक सेवाभावी व्यवसाय मानला जातो. या सेवाभावी व्यवसायाकडून समाज सातत्याने निरलस सेवेची अपेक्षा करतो. या व्यवसायाकडून अपेक्षित असलेल्या कर्तव्यांची अपेक्षा करीत असतानाच शिक्षकांनी काही चुका केल्यास समाज शिक्षकांना क्षमा करीत नाही. निम्न सामाजिक प्रतिष्ठा व अवहेलना यामुळे सर्वच शिक्षकांच्या जीवनात नैराश्याची छाया पसरते. नवीन काही करावी ह्याची प्रेरणा मिळत नाही. ऊर्मी, नवोपक्रमशीलता लयास जात आहे.

**शिक्षकाची विमनस्कता :**

वर्तमानस्थितीत समाजात शिक्षकांबद्दलचा आदरभाव मान्यता शिक्षकांना खरा वाटत नाही. काही शिक्षक मित्रांशी बोलतांना हे तीव्रतेने जाणवते.

शिक्षक मित्र खालील शब्द प्रयोग करताना आढळतात.

आम्ही काय करणार?-

१. सगळा समाजच भ्रष्ट झालाय?

२. आम्ही सांगून मुले थोडेच ऐकणार आहेत?

३. घरीदारी तर ती नको तेच पाहतात, आमचा तो काय प्रभाव पडणार!

४. परीक्षेत जे विचारतात तेवढेच मागतात मुले.

५. त्यांना मूल्ये-बिल्ये काहीही नको असते.

६. परीक्षा आणि गुण या दोनच गोष्टीवर सगळी शिक्षणव्यवस्था लक्ष ठेऊन आहे.

७. कॉपीला कोणीही शासन करीत नाही.

८. शाळेत शासन केले तर मुलांना सोडा म्हणून पालकच आग्रह धरतात.

९. शालांत परीक्षेच्या वेळी पाल्यांना कॉपी पुरविणारेही पालकच आहेत.

१०. वर्षानुवर्षे बे एके बे, रटाळ, त्याच त्या गोष्टी करत राहण्यात कसली आलीय शिल्पकराची, नित्यनूतन नवनिर्माणाची दृष्टी आणि कृतिशीलता हे सारे नुसते भाबडेपणाने स्वत:चा गौरव करीत राहून 'शिक्षकी पेशा फारच उदात्त' असे म्हणत खोट्या समाधानात रहायचे दुसरे काय?

वर्तमान शिक्षकाची वरीलप्रमाणे मानसिकता असेल तर अध्यापनकार्य कसे समृद्ध होणार? यासाठी अध्यापन कार्याचे प्रमुख पैलू समजावून घेणे गरजेचे आहे.

**अ. अध्यापनकार्याचे प्रमुख पैलू :**

१. शिक्षक ज्या विषयाचे अध्यापन करतो त्या विषयाचे त्याचे विषयज्ञान

२. अध्यापन परिणामकारक आणि रोचक व्हावे म्हणून शिक्षकाची अध्यापनक्षमता

३.वाचन,मनन आणि चिंतनातून शिक्षकाचा व्यापक होत जाणारा व्यावसायिक दृष्टिकोन

४.यशस्वी अध्यापक म्हणून शिक्षकाने संपादन करावयाची उपक्रमशीलता

याप्रमाणे अध्यापनकार्याचे पैलू शिक्षकाने आत्मसात

करणे गरजेचे आहे. सदरचे पैलू आत्मसात केलेले आहेत काय? यासाठी अध्यापकाने/शिक्षकाने खालील प्रश्न स्वत:ला विचारावेत.

१.विषयाचे अध्यापन करण्यापूर्वी त्या विषयाचे परिपूर्ण ज्ञान मला आहे का?

२.केवळ पाठ्यपुस्तकावर अवलंबून न राहता तदनुषंगिक अन्य पुस्तकांचे वाचन करुन नवे संदर्भ लक्षात घेतो / घेते का?

३. विषय अदयावत व गतिमान व्हावा म्हणून प्रयत्नशील असतो/असते का?

४. माझ्या अध्यापन विषयासंदर्भातील वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके यात वेळोवेळी येणारी नवीन माहिती जाणून घेतो/घेते का?

५. मोकळ्या तासिकेला माझ्या अध्यापन विषयाच्या संदर्भात शिक्षक मित्रां/मैत्रिणी समवेत चर्चा करतो/करते का?

६. अध्यापन विषयाच्या अध्यापनाच्या वेळी शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करतो/करते का?

८. अध्यापन करतांना कार्य कारणावर भर देतो/देते का? कशा रीतीने?

९. विद्यार्थ्यांना शंका विचारण्यास प्रवृत्त करतो/करते का?

१०.विद्यार्थ्यांना शंका विचारण्याची संधी देतो/देते का?

११.विद्यार्थ्यांच्या शंकांना समाधानकारक उत्तर देतो/देते का?

१२.विषयातील संज्ञा,संकल्पना,सिद्धांत,तत्वे,सूत्रे, गृहितके,खुणा,चिन्हे,प्रमेये,व्याख्या,नियम, यासंबधीचे वस्तुनिष्ठ ज्ञान माझ्याजवळ आहे का?

१३.स्वत:चे फलक लेखन सुवाच्च, सुबोध,कल्पक व शुद्धलेखनाच्या नियमाबरहुकूम आहे का?

१४.विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन व्हावे म्हणून अध्यापनपद्धती व तंत्रे, शैक्षणिक तंत्रज्ञान आत्मसात केलेले आहे का?

१५.सर्व अध्यापन पद्धती व तंत्रे यांचा अध्यापन करताना वापर करतो/करते का?

१६. तर्कशुद्ध, विमर्शी (Divergent) विचार करुन समस्या सोडविण्याच्या क्षमतेचा स्वत:मध्ये विकास केलेला आहे का?

१७.आपल्या कल्पना मोजक्या शब्दांत, मुद्देसूद व अर्थवाही स्वरुपात मांडण्याची स्वत:ला सवय आहे का? या स्वरुपात मांडू शकतो/शकते का?

१८.कोणत्याही घटकाचे अध्यापन करण्यासाठी काही 'पूर्वज्ञान' शिक्षकाजवळ असणे आवश्यक असते? ते माझ्याजवळ आहे का?

१९.ज्या पाठ्यघटकाचे अध्यापन मी करणार आहे, त्याचे मला आकलन झालेले आहे का?

२०.अध्यापन प्रसंगी विद्यार्थ्यांना विचारावयाचे प्रश्न यासंबंधी माझे पूर्व नियोजन आहे का?

२१.अध्यापन प्रसंगी मी विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय प्रश्न विचारतो/ विचारते का?

२२.पाठ्यांशातील संबोध, संकल्पना स्पष्टीकरणासाठी पूरकसंदर्भांचे पूर्व नियोजन आहे का?

२३. माझे अध्यापन विद्यार्थी केंद्री आहे की शिक्षककेंद्री याचा शोध घेतो / घेते का?

२४. माझे अध्यापन चैतन्यदायी, आनंददायी व विद्यार्थी कृतीला सकारात्मक चालना देणारे असते का?

२५.अध्यापन प्रसंगी माझा दृष्टिकोन वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक असतो का?

ही प्रश्नसूची शिक्षक त्याच्या चिंतन,मनन, दैनंदिन अनुभव,व्यासंग, आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षण यातून आणखी वाढवू शकतो व आपले अध्यापन कार्य अधिकाधिक समृद्ध करु शकतो/शकते. मात्र ही समृद्धता आणण्यासाठी शिक्षकाची स्वबदलाची मानसिकता असणे गरजेचे आहे.

**शिक्षकाची स्वबदलाची विचारप्रक्रिया व कृतीकार्यक्रमाचे महत्वाचे टप्पे :**

१. माझे वैयक्तिक प्रश्न, माझ्या सेवाक्षेत्रातील प्रश्न आणि समस्या सोडविण्याची जबाबदारी माझी आहे.हा मूल्यनिर्धार, हा स्वावलंबनाचा विचार अगतिकतेला व परावलंबनाला दूर करायला आवश्यक मनोबल निर्माण करतो.

२. प्रश्न आणि समस्या  निर्माण करणाऱ्या परिस्थितीच्या पृथ:करणातून जी कारणे स्वत:च्या आधीन आहेत, त्यांची यादी करणे.

३. यादीतील कारणांचा अग्रक्रम लावून नेमक्या कोणत्या कारणावर लक्ष केंद्रित करुन, कोणत्या कामाला सुरुवात करावयाची त्याचा निर्णय घेणे.

४. ते कारण दूर करण्याकरिता इतर ठिकाणी, इतरांनी काही प्रयत्न केले असतील तर त्याचा अभ्यास करणे व स्वत:च्या माहिती संचयाची आणि पुढील कृतीसाठीची ताकद वाढविणे.

५. स्वत: काय करणार हे स्वत:शी स्पष्ट करणे, काढणे त्यामध्ये प्रथम कोणती गोष्ट करायची, नंतर कोणती? असा कृतिक्रम निश्चित करणे.

६. प्रयत्नाला सुरुवात केल्या केल्या तात्काळ व हमखास यश मिळणारच असा विचार मनात न ठेवता प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे हा दृष्टिकोन आत्मसात करणे.

७. निर्धारित केलेली कृती पूर्ण झाली की त्याचा मागोवा घेऊन खालीलप्रमाणे कृतीचे पृथक्करण करणे.

❖ मला स्वत:त कोणते बदल करावे लागले?
❖ काय नवे शिकावे लागले?
❖ काय विसरावे लागले?
❖ कुठे आणि कोणकोणत्या अडचणी आल्या?
❖ आलेल्या अडचणींवर मात कशी केली?
❖ माझ्या मनोबलात काय फरक पडला?
❖ कधी निराश झालो/झाले का?
❖ कधी मनाला खिन्नता आली का?
❖ मुलांमध्ये कोणकोणत्या प्रकारचे बदल दिसले! हे बदल कोणत्या व किती मुलात दिसले?
❖ काही मुलांतच बदल का दिसले? इतर मुलात बदल का दिसले नाहीत?
❖ बहुसंख्य मुलात बदल घडवून आणू शकलो/शकले का?
❖ हा प्रयत्न करताना कोणकोणत्या नवनव्या कल्पना सुचल्या?
❖ या कल्पनांचा वापर केल्याने काय होईल? याचा विचार केला का?
❖ प्रश्नाचे उत्तर हाती लागेपर्यंत किती भिन्नभिन्न पर्याय वापरता येतात, त्याचे नवनवे आराखडे हाताशी येऊ लागलेत का?
❖ प्रश्नाचे उत्तर हाती लागण्यासाठी मी नव्याने काय करावे असे मला पहिल्या कृतीने दाखविले काय?
❖ नव्या कृतिकार्यक्रमासाठी माझ्याकडे पहिल्यापेक्षा कोणत्या वेगळ्या गोष्टी आहेत? ज्या आधी नव्हत्या किंवा होत्या पण मला समजल्या नव्हत्या?

**समारोप:**

प्रश्नांची,समस्यांची उत्तरे निर्धारपूर्वक कृतिकार्यक्रम योजून किंवा कृतिसंशोधन करुनच मिळविता येतात. याचा अनुभव आला की आत्मविश्वासपूर्वक वाटचालीची सुरुवात होते व ही वाटचाल स्वावलंबनाच्या निर्धाराने समृद्धीकडे सरकू लागते.

बदल हे चुटकीसरशी घडत नाहीत. त्याला काही वेळ लागतो. निर्धाराने कृतीची सुरुवात करणे व स्वत:मध्ये बदल घडवून आणणे हे खरे तर एक प्रकारचे स्वत:च स्वत:शी करावयाचे युद्ध आहे. या युद्धात यशस्वी होण्याकरिता आत्मविश्वासाने, स्वत:च काम करुन मार्ग शोधणे व अथकपणे उत्साहाने पुढे-पुढे जात राहणे हा सैनिकी बाणा सोडायचा नाही. हा स्वबदलासाठी स्वत:च स्वत:चे प्रश्न हातात घेऊन स्वत:ला सामर्थ्यशाली शिक्षक बनविण्याची आणि अध्यापनकार्य समृद्ध करण्याची कार्यशाळा सुरु करावयाची आहे.

**काकासाहेब वाळुंजकर**
सहा.विभागीय अधिकारी
रयत शिक्षण संस्था,
उत्तर विभाग, अहमदनगर

## एन.ई.पी.आणि शिक्षक शिक्षण

शैक्षणिक धारणे देशाच्या पिढ्यांना दिशा देणारे पथदर्शी नंदादीपच! देशाच्या सामाजिक सांस्कृतिक,भौगोलिक व राजकीय प्रतिमा शैक्षणिक धोरणात प्रतिबिंबित झाल्या असल्यातरी देशकाल परत्वे शैक्षणिक धोरणे तरुण पिढीला जागतिकीरणाशी सामना करताना उपयोगी ठरतात.

अता पर्यंत शिक्षण या घटकांचा विचार करणारे अनेक आयोग आले. समित्या,मंडळे व धोरणे आखली गेली; त्यानुसार बदल घडतही गेले. यातून समाजाच्या शैक्षणिक समस्यांचे निराकरण झाले व काही प्रश्नही नव्याने समोर आले. सन १९६४-१९६६ राष्ट्रीय शिक्षण आयोग स्थापन केला गेला तोच कोठारी कमिशन या नावाने सर्वपरिचित आहे. खरे तर हेच कमिशन आजही सर्व आयोगाचे मूळच समजावे लागेल. अगदी सन २०२० मध्ये आलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही कोठारी कमिशनचा धागा पकडून आलेले दिसून येते.

शैक्षणिक धोरण आखताना देश,समाज व भविष्यकालीन गरजा यांचा विचार केला जातो. पण कोणतेही धोरण आखताना तटस्थ व  वस्तुनिष्ठ विचार आणि परिस्थितीनुसार निर्माण होणारी आव्हाने यांचा विचार करणे अपेक्षित असते.

शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी करणारा सर्वात महत्वाचा व जबाबदार घटक म्हणजे शिक्षक! सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती किती चांगली, किती वाईट याहीपेक्षा या मूल्यमापन पध्दतीची कार्यवाही ज्या प्रकारे होणे गरजेचे होती त्याप्रमाणे न झाल्याने एका चांगल्या मूल्यमापन पध्दतीला आपण वाटाण्याच्या अक्षता दाखवल्यासारखे झाले. बालकाचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट  आहे. शिकणारा शारीरिक, मानसिक सामाजिक,शैक्षणिक व भावनिकदृष्ट्या सक्षम व्हावा व ते कार्य शिक्षकाच्या हाती व्यवस्थेने सोपवले आहे असे म्हणायला काही हरकत नाही.

परिवर्तन ही विकासाची, प्रगतीची नांदी आहे. केवळ पुस्तक शिकवणारा शिक्षक होण्यापेक्षा पुस्तकाबाहेर जाऊन शिकवणारा शिक्षक हवा. शिकविणाऱ्या शाळा तर सर्वच आहेत पण आज हवी आहे शिकणारी शाळा! शिक्षणातून सामाजिक न्याय,समता,स्वातंत्र्य साध्य व्हावे. आज जग छोटं झालंय! ज्ञान व माध्यमांचा एवढा भडिमार होतो आहे की आजचे ज्ञान काही दिवसात निर्माल्यवत होते आहे. संगणक चालू करण्यापूर्वी रिफ्रेश करावा लागतो. तद्वत शिक्षकाने आपल्यातला शिक्षक सतत रिफ्रेश करुन अपडेट केला पाहिजे. कारण शिक्षकच मूलभूत बदलांच्या केंद्रस्थानी असतो. शिक्षणं हा शिक्षकाचा स्थायीभाव असावा. शिक्षक प्रशिक्षणातून त्याने आपल्याला नेहमीच अद्ययावत ठेवले पाहिजे.

कधी कधी शिक्षणशास्त्राची पदवी घेऊन अनेक वर्षे लोटली तरी शिक्षक येणाऱ्या बदलांना स्वीकारत नसेल तर काय म्हणावे? लॉकडाऊन येईल व शाळाच कुलूपबंद  होतील ही कल्पना कुणीही स्वप्नात पाहिली नसेल. पण शाळा बंद शिक्षण चालू ही नवीन प्रणाली आम्हाला शिकावी लागली. ऑनलाईन तेव्हा बोटावर मोजणारेच होते;  पण ज्यांनी

काळानुरुप बदल स्वीकारला ते तरले. विद्यार्थ्यांपर्यंत गेले पण ज्यांना नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेता आले नाही ते यातून बाहेर पडले. उघड पडले.

नवीन शैक्षणिक धोरणात चार वर्षांचा एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम येत आहे. एकीकडे बी.एड. कॉलेजना घरघर लागली असताना चार वर्षे शिक्षण शास्त्र पदवीसाठी टाचा घासून ही उद्या नोकरीची हमी नसेल तर युवावर्ग याकडे पाठ फिरवणार आहे. यात व्यवसाय,कौशल्य,कला या विषयातील स्थानिक पातळीवरील अन्य व्यक्तींसाठी शिक्षणशास्त्राचे अल्प कालावधीचे अभ्यासक्रम असणार आहेत. व अध्यापन करण्यासाठी समाजातील स्वयंसेवकांनाही सहभागी करुन घेतले जाणार असेल तर ज्याने अध्यापनाचे कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेतलेले नाही तेच अध्यापन क्षेत्रात शिरकाव करीत असतील तर अध्यापक महाविद्यालयातून शिक्षण शास्त्राची पदवी घेणाऱ्यापुढे मोठे आव्हान असणार आहे. तरीही गुणवत्तेच्या आधारावर जे शिक्षक ही आव्हाने व समस्यांना लिलया समोरे जातील ते या प्रवाहात टिकतीलच! कारण तो मूलभूत बदलांच्या केंद्रस्थानी असणार आहे.

समुपदेशन व अध्ययन –अध्यापन यात फरक आहे. कारण विद्यार्थ्यांच्या अध्ययनासंबंधी,त्याच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करणारा,विषयाचा व्यासंग व अधिक ज्ञान असणारा हाच प्रशिक्षणातून तंत्रशुद्ध अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियांना सामोरे जाऊ शकतो.

नवीन बदलात बहुउद्देशीय विद्यापीठे येऊ घातली आहेत. यातून विद्याशाखांमधील दरी मिटवण्याचा एक प्रयत्न धोरणात केलेला आहे. आता विद्यार्थी एका शाखेतून दुसऱ्या शाखेत जाणे, किंवा दोन शाखेतील आपल्या आवडीचे विषय एका पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणासाठी निवडण्याची संधी फारच कमी प्रमाणात असेल शिक्षक शिक्षणातील आवश्यक त्या बदलांना स्वीकारुन पुढे जाणारा हवा, कारण उद्या नवनवीन तंत्रज्ञान,शैक्षणिक सॉफ्टवेअर,माध्यमातून होणारे बदल, शिकणारांची बदलती मानसिकता,पालकांच्या व समाजाच्या अपेक्षा याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. शिक्षक हा समाजाभियंता असेल तर मुळात त्याचा शैक्षणिक ज्ञानात्मक व तंत्रज्ञानाधारीत पाया भक्कम असावा लागणार आहे.

उद्या सांस्कृतिक अहंगड,वंचितांचे शिक्षण,अभिजनांचे शिक्षण,सामान्य व मध्यम वर्गीयांचे शिक्षण,शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षण हक्क कायद्याची दखल न घेणे अशी अनपेक्षित आव्हाने उद्याच्या शिक्षकासमोर येऊ घातली आहेत. खरे तर आव्हाने स्वीकारतो व त्यातून शिकून समर्थ होतो तोच शिक्षक !



वार्षिक स्नेह संमेलन : प्रमुख पाहुणे मा.राजा मंगळवेढेकर

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" – कर्मवीर

: स्थापना :
१६/०८/१९४०

|| सहकाराच्या दिपज्योती रयत सेवकांचे जीवन उजळती ||

पगारदार नोकरांच्या सहकारी बँकांमधील अग्रेसर बँक
रयत सेवकांच्या अडचणीचे वेळी सहकार्याचा हात सदैव पुढे करणारी
त्यांचे आशास्थान असणारी आपली बँक– रयत सेवक बँक
जिव्हाळ्याची बँक

**अमृत महोत्सवाची बँक**



संस्थापक
पद्मभूषण डॉ. कर्मवीर
भाऊराव पाटील– डी. लिट्

# दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि. सातारा

मुख्य कार्यालय– ४५५/२/२० फ पेठ, सदरबझार, सातारा–४१५००१
फोन नं. (०२१६२) २३१३१३, २३१३१४, २३१८३५, २३३३१५
Email ID: ho@rsbs.co.in | Website: www.rayatsevakbank.co.in

### दि. ३१/०३/२०२१ अखेरची बँकेची सांपत्तिक स्थिती

भाग भांडवल रु. ६१ कोटी ०४ लाख.
एकूण निधी रु. ७१ कोटी ४५ लाख.
ठेवी रु. १२७२ कोटी ८२ लाख.
कर्ज रु. ७८१ कोटी ५७ लाख.
गुंतवणूक रु. ६०० कोटी ४३ लाख

### –: शाखा विस्तार :–

औधगांव (पुणे), अहमदनगर, सांगली, पंढरपूर, कोपरगाव वाशी (नवी मुंबई) बारामती, विटा, सदरबझार (सातारा) कर्मवीर समाधी परिसर (सातारा) छ. शिवाजी कॉलेज परिसर (सातारा), दहिवडी, मंचर, श्रीरामपूर, कराड, कर्जत कोल्हार, आडगांव (नाशिक), लोणंद, हडपसर

### बँकेची ठळक वैशिष्ट्ये

१) सभासदांना सत्वर कर्ज पुरवठा २) विशेष घरबांधणी कर्ज नं. १,२,३/ घरतारण कर्ज योजना ३) सोनेतारण कर्ज योजना ४) जामिनकी कर्ज नं. १, २, ३,५ ५) वाहनतारण कर्ज योजना ६) शैक्षणिक कर्ज योजना ७) जुन्या गाड्यांना वाहनतारण कर्ज तसेच टेकओव्हर कर्ज ९) मयत सभासदांच्या वारसांस रु. १५ लाख आर्थिक मदत १०) बँकेच्या शाखांमध्ये सेफ डिपॉझिट व सोनेतारण ११) कर्मवीर आरोग्य संजीवनी योजना १२) रयत माऊली कोविड योजना सुविधा उपलब्ध.

**ठेवीवरील आकर्षक व्याजदर**

| ठेव प्रकार | व्याजदर (दसादशे) | बँकेच्या आकर्षक ठेव योजना |
|---|---|---|
| अ) चालू ठेव | ... | १) रयत बचत, शुभमंगल ठेव, पेन्शन ठेव योजना |
| ब) सेव्हिंग्ज ठेव | ३.००% | २) मुदत ठेव चक्रवाढ व्याज ठेव योजना |
| सुपर सेव्हिंग्ज ठेव | ५.००% | ३) कर्मवीर कॅश सर्टिफिकेट ठेव योजना |
| ३० दिवसासाठी पुनर्गुंतवणूक ठेव | ३.७५% | ४) लक्ष्मी धनवर्धिनी रिकरिंग ठेव योजना |
| ४६ दिवसासाठी पुनर्गुंतवणूक ठेव | ४.२५% | ५) रयत लखपती ठेव योजना |
| क) मुदत ठेव | | |
| १. ७ दिवस ते १४ दिवस | ३.७५% | |
| २. १५ दिवस ते ९० दिवस | ४.२५% | * ज्येष्ठ नागरिकांसाठी (६० वर्ष पूर्ण) १ वर्षाच्या पुढील साधी मुदत |
| ३. ९१ दिवस ते २७० दिवस | ४.५०% | ठेवीवर अर्धा टक्का जादा व्याजदर. |
| ४. २७१ दिवस ते १ वर्ष | ४.७५% | * रयत शिक्षण संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्त (५८ वर्षे पूर्ण) होणाऱ्या बँक |
| ५. १ वर्षाचे पुढे ते २ वर्षे पूर्ण | ५.००% | सभासदांना १ वर्षाच्या पुढील साधी मुदत ठेवीवर अर्धा टक्का जादा व्याजदर |
| ६. २ वर्षाचे पुढे | ५.२५% | * ठेवीचा रु. १००० कोटीवर टप्पा पूर्ण |
| | | * ठेवीचा विमा असल्याने ठेवीची सुरक्षितता |

### –: संचालक मंडळ :–

**श्री. जंबूकुमार आडमुठे**
चेअरमन

**सौ. निलीमा कदम**
व्हा. चेअरमन

**श्री. शिवाजी फडतरे**
जनरल मॅनेजर

प्रि.डॉ. विठ्ठल शिवणकर (एक्स ऑफिसिओ), श्री. पोपटराव पवार, श्री. लालासाहेब खलाटे, श्री. रामदास तांबे, श्री. विजयकुमार डुरे, श्री. अर्जुन मलगुंडे सौ. सुनिता वाबळे, श्री. बाबासाहेब शेख, श्री. प्रमोद कोळी, डॉ. श्री. विजय कुंभार, श्री. शहाजी मखरे, श्री. सुभाष पाटील, डॉ. श्री. बिरु राजगे



Rayat Shikshan Sanstha's



# Yashavantrao Chavan Institute Of Science Satara, (Autonomous)

**Reaccredited at the A+level with CGPA of 3.57**

**College with Potential for Excellence | Selected for FIST by DST | Selected for STAR COLLEGE SCHEME By DBT**
**ISO-9001:2015 Certified | Shalasiddhi - A Grade (Junior College)**



| Course | Subjects |
|---|---|
| JG : B. Sc. | **Principal Subjects:**<br>Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Electronics, Botany, Botnay-Plant Protection, Botany-Seed Technology, Zoology, Zoolgoy-Fisheries, Microbiology, Computer Science<br>**Interdisciplinary Subjects at B.Sc.II:**<br>Astrophysics, Fisheries, Plant-Protection, Biochemistry |
| JG : B. Sc. (Entire) | Biotechnology, Nanotechnology, Forenics Science, Animation Science, Food Processing & Packaging, Bachelor of Computer Science (BCS), B. Voc (Software Development) |
| PG : M. Sc. | Botany, Zoology, Chemistry, Microbiology, Physics, Mathematics, Statistics, Electronic, Biotechnology |
| Research M.Phill, Ph.D | Botany, Zoology, Chemistry, Microbiology, Physics, Electronic, Mathematics |
| Distance Mode | B.Sc. Facility Services., B. Lib & I.Sc & M.Lib & I.Sc.- Y.C.M.O.U. Nashik |

**डॉ. बी. टी. जाधव**
प्राचार्य



MAHASUPER HOUSING LOAN



MAHASUPER GOLD LOAN



MAHASUPER CAR LOAN



PERSONAL LOAN



AGRICULTURE LOAN



BUSINESS LOAN

आपकी बैंकिंग जरुरतों का साथी ..

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

अंचल प्रबंधक – बैंक ऑफ महाराष्ट्र अंचल कार्यालय, लालटाकी, अहमदनगर

गर्व से सहयोगी

Pradhan Mantri mudra Yojna

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

Azadi Ka Amrit Mahotsav

प्रधानमंत्री जन-धन योजना

प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना

www.bankofmaharashtra.in
Internet Banking : https://www.mahaconnect.in
Toll-Free No.: 1800-233-4526

TAKE SAFETY STEPS FOR COVID-19

Wear Mask and Hand Gloves | Sanitize Hand Frequently | Keep Social Distancing | Check Temperature | Don't Spit in Public Place



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" – कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे



# महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे

यु.जी.सी. मान्यताप्राप्त आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न NAAC पुनर्मानांकन : 'A' ग्रेड
कला, विज्ञान व वाणिज्य या तिनही शाखांनी समृद्ध

**DST-FIST College**
**सेडाचा उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार**

## ऑनलाईन प्रवेश सुविधा

**बी. ए.**
मराठी
हिंदी
इंग्रजी
इतिहास
भूगोल
अर्थशास्त्र
मानसशास्त्र

**बी. कॉम**
अकाउंटन्सी
कॉस्टिंग
बैंकिंग

**बी. एस्सी**
रसायन शास्त्र
पदार्थविज्ञान
सूक्ष्मजीवशास्त्र

**बीबीबए (सीए)**

**बी. व्होक. (मास कम्युनिकेशन)**

**एम. ए.**
मराठी
हिंदी
इतिहास
भूगोल
अर्थशास्त्र

**एम. कॉम**
कॉस्टिंग
बैंकिंग

**एम. एस्सी**
रसायन शास्त्र
भूगोल

- कोविड-१९ साथीच्या काळात सर्व वर्गाचे ऑनलाईन अध्यापन सुरु.
- पीएच.डी. सेट-नेट असा उच्च गुणवत्ताधारक व अनुभवी प्राध्यापकवर्ग
- विद्यार्थ्यांचा विकास हाच आमचा ध्यास त्यासाठी विविध योजना
- गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी- 'कमवा आणि शिका' योजना
- स्पर्धा परिक्षा व प्लेसमेंट संदर्भात विशेष मार्गदर्शन
- आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन
- विशेष शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी दत्तक पालक योजना, उद्योजकता व व्यक्तीमत्व विकास योजना
- विविध सांस्कृतिक उपक्रम, विद्यार्थिनी कल्याण योजना (महिला मंच उपक्रम)
- सामाजिक जाणिवेसाठी राष्ट्रीय सेवा योजना, रक्तदान, मागास खेडे दत्तक योजना व महिला मंच उपक्रम.
- विद्यार्थी-पालक-शिक्षक सुसंवाद- पालक मेळावे, माजी विद्यार्थी मेळावा, विद्यार्थी दत्तक योजना, नियतकालिक
- सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, विज्ञानयुगात भरारी मारण्याची संधी
- समुपदेशन केंद्राची सुविधा
- विज्ञान संशोधनासाठी सुसज्ज संशोधन प्रयोगशाळा
- इंग्रजीतून उत्तम संभाषण करण्याची/शिकण्याची संधी
- समृद्ध व संपूर्ण संगणकीकरण झालेले ग्रंथालय । नोंदणीकृत व सक्षम माजी विद्यार्थी संघटना
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांची निवड व पदक प्राप्त.
- प्रशस्त क्रीडांगण व विविध क्रीडा साहित्याने समृद्ध असा क्रीडा विभाग


## रोजगाराभिमुख ४८ शॉर्ट टर्म कोर्सेस

- फॅशन डिझायनिंग
- सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट
- पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट
- जर्नालिझम
- सेल्फ एम्पॉलयमेंट ॲण्ड ब्युटी केअर
- हर्बल कॉस्मेटीक्स
- सी.सी.टी.व्ही. इस्टॉलमेंट
- फोटोग्राफी
- उद्योजकता विकास
- डिजिटल मार्केटींग
- डिप्लोमा कोर्स इन फार्मास्युटिकल टेक्निक्स
- कॉम्प्युटराईज्ड अकाऊंट रायटींग
- कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्किंग
- इन्स्ट्रुमेंटल मेथड्स इन केमिकल ॲनालिसीस
- मशीन लर्निंग प्रोग्रामींग
- टॅक्सेशन ॲण्ड जी. एस. टी.
- क्यू.एम.एस. आणि एफ. एस.एम.एस.
- ॲडव्हान्स एक्सेल ॲण्ड क्लाऊड कॉम्प्युटींग व इतर कोर्सेस

**डॉ. पांडुरंग गायकवाड**
प्राचार्य



## विभाग तीन
## आम्ही चालवू हा पुढे वारसा...



गुरुने दिला ज्ञानरुपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा
जिथे काल अंकुर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले
फलद्रुप हा वृक्ष व्हावा तसा
गुरुने दिला ज्ञानरुपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा...

जगदिश खेबूडकर

## ।। अनुक्रमणिका ।।

**विभाग तीन**
**आम्ही चालवू हा पुढे वारसा...**


| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | ...आणि मी जी.एस. झाले ! | सौ.मंगल पाटील | १३९ |
| ०२ | बी.एड.ने मला काय दिले? | बाबुराव उपाध्ये | १४२ |
| ०३ | माझ्या बी.एड. च्या आठवणी | गितांजली बोरुडे | १४४ |
| ०४ | माझ्या आठवणीतील महाविद्यालय | जयश्री पोटघन | १४७ |
| ०५ | एस.एस.बी.कॉलेज : एक ज्ञानमंदिर | आदिनाथ जोशी | १४९ |
| ०६ | मंतरलेले दिवस | अमितकुमार गागरे | १५१ |
| ०७ | बी.एड.,मी आणि माझे करीअर | सौ.नयना पगारे | १५४ |
| ०८ | बी.एड. मध्ये मी काय शिकले? | रोहिणी कोळगे | १५५ |
| ०९ | सुसंस्कृत बनवणारे शिक्षणशास्त्र महाविद्यालय | प्रियंका तिवारी – खराडकर | १५७ |
| १० | अध्यापकांच्या आठवणी | दीपक आदमाने | १६० |
| ११ | शिक्षकांचे ज्ञानपीठ : एस.एस.बी.बी.एड. कॉलेज | अमोल रणदिवे | १६२ |
| १२ | महाविद्यालयातील माझ्या आठवणी | पवन माळी | १६४ |
| १३ | उत्तम शिक्षक व विद्यार्थ्यांची लक्षणे | प्रा.डॉ.अनिल करवर | १६५ |
| १४ | घोषित युध्द! (कविता) | प्रा.डॉ.भागवत शिंदे | १६६ |


अशी पाखरे येती
स्मृती ठेऊनी जाती...



# ...आणि मी जी.एस.झाले!

**सौ. मंगल पाटील**

श्रीरामपूरला बोरावके कॉलेजमध्ये मी बी.एस्सी.झाले. प्राणीशास्त्र विषय घेवून प्रथम श्रेणीत मी १९७४ साली बी.एस्सी.झाले. छोट्या नितीनचा श्रीरामपूरला २७ फेब्रुवारी १९७४ साली जन्म झाला व १८ मार्चला लगेच माझी सेमीस्टर होती. सर्वांचे म्हणणे परीक्षा देवू नये. पण मी एवढ्या छोट्या मुलाला घरी ठेवून परीक्षा दिली. खूप चांगले मार्क्स पडले. नंतर घरापुढे बी.एड.कॉलेज होते. पण १९७४-७५ चे ॲडमिशन संपले होते. म्हणून मग काही दिवस घरीच होते. लगेच १९७५-७६ च्या बॅचसाठी अर्ज केला. बी.एड.कॉलेजमध्ये मुलाखत दिली. लिस्टमध्ये माझा प्रथम क्रमांक होता. ॲडमिशन लगेच मिळाले व घेतले.

त्यावेळी कॉलेजमध्ये **हे** म्हणजे माझे पती एस.सी. पाटील प्राध्यापक होते. पण कॉलेजमध्ये पगार होत नसत. पगार पण कमीच होते. प्राचार्य रोकडे सर होते. त्यांना भेटले व फी बाबत विचारले. त्यांनी लगेच सर्व फी भरावी लागेल असे सांगितले. एवढेसुद्धा पैसे ह्यांच्याजवळ नव्हते. मग दोघांनी विचार करुन माझ्या गळ्यात एक चैन होती. एका बाळाच्या सोन्याच्या बिंदल्या होत्या. त्या गावात एके दुकानात गहाण ठेवल्या व पैसे आणले. माझी कॉलेजची पूर्ण वर्षाची फी भरली. मला काही साड्या घेतल्या व गावी गेलो. हे कोणालाही घरी सांगितले नाही. फक्त आईने मला विचारले तिला तेवढे सांगितले. माझे कॉलेज सुरु होण्यापुर्वी श्रीरामपूरला परत आलो. सचिनला तेथेच ठेवले. नितीन एक वर्षाचा. त्याला घेऊन आलो. त्याला सांभाळण्याचा प्रश्न होताच. रोकडे सर शिस्तबद्ध व कडक आहेत हे मी ऐकून होते. तसा फी भरताना अनुभव आला. कॉलेज सुरु झाले. कॉलेजच्या पलिकडे झोपडपट्टी होती. तिथली एक मुलगी रणपिसे शिपायाने आणून दिली. तिला नितीनला सांभाळायला ठेऊन घेतले. सर्व आवरुन कॉलेजला जाताना खूप धावपळ, तारांबळ होई. कॉलेजला चालले की त्याला कळे. तो मागे लागे. खूप रडे, सोडत नसे. मग त्याला बाहेर हे किंवा कमल मुलगी घेऊन जाई. मग मी जिना उतरुन कॉलेज गाठे. कशीबशी धापा टाकत कॉलेजमध्ये पोहचत असे. पिरिअडला लक्ष लागत नसे. त्याचा रडण्याचा आवाज कानात घुमत राही. मधल्या सुट्टीत त्याला दुध वगैरे देऊन जाई. नंतर लेसन सुरु झाले. माझी फ्रेश ॲडमिशन असल्याने ४० लेसन क्रमाने लागले. गावाबाहेर कॉलेज, शाळा. सर्व गावात जायची कसलीही सोय नव्हती. मग माझ्या आईने जयसिंगपूरवरुन रेल्वेने सायकल पार्सल केली. माझा लेसनचा प्रवास सायकलने सुरु झाला. खूप दिवसाने सायकल चालवल्याने आत्मविश्वास यायला वेळ लागला. मी खूप वेळा पडत असे. पण घरी कधी बोलले नाही. पडले की मग बॅगमधील डस्टर,खडू,फळा इकडे तिकडे पसरे. फळा एका बाजूला पडे. मग कोणीतरी येई व मला मदत करी. असे चालू होते.

दरम्यानच्या काळात कॉलेजमध्ये एल.आर.एक व प्रतिनिधी पाच निवडायची नोटीस निघाली. फॉर्म भरलेले होते. माझी खूप कसरत होती. पण मला चैन पडेना. मी एल.आर.साठी अर्ज भरला. माझ्या बरोबर अजून एका विद्यार्थीनीने अर्ज भरला. एक जागा व २ अर्ज. बाकीच्या प्रतिनिधीसाठी निवडणूक, मतदान ठरले. पण आमच्यापैकी एक अर्ज मागे घ्यायचा व एल.आर. बिनविरोध करायचा असे रोकडेसरांनी सांगितले. अर्ज परत घेण्याची तारीख नियमाप्रमाणे निश्चित होती. मला प्राचार्यांनी बोलावून अर्ज मागे घेण्यासंबंधी सुचविले. तसेच प्रा. अनारसे सर जिमखाना प्रमुख त्यांनी मला बोलावून अर्ज मागे घेण्यासंबंधी चर्चा केली. मी पण नितीन लहान असल्याने या विचाराशी सहमत झाले. अर्ज परत घेण्याची तारीख आली. मी अर्ज परत घेण्याचे ठरवले. त्यात संध्याकाळी आमच्या स्टाफ क्वार्टरजवळच विद्यार्थी वसतिगृह होते. तेथे आमच्या वर्गातील विद्यार्थी आले होते. मी आश्चर्यचकित झाले.

मला काही कळेना. सर्वांना या म्हटले. एवढ्या विद्यार्थ्यांना बसायला जागासुद्धा नव्हती. सर्व उभे राहिले. मला म्हणाले, उद्या अर्ज मागे घ्यायचा नाही. दुसऱ्या विद्यार्थीनीने घेऊ देत मागे.  त्यांनी अर्ज मागे घेतला नाही तर निवडणूक होऊ देत. पण कोणत्याही परिस्थितीत अर्ज मागे घ्यायचा नाही. मी चक्रावून गेले. मी अर्ज मागे घेत नाही म्हटल्यानंतर ते सर्व परत गेले.

दुसरे दिवशी मी प्रा. अनारसे सरांना जाऊन सांगितले, मी अर्ज मागे घेणार नाही. त्यांनी प्राचार्यांना तसे सांगितले. रोकडेसरांनी मला बोलावून घेतले. पण मी माझ्या निर्णयाशी ठाम राहिले. मग त्यांनी त्या दुसऱ्या विद्यार्थीनीला बोलावून घेतले. तिला अर्ज मागे घ्यायला सांगितले. तिने दुपारनंतर अर्ज मागे घेतला. मग मी बिनविरोध एल.आर.म्हणून निवडून आले. पाच प्रतिनिधींसाठी मतदान झाल्यावर त्यांची नावे घोषित करण्यात आली. जिमखान्याची बैठक लगेचच बोलावण्यात आली. ते पाच विद्यार्थी व मी एक असे आमची सहा जणांची कमिटी, अनारसे सर प्रमुख होते. प्रत्येकाला कामाचे वाटप करुन दिले. प्राचार्यासोबत बैठक झाली. पुढे या सहा प्रतिनिधीमधून एक जनरल सेक्रेटरी निवडायचा. यावेळी पण असेच झाले. सर्वांनी माझेच नाव ठरवले. अनारसे सरांना जावून सांगितले. प्राचार्यांनाही सांगितले. पुन्हा मला दुसरा धक्का बसला. सर्वानुमते माझेच नाव घोषित केले. अशाप्रकारे बी.एड. कॉलेजमध्ये मी प्रथम एल.आर.लेडिज प्रतिनिधी व नंतर सर्व कॉलेजमध्ये जनरल सेक्रेटरी झाले. मी सर्व आनंदाने स्वीकारले.

मग आमच्या वेगवेगळ्या कामाचे, कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रम करु लागले. पहिलाच कार्यक्रम 'रक्षाबंधन' आम्ही साजरा केला.  नंतर 'शिक्षकदिन' मोठ्या प्रमाणात साजरा केला. आमच्या आधीच्या बॅचमधील प्रथम क्रमांक आलेल्या शिक्षकांचा सत्कार आयोजित केला. प्रा. रामनाथ निर्मळ सर वर्गात प्रथम होते. तर प्राचार्य गागरे सरांना फ्रेश प्रशिक्षणार्थी मधून 'गंगूनांना' पारितोषिक मिळाले होते. त्याच दिवशी मी ठरवले, हे बक्षीस पुढच्या वर्षी मी घेणारच. ह्यांचे आदर्श आमच्यापुढे होते. पण घरच्या जबाबदाऱ्या, नितीन लहान व कॉलेजची कामे या सर्वातून थोडक्यात ते निसटले. ग्रंथालयात बसून मी अभ्यास करे. आमच्या मागण्याप्रमाणे कॉलेजमध्ये रात्रअभ्यासिका सुरु केली होती. मी रात्री कॉलेजमध्ये बसून अभ्यास करे. घरी नितीनमुळे अभ्यासाला फार कमी वेळ मिळे. ग्रंथालयाची शिस्त होती. प्रा. ठुबेसर ग्रंथपाल होते. बॉक्समध्ये चिठ्ठी टाकून पुस्तकाची मागणी करायची एका वेळी एकच पुस्तक मिळे.  ठुबे सर काही पुस्तके मला त्यांच्या नावावर घेऊन देत. नंतर माझ्या वडिलांनी जयसिंगपूरहून सर्व पुस्तकांचा एकत्र सेटच पाठवला. मग माझ्या सोयीप्रमाणे अभ्यास करे.

प्रा. अनारसे सर मूल्यमापन शिकवत. तर जी एम. चव्हाण सर 'गणित मेथड' शिकवत. प्रा. बोरुडेसर 'विज्ञान' शिकवत. प्रा. वंजारीसर 'शालेय प्रशासन' शिकवत. 'माझे पालक' प्रा. एस.टी.चव्हाण सर होते. प्रा. आर.टी.पाटील 'शिक्षणातील समस्या' हा पेपर शिकवत. हे सर्व शिस्तबद्ध चालू होते. शिपाई म्हणून लाटणे मामा होते. त्यांच्या जवळ रजिस्टर असे. बाहेर स्टूलवर ते बसलेले असत. बेल झाल्यानंतर जो येईल त्याला त्या ठिकाणी नोंद करावी लागे. मग मला क्वचित लेट होई. एक दोन मिनिटाकरिता रजिस्टरला नाव व का उशिर झाला हे लिहावे लागे. उशीरा येणाऱ्या सर्वांना प्राचार्य बोलावून घेत. विचारपूस करीत. मला कारण सांगताना एकदम रडायला येई. कारण डोळ्यापुढे मला माझा छोटा मुलगा नीतीन दिसे.

लेसन घेताना शाळेत वेळेवर पोहचले नाही तर प्राध्यापक लेसन पाहत नसत. पुन्हा दुसरा लेसन लावून टाचण काढून परत लेसन घ्यावा लागे. एक दोन वेळा तसे पण झाले. म्युनिसिपल शाळा नंबर एकला मला लेसन होता. मी चुकून व्यवस्थित न पाहिल्याने शाळा नंबर ३ ला गेले. प्राध्यापक आले नाहीत. लेसन तिथल्या शिक्षकाने पाहिला पण हे कबूल करत नसत. परत मला दुसरा लेसन घ्यावा लागला. श्रीरामपूर मधील जनता हायस्कूल खूप लांब. सकाळीच लेसन लागला होता. पाऊस पडत होता.

निघायला उशीर झाला. पावसाने सायकल चालेना, पळेना. कशीबशी शाळेत पोहचले पण तास सुरु होऊन १० मिनिटे झाली. प्राध्यापकांना विनंती केली. मी एवढ्या लांब आले, मी तास घेते. पण त्यांनी नाही पाहणार असे सांगितले. मी गेले तशी परत आले. रडत रडत येत होते. पाण्याने डोळे भरल्याने पुढचे काही दिसेना. असा हा बी.एड. चा प्रवास मी सर्व विविध कार्यक्रम पार पाडत, अभ्यास करत, लेसन घेत पूर्ण केला. खूप जिद्दीने हे केले. माझ्या आईने मला मोलाची साथ दिली. ती अधुनमधून येई. सहामाही परीक्षेला आठ दिवस राहिली. पुन्हा वार्षिक परीक्षेला दहा दिवस राहिले. माझी दोन्ही मुले सचिन, नितीन सांभाळे. स्वयंपाक करे. मला फक्त जेवायला बोलवे. मी अभ्यास करे.

शेवटचा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आदरणीय शंकरराव काळे साहेबांच्या अध्यक्षतेखाली आनंदात खूप छान पार पडला. त्यांनी पण माझे खूप कौतुक केले. वार्षिक लेसन झाले. ते पण उत्तम. अनारसे सर गणिताचा वार्षिक पाठ पहायला होते. एक बाहेरचे परीक्षक होते. बालिका शाळेत सातवीचा गणिताचा पाठ होता. त्यांना खूप आवडला. बाहेर जाऊन दोघेही माझी वाट पाहत थांबले. त्यांनी माझी पाठ थोपटली. खूप छान पाठ झाला. ते भारावून गेले. कॉलेजवर पण त्याची चर्चा झाली. माझ्या ह्या सर्व प्रवासात मला प्रा. अनारसे सरांची खूप मदत झाली.

आमच्या शेजारीच प्रा. शेटे सर होते. पण त्यांचा भूगोल विषय असल्याने प्रत्यक्ष शिकवायला ते नव्हते. त्यांचे मार्गदर्शन मिळे. कॉलेज मध्ये वार्षिक परीक्षा संपल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी सर्व साहित्य जमा करण्यासाठी बोलावले. ते झाल्यावर लेक्चर हॉल मध्ये आम्हाला प्रत्येकाला एक कागद दिला. प्रत्येक प्राध्यापकांच्या बद्दल काय वाटते ते लिहायला सांगितले. मी अनारसे सरांच्या बद्दल एक वाक्य लिहिले. ''ही इज माय स्पिरिच्यूल फादर.'' तो कागद सरांनी आजही जपून ठेवला आहे. त्याच वेळी आमच्याकडून संस्थेने नोकरीसाठी अर्ज भरुन घेतले. माझ्यासाठी माझ्या आईने अनोनात कष्ट घेतले. दोन्ही लहान मुले सांभाळण्याची तसेच स्वयंपाक करायची, वेळेत मला जेवण द्यायची बिचारी माझी 'माय'.

जनरल सेक्रेटरी म्हणून गॅदरींगपर्यंत माझे व माझ्या सहकाऱ्याचे खूप छान काम झाले. सर्वांनी एकोप्याने काम केले. विविध कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व कार्यवाही वेळेत सर्व होई. बी.एड. परीक्षेचा निकाल लागला व लगेचच मला ऑर्डर आली. प्रथम खंडाळा शाखा, नंतर न्यू इंग्लिश स्कूल उंदीरगाव शाखा. पहिला पगार ४१० झाला. खूप आनंद झाला.

बी.एड.मध्ये आम्हाला ७५ रुपये स्टायपंड मिळे. वर्षाच्या शेवटी पैशाचे वाटप होई. रजा वगैरे धरुन पैसे मिळत. मला ३४० रुपये मिळाले. ते पैसे खूप वेळ हातात धरुन मी पाहतच राहिले. माझी जन्माची पहिली कमाई. त्या पैशांत मी माझी दोन बाळं सचिन, नितीन यांना 'मिलन' या कापड दुकानात कपडे घेतले, ह्यांना एक शर्ट घेतला. या माझ्या दोन्ही बाळांनी माझ्या आई जवळ थांबून मला शिकू दिले. त्यांना पण माझा सलाम.

नोकरीत पगार मिळायला सुरुवात झाल्यानंतर पाच सहा महिन्यांनी मी ठेवलेली चैन व बिंदल्या पैसे देवून परत आणल्या. असा माझा बी.एड. चा प्रवास. सायकल परत जयसिंगपूरला पाठवून दिली. सायकलने मला मदत केली. मला खूप वेळा अपघातातून वाचविले. धन्य ती सायकल. मी हे खूप कष्टाने, जिद्दीने, धडपडून मिळवले. सहजगत्या, अलगद काही नाही मिळाले. फक्त नोकरी संस्थेत लगेच मिळाली. बी.एस्सी. असल्याने लगेच नोकरी मिळाली. माझ्या आयुष्याला बळकटी आली, उभारी आली.

बी.एड.ला मला मदत करणाऱ्या प्राध्यापकांना सलाम. प्राचार्य रोकडे सरांची मी खूप ऋणी आहे. आमचे सहकारी प्रशिक्षण देणारे विद्यार्थी, शिक्षक यांना पण सलाम. माझी आई, दोन्ही बाळं सचिन, नितीन व माझे मिस्टर एस.सी. पाटील यांची पण ऋणी आहे.

बी.एड.च्या या चाकोरीबद्ध प्रवाहातून जात असताना शिस्तबद्ध व्यक्तिमत्व घडत गेले. वेळेचे महत्व पटत गेले.

# बी.एड.ने मला काय दिले?

**बाबुराव उपाध्ये**

रयत शिक्षण संस्थेचे श्रीरामपूर येथील स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय म्हणजे व्यक्तिमत्व विकासाचे ज्ञानसंस्कार केंद्र आहे, याचा प्रत्यय मी १९८३-८४ या काळात घेतला आहे. एम.ए.मराठी रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालयातून झाल्याबरोबर मी याच महाविद्यालयाच्या एका कोपऱ्यातील जाळी लावलेल्या बी.एड. कॉलेजात प्रवेश घेतला. या काळातील अनेक आठवणी मनी मानसी जपलेल्या आहेत. बी.एड.ने मला काय दिले? हा प्रश्न सोडविताना त्याचे उत्तर शब्दांपलिकडच भावबंधनात बांधून आहे.

**अनाथाचे नाथ झालेले कॉलेज**

माझे वडील कधी वारले ते मला स्मरत नाही. मी ७-८ वर्षाचा होतो तेव्हा आई देखील सोडून गेली. उंदीरगाव या खेड्यात मी अनेकांच्या घरीदारी राहून, राबून,भांडी,धुणी करुन शिक्षण घेतले. १२ वीला बोरावके कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर प्रा. विजयराव कसबेकरसर यांनी सहकार्य केल्यामुळे वसतिगृहात प्रवेश मिळाला. कमवा आणि शिका योजनेतून शिक्षण झाले. कसबेकर सर, प्रा.एस.सी. पाटील, प्रा. मंगलताई पाटील, प्रा. कडलक मॅडम, प्रा. आण्णासाहेब चौगुले अशा कितीतरी प्राध्यपकांनी आधार दिला. त्यांच्या घरी कामे केली आणि बी.एड. प्रवेश घेतला.

प्राचार्य आ.पा. खरात अतिशय गुणी आणि दयाळू प्राचार्य होते. मी ४८० रुपये प्रवेश फी भरु शकत नव्हतो. प्राचार्यांना प्रा.एस.सी. पाटील व प्रा. मंगलताई पाटील भेटले. माझी परिस्थिती त्यांना सांगितली. त्यातून बी.एड. च्या कमवा आणि शिका योजनेत काम मिळाले. दिवसभर कॉलेज असल्याने नाईट ट्युडी मिळाली. त्यामुळे फी चे पैसे, अभ्यास आणि मदत हे फायदे झाले. माझ्यासारख्या अनाथाला पोटाशी धरणारे बी.एड. संस्था ही गोरगरिबांच्या मुलांना शिकविणारी संस्था आहे. रयतेचे हे संस्कार मला बी.एड.च्या सर्व प्राध्यपकांच्या वागण्यात जाणवले. त्यावेळी प्रा. शंकरराव आनरसे सर, प्रा. रामदास बोरुडे सर, प्रा. नान्नर सर, प्रा. मणेर मॅडम, प्रा. पाटील सर, प्रा. पाटील मॅडम हे सर्व अतिशय प्रेमळ आणि गुणवान असल्याने मला वर्षभर सर्वांनी खूप मदत केली. समजून घेतले. हे देव दयेचेच होते.

बोरावके महाविद्यालयात १२ वी ते एम.ए.पर्यंत शिक्षण घेतले. पण तिथे तनामनाची इतकी गुंतवणूक झालेली नव्हती. बी.एड. करताना मात्र अध्ययनाच्या निमित्ताने २४ तास कार्यशीलता निर्माण करणारे अनेक अनुभव मनीमानसी मुरुन आहेत. पहिल्या दिवसापासून प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि अत्यंत प्रभावी उपक्रम सुरु झाले. सूक्ष्म अध्यापन, शाळेतले अध्यापन तास, त्यासाठी टाचण, नोटस काढणे, पुन्हा पुन्हा दुरुस्ती करणे,चर्चा आणि सूचनांचे काटेकोर पालन करणे, शिस्त, संस्कार, ज्ञानसाधना, सदैव कृतीशीलता आणि संयमशीलता या सूत्रांचे गणित जुळविण्याचे कौशल्य आत्मसात करण्यातच खरे बी.एड. चे शिक्षण झाले.

बी.एड. च्या उपक्रमात स्वत: प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकही कार्यतत्पर असल्यामुळे विद्यार्थी सहजपणे सर्व उपक्रमात आघाडीवर असत. थकवा असे पण कंटाळा नव्हता. कामाचा ताण होता पण उत्साह होता. दिवस, रात्र बांधून होतो पण ज्ञानसाधनेत आनंद होता. प्राध्यापकांची शिस्त आणि संस्कार व्यक्तिमत्वावर छाप पाडणारी असल्यामुळे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण लाभले. जे पाच-सहा वर्षाच्या महाविद्यालयीन काळात प्रभावाने जाणवले नाही. तर केवळ एका वर्षातच आम्ही कृतीशील शिक्षण अनुभवले. कंटाळा नाही की तासाचे बुडलेपण कधीच अनुभवले नाही. व्यर्थ गप्पा आणि वेळ काढूपणा कधी जाणवला नाही. बी.एड. म्हणजे अध्यापनातून ज्ञानसैनिक होण्याचा बहुमान लाभला. ज्ञानमंदिराच्या सीमेवर समर्थपणे टिकून राहण्यासाठी पूर्णपणे तयार होण्याची कार्यशाळा आणि प्रशिक्षण म्हणजे बी.एड.वाटले.

**पाटील परिवारामुळे बी.एड.झाले.**

बोरावके कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस.सी.पाटील आणि सौ.

मंगलताई पाटील यांनी मला आधार दिला. तेच माझे मायबाप झाले. मी कमवा आणि शिका योजनेत कष्टाची कामे करताना आदरणीय सौ. मंगलताई पाटील यांनी अतिशय आत्मियतेने चौकशी केली. मी पोरका असल्याचे समजताच त्यांच्या डोळ्यात पाणी आले. मला त्यांच्या मायाळू स्वभावात कर्मवीर आण्णा व रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांचे दर्शन झाले. त्यांनी मला घरचा आधार दिला. दररोज मला जेवण देत असत. प्रा. पाटील सर कपडे देऊन खूप मदत करीत. बी.एड.चा प्रवेश त्यांच्यामुळेच झाला. प्राचार्य आ.पा.खरातसर व त्यांची चांगली मैत्री होती. बी.एड. चे अध्ययन दिवसभर चालत असल्याने काम करणे, पैसा मिळविणे कठीण होते.

पाटील मॅडम हरेगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल उंदीरगाव शाखेत शिक्षिका होत्या. त्यावेळीही त्यांनी तेथे ८ वीला असताना मला पाहिले होते.तिथे त्यांनी मला आधार दिला. दररोज त्यांच्या घरी जेवण मिळत असे. पैसे,कपडे आणि माझ्या गरजा त्यांनी भागविल्या. कर्मवीरांच्या विचारांचे खरे आचरण मला पाटील दांपत्यात पाहण्यास मिळाले. त्यांच्यामुळे बी.एड. झाले.

बी.एड. च्या वार्षिक सांस्कृतिक महोत्सवात मी शेजारीण सखेबाई हे सुंदर गाणे म्हटले. तेव्हा माझ्या मम्मा म्हणजे पाटील मॅडमने मला खूप शाबासकी दिली. त्यावेळी बी.एड. कॉलेजचे प्राचार्य खरात सर, शंकरराव अनारसे, प्रा. नानकर सर, इंग्रजीच्या प्रा.सौ.के.जे. पाटील मॅडम, सातारा विभागाचे प्रा. एम.जी.पाटील सर, प्रा. बाबुराव दळवी, प्रा. पवार, प्रा. सौ. नजमाताई मणेर, प्रा. जी.एम. चव्हाण सर, ग्रंथालयातील श्री. दामोदर ठुबे, गवळी, जोर्वेकर मामा अशी कितीतरी मंडळी मला लाभली. श्री. करणे मामा शिपाई होते. परंतु तरी आपुलकीने मदत करीत असत. या सर्व आठवणी मला आजही नवलपूर्ण वाटतात.

नाटकातील भूमिकेबद्दल आमचा प्राचार्य खरात सर, अनारसे सर, प्रा. नानकर यांनी सत्कार केला. एक ग्रुप फोटो आम्हाला प्रत्येकाला मिळाला. तो अजूनही मी जपून ठेवला आहे. प्रा.एस.सी.पाटील सर, सौ. मंगलताई पाटील मॅडम, पाडळकर मॅडम, सौ. सुरेखाताई चौगुले, प्रा. र.बा. मंचरकर, प्रा. विजयराव कसबेकर सर, प्रा. दळवी सर अशा अनेकांचे आशिर्वाद, सहकार्य लाभले. पाटील परिवारामुळे २२ मे १९८४ ला मंदाकिनीशी विवाह झाला. अगदी साध्या पद्धतीने. तेव्हा पाटील परिवाराने सर्व संसार उभा करुन दिला. रयत मध्ये नोकरी देताना खूप प्रयत्न केले. बी.एड चे हे मंगल मी हृदयात साठवले आहे.

**भावी शिक्षकांचे ज्ञानमंदिर**

रयत शिक्षण संस्थेचे स्वामी सहजानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय आम्हा विद्यार्थ्यांना भावी शिक्षकांचे ज्ञानमंदिरच वाटले. कारण भविष्यात 'आपण शिक्षक होणार' हे स्वप्न खऱ्या अर्थाने याच महाविद्यालयात अनुभवले. १९७० साली स्थापन झालेले हे महाविद्यालय महाराष्ट्र राज्यात गुणवत्तेच्या बाबतीत क्रमांक एकचे असल्याने आपणास येथे प्रवेश मिळाला, हे खरोखर सद्‌भाग्याचेच वाटले. कारण प्रवेश घेण्यासाठी फार मोठी स्पर्धा होती. १०० विद्यार्थी संख्या मर्यादा आणि विविध शाखेतील मर्यादित प्रवेश संख्या त्यामुळे ज्याला प्रवेश मिळाला, तो उत्तम अध्यापक झालाच म्हणून समजा. शिवाय १०० टक्के निकालाची परंपरा अखंडपणे सुरुच होती. त्यामुळे १९८३–८४ च्या कालखंडात माझ्याबरोबर शंकरराव पुंड, आर.डी.गायकवाड, यादव अशी किती तरी मित्र मंडळी होती. माझी आणि शंकरराव पुंड यांची अत्यंत एकरुप मैत्री होती. ते व मी पुढच्या एक नंबर बेंचवर नेहमीच बसत असू. आम्हाला सर्वजण बेंचमित्र म्हणत असत. शंकरराव पुंड म्हणजे सर्वात आदर्श व हुशार असल्याने मी त्यांच्या सहवासात राहिलो. परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्या सालचे ते आदर्श विद्यार्थी ठरले. आम्हाला सर्वांना खूप आनंद झाला. आम्ही सर्वजण अतिशय एकोप्याने राहत असू. त्यामुळे बी.एड. चे शिक्षण म्हणजे मैत्रीचा सुगंध, ज्ञानाचा दरवळ आणि माणूसकीचा प्रकाश अनुभवता आला.

# माझ्या बी.एड.च्या आठवणी...

गितांजली बोरुडे

प्रत्येकाच्या  जीवनात आयुष्याला कलाटणी देणारा एखादा प्रसंग किंवा क्षण असतोच. तसेच प्रत्येकाच्या जीवनात काही अविस्मरणीय क्षण असतात मात्र माझ्या बाबतीत म्हणायचं झालं तर आयुष्याला कलाटणी देणारा कोणता एक प्रसंग नाही तर एक संपूर्ण वर्षच आहे आणि ते म्हणजे २००४-०५! लहानपणापासून उराशी बाळगलेले 'एक उत्तम शिक्षक बनायचं' हे ध्येय म्हणून साध्य करण्यासाठी काही कारणास्तव डी.एड.ला प्रवेश मिळाला नाही म्हणून आर्ट टीचर डिप्लोमा (ATD) केले. सोबतच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक विद्यापीठातून बी.ए.पूर्ण केले. बी. एड. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करुन इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या ३०% कोट्यातून स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूरला प्रवेश मिळाला आणि आयुष्याला कलाटणी मिळत गेली. खरंतर आजवरच्या शालेय शिक्षणात मागे वळून पाहिलं तर खूप थोडे अविस्मरणीय क्षण किंवा प्रसंग आठवतात. मात्र बी.एड. चे शैक्षणिक वर्ष म्हटले की आठवणीतील एक पान सहज उलगडत जातं.

रयत शिक्षण संस्था ही कर्मवीर भाऊराव पाटलांच्या स्वप्नातील व ध्येयाने प्रेरित असलेली संस्था आहे. त्यामुळे या संस्थेचे बी.एड. कॉलेज म्हणजे देखील उत्तम शिक्षक बनण्यासाठी अहोरात्र कष्ट घेणारे सर्व प्राध्यापक, सर्व शैक्षणिक सोयीसुविधांनी सुसज्ज असणे ओघाने आलेच. बी.एड. म्हटलं की नेहमीच्या अध्ययन अधयापनासोबतच मायक्रोटिचिंग, सराव पाठ, छात्र सेवाकाल, विविध दिनविशेष, सांस्कृतिक कार्यक्रम,विविध स्पर्धा, परीक्षा आणि प्रॅक्टिकल्स यांनी गजबजलेले वर्ष,'रात्र थोडी सोंगे फार' या उक्तीप्रमाणे एकूणच बी.एड.च वर्ष असते. त्यामुळे अगदी तंतोतंत व काटेकोरपणे केलेले वेळापत्रक हे सर्वांना फॉलो करणं अनिवार्य असतं. यातूनच वेळेचे नियोजन, वक्तशीरपणा या बाबी विद्यार्थी-शिक्षकांच्या अंगी रुजू लागतात. आजही मायक्रोटीचिंगच्या वेळी पहिल्याच तासाला लटपटणारे पाय,थरथरणारे हात आठवले की मनातल्या मनात हसू येत. असेच मायक्रोटीचिंगच्या तासाला डॉ. प्रकाश देशमुख सरांच्या गटांमध्ये फलक लेखन कौशल्य चालू होतं आणि सरांनी माझा फलक लेखन कौशल्याला खूप मनापासून दाद दिली. यामुळे की काय तिथून पुढे बऱ्याच कार्यक्रमाला मला फलक लेखन करण्याची संधी देखील मिळाली.

प्राचार्य डॉ. मणेर मॅडम यांचे नेतृत्वाखाली कार्यरत सर्व प्राध्यापकांची शिकवण्याची एक विशिष्ट खासियत होती. डॉ. प्रकाश देशमुख सर म्हणजे तत्त्वज्ञान हसत खेळत आजच्या शब्दात समोरच्या मनात उतरविण्यात तरबेज, तर  प्राध्यापक बोरुडे सर म्हटलं की शैक्षणिक मानसशास्त्र सारखा कठीण विषय देखील सहजतेने सोप्या भाषेत विद्यार्थ्यांच्या गळी उतरविण्याच कसब सरांकडे होते. शालेय व्यवस्थापन शिकवताना प्रत्येक आयोग, समित्या अन अगदी प्रत्येक मुद्दा सोदाहरण स्पष्ट करणारे श्री. पुंड सर तर मूल्यमापन व संख्याशस्त्र या सारखा अवघड विषय देखील सर्व विद्यार्थ्यांना तितक्याच तळमळीने, शांतपणे, हसतमुख-

चेहऱ्याने शिकवणारे डॉ. गागरे सर. ICT सारखा प्रॅक्टिकल विषय शिकविताना कॉम्प्युटर Lab सोबतच वर्गात आशयाची एकमेकांची सांगड घालणारे नान्नर सर. स्पष्ट व करारी तितकेच प्रेमळ असे इंग्रजी विषयाचे अध्यापन करणारे डॉ. व्हनबट्टे सर आणि आई सारख्या मायाळू, मितभाषी आणि हसतमुख अशा इतिहास अध्यापन पद्धती शिकविणाऱ्या हिरगळ मॅडम. या सर्व प्राध्यापकांच्या अभ्यासपूर्ण अध्यापनाचा प्रभााव तर होताच. सोबत या सर्वांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर सातत्याने प्रभाव पडत होता. सर्व प्राध्यापकांची विद्यार्थ्यांविषयी तळमळ ही कुठेतरी माझ्या शिक्षक व्यक्तिमत्वावर देखील प्रभाव पाडून गेली.

बी.एड.च्या प्रत्येक कार्यक्रमाध्ये, उपक्रमांमध्ये मी सातत्याने समरस होऊन सहभागी होत असताना माझ्या व्यक्तिमत्वाचे पैलू देखील कळत नकळत उलगडत जात होते. माझ्यातील ज्या कला गुणांची मलाच कल्पना नव्हती ते या बी.एड.च्या वर्षामध्ये माझ्यासमोर अलगत साकारत होते. माझी ही धडपड पाहुन असेल किंवा माझ्यातील संभावना माझ्या गुरुवर्यांना लक्षात आली असेल कदाचित म्हणून की काय पण मी अर्ज केलेला नसताना देखील विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून माझी निवड केली गेली आणि हळूहळू माझ्यातील नेतृत्व गुणाला संधी मिळत गेली. कॉलेजमधील रांगोळी स्पर्धा किंवा सांस्कृतिक स्पर्धा असो यामध्ये ज्या गोष्टी मी आधी कधीही केलेल्या नव्हत्या त्या गोष्टी करण्याची संधी मिळत गेली. रांगोळी स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटलांचे व्यक्तिचित्र मी पहिल्यांदाच रांगोळीमध्ये रेखाटले, तर इतिहास गटाच्या माध्यमातून सादर केलेल्या राणी लक्ष्मीबाई एकपात्री आजही तितकेच स्मरणात आहे. इतिहास अध्यापन पद्धतीच्या अनुषंगाने आधार पद्धतीने शिकवलेला मौर्यकालीन इतिहासातील सम्राट अशोक हा पाठ आणि हिरगळ मॅडम यांनी त्यासाठी केलेले कौतुक आजही आत्मविश्वास वाढविते. सराव पाठाला स्वत: तयार केलेली शैक्षणिक साधने वापरताना एक अतुलनीय आनंद मिळाला तो स्वनिर्मितीचा, सर्जनशीलतेचा. विद्यार्थ्यांसाठी काहीतरी नवीन करण्याची उमेद बी.एड. पासूनच जीवनात रुजली.

बी.एड.च्या वर्षातील भावनावश करणारा प्रसंग म्हणजे छात्रसेवाकाल. निमगावच खैरी या ठिकाणी आमच्या गटाचा छात्रसेवाकाल डॉ. प्रकाश देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. त्यावेळी पंधरा दिवसात वर्ग अध्यापनासोबतच पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम असे एक ना अनेक उपक्रमांची रेलचेल आमच्या छात्रसेवाकालामध्ये होती. अगदी भारावून गेल्यासारखे ते पंधरा दिवस आम्ही विद्यार्थ्यांशी व विद्यार्थी आमच्याशी समरस झाले होते. आम्हाला विद्यार्थ्यांचा लळा लागला होता. मला आजही आठवतं पाचवी अ च्या वर्गातील मुले छात्रसेवाकाल सांगतेच्यावेळी अगदी शनिवार व सकाळची शाळा असून देखील उपाशीपोटी मी जाणार म्हणून माझी वाट पहात बसले होते. त्या लहानग्यांनी मला साश्रूंनी निरोप दिला होता. त्यावेळी मात्र मलाही माझ्या अश्रूंना आवरता आले नव्हते.त्यानंतरच्या काही दिवस विद्यार्थ्यांनी पाठविलेली पोस्टकार्ड व आंतरदेशीय पत्राद्वारे मला माझ्या चांगल्या कामाची पावती मिळाली. कामातील आत्मिक आनंद जे काही करायचं ते उत्तम रीतीनेच करायचं ही समज मनात अगदी खोलवर रुजली. नव्हे नव्हे जीवनाचे एक सूत्रच बनले. आयुष्यामधील आणखी एक मानाचा शिरपेच ठरणारी एक घटना घडली. सन २००४–०५ मधील आदर्श विद्यार्थी या पुरस्काराने गौरविले गेले. कदाचित मी बी. एड. ची केवळ पदवी घेतली नाही तर जाणीवपूर्वक बी.एड.चा प्रत्येक क्षण जगले त्याचीच ती पावती असावी.

बी.एड. मधील माझ्या सर्व गुरुवर्य यांचे कडून खूप शिकायला मिळाले. सोबतच मला निसीम प्रेम करणारे मित्र मैत्रीण देखील मिळाले. आजही whatsapp च्या माध्यमातून बी.एड. ग्रुप वर कॉलेजच्या अनेक आठवणी डोकावत राहतात. आजही आम्ही अनेकजन एकमेकांच्या संपर्कात आहोत. एकमेकांच्या यशात, आनंदात सहभागी होत आहोत. बी.एड.च्या पर्वानंतरच्या कालावधीत देखील बी.एड. च्या

प्राध्यापकांचे मार्गदर्शन मला मिळाले. यामध्ये प्रा. डॉ. प्रकाश देशमुख हे मला एम.फिल. पदवीसाठी मार्गदर्शक म्हणून लाभले. श्री. रामदास बोरुडे सर यांच्या प्राचार्य पदाच्या नेतृत्वाखाली गायत्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, देवळाली प्रवरा या बी.एड. कॉलेजला काम करण्याची संधी मिळाली. बी.एड.च्या या शैक्षणिक वर्षात जे काही व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडत गेले त्याच माध्यमातून पुढे पुणे विद्यापीठात मेरीट द्वारे एम.एड.करण्याची संधी मिळाली. एम.एड. लाही बी.एड. प्रमाणेच विशेष प्राविण्य मिळाले. शिक्षणशास्त्रातील SET परीक्षा ही सन २००६ मध्ये उत्तीर्ण होऊन गायत्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय देवळाली प्रवरा येथून बी.एड. कॉलेज वर अध्यापनाचा श्रीगणेशा केला. पुढे इरा एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,आर्वी,तालुका हवेली,जिल्हा पुणे या ठिकाणी ९ वर्ष असे एकूण ११ वर्ष अध्यापनाचे काम करण्याची संधी मिळाली.

MPSC द्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत राज्यात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होऊन एप्रिल २०१७ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी या ठिकाणी वरिष्ठ अधिव्याख्याता (गट अ) म्हणून नियुक्त झाले. याच दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याद्वारे डॉक्टरेट मिळाली. पुढील सहा महिन्यातच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे या शालेय शिक्षणाच्या शिखर संस्थेत प्रतिनियुक्तीवर मागील साडेतीन वर्षापासून संशोधन विभागामध्ये कार्यरत असून या विभागाची धुरा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे सांभाळत आहे. याठिकाणीही काम करताना नाविन्याची कास धरत पुर्वापार चालत आलेल्या उपक्रमांना नावीन्याची व तंत्रज्ञानाची जोड देण्यात यश मिळत आहे. माझ्या या सर्व यशामागे बी.एड.च्या शैक्षणिक वर्षात माझ्या गुरुजनांनी माझ्यावर केलेले शैक्षणिक संस्कार हेच आहे. माझ्या आयुष्यातील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर आणि येथील माझे गुरुजन यांचे माझ्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण असेच आहे. त्यामुळे महाविद्यालयाचे अथवा माझ्या गुरुजनांचे ऋण व्यक्त करण्यासाठी धन्यवादाचे हे शब्द कमी पडतील. म्हणूनच मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते. आमच्या या महाविद्यालयाची गौरव गाथा अशीच दिवसेंदिवस वाढत जावो. महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षा निमित्त माझ्याकडून मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !




१९८६-८७ वार्षिक स्नेह संमेलन: समुहगीत गायन

## माझ्या आठवणीतील महाविद्यालय...

सौ. जयश्री पोटघन

मी सौ. जयश्री अरुण पोटघन पूर्वाश्रमीची कु. जयश्री मधुकर कथले. परवा श्री. अनिल करवर सरांचे पत्र मिळाले. स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या सुवर्ण महोत्सवी विशेषांकासाठी आजी माजी विद्यार्थ्यांनी लेख पाठविण्यासंबंधीचे आवाहन होते. अनेक विषयांपैकी एक विषय होता 'बी.एड. ने मला काय दिले?' खरंच, बी.एड.ने मला काय दिले?..आणि माझे मन ३२ वर्षापूर्वीच्या भूतकाळात रमले.

होय, मी ३२ वर्षापूर्वीच्या म्हणजेच शैक्षणिक वर्ष १९८९-९० सालच्या बॅचची विद्यार्थिनी, मुंबईला जन्मलेली. मी.बी.एस्सी. पदवी प्राप्त करुन लग्नानंतर श्रीरामपूरला आले. आयुष्याचे जोडीदार श्री. अरुण पोटघन येथील बोरावके ज्युनियर (सायन्स) कॉलेजमध्ये फिजिक्स विषयाचे प्राध्यापक होते.

शिक्षकांबद्दल समाजामध्ये कायम आदराचे व सन्मानाचे स्थान असते. विद्यार्थ्यांचा कल,आवड व क्षमता ओळखून त्याला आयुष्यात यशस्वी होण्याकरिता शिक्षक योग्य मार्गदर्शन करु शकतो. एका अर्थाने समाजाला घडविणारे शिल्पकार टिकवून ठेवण्यास शिक्षकाची भूमिका अत्यंत निर्णायक असते. जगात सर्वच ठिकाणी गुरु आणि शिक्षकांचा आदर केला जातो. काही शिक्षक आयुष्यावर केवळ प्रभावच टाकत नाहीत तर विद्यार्थ्याच्या जीवनात स्थित्यंतरही घडवून आणतात, असे बाळकडू लहानपणापासूनच माझ्या आई-वडिलांनी मला पाजले असल्याने तसेच जोडीदाराचीही अमूल्य अशी साथ मिळाल्याने शिक्षक होण्यास प्रेरित होवून मी दर्जेदार शिक्षक घडविणाऱ्या स्वामी सहजानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये बी.एड.ला. प्रवेश घेतला.

एकूण १०० विद्यार्थ्याची आमची बॅच, प्राचार्य अनारसे सर, प्राध्यापक चव्हाण सर, नानकर सर, रवीकिर्ती सर,बोरुडे सर, गागरे सर, देशमुख सर,पाटील मॅडम, मणेर मॅडम इ. च्या मार्गदर्शनाखाली अध्ययन -अध्यापनाचे धडे गिरवू लागली. माझे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असल्याने मराठीतून अध्ययन करणे अवघड झाले होते. परंतु मा. प्राचार्य अनारसे सरांनी कॉलेजच्या ग्रंथालयातील इंग्रजी माध्यमाच्या पुस्तकांचे दालन माझ्यासाठी खुले करुन दिल्याने माझे अध्ययन सोपे झाले. तसेच प्रेग्नन्सी पिरीयडमध्ये बी.एड. करताना माझ्या बॅचच्या विद्यार्थी-शिक्षकांचे, सर्व प्राध्यापकांचे उत्कृष्ट असे सहकार्य लाभल्याने मी बी.एड. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊ शकले.

बी.एड. झाल्यावर माझ्या शिक्षकी पेशाचा श्री गणेशा झाला. नोकरीची धुरा सांभाळत शैक्षणिक वर्ष १९९१-९३ मध्ये याच कॉलेजमधून एम.एड.केले व त्यानंतर एम.ए.केले. शिक्षक म्हणून काम करताना हे जाणवले की शाळेचा दर्जा शिक्षकांवर अवलंबून असतो. कोणतीही शिक्षण योजना शिक्षकांशिवाय राबविली जाऊ शकत नाही व यशस्वी केली जाऊ शकत नाही. 'शिक्षक' ही केवळ व्यक्ती नसून संस्काराचे एक विद्यापीठ असते. विद्यार्थ्यांना घडवून एक संवेदनशील नागरिक घडविण्याचे आणि मनुष्य निर्माणाचे कार्य शिक्षकच हा

खऱ्या अर्थाने साध्य करु शकतो. बी.एड.करत असताना मी शिकले की वक्तशीरपणा काय असतो? अध्ययन क्षमतेचे मूल्यमापन कसे असावे? विद्यार्थ्यांची मानसिकता कशी असते? नाविन्यपूर्ण शिक्षणपद्धतीचा वापर कसा करावा? आनंददायी शिक्षण व तणावमुक्त अध्ययन, शिक्षण व्यवस्थेत किती उपयोगी आहे? अशा सर्व वैविध्यपूर्ण बाबींचा मी माझा विद्यार्थी घडविण्याकरिता वापर केला. विद्यार्थ्यांना आपली नेमकी योग्यता लक्षात यावी त्यांनी त्यांच्यातील विशेष कौशल्य ओळखावे हा माझा सातत्याने प्रयत्न राहिला.

शालेय शिक्षक म्हणून काम करता-करता शिक्षक घडविणाऱ्या डी.एड.कॉलेजच्या विद्यार्थिनींना शिकविण्याची संधी मिळाली. बी.एड. करताना आत्मसात केलेली सर्वच कौशल्ये पणाला लावून मी अध्यापन केले. हे कार्य करत असताना विद्यार्थी घडविण्याबरोबरच एक सक्षम शिक्षक घडविण्याचे कौशल्य प्राप्त झाले. माझ्यातील जिद्द,तळमळ व प्रामाणिक कष्ट पाहून मला डी.एड. कॉलेजचे प्राचार्यपद प्राप्त झाले. प्रशासकाची जबाबदारी सांभाळताना अनेक शिक्षण तज्ज्ञांशी संपर्क आला. त्यांच्या ज्ञानाची व अनुभवांची भर माझ्या ज्ञानात पडत होती. याच गुणांच्या आधारे मला डी.एड. कॉलेज इन्स्पेक्शन कमिटीत काम करण्याची संधी मिळाली. यामुळे प्रशासकीय कामाबरोबर सक्षम व्यवस्थापन कसे करावे हे शिकण्यास मिळाले. त्यामुळेच की काय मला केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (सी.बी.एस.ई.) शाळेचे प्राचार्यपद मिळाले व आज गेली ११ वर्षे श्रीरामपूर येथील श्रीराम अकॅडमी सी.बी.एस.ई. स्कूल च्या प्राचार्यपदी यशस्वीपणे कार्य करीत आहे.

माझ्या २५ वर्षे व्यावसायिक जीवनाचा पाया रचणाऱ्या बी.एड.मुळे मला समाजात भरपूर मान सन्मान, प्रतिष्ठा,प्रेम,जिव्हाळा,आदर मिळाला. जीवनात पैसा कमविण्यापेक्षा कामातून समाधान मिळवणे जास्त गरजेचे असते आणि मी खऱ्या अर्थाने समाधानी आहे असे मला वाटते. कृतज्ञता ही मानवी जीवनातील श्रेष्ठ व सुंदर भावना आहे असे मी मानते आणि म्हणूनच ज्यांनी मला घडविले असे आदरणीय अनारसे सर व सर्व आदरणीय प्राध्यापकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

**'जरी मी असेल घडणीची माती**

**मूर्तीची निर्मिती त्यांचीच आहे'**




१९७९-८० वार्षिक स्नेह संमेलनातील प्रमुख पाहुणे प्रसिद्ध साहित्यिक राजा मंगळवेढेकर व इतर

# एस.एस.बी.कॉलेज : एक ज्ञानमंदिर

आदिनाथ जोशी

‘ ज्ञानासाठी या आणि सेवेसाठी जा.’ असं पूर्वी जीवन शिक्षण मंदिर, असलेल्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांच्या प्रवेश कमानीवर दिमाखाने मिरवणारं वाक्य चिरस्मरणात आहे, हे वाक्य सर्वार्थाने सिध्द आणि साध्य करणारे रयत शिक्षण संस्थेचे श्रीरामपूर येथील स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय होय. या वर्षी महाविद्यालय आपला सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना या वटवृक्षाचे एक पान आपणही व्हावं या सारखे भाग्य ते काय असावे ?

तब्बल ५० वर्षांची अखंड, अविरत अविचल वाटचाल ज्ञानगंगेचा एक प्रवाह कर्मवीर भाऊराव पाटील या भगिरथाने श्रीरामपूरात आणला आणि आज समृद्धतेने नटलेल्या संस्कारित शिक्षकांची सुपिक राने त्यातून पहावयास मिळत आहेत. असं म्हटलं जात की पिढी घडविण्याचे कार्य शिक्षक करतात आणि अशा ‘शिक्षकांना’ च घडविणारे विद्यापीठ म्हणजे आमचे एस.एस.बी.कॉलेज.

मी २००२-२००३ च्या बी.एड. मध्यवर्ती प्रवेश बॅचचा विद्यार्थी. महाविद्यालयाचा लौकीक ऐकून होतो, इथे प्रवेश मिळविण्यासाठी भल्याभल्यांची धडपड असायची. म्हणूनच मी स्वत:ला भाग्यवान समजतो की मला बी.एड. प्रवेशासाठी हे महाविद्यालय मिळालं.

रयत संकुल श्रीरामपूर परिवारात आर.बी.एन.बी.आणि डाकले कॉलेजच्या मध्ये दिमाखात उभे असलेले आमचं महाविद्यालय आजही तितकच प्रिय आणि संस्मरणीय आहे. कारण इथल्या भिंती, दारं, खिडक्या, वर्ग, प्रयोगशाळा,ग्रंथालय आमच्या आयुष्याच्या जडघडणीतला अतिशय महत्वाचा टप्पा आहे. म्हणूनच नमनालाचा घडाभर तेल न दवडता मी माझ्या मुख्य विषयाकडे वळतो तो म्हणजे महाविद्यालयातील मला भावलेले उपक्रम, शिस्त आणि छात्रसेवाकाल. खरं म्हणजे विषयाची निवड करताना मी अजूनही संभ्रमात आहे. पण एका विषयाला न्याय द्यावा लागेल. सर्व विषयावर भरभरुन लिहता आल असत. तेवढी ज्ञानाची वैचारिक शिदोरी याच महाविद्यालयाने आम्हाला दिली आहे. कदाचित शिक्षकांच्या आठवणी सांगतांना कमी, अधिक झालं असत तसं होऊ नये म्हणून महाविद्यालय हाच धागा पकडला.

महाविद्यालय म्हणजे एक इमारत, खोल्या कार्यालय आणि अन्य भौतिक गोष्टींचं का? तर नाही इथल्या माणसांनी घडविला आहे इतिहास. घडविले आहेत हजारो शिक्षक आणि उभारले आहे हजारो संसार! आजच्या या सुखद संसाराची पाळेमुळे एस.एस.बी. च्या संस्कारात, शिस्तीत, उपक्रमात आणि छात्र सेवाकालाच्या अनुभवात आहेत हे ही तितकेच खरे. माझ्या शैक्षणिक वाटचालीत मी भरपूर शाळा, महाविद्यालये पाहिली, अनुभवली. मात्र एस.एस. बी. हा कळसाध्याय आणि मानाचा तुरा आहे या बद्दल माझ्या मनात किंचितही संदेह नाही. याला कारण या महाविद्यालयातील मला भावलेले उपक्रम, शिस्त आणि छात्र सेवाकाल. २००२-०३ बॅच सुरु होताना प्रथमत: तत्कालीन प्राचार्या नजमा मनेर यांनी सर्व शिक्षकांचा आधी परिचय आणि ओळख करुन दिली. उपक्रमशीलतेचा तो प्रथम अध्याय होता. त्यातून स्नेह वृद्धीगंत झाला आणि तो चिरंतन आहे आज पावेतो.

आमच्या महाविद्यालयाच्या उपक्रमशीलतेबद्दल किती लिहिलं तरी कमीच आहे. शैक्षणिक वर्षाच्या आरंभापासून ते समारोपापर्यंतची ही मालिका आमच्यातल्या कला, क्रिडा आणि नेतृत्व गुणांना विकसित करुन गेली. शैक्षणिक वर्षातील जयंती, पुण्यतिथी,व्याख्याने, शिबीरे यांचे आयोजन, नियोजन आणि प्रत्यक्ष संयोजन हे आम्हा प्रशिक्षणार्थी शिक्षकांनाच करावे लागायचे. त्यातूनच मग कुणाचं अक्षर चांगल, कुणाचं भाषण चांगले, कुणाची रांगोळी, चित्रकला चांगली आणि कुणाचा गाण्यासाठी आवाज चांगला. आमच्यातल्या दडलेल्या कलाप्रेमी शिक्षकाला इथे एस.एस.बी. कॉलेजच्या उपक्रमांनी संधी दिली आणि आम्ही त्या संधीचे सोने केले. म्हणतात ना कौशल्य आणि कर्तृत्व असेल तर संधीही दरवाजा ठोठावते तसच काहीस आमच्या बाबतीत घडलं.

महाविद्यालयात शैक्षणिक उपक्रमा सोबत सामाजिक आरोग्य विषयक आणि पर्यावरण विषयक विविध उपक्रमांचे आयोजन व्हायचे. मला आठवतय आमच्या बॅचच्या

विद्यार्थींनीनी आम्ही रक्षाबंधन या कार्यक्रमातून जमा झालेली ओवाळणीची रक्कम श्रीरामपूर येथील 'नॅब' संस्थेला देणगी म्हणून दिली. हा कार्यक्रम होत असताना सर्व विद्यार्थी आणि शिक्षक अतिशय भाऊक झाले होते. सामाजिक दायित्वाची जाणीव या उपक्रमातून प्रशिक्षणार्थी शिक्षकामध्ये निर्माण होत होती. अंध मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य आम्हाला जगण्यातला आनंद शिकवून गेले होते. याहून सरस उपक्रम तो काय सांगावा शेवटी शब्द मर्यादा आहेच.

बी.एड. कॉलेज म्हणजे Donkey Work असं म्हणायचे. पण हे करताना त्यात नवनिर्मितीचा आनंद, स्व-कर्तृत्व आणि क्षमतांचे आकलन. सृजनाचा अविष्कार आणि सहज सादरीकरणाचे धडे होते हे आता आमच्या लक्षात येतय.या कॉलेजात तावून सुलाखून घेतात. एस.एस.बी. च्या मुशीत तयार झालेला शिक्षक जगाच्या पाठीवर कोणत्याही शाळेत आपल्या अध्यापनाचा ठसा उमटवू शकतो हे त्रिवार सत्य आहे.

उपक्रमा सोबतच एस.एस.बी.ची शिस्त हा ही मनाला भावलेला विषय. शैक्षणिक आयुष्यात 'शिस्त' असायलाच हवी. शिस्तीने जीवनाला चांगल वळण लागत हे आम्ही अनुभवलं. तत्कालीन उपप्राचार्य रामदास बोरुडे सर, डॉ. शंकर गागरे सर, डॉ. राजाराम कुंभार, डॉ. आलमप्रभु रविकिर्ती, प्रा. पुंड सर, प्रा.सौ. हिरगळ मॅडम या सर्व मान्यवर शिक्षकांनी आपल्या कृतीशील आचार आणि विचारातून शिस्त आमच्यामध्ये रुजवलेली आहे. आज शालेय वर्गात शिकताना त्या शिस्तीची प्रखरतेने आठवण होते. महाविद्यालय भरण्याच्या घंटे पासून ते सुटण्याच्या घंटेपर्यंत आम्ही असे घड्याळाच्या काट्यावर चालत, बोलत, वागत होतो. याच शिस्तीने आम्हा सर्वांच्यामध्ये नकळत दहा गाभा घटक आणि दहा नैतिक मुल्यांची कधी रुजवणूक झाली ते कळलेच नाही. आज आपल्या जीवनात नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा, वैज्ञानिक दृष्टीकोन जो आला आहे तो केवळ आणि केवळ एस.एस.बी. कॉलेजच्या शिस्तीमुळे.

आता आठवणी छात्रसेवाकालाच्या. अशोकनगर येथे भास्कर गलांडे पाटील विद्यालय तर दुसरा शिरसगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाला. छात्रसेवाकाल म्हणजे एकप्रकारे १० दिवसांचे प्रॅक्टीकल आणि तोंडी परीक्षाच, बऱ्याच जणांचे तोंडचे पाणी पळायचे. भाग, सहभाग आणि सहवास यातून अनेक प्रश्न सुटत जायचे. आम्ही आमच्या ग्रुपने अशोकनगर आणि शिरसगाव येथील छात्रसेवाकाल अक्षरशः 'अजरामर' केले असे म्हणाले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. टाईमटेबल, प्रार्थना, परिपाठ, प्रत्यक्ष पाठ, अध्यापन, विविध स्पर्धा आयोजन, नियोजन, सादरीकरण, सांस्कृतिक रेलचेल हे सर्व काही छात्र सेवाकाळात ठासून भरलेल होत. जो-तो आपली जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडत होता आणि त्यातूनच नव्या भारताचा नव उन्मेशधारी 'शिक्षक' घडत होता. छात्रसेवाकाल म्हणजे 'मंतरलेले दिवस' पुन्हा न येणारे दिवस. आजही आठवले तरी या गीतांच्या ओळी आठवतात.

गेले ते दिन गेले...

खरच काळ किती झपाट्याने जातो. आज आम्ही स्थिर स्थावर आहोत रोजी रोटी कमावतो, आनंद देतोयघेतोय अध्ययन आणि अध्यापनातून. मात्र आमच्यातला हा 'सृजनशील' आणि 'हाडाचा' शिक्षक घडविला तो स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने. सुवर्ण महोत्सवानिमित्त मनापासून शुभेच्छा..! गुरुजनांना त्रिवार वंदन आणि एस.एस.बी.ला मानाचा मुजरा..!

जय हिंद! जय कर्मवीर!

**अविष्कार एक अभिनव उपक्रम**

शाळा, महाविद्यालय आले म्हणजे स्नेहसंमेलन आणि विविध गुणदर्शन आलेच. पण इथेही एस.एस.बी. कॉलेजची अनोखी उपक्रमशीलता अधोरेखित झाली. आम्ही ज्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात होतो त्यावर्षी साहित्य, संगीत आणि कला क्षेत्रातील दिग्गजांचे निधन झाले होते. त्यात शांता शेळके, कादंबरीकार शिवाजी सावंत, गायक,संगीतकार सुधीर फडके , कवी वसंत बापट, हरीवंशराय बच्चन आणि अभिनेत्री प्रिया तेंडुलकर या सर्व महान व्यक्तींना आम्ही 'अविष्कार' या सादरीकरणाच्या माध्यमातून श्रध्दांजली पर कार्यक्रम सादर केला. व्यवसायिक रंगभूमीवरील कलाकारांनी जसा प्रयोग करावा तसा हा आमचा प्रयोग अफलातून आणि अविस्मणीय ठरला.

## मंतरलेले दिवस

**अमितकुमार गागरे**

ऑगस्ट २००६ च्या पहिल्या आठवड्यामध्ये स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये मला बी.एड्. साठी प्रवेश मिळाला. याच महाविद्यालयात वडील १९८९ पासून प्राध्यापक म्हणून कार्यरत असल्याने बालपणापासून महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रमात सहभागी व्हायची संधी मिळाली. उन्हाळी आणि दिवाळीच्या सुट्ट्या बऱ्यापैकी ग्रंथालयातच पुस्तकांच्या सहवासात जायच्या. परंतु आता विद्यार्थी म्हणून मी महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. बोरुडे सर काम पाहत होते. शैक्षणिक मानसशास्त्र शिकविताना श्री. बोरुडे सर तल्लीन होऊन जायचे. ऑक्टोबर २००६ श्री. बोरुडे सर सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीचा कार्यक्रम महाविद्यालयाचा झाला, यानंतर श्री. शंकरराव गागरे सर यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला.

महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक अध्यापन परिपूर्ण तयारी करुनच घेत असत. शैक्षणिक तत्वज्ञान या विषयासाठी डॉ. व्हनबट्टे सर, माहिती तंत्रज्ञान शिकविण्यासाठी डॉ. नान्नर सर, शैक्षणिक समाजशास्त्र विषयासाठी श्री. पुंड सर तर शैक्षणिक मानसशास्त्र विषयासाठी हिरगळ मॅडम होत्या. दर्जेदार अध्यापन कसे असावे याचा वस्तुपाठ म्हणजे या सर्व प्राध्यापकांचे अध्यापन.

महाविद्यालयाला दोन वर्षापूर्वीच नॅक कडून ' ए' मानांकन प्राप्त झालेले असल्याने महाविद्यालयात उपक्रमांची रेलचेल होती. महाविद्यालयाची सुरुवातच परिपाठाने व्हायची. आमची बॅच ८० विद्यार्थ्यांची होती. १३ विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे प्रत्येक गटाला आठवड्यातील एक दिवस नेमून दिलेला असायचा. ज्या गटाचा दिवस असेल त्या गटातील विद्यार्थ्यांनी त्यादिवशी सकाळी १०:०० वाजता उपस्थित राहून परिपाठाची तयारी करायची. महाविद्यालयाची स्वच्छता, बागेला पाणी देणे ही कामे त्या गटानेच करावयाची. यातून आपोआपच स्वच्छता, नीटनेटकेपणा या मूल्यांची रुजवणूक होत होती.

प्रत्येक गटाने स्वत:चे नाव, गीत ठरविलेले होते. सहा दिवसात सहा वेगवगळे गट, त्यांची गीते, सकाळी १०:४५ वा. परिपाठाला सुरुवात व्हायची. प्राचार्य व प्राध्यापक सर्वजण परिपाठाला उपस्थित असत. दिवसाची सुरुवातच या संस्काराने व्हायची.

सूक्ष्म अध्यापन, सेतू पाठ, सराव पाठ यामध्ये सुद्धा उत्कृष्ट पाठ घेण्यासाठी निकोप स्पर्धा असायची. परिपाठाने सुरु झालेला दिवस संध्याकाळी दुसऱ्या एखाद्या उपक्रमाने कधी संपायचा हे कळायचेच नाही.

अध्यापनाबरोबरच शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणकोणते सहशालेय उपक्रम कशाप्रकारे राबवावे याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन व प्रशिक्षण आम्हाला महाविद्यालयात शिकायला मिळाले. दिवाळीच्या सुट्टीमध्ये प्राचार्यानी कमवा व शिका योजने अंतर्गत किमान पाच घरात जाऊन पुस्तकांचे महत्व सांगून पुस्तके विकण्याचे कौशल्य विकसित केले.

थोर पुरुष, समाज सुधारक यांची जयंती किंवा पुण्यतिथी फोटोला हार घालून साजरी न करता त्यांच्या विचाराचे हस्तलिखित तयार करवून घेतली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे उपक्रम कशाप्रकारे राबवावयाचे याचे प्रशिक्षण उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसांचे व्यक्तिमत्व विकास शिबिर राबवून दिले.

व्यायामाची व आरोग्याची आवड निर्माण व्हावी यासाठी रोज सकाळी ५.०० वाजता योगासन वर्ग प्राचार्यानी महाविद्यालयात सुरु केले. आमच्या बॅच मध्ये श्री.अनिरुद्ध पटारे नावाचा विद्यार्थी होता. जो योगगुरु होता व अनेक योगासनांचे कोर्सेस त्याने केलेले होते. तो हे पहाटेचे योगासन वर्ग घ्यायचा. होस्टेल मध्ये राहणारी सर्व मुले या योगासन वर्गाना उपस्थित असायची.

आमच्या बॅच मध्ये शेतकरी कुटुंबातील मुले तर बरीच. परंतु शेतामध्ये कधीही न गेलेली मुले होती. आयुष्यात प्रथमच खुरप्याने गवत काढण्याचा अनुभव याच महाविद्यालयामुळे मिळाल्याचे आवर्जून काहीजण सांगतात.

उत्कृष्ट शिक्षक घडविणारे महाविद्यालय असा नावलौकिक या महाविद्यालयाचा आहे. तो या विविध उपक्रमांमुळेच. वर्षभरात अनेक वेगवेगळ्या विषयांच्या तज्ज्ञानी महाविद्यालयात येऊन व्याख्याने दिली. बहिशाल व्याख्यानमाला या पुणे विद्यापीठातील योजनेमुळे उत्कृष्ट व्याख्याने ऐकण्याची, अनुभवण्याची संधी मिळाली. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत, परिचय, आभार, सूत्रसंचालन हे आम्हीच करावयाचे असल्याने कार्यक्रम नियोजन कसे करावे याचे आपोआच प्रशिक्षण होत होते.

एखादा कार्यक्रम, महाविद्यालयाची स्वच्छता यामध्ये सर्व विद्यार्थी मनापासून सहभागी व्हायचे. श्रमपरिहारासाठी प्रत्येक कार्यक्रमानंतर प्राचार्य सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना अल्पोपहार दयावयाचे. महाविद्यालयातील श्री. जगधने मामा उत्कृष्ट स्वयंपाकी होते. खर्चाची बचत व्हावी, आणि सर्वांना आरोग्यपूर्ण, स्वच्छ जेवण, अल्पोपहार मिळावा, यासाठी आम्ही विद्यार्थीच जगधने मामांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमानंतर जेवण बनवायचो. कर्मवीर आण्णांच्या बागेतील मुले अशाच प्रकारे स्वयंपाक बनवत असतील, असा विचार प्रत्येकाच्या मनात यायचा. या उपक्रमातून जगधने मामांनी मुलींना अनेक पदार्थ बनवायचे तर शिकविलेच. परंतु घरामध्ये पाहुणे जास्त आले तर स्वयंपाकाचे प्रमाण कसे ठेवायचे हेही शिकविले.

सहज शिक्षण, औपचारिक शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण याचा त्रिवेणी संगम म्हणजे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन बिनभिंतीची शाखा, म्हणजे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर.

आमच्या बॅचच्या वेळेस महाविद्यालयाने व्यक्ती अभ्यास पद्धती या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केलेले होते. हे दोन दिवसीय चर्चासत्र विविध मान्यवरांची भाषणे, शोधनिबंध सादरीकरण, सायंकाळी विविध गुणदर्शन यासारख्या कार्यक्रमांनी भरगच्च झालेले होते. सर्वांसाठी ही एक शैक्षणिक विचारांची मेजवानीच होती. चर्चासत्राच्या महिनाभर अगोदरपासून नियोजन सुरु होते. निमंत्रण पत्रिका, शोधनिबंध वाचन, पाहुण्यांची राहण्यांची, जेवणाची व्यवस्था यांची लगीनघाई चालू होती. श्री. पुंड सर, श्री. व्हनबट्टे सर यांनी विद्यार्थ्यांचे गट तयार करुन प्रत्येकाला त्यांची जबाबदारी सोपवलेली होती. अगदी रात्री, अपरात्री श्रीरामपूर रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड येथे लांबून येणाऱ्या पाहुण्यांना घ्यायला विद्यार्थी रात्रभर थांबून होते. आमच्या सर्वांसाठीच हा एक वेगळा, समृद्ध करणारा अनुभव होता.शिक्षकी जीवनात कार्यक्रमाची पूर्वतयारी, नियोजन आणि कार्यक्रम झाल्यानंतरची कामे कशी करावी याचे हे प्रात्यक्षिकच होते.

शिक्षक प्रशिक्षणाचा आत्मा म्हणजे सूक्ष्म अध्यापन कार्यशाळा. महाविद्यालयातील प्राचार्य आणि प्राध्यापक यांनी ही कार्यशाळा अत्यंत काटेकोर नियोजन करुन प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेसा वेळ देऊन घेतली. प्राध्यापकांचे प्रत्येक कौशल्याचे डेमो लेसन आणि त्या नंतर त्या कौशल्याविषयी घेतलेली चर्चा यामुळे संबधित कौशल्याविषयी परिपूर्ण माहिती मिळाली. या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कौशल्याच्या सादरीकरणाला सर्व प्राध्यापक आवर्जुन उपस्थित राहत असत. कौशल्याच्या चर्चेत सहभागी होत. बुद्धीवादी चर्चा कशी असावी, मुद्दे कसे मांडावेत याचा उत्तम नमुना म्हणजे ही कार्यशाळा.

महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम जितके गुणवत्तापूर्ण व दर्जेदार तितका शिक्षक विद्यार्थी दर्जेदार घडत असतो. श्रीरामपूर बी.एड. महाविद्यालय म्हणजे दर्जेदार उपक्रमांची खाण. विविध प्रकारच्या स्पर्धा व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्राध्यापक सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असत.

रयत शिक्षण संस्था, सातारा मार्फत आयोजित राज्यस्तरीय कर्मवीर जयंती वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्याची संधी महाविद्यालयाने आम्हाला दिली. तसेच पुणे विद्यापीठ पुणे व बनारस हिंदु विद्यापीठ बनारस यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित निवडक विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरसिंग द्वारे चर्चा करण्याची संधी मिळणार होती. महाविद्यालयाने त्यावेळी मला आणि आमचा मित्र श्री. मनिष गवांदे यांना या स्पर्धेसाठी पाठविले. मुलाखतीद्वारे आमची निवड झाली. परंतु काही तांत्रिक

कारणामुळे ही व्हिडीओ कॉन्फरन्स होऊ शकली नाही.

अशाप्रकारे महाविद्यालयाने अनेक विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धेत गुणकलेनुसार सहभागी होण्याची संधी दिली.

औपचारिक शिक्षणाबरोबरच अप्रत्यक्ष शिक्षणाच्या अनेक संधी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिल्या. कै.ॲड रावसाहेब शिंदे, मीनाताई जगधने, कै.सुमनभाई शहा, श्री. रामदासजी डांगे यासारख्या अनेक मान्यवरांशी मनमोकळ्या गप्पा मारण्याची व या व्यक्तिमत्वांना अनुभवण्याची संधी याच महाविद्यालयामुळे मिळाली.

शालेय व महाविद्यालयीन जीवनात मिळालेले शैक्षणिक अनुभव व बी.एड. महाविद्यालयात मिळालेले शैक्षणिक अनुभव यांची तुलना केली तर बी.एड. महाविद्यालयातील अनुभव काकणभर अधिकच. सूक्ष्म अध्यापन, सराव पाठ, अध्यापन पद्धतीचे गट, आंतरवासिता गट यासारख्या वेगवेगळ्या गटात, वेगवेगळ्या विद्यार्थ्यांबरोबर काम करावे लागल्यामुळे आपोआपच सहकार्याची भावना वाढीस लागली. महाविद्यालयातील आमची ८० विद्यार्थ्याची बॅच नावानिशी एकमेकांना ओळखू लागली.

महाविद्यालयाचे मुलींचे व मुलांचे वेगवेगळे वसतिगृह होते. वसतिगृहातील मुलामुलींसाठीही महाविद्यालयाने विविध उपक्रम राबविले.

मुलींच्या वसतिगृहामध्ये रोज संध्याकाळी जेवणा अगोदर प्रार्थना, सुविचार, बोधकथा, चर्चा असा अर्धा तास असायचा. यामुळे कमी बोलणाऱ्या मुलीही गटामध्ये सहभागी होऊ लागल्या, आत्मविश्वासाने आपली मते मांडू लागल्या.मुलांच्या वसतिगृहामध्ये मुलांचे वाढदिवस प्राचार्य, प्राध्यापक यांच्या समवेत आवर्जुन साजरे होत. त्यामुळे शिक्षक विद्यार्थी या नात्याची मजेशीर गुंफण तयार होत असे. आमच्या बॅचच्या श्री. मनोज कदम याने त्याला मिळालेली सर्व स्कॉलरशिपची रक्कम महाविद्यालयाला देऊ केली. या रकमेतून महाविद्यालयाने प्रत्येक बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी आदर्श विद्यार्थी, आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार सुरु केले.

आमच्या बॅचने त्यावेळेस लावलेली झाडे आता मोठी होऊन सर्वांना सावली देण्याचे काम करत आहेत. तसेच महाविद्यालयातून प्राप्त केलेली ज्ञानाची शिदोरी घेऊन विद्यार्थी शिक्षक वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालयामध्ये ज्ञानदानाचे काम करीत आहेत.

सध्या बी.एड. चा अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीवरुन दोन वर्षाचा झालेला आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०१९ नुसार शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम चार वर्षाचा असावा असे सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे भविष्यात बी.एड. अभ्यासक्रम राबविणारी महाविद्यालये २०२८ नंतर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयाला जोडली जातील . त्यामुळे कदाचित या महाविद्यालयांचे स्वतंत्र अस्तित्व राहणार नाही. परंतु बी.एड. अभ्यासक्रम एक वर्षाचाच असतांना या महाविद्यालयाने आम्हांला जे भरभरुन दिले, ते कधीही न संपणारे आहे.

महाविद्यालयाचा आठवड्यातील पहिला दिवस सोमवार कधी सुरु व्हायचा आणि शेवटचा दिवस शनिवार कधी यायचा हे कळायचेच नाही. रोज संध्याकाळी घरी जाताना काचफलकातील नोटीस बोर्डवर कुठल्या तरी कार्यशाळेची नोटीस लागलेली असायची. दिवस कधी सुरु व्हायचा आणि कधी संपायचा हे कुणालाही समजायचे नाही, पण यामध्येच आमचे घडणे लपलेले होते. या महाविद्यालयाने आम्हाला शिक्षणाचा अर्थ समजावलाच. पण तो अर्थ जगायलाही शिकविले. शिक्षणातील विचारप्रवाह, संकल्पना, यांची ओळख करुन दिली. अनेक नवीन मित्र याच महाविद्यालयाने मला दिले. जीवाला जीव देणारे मित्र याच महाविद्यालयात मला भेटले. आयुष्यातील सहचारिणी मला याच महाविद्यालयात भेटली. चांगल्या शिक्षकांचे विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्व याच महाविद्यालयाने मला समजावले.

शिक्षण प्रशिक्षण क्षेत्रात १९७० पासून काम करणारे हे महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीस आम्हा सर्व विद्यार्थ्यांकडून भरभरुन शुभेच्छा !

# बी.एड.,मी आणि माझे करिअर

सौ. नयना पगारे

The capacity to learn is a gift,
The ability to learn is a skill.
The Willingness to learn is a choice

-Brain Herbert.

या विचाराप्रमाणे मी माझी शिक्षणाची आवड कधीच सोडली नाही. आपल्या आयुष्यात कुणीतरी मोरपीस फिरवावा, आणि जीवनाची दिशाच बदलून जावी असा काहीसा अनुभव माझ्या आयुष्यात घडून आलाय, आणि हे मोरपीस म्हणजेच जणू मी स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे घेतलेली शिक्षणशास्त्राची पदवी.

जीवनाला अशी कलाटणी मिळाली की, सगळ स्वप्नच आहे, की काय अशा सुखद अनुभूतीची प्रचिती आली. माझी तर गोष्टच वेगळी आहे. मुंबई विद्यापीठातून बी.ए. (Economics)पदवी घेऊन श्रीरामपूरसारख्या तालुक्याच्या गावी स्थित असलेल्या श्री. नितीन यशवंत यांच्याशी विवाहबद्ध झाले. त्यांच्याच प्रेरणेने, प्रोत्साहनाने लग्नानंतर १२ वर्षानंतर २०१४ साली एस.एस.बी. महाविद्यालयात प्रवेश घेतला. योगायोगाने आमची शेवटची बॅच १ वर्षाची, वर्षाची कसली आठच महिन्याची एखाद्या खाणीतल्या हिऱ्याला पैलू पाडावेत तशी कारागीरी कसब असणारे, गुरुतुल्य, मातृतुल्य शिक्षकांची नाळ जोडली गेली. आणि त्यांच्या कसबीप्रमाणेच त्यांनी माझ्यात खूप काही गुण अगदी ठासून भरले. शिवाय माझ्यात उपजत असलेल्या कलांना तेज देऊन उजळवण्याचे काम या गुरुंनी केले.

त्यांच्या प्रत्येक परीक्षेत तावून तुलाखून निघून अखेर त्यावर्षी कॉलेजात ८४% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकविला आणि माझा आत्मविश्वास शिगेला पोहचला. जणू काही मनाने ठरवून टाकले आता थांबायचे नाही. शिक्षण पुन्हा सुरु ठेवले. M.A. (Economics) पूर्ण केले. त्यातूनच TET / TAIT या परीक्षांची तयारी सुरु ठेवली व पहील्याच वर्षी यशस्वीही झाले. त्यातच TAIT परीक्षेत उत्तम गुण मिळवले व आश्चर्य म्हणजे २०२० मध्ये पवित्र पोर्टलद्वारे मेरीटने निवड होऊन आपल्याच रयत शिक्षण संस्थेसारख्या नावाजलेल्या संस्थेत काम करण्याची संधी मिळाली आणि केवळ स्वप्न वाटणारी गोष्ट प्रत्यक्षात आली. इ. ९ व १० वी साठी शिकवण्यासाठी कायमची नेमणूक झाली.

विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे आज कालच्या या बाजारी दुनियेत खऱ्या गुणवत्तेची कदर करणाऱ्या या रयत शिक्षण संस्थेचा एक सदस्य होण्याची संधी मिळाली त्याबद्दल मी कायम त्यांची ऋणी राहील.

अजून काय हवे असते व्यक्तीला. आपण आपल्या कष्टाने, जिद्दीने, प्रयत्नाने यश खेचून आणावं आणि स्वावलंबनाने ताठ उभे रहावे यापेक्षा दुसरे सुख काय? माझ्या सारख्यासाठी तर ही मोठी अभिमानाची गोष्ट ठरली, आणि ह्या साऱ्या कतृत्वाचे श्रेय मी माझ्या बी.एड. पदवीलाच देते . तसेच या काळात जीवाला जीव देणाऱ्या मित्रमैत्रिणींची साथ तितकीच महत्वाची ठरली.

आज समाजात विद्यार्थ्यांमध्ये डी.एड., बी.एड. बद्दल खूपच उदास दृष्टिकोन निर्माण झालेला दिसून येतोय. नोकरी मिळत नाही हा गैरसमज झालाय,पण तस नाही. मनात जिद्द,चिकाटी,कष्ट करण्याची तयारी, स्वगुण असतील तर नक्कीच असाध्य ते साध्य होतेच.

या बी.एड. नेच माझ्यात एक आत्मविश्वास, जिद्द, कमी वेळेत जास्त काम करण्याची तयारी निर्माण केली. म्हणूनच आज मी माझ्या आयुष्यात पूर्णपणे यशस्वी आहे. बी.एड. करताना अनेक उपक्रम, व्याख्याने, प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन, छात्रसेवाकाल यासारख्या गोष्टीमधून माझ्यात एक प्रकारचा कणखरपणाच निर्माण झाला. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत स्वत:तले बेस्ट (चांगलेच) देण्याची सवय मला जडली. आणि मला हवे ते मी मिळवू शकले. कॉलेजमधील प्राध्यापकांचे कायम स्फुर्तीपर, मार्गदर्शनाची माझ्या यशात भर पडत गेली.

शेवटी एवढेच सांगावसे वाटते आज मी जी काही आहे, ज्या यशाच्या शिखरावर आहे ते केवळ या माझ्या बी.एड. पदवी मुळेच. माझ्या या एस.एस.बी. कॉलेज ऑफ एज्युकेशन व माझ्या प्राध्यापकांची आयुष्यभर ऋणी राहील. मला ते ऋण फेडायचेही नाही मी आयुष्यभर त्यांच्या ऋणात राहू इच्छिते.

# बी.एड.मध्ये मी काय शिकले?

रोहिणी कोळगे

**'आयुष्य एकदाच मिळते**
**त्यात खूप काही शिकायचे असते**
**मलाही आयुष्यात खूप काही शिकायला मिळाले**
**ते मला बी.एड. ने दिले'**

बी.एड. मध्ये असताना खूप काही शिकायला मिळाले. मी सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेचे स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर येथे बी.एड.पूर्ण केले. या एका वर्षात सर्व प्राध्यापकांनी खूप छान शिकवले.

मा. प्राचार्य श्री. पोंधे सर अतिशय मनमिळावू स्वभावाचे,शिस्तप्रिय आणि सर्वांना समजून घेणारे तसेच प्रा.श्री. नान्नर सर,प्रा.श्री. करवर सर, प्रा.श्री. पूंड सर, प्रा.श्री. पाटोळे सर, प्रा.श्री. भोये सर आणि प्रा.सौ. हिरगळ मॅडम या सर्वांनी आम्हांला बहुमोल असे मार्गदर्शन केले. प्रत्येकांनी त्यांच्या विषयाचे सखोल असे ज्ञान दिले. एखादा घटक समजून सांगताना दैनंदिन जीवनातील खूप उदाहरणे दिली.

माझे डी.टी.एड्. झाले असल्यामुळे बी.एड. करायला सोपे गेले. पाठ कसा घ्यायचा, टाचण कसे काढायचे याची माहिती होती. टाचण काढताना कधी काही चुकल तर पुन्हा टाचण लिहायला सांगायचे. मीही चुका दुरुस्त करुन पुन्हा टाचण लिहायचे. सर्व प्राध्यापकांना टाचण एकदम व्यवस्थित लिहिलेले पाहिजे असायचे. तरच पाठ घेऊ दयायचे. यातून एक गोष्ट समजली की शिक्षकांनी स्वत: आधी परिपूर्ण असावे.

आता बी.एड. दोन वर्षाचे झाले आहे. आमची २०१४-२०१५ ची शेवटची बॅच एक वर्षाचे बी.एड.होते. या १ वर्षात खूप धावपळ झाली. परंतु शिकायलाही खूप मिळाले. कमी वेळेत एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन कसे करावे हे समजले. अभ्यासाव्यतिरिक्त शैक्षणिक उपक्रम घेतले जायचे. त्यातून आमच्या ज्ञानात भर पडण्यास मदत होत असे.

कधी कधी अचानक कार्यक्रम घेतले जायचे. मा.प्रा.श्री. करवर सर अगदी कमी वेळेत कायक्रमाचे नियोजन खूप छान करायचे. कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पडायचा. मी बी.एड. ला असताना खूपदा सूत्रसंचालन केले आहे. अनुमोदन देणे, आभार मानने यासारख्या जबाबदाऱ्याही पार पाडल्या आहेत. त्यातून स्टेजवर बोलायचा आत्मविश्वास माझ्यात निर्माण झाला.

मी खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था, अशोकनगर या संस्थेतील न्यू इंग्लिश स्कूल, शिरसगाव ता.श्रीरामपूर येथे सहशिक्षिका म्हणून काम करते. शाळेत काही कार्यक्रम असल्यावर मी माझे मनोगत व्यक्त करते. कार्यक्रमात बोलायची संधीही मला दिली जाते. म्हणजे बी.एड.ने स्टेजवर बोलायचा जो आत्मविश्वास माझ्यात निर्माण केला त्याला प्रत्यक्षात उतरविण्याचे काम न्यू इंग्लिश स्कूल,शिरसगाव शाळेत केले जाते.

बी.एड.ला असताना क्रिडा स्पर्धा घेतल्या गेल्या. तसेच बुद्धिबळ स्पर्धा देखील घेतली. बुद्धिबळ स्पर्धेत मला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मला प्रमाणपत्र आणि ट्राफी मिळाली तो बी.एड.च्या जीवनातील माझा खूप अविस्मरणीय क्षण होता. संधी मिळाली की त्या संधीचे सोने कसे करावे हे बी.एड. ला असताना शिकवले गेले.

बी.एड.ला असताना छात्रसेवाकाल भास्करराव गलांडे पाटील विदयालय,अशोकनगर येथे होता. त्यावेळी प्रा.श्री. करवर सर यांनी माझ्यावर एक जबाबदारी दिली ती म्हणजे वेळापत्रक तयार करणे. आमच्या गटात १४ छात्राध्यापक होते. या सर्वांचे वेळापत्रक मी खूप छान केले. त्याबद्दल सरांनी कौतुकही केले. ऐनवेळी तास कसे ॲडजस्ट करायचे तेही शिकायला मिळाले. या छात्रसेवा काळामध्ये शाळेतील कामकाज कसे चालते हे समजले. शाळेत वेळेवर

गेले पाहिजे, वर्गावर वेळेत गेले पाहिजे. त्याचप्रमाणे वर्गनियंत्रण ठेवून विद्यार्थ्यांना कसे शिकवावे हे समजले. एखादा घटक शिकविताना विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन तो घटक कसा शिकवावा हे समजले. विद्यार्थ्यांच्या काय काय समस्या असतात हे जाणून घ्यायला शिकले. त्याचप्रमाणे छात्रसेवाकालामध्ये आम्ही वेगवेगळ्या क्रिडा स्पर्धा देखील घेतल्या. उदा. कबड्डी,खो-खो, शर्यत, लिंबू-चमचा, इ. स्पर्धा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देता आला. यातून हे शिकायला मिळाले की कोणत्या विद्यार्थ्याला कोणत्या खेळाची आवड आहे. फक्त त्यांच्या खिलाडू वृत्तीला वाव देणे गरजेचे आहे.

बी.एड.ला असताना मला तालुकास्तरीय आणि राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायची संधी मिळाली. यातून स्टेजवर बोलायचा अजून आत्मविश्वास वाढला. एक प्रसंग सांगावा वाटतो, मी २ जानेवारी रोजी कोपरगाव येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी गेले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३ जानेवारीला कॉलेजमध्ये गेले. एक परीक्षा होती. मी माझा नंबर शोधत होते. तेव्हा मा.प्रा.श्री. पाटोळे सर मला म्हणाले, आज सावित्रीबाई फुले जयंती आहे. तू भाषण करायच. मी म्हणाले, सर माझी काहीच तयारी नाही. सर म्हणाले, तयारी नसली तरी तू खूप छान बोलशील याची मला खात्री आहे. मी म्हणाले, ठीक आहे. करते तयारी. परीक्षा झाली. त्यानंतर कार्यक्रम सुरु झाला. सरांना एक विनंती केली. सर मी सर्वात शेवटी बोलते, सर म्हणाले, ठिक आहे. बाकीच्यांचे वक्तृत्व होईपर्यंत मी एक कविता केली आणि ती सादर केली. सरांना ती कविता खूप आवडली. मला म्हणाले, तुझ्यातल्या कविता करण्याच्या कौशल्याला आयुष्यभर जपून ठेव.

आता ८ मार्च २०२१ चा प्रसंग सांगते. ८ मार्च जागतिक महिला दिन होय. सकाळी एक कविता लिहिली. शाळेत महिला दिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मग मी सादर केली. सर्वजण मला म्हणाले, छान बोललात. त्यावेळी मला खूप आनंद झाला. खूप छान वाटल. त्यांच्या त्या शाबासकीचे शब्द माझ्यासाठी खूप अनमोल होते. मला एवढेच सांगायचे आहे की जो आत्मविश्वास माझ्यात तयार झालाय तो फक्त बी.एड.मुळेच झालाय.

अभ्यासाचा ताण कमी व्हावा म्हणून मा.प्रा.श्री. भोये सर आणि मा.प्रा.श्री. पाटोळे सर यांनी अनेक उपक्रम राबवले. त्यामुळे आम्हा छात्राध्यापकांना कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. रोजचे तास, पाठ, प्रॅक्टिकल अभ्यास या सर्वांचा ताण कमी होण्यास मदत झाली. म्हणजे यातून एक गोष्ट समजली की रोजच्या धावपळीच्या जीवनात आपण जर आपले आवडते छंद, आवडी यासाठी जर वेळ दिला तर तो कामाचा ताण कमी होऊ शकतो.

बी.एड.ला असताना खूप धावपळीचे जीवन जगायला शिकले. कामाचे योग्य नियोजन कसे करावे ते समजले. विद्यार्थ्यांना कसे शिकवावे ते शिकायला मिळाले. वेळेचे नियोजन कसे करावे ते शिकायला मिळाले. वेळेचे नियोजन कसे करावे ते समजले. आत्मविश्वासपूर्वक बोलायला शिकले. हे सर्व मला बी.एड. ने दिले.

बी.एड. कॉलेजचे प्राचार्य श्री. पोंधे सर, सर्व प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, माझे सर्व सहकारी छात्राध्यापक या सर्वांचे मी मनापासून आभार मानते. कारण तुम्हां सर्वांकडून मला खूप काही शिकायला मिळाले.

## सुसंस्कृत बनवणारे शिक्षणशास्त्र महाविद्यालय

**प्रियंका तिवारी - खराडकर**

मी २००१-२००२ या शैक्षणिक वर्षात बी.एड. प्रशिक्षण घेतले. त्यावेळी बी.एड.ला नंबर लागणे हे मेरीट वर अवलंबून होते. सीईटी परीक्षा नव्हती. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून संपूर्ण महाराष्ट्रातून हे सीट अलॉट केले जात असत. ओपन कॅटेगिरीच्या फक्त दोन जागा होत्या व त्यातून माझा व उदगीर येथील वर्षा सबनीस हिचा मुलींमधून एस.एस.बी.साठी नंबर लागला होता. त्यावेळी ठरवले होते की श्रीरामपूर मध्ये नंबर लागला तरच बी.एड.करेल अन्यथा नाही. परंतु नशिबाने माझा नंबर एस.एस.बी. कॉलेजला लागला व माझा शैक्षणिक प्रवास सुरु झाला. मी २००१ मध्ये एम.ए.इंग्लिश, आर.बी.एन.बी. या कॉलेजमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केले होते. शिक्षण शास्त्राशी माझा तसा अर्थाअर्थी संबंध नव्हता. परंतु पहिल्या दिवसापासनूच कडक शिस्त, स्वयंशिस्त व शैक्षणिक मूल्यांचे महत्व देणारे धडे मिळू लागले. पुस्तकातील गाभा घटक व मूल्ये फक्त पुस्तकातच नसतात तर ते शिक्षकाने दैनंदिन जीवनात उतरवले नाहीत तर तो शिक्षक बनूच शकत नाही. ही मुल्ये आपल्या जीवनाचा जोपर्यंत एक भाग बनत नाहीत तोपर्यंत तुम्हाला या कॉलेजमध्ये स्वस्थ बसता येणारच नाही असे काही भारावलेले वातावरण कॉलेजमध्ये होते. इथे दररोज नवीन उपक्रम असत. रोज परीक्षा असायची. यापूर्वी कधीतरी दोन महिन्यातून एकदा परीक्षा देण्याची सवय होती. परंतु बी.एड.ला मात्र लेसन नोट्स तयार करणे, लेसनची तयारी करणे हे करता करता आठवड्यातून दोन ट्युटोरियल्स असायच्या. यात पायाभूत विषय व मेथड आणि कन्टेन्ट यांचे विषय यांचा बरोबरीनेच समावेश असायचा. लेसन नोट काढताना बऱ्याच प्राध्यापक मंडळीबद्दल ऐकले होते की खराब हस्ताक्षर व असंबद्ध मुद्दे आढळल्यास ते तुमची लेसन नोट फाडून फेकतात. अशी लाजिरवाणी वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून एकमेकांच्या सल्ल्याने लेसन नोटस तयार करुन फायनली त्या शिक्षकांसमोर ठेवणे ही मोठी परीक्षाच असायची. परंतु माझे मेथड मास्टर डॉ. आर.ए.कुंभार सर जे त्यावेळी अध्यापना बरोबरच स्वत:देखील पीएच.डी. चा अभ्यास करीत होते. त्यांचा Approach हा Considerate, Kind and Cooperative असा Three K होता. त्यामुळे माझे हस्ताक्षर खूप खराब असतानाही त्यांनी कधीही माझी लेसन नोट फाडून फेकली नाही. परंतु त्यातील चुका मात्र नक्कीच दुरुस्त करण्यास वेळोवेळी सांगितले.

> "Where the pools are bright and deep,  
> where the gray trout lies asleep,  
> Across the river and over the lee,  
> That's the way for Billy and me!"

ही त्यांनी वार्षिक पाठासाठी शिकवलेली डेमो कविता अजूनही मी गुणगुणत असते. कथाकथन करावे तर ते कुंभार सरांनीच आणि विद्यार्थ्यांनी फक्त ऐकत राहावे! ऐकता ऐकता कधी आपण त्या कथेचाच एक भाग बनून जातो व ती कथा आपल्यासाठी आपले एक अविस्मरणीय विश्व बनून जाते हे आपल्यालाच कळत नाही. अशाच प्रकारे काही न विसरता येणाऱ्या सरांनी सांगितलेल्या कथा म्हणजे रवींद्रनाथ टागोर यांची काबुलीवाला, आणि सर्पमित्रांची स्वत:चा जीव धोक्यात घालून गावकऱ्यांचा जीव वाचवण्याचा कथानक असलेली ती कथा मला अजूनही आठवतात.

**शपथ ही घेतो आम्ही, सर्वांच्या साक्षीने,**  
**देणार नाही हुंडा, घेणार नाही हुंडा**

या लोकगीतीच्या माध्यमातून सर्व विद्यार्थी शिक्षकांमध्ये नकळतपणे हुंडा जनजागृती सरांनी कशी केली व तो संस्कार आमच्या आत कसा रुजला हे आम्हाला सर्व विद्यार्थी शिक्षकांना सुद्धा कळले नाही.

'छात्रसेवाकाल' म्हणजे सर्वार्थाने pratical knowledge घेण्याचा कालावधी होय. यात मला इयत्ता सहावीच्या वर्गाची वर्गशिक्षिका करण्यात आले होते. ही शाळा होती, वडाळा महादेव येथील माध्यमिक शाळा. Class control हा संपूर्णपणे शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी असलेला संवाद आणि approach यावर अवलंबून असतो आणि शिक्षकाने जर विद्यार्थ्यांच्या जीवनाशी तो शिकवत

असलेल्या धड्यांचा संबंध लावला तरच मुले शिक्षकांचे म्हणणे ऐकून घेतील अन्यथा ते शिक्षकास जुमानत नाहीत व तसे करण्यास ते स्वतंत्र असतात कारण, त्यांच्या भावविश्वाचे ते स्वत: संचालक असतात. त्यामुळे तुम्ही जग जिंकू शकता परंतु मुलांची मने मात्र जिंकण्यासाठी तुम्हाला त्यांच्या विश्वातच शिरावे लागेल आणि त्यांच्या कलाने त्यांच्या आवडीने तुमच्या अध्यापन पद्धतीला वळवावे लागेल तरच मुले तुमच्याकडून योग्य शिक्षण घेतील व तुम्ही त्यांच्यात अपेक्षित वर्तन बदल घडवून आणू शकाल, हा संदेश डॉ.कुंभार सर आणि पुंड सर यांनी दिला.

कुंभार सरांनी फक्त बी.एड. या वर्षापुरतेच मार्गदर्शन केले नाही तर त्यांनी पुढील आयुष्यात देखील प्रत्येक वळणावर योग्य मार्गदर्शन करुन माझ्या आयुष्यात एका दीपस्तंभाचे कार्य केले आहे. सरांच्या प्रेरणेमुळेच मी एम.एड. साठी प्रवेश घेऊन पुढे शैक्षणिक कार्यात जास्त सहभाग घेऊ लागले. मी आर.बी.एन.बी. येथे बी.ए. आणि एम.ए. च्या विद्यार्थ्यांना शिकवत असताना त्या विद्यार्थ्यांमध्ये आढळून आलेल्या शैक्षणिक कमकुवतीची चर्चा कुंभार सरांबरोबर करीत असे. त्यावेळी सरांनी मला महत्वाचा कानमंत्र दिला तो म्हणजे जोपर्यंत तुमच्यासारखे संशोधक प्रवृत्तीचे शिक्षक फक्त ग्रॅज्युएशन आणि पोस्ट ग्रॅज्युएशन ला शिकवत राहतील तोपर्यंत असेच कमकुवत विद्यार्थी तुमच्याकडे येत राहतील कारण तुमच्यासारख्या शिक्षकांनी प्राथमिक शिक्षण क्षेत्रात जाऊन खालील वर्गांमध्ये पाया पक्का केला पाहिजे. त्यामुळे मला पुढे डी.एड. कॉलेज येथे शिक्षक प्रशिक्षक बनण्याची संधी मिळाली व ती मी लगेच स्विकारली कारण सरांचे वाक्य मला प्रेरणादायी ठरले व मी शिक्षणाचा पाया असलेले प्राथमिक, पूर्व प्राथमिक शिक्षण व शिक्षक प्रशिक्षण,संशोधन ह्यासाठीच माझे आयुष्य लावण्याचा संकल्प केला. पुढे डी.एड. कॉलेज मध्ये प्राचार्य, डायटमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक, पंचायत समितीमधील साधन व्यक्ती व शिक्षक यांना कृती संशोधनाचे प्रशिक्षण देणे, आशयज्ञान अभिवृद्धीसाठी मार्गदर्शन इत्यादी कार्य केले. यातूनच पुढे डहाणूकर इंग्लिश मीडियम शाळेची प्राचार्या व श्रीमती मालती डहाणूकर शैक्षणिक संस्थेची एज्यूकेशन ऑफिसर म्हणून मी कार्यरत आहे. या संपूर्ण प्रवासात कुंभार सरांनी फक्त मलाच नव्हे तर माझ्या शाळेतील सर्व शिक्षकांच्या टिम ला देखील मार्गदर्शन केले आहे. अशा या हाडाच्या शिक्षकाला शतश: नमन.

'या देहाला पुंड असे म्हणतात' अशी स्वत:ची ओळख करुन देणारे पुंड सरांनी पहिल्या भेटीतच धडा दिला तो म्हणजे देह अशाश्वत आहे आणि देहाची नावे बदलत राहतील. परंतु आत्मा अमर आहे आणि तो कपडे बदलल्याप्रमाणे शरीर बदलत असतो. त्यामुळे आपण जाणतो ते फक्त देहाचे नाव आणि म्हणूनच या देहास काय म्हणतात असे मुक्तपणे म्हणणारे आणि विरक्तता, अलिप्तता शिकवणारे त्यांचे तत्वज्ञान! किती गहन संदेश त्यांनी किती सोप्या पद्धतीने आमच्यापर्यंत पोहोचवला! अशी झाली माझ्या अध्यात्मिकतेची सुरुवात.बोर्डे सरांनी शिकवलेले बालमानसशास्त्र व विविध उदाहरणातून केलेले त्याचे विवेचन त्यामुळे आज प्रत्यक्ष शाळेत काम करताना विद्यार्थ्यांच्या विविध वर्तनाचे अर्थ लावताना एका निरीक्षकाची भूमिका सहज करता येते व विद्यार्थी वर्तनाबाबत कौन्सिलींग करता येते.

पी.ए. देशमुख सरांचे शैक्षणिक तत्वज्ञान कोण विसरु शकेल?''गंगा जटेतून वाहे,''' क्या मेरा? सब कुछ तेरा.'' त्यांनी बनवलेली कॅमेरा या शब्दाची व्याख्या. आणि फोटोग्राफर फोटो काढताना आपल्याला हसायला का सांगतात याचे त्यांनी केलेले विवेचन. जर फोटो काढताना तुमची स्थिती चांगली असेल तरच तुमचा फोटो चांगला येईल. तसेच जेव्हा तुम्ही विद्यार्थ्यांच्या संपर्कात येतात त्यावेळी तुम्ही हसतमुख असाल तर विद्यार्थी देखील तुम्ही देत असलेले ज्ञान सहज ग्रहण करण्याच्या स्थितीत असतील असे सरांनी सांगितलेले शैक्षणिक तत्वज्ञान!

गागरे सर शांत, हळू आवाजात बोलणारे सदैव हसतमुख व अतिशय अभ्यासू व्यक्तिमत्व. त्यांचे व्यक्तिमत्व विकास पर व प्रेरणादायी प्रसंगाचे लेखन असणारे पुस्तक ''झेप'' आम्ही विसरु शकणार नाही. मूल्यनिर्धारण व

मूल्यमापन हा शैक्षणिक संशोधनासाठी लागणारा basic statistics असलेला विषय त्यांनी किती सोपा करुन सांगितला. वा.ना. दांडेकरांचे संपूर्ण पुस्तक आम्हाला पचवायला सोपे करुन दिले. यामुळेच मला M.Ed. च्या Thesis मध्ये चौथ्या प्रकरणाचे उपयोजन करणे अतिशय सोपे गेले होते. सरांनी सांगितलेल्या मूल्यमापनाच्या सर्व संकल्पना व मूल्यमापन हे सृजनशील असावे हे त्यांचे वाक्य मी जीवनात अवलंबलेले आहे. आजही शाळेची प्राचार्य म्हणून भूमिका बजावत असताना शिक्षकांचे पाठ निरीक्षण करताना व विद्यार्थ्यांचे अध्ययन पाहतांना त्यातून त्यांच्या चुका न काढता त्या दुरुस्त कशा करता येतील, त्यांच्यात असलेल्या चांगल्या गुणांच्या सहाय्यानेच त्यांच्या चुकांवर मात कशी करता येईल हे त्यांना कृतीतून करुन दाखविण्याचाच प्रयत्न करते. त्यामुळे Expected Learning Outcome मिळविण्यात मला मदत होत असते.

रवीकिर्ती सर म्हणजे Hero Entertrainer आणि नवीन Technology चा वापर करणारे एकमेव प्राध्यापक होते. मला वाटते जेव्हा एखादी व्यक्ती अतिशय बुद्धिमान असते त्यावेळी तिचे म्हणणे सामान्य लोकांना समजतच नाही व त्यामुळे त्या व्यक्तीच्या मध्ये असलेले ज्ञान सामान्यापर्यंत पोहोचतच नाही. अशीच काही परिस्थिती होती सरांची. ते वर्गात आल्यावर आमच्या वर्गातील मुले त्यांना हसत व त्यांचे शिकवणे आमच्यापर्यंत बरेच वेळा पोहोचत नसे. परंतु त्यांनी वार्षिक पाठासाठी घेतलेला भूगोलाचा पाठ ज्यात त्यांनी OHP चा वापर करुन 3D Slides पहिल्यांदा दाखवल्या ते आमच्यासाठी प्रेरणादायी ठरले.

Captain of Ship नजमा मणेर मॅडम. त्यांच्याकडे पाहूनच आदरयुक्त भितीचा भाव निर्माण होत असे. कॉलेजमध्ये इन अँड आऊट टाइम रजिस्टर होते.सकाळी ११.०० वाजता पहिला तास सुरु होई व १०.५० ते १०.५५ पर्यंत सर्व विद्यार्थी शिक्षकांनी कॉलेजच्या या रजिस्टरमध्ये स्वत: आल्याची सही करणे अपेक्षित असे. ११.०५ पासून व त्यानंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना मणेर मॅडम यांच्या समोर जाऊन त्यांच्या केबिनमध्ये रजिस्टरवर सही करावी लागत असे. ११.३० नंतर येणाऱ्यांची त्या दिवशीची रजा मांडली जात असे. कधीकधी हे मस्टर बाहेर व्हरांडयातच असे. परंतु त्यावर सही करताना तिथे मणेर मॅडम फक्त येऊन उभ्या राहत व आपल्याला काहीही विचारले नाही तरी अपराध्याच्या भावनेने आपण फक्त खजील होऊन जाऊ असा दृष्टीक्षेप टाकत. त्यांनी आम्हाला शिकवलेले विषय आरोग्य शिक्षण लोकसंख्या शिक्षण. यात त्यांनी आम्हाला शिकवलेले व महत्वाचे लक्षात राहिलेले मुद्दे आपण साधारणपणे म्हणतो''प्रत्येक यशस्वी पुरुषाच्य मागे एक स्त्री असते.'' परंतु मणेर मॅडम यांनी आम्हाला म्हणायला शिकवले,'' प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या बरोबर एक स्त्री असते'' त्यांनी शिकवलेला दुसरा मुद्दा म्हणजे आई आपल्या मुलांची टेस्ट डेव्हलप करते. लहानपणीच सर्व पदार्थ खाण्याची सवय मुलांना लावल्यास त्यांच्यात जेवणाची आवडनिवड राहत नाही. त्यामुळे मुलांना लहानपणी त्यांच्या आवडीचे नाही तर त्यांच्या शारिरीक व बौद्धिक विकासासाठी आवश्यक पदार्थ खाऊ घालावेत. म्हणजे मोठे झाल्यावरही त्यांची ती सवय कायम राहिल. ''भांड्याला भांडे लागले तर आवाज होणारच, परंतु घरात भांडेच नसतील तर त्या घरात स्वयंपाक कसा करता येईल आणि त्याला घर म्हणता येईल का?' इति हिरगळ मॅडम! या उदाहरणातून सासू व सून यांचे एकमेकांशी संबंध कसे असावेत यचे धडे मिळाले व कधीही अतिरेक हा चांगला नसतो हे मूल्य शिकण्यास मिळाले. हिरगळ मॅडम यांचेकडून आम्ही शालेय व्यवस्थापन शिकलो व इतिहास मेथड कंटेट मध्ये फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती अमेरिकन राज्यक्रांती, पहिले व दुसरे महायुद्ध,अठराशे सत्तावनचा उठाव हे सर्व कण्टेण्ट बी.एड.मध्ये आल्यावर कायमचे लक्षात राहिले. याचे श्रेय हिरगळ मॅडम यांच्या प्रभावी इतिहास शिकवण्याच्या हतोटीलाच आहे. अशा या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून सुसंस्कृत बनवत शिक्षण देणाऱ्या माझ्या जीवन शिक्षकांना माझे कोटी कोटी नमन. असे शिक्षक सर्वच प्रशिक्षणार्थी शिक्षकांना लाभले तर तो दिवस दूर नाही जेव्हा भारतातही फीनलंड प्रमाणे गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळेल.

## अध्यापकांच्या आठवणी

दीपक आदमाने

शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्यापाड्यात प्रवाहित करणारे आधुनिक भगिरथ कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या विशाल वटवृक्षाची एक मजबुत पारंबी म्हणजे स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, श्रीरामपूर अन या महाविद्यालयाचे खंबीर शिलेदार येथील सर्व प्राध्यापक वृंद!

**ध्यान मुलं गुरु मुर्ती**
**मंत्र मुल गुरु वाक्य्**
**पुजा मुलं गुरुं पद्**
**मोक्ष मुलं गुरु कृपा**

कोणत्याही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक जीवनात आमुलग्रा बदल होण्यासाठीचा महत्वाचा घटक म्हणजे त्याला शैक्षणिक जीवनात मिळालेले शिक्षक, प्राध्यापक इ.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांवर त्यांच्या प्राध्यापकांचा विशेष परिणाम झालेला दिसून येतो. प्राध्यापक कसे वागतात, बोलतात, शिकवितात याचा अनन्य साधारण परिणम त्यांच्यावर जाणवत असतो. मी स्वत:ला खूप भाग्यवान विद्यार्थ्यांपैकी एक समजतो कारण मला शाळेत उत्तम शिक्षक व महाविद्यालयात सर्वोत्तम प्राध्यापक मिळाले. त्यापैकी कलश स्थानी असणारे आमचे शिक्षणशास्त्राचे पदवी संपादन करताना लाभलेले प्राध्यापक. आम्हास मा. पोंधे सर, पुंड सर, नान्नर सर, करवर सर, पाटोळे सर, भोये सर व हिरगळ मॅडम असे सुर्यासमान तेजस्वी मात्र चंद्राप्रमाणे स्वाभावाने शितल असे प्राध्यापक लाभले.या सर्वांच्या आठवणी आजही जशास तशा आहेत.

**१. मा. प्रा.डॉ.श्री. एम.एस.पोंधे सर**

महाविद्यालयाचे प्राचार्य मा. पोंधेसरांच्या आठवणी विशेष आहेत. व्यक्तिमत्व अतिशय धीर-गंभीर,शांत,संयमी, प्रसंगी अंगी कडक शिस्त. सरांची शिकविण्याची निराळीच प्रथा असायची. शिकवितांना सरांचा एक विशेष उद्‌गार असायचा म्हणजे ''नॉलेज क्रॉंक्रिट'' असले पाहिजे. सरांनी शिकविलेले संख्याशास्त्र आजही उत्तमरित्या स्मरणात आहेत. सरांची एक विशेष बाब म्हणजे सर घर ते महाविद्यालय पायी चालत यायचे; येताना डोळ्यावर रेबन सन ग्लासेस असायचे. त्यामुळे पोंधे सरांचे दबंग व्यक्तिमत्व अधिकच रुबाबदार दिसायचे.

**२. मा.प्रा.एस.जी.पुंड सर**

महाविद्‌लयाचे उपप्राचार्य पुंड सरांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष भाग म्हणजे कडक शिस्त, बोली जणुकाही पुण्यातील सदाशिव पेठेतील निवासी! मात्र शब्दाला धार ही तलवारीपेक्षा जास्त. प्रसंगी विनोद बुद्धीही असणारे. सरांची एक विशेष गोष्ट म्हणजे कायम प्रगतीचे पुढचे पाऊल. शिक्षकी जीवनाची सुरुवात प्राथमिक शिक्षकापासून करणारे व शेवट मात्र महाविद्यालयाचे तज्ज्ञ प्रा.डॉ. अगदी निवृत्तीच्या वयात विद्यावाचस्पती पदवी संपादन करणारे पुंड सर म्हणजे शिक्षणाला वय नसते याचे साक्षात मुर्तीमंत उदाहरण होय. सरांचे पुर्ण नाव शंकर गणपत पुंड होय. मी एकदा विनोदाने सरांना म्हटलो की, सर नाव उलट नाही का

झाल? त्यावेळी न रागवता माझ्या विनोद बुद्धीला दाद दिली. सरांची शैक्षणिक सुरुवात आणि शेवट बघितला तर जाणवते की, परिस्थितीमुळे जर शिक्षणात अडचण आली तर तिला न डगमगता दिलेले उत्तर म्हणजे;

**विझलो जरी आज मी हा माझा अंत नाही।**
**पेटेन उद्या नव्याने हे सामर्थ्य नाशवंत नाही।।**

**३. मा.प्रा.डॉ. करवर सर**

अतिशय विनोद बुद्धी असणारे व चविष्ट भोजनाचा मनमुराद आनंद लुटणारे करवर सर हे सर्वच विद्यार्थ्यांचे प्रिय प्राध्यापक होते. सर्व विद्यार्थ्यांशी कायम मित्रत्वाचे नाते जोपासणारे करवर सर आजही जसेच्या तसे स्मरणात आहेत. महाविद्यालयाच्या प्रत्येक प्रसंगात उत्साहाने सहभाग होणाऱ्या करवर सरांना प्रत्येक विद्यार्थ्यांचे गुण-अवगुण ज्ञात असत. मला आठवते की, सरांनी मला मी जात नसतानाही श्रीरामपूर पंचायत समितीच्या व्याख्यानमालेत पाठविले व त्यांच्याच आशिर्वादाने तेथून मी तृतीय क्रमांकाचे बक्षिस, रोख रक्कम, मानपत्र, मानचिन्ह संपादन केले. यातूनच मला पुढे वक्तृत्वाची अधिकच आवड निर्माण झाली.

**४. मा.प्रा.वि.स.पाटोळे सर**

पाटोळे सर आम्हाला आय.सी.टी.विषय शिकवायचे. सरांमुळेच मला संगणकाची आवड निर्माण झाली. प्रत्येक विषयाची पीपीटी बनविणे सरांनी शिकविले. त्यांच्या शिकविण्यातील लकबी मुळे विषयाचे अध्ययन-अध्यापन सखोल होत असे. पाठाचे निरिक्षण करताना सरांची विद्यार्थ्यांवर करडी नजर असे. यामुळे आमची अध्यापन शैली अधिकच विकसित झाली. सरांच्या विषयावर आम्हा विद्यार्थ्यांमध्ये तणावविरहीत वाद विवाद स्पर्धा होत असे. यामुळे आपला मुद्दा अधिक प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य विकसित झाले.

**५. मा.प्रा.डॉ. आर.के.नान्नर सर**

नान्नर सर आम्हास मानसशास्त्र विषय शिकवत असत. त्यांचा आवडता मुद्दा म्हणजे प्रौढावस्थेंतील बालकाची वाढ आणि विकास. सरांच्या बोलण्यातील ताल व लय यामुळे त्यांचे व्याख्यान अधिक प्रभावी होत असे. ते इतर शिक्षकांच्या तुलनेते मितभाषी होते. यामुळे आम्हास कधीकधी भितीही वाटत असे. मात्र विषयातील सखोल ज्ञानामुळे त्यांचे व्याख्यान प्रभावी वाटत असे.

**६. मा.प्रा.सी.एम.भोये सर**

भोये सर आम्हास अध्ययन- अध्यापन शास्त्र हा विषय शिकवत असे. सरांचा खास उद्‌गार म्हणजे ''तुमच्या माहितीसाठी सांगतो'' इतर शिक्षकांच्या तुलनेत सरांचा अभ्यासक्रम नेहमी अग्रेसर असे. विद्यार्थ्यांच्या अध्यापनातील त्रुटीवर सरांचे मिश्किल भाष्य असे. यामुळे विद्यार्थ्यांना चुकही समजत असे व अपमानित देखील वाटत नव्हते. सरांचे सर्वच विद्यार्थ्यांबरोबर मित्रत्वाचे नाते असे. यामुळे भोये सर सर्वच विद्यार्थ्यांच्या मनावर राज्य करत.

**७. मा.प्रा.एस.पी.हिरगळ मॅडम**

हिरगळ मॅडम या आम्हास छात्रसेवाकालात मार्गदर्शक प्राध्यापिका म्हणून लाभल्या होत्या. छात्रसेवाकालात मी गटाचा प्रमुख या नात्याने काम पाहिले होते. यामुळे शाळेचे नेतृत्व कसे करावे याचे मार्गदर्शन मला मॅडमकडून मिळाले. मॅडम यांची आयुष्याच्या प्रत्येक वळणावर संक्रमण अवस्थेतील बदल स्विकारण्याची तयारी आयुष्याला चालना देत असे.

असे हे आमचे सर्व प्राध्यापक वृंद व त्यांच्या आठवणी या सर्वांमुळे जीवनात नवचैतन्य संचारले. त्याबद्दल मी सर्वांचाच नेहमी ऋणी असेल.

## शिक्षकांचे ज्ञानपीठ : माझे महाविद्यालय

**अमोल रणदिवे**

माणसे एकत्र येतात. स्नेहबंध निर्माण होतात.कालांतराने काही कारणाने त्यांचा वियोग होतो. वियोगाच्या क्षणी निरोप हा द्यावाच लागतो. भेटीच्या पोटी असतात ताटातुटी याची आज प्रकर्षाने जाणीव होते. आज आमच्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणीने मन भरुन आले आहे. माझ हक्काच आवडत घर म्हणजे माझे महाविद्यालय. आई आपल्या जीवनाचा पहिला गुरु असते तर दुसरा शिक्षक. त्यामुळे महाविद्यालयाचे माझ्या जीवनातील स्थान अढळ ध्रुवताऱ्याच्या प्रमाणे आहे. रातराणीच्या सुगंधाची चर्चा कुणीच करत बसत नाही. वाऱ्याच्या झुळकीबरोबर तो आला की आपले मन प्रसन्न होवून जाते. अगदी तसेच माझे महाविद्यालय आहे.

ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते. त्या ज्ञानाचे मंदिर म्हणजे आदर्श शिक्षकाचे ज्ञानपीठ माझे महाविद्यालय. या ज्ञानपीठातील शिक्षकांनी आम्हाला सुंदर आकार दिला. महाविद्यालयातील शिक्षकांनी आमच्यासाठी केलेली धडपड आम्ही कधीही विसरु शकणार नाही. त्यांनी फक्त अध्यापन, ज्ञान देण्याचे काम केले नाही, तर आमचे व्यक्तिमत्व कला कौशल्य व ज्ञान, आदर्श शिक्षक आदि गुण कौशल्ये सुंदर बनवण्यासाठी अथक प्रयत्न केले. आता पर्यंत पारंपारिक शिक्षणाची कास धरुन भावी शिक्षकाची स्वप्न पाहणाऱ्या आमच्या सारख्या सामान्य विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयातील व्यावसायिक शिक्षण एक आव्हानच होते. या आव्हानाची सुरुवात पाठटाचणापासून सुरु होते. कधी कधी याच पाठटाचणावरुन मार्गदर्शक शिक्षकांचे बोलणेही खाल्ले. पण ते आमच्या कल्याणासाठीच होते. याची जाणीव आज होते आहे.

विद्यार्थी शिक्षकांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी नेहमी महाविद्यालयात विविध स्पर्धा आयोजित केल्या जात असत. त्यात वक्तृत्व, निबंध,काव्य वाचन,वादविवाद स्पर्धा इत्यादीत आम्ही उत्साहीपणे सहभागी होत असू.नाविण्यपूर्ण उपक्रम देखील होत. त्यात भित्तीपत्रके, पोस्टर प्रेझेंटेशन, रांगोळी, इत्यादी. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी कल्याण मंडळ,कमवा आणि शिका अशा विविध विभागात मी नेहमी सहभागी होवुन नवनवीन गोष्टी शिकलो.

आज पर्यंत आमच्या महाविद्यालयातून अनेक विद्यार्थी शिक्षक यशाच्या शिखरांवर पोहाचले आहेत. आदर्श शिक्षकांचे मिळालेले धडे पुढे घेवून आधुनिक शिक्षणाच्या माध्यमातून भारताचे उत्तम, सुजाण नागरीक घडविण्याचे कार्य आम्ही करणार आहोत. या महाविद्यालयाने आम्हांला खूप काही दिले आहे. आदर्श गुरु, आदर्श मित्र-मैत्रिणी,आदर्श विचार, आदर्श संस्कार असे महाविद्यालयाने आम्हाला भरभरुन दिले आहे. देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी अशी काहीशी अवस्था झाली आहे. जगाच्या पाठीवर आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या पंखात या महाविद्यालयाने भरलेले बळ आम्ही कधीच विसणार नाही.

हे वळण लावण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांनी अविरत कष्ट घेतले. कोविड - १९ च्या काळात विद्यापीठाच्या माध्यमातून महाविद्यालयाने विविध सामाजिक कार्ये केली. २५००/- पेक्षा जास्त मास्क तयार करुन गरजवंतापर्यंत पोहोचविले. ज्ञानदाना बरोबरच सामाजिक जबाबदारी या ज्ञानपीठाने पुर्ण केली. शिक्षकांनी आमच्यातील अज्ञानावर त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, संस्कृतीचा लोप दिला. मनाच्या कोऱ्या करकरीत पाटीवर आदर्श शिक्षक होण्याची त्याच बरोबर समतेचे, ममतेचे धडे गिरवले आणि आज ती पाटी ज्ञानरत्नांनी शिगोशिग भरलेली आहे.

शिस्तीशिवाय आयुष्य म्हणजे होकायंत्रा शिवाय जहाज. म्हणूनच आमच्या जीवनाचा कटी पतंग होण्यासाठी त्यांनी प्रेमाने शिस्तीचाही ढोस पाजला. हे सर्व करताना शिक्षक व महाविद्यालयाने प्रत्येक विद्यार्थ्याला एकाच मापात तोलले नाही तर प्रत्येक दगडातील देव शोधून त्यावर सद्विचारांचे घाव घातले आणि त्या दगडाला ज्याच्या त्याच्या गुण वैशिष्टयाप्रमाणे देवाचे रुप दिले. महाविद्यालयाने छात्रसेवाकाळातून आदर्श शिक्षक, पथनाट्यातून उत्कृष्ठ कलाकार, क्रिडामधून खेळाडुही निर्माण केले, असे हे माझे

महाविद्यालय फक्त शिक्षण देणारे शाळा किंवा साधे महाविद्यालय नसून आमच्यासाठी एक आदर्श शिक्षकाचे ज्ञानविश्व आहे.

**सहवास सुटला म्हणून सोबत सुटत नाही**
**नुसता निरोप दिल्याने नाते तुटत नाही**

वरील काव्य पंक्ती प्रमाणेच माझे व महाविद्यालयीचे नाते आहे. दोन वर्षापूर्वी या महाविद्यालयाच्या वटवृक्षाखाली विसावलेला एक पक्षी आज मनोगत व्यक्त करीत आहे. आज अनेक मागील जुन्या आठवणी आमच्या डोळ्यासमोर तरळत आहे.महाविद्यालयाचा निरोप घेताना डोळ्यात अश्रू आहेत. दोन वर्षापूर्वी महाविद्यालयात आगमन झाले. महाविद्यालयाची इमारत व परिसर अगदी लहान. पण डोळ्यात कायमस्वरुपी साठवून ठेवावे असे मनमोहक वातावरण.

आतापर्यंत एक सामान्य विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतलेले असल्याने भविष्यातील भावी शिक्षक म्हणून व्यावसायिक शिक्षण ही आमच्या जीवनात नवीनच होते. महाविद्यालयात आल्यापासून येथील प्रतिभा व ज्ञानवंत शिक्षकांनी उत्तम संस्कार केले. व्यावसायिक अभ्यासक्रमा बरोरच कला,कौशल्य,क्रीडा, साहित्य,मनोरंजन आदिक्षेत्रात असणारी विद्यार्थी शिक्षकांची आवड जोपासली. एकेविसाव्या शतकात माणूस म्हणून कसे जगायचे हे आम्हाला महाविद्यालयातील शिक्षकांनी शिकवले. आमचे महाविद्यालय हे सरस्वतीचे मंदिर आणि या मंदिरात दैनंदिन परिपाठ होत असे. त्यात प्रामुख्याने राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, रयत गीत इत्यादी दररोज होत असे.

महाविद्यालयातील शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनाला आगळे-वेगळे वळण देणारे होते. याच शिक्षणातून सर्वधर्म समभाव, राष्ट्रभक्ती, वृक्षप्रेम, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जागरुकता, आदर, नैतिकता, सहकार्य, मुल्ये याच महाविद्यालयात शिकलो. विविध उपक्रम कार्यक्रम यांची नेहमीच रेलचेल असे. मराठी भाषा दिन, विज्ञान प्रदर्शन, व्याख्याने, विविध स्पर्धा, थोर महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी इत्यादी कार्यक्रम आवर्जुन आयोजित केले जात असत. कारण भावी शिक्षकांनी विद्यार्थ्याच्या मनावर संस्कार रुजवून त्या दिनांचे महत्व पटवून द्यावे हे त्या मागील महत्वाचे कारण होय.

विविध कौशल्ये निवडून पाठटाचणाचे सादरीकरण तसेच आपले संभाषण पद्धती इत्यादी कौशल्ये विकसित करण्यासाठी मार्गदर्शक शिक्षकांचे खाल्लेले खडे बोल आजही आठवतात. पडलेला पाठ पुन्हा कसा जीव ओतून पुर्ण करायचा याची संजिवनी इथल्या शिक्षकांनी दिली. कुठले ही मंदिर उभे करण्यासाठी मंदिराचा पाया व कळस भक्कम असणे गरजेचे असते. तसेच माझ्या महाविद्यालयाचा पाया आदरणीय प्राचार्य व कळसरुपी आमचे मार्गदर्शक शिक्षक आहे. आणि म्हणूनच गेल्या ५० वर्षापासून ही ज्ञानदानाची ज्योत अखंडपणे सुरु आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना शालेय जीवनातील प्रत्यक्ष अनुभव व कामकाजांची माहिति मिळण्यासाठी छात्रसेवा काळाचे आयोजन केले जात असे. त्यात आमच्या विद्यार्थी शिक्षकांची होणारी दमछाक आजही आठवते. शाळेतील आलेले विविध अनुभव, केलेले कार्य, उपक्रम यांची मार्गदर्शक शिक्षक नेहमीच स्तुती करुन प्रेरणा देत असत. विद्यार्थ्यांनी शाळेत फक्त तासावर न शिकविता कर्तव्यदक्ष व जागरुक शिक्षक बनावे यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विविध कार्यक्रम, उपक्रम राबविण्याची संधी देत असे. कमवा आणि शिका विभागाने आयुष्याचा भाग व शिक्षण पूर्ण करण्यासाठी पाठबळ दिले.

महाविद्यालयाच्या संदर्भात शब्दरुपी लेखन मांडावे तरी किती. कारण अथांग सागरातून थेंब थेंब पाणी गोळा करण्यासारखे आहे. ५० वर्षातील महाविद्यालयाची पत, प्रतिष्ठा आणि अध्यापनाचा दर्जा आजही कायम आहे. कारण खचलेल्या पाखरांच्या त्या पंखात बळ देण्याचे कार्य आमचे महाविद्यालय आहोरात्र करीत आहे. महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व कर्मचारीवृंद या सर्व ज्ञानवंत ज्ञानरत्नांनी केलेले सहकार्य आम्ही कधीही विसरु शकणार नाही. तसेच मिळालेला आनंद, अनुभव हे दिवस पुन्हा आयुष्यात येणार नाही. याच खूप दु:ख होत आहे. परंतु विरहाच्या मनापुढे भविष्याची वेध घेणारी भावी शिक्षकांची दुरदृष्टी तयार करुन व पुढील वाटचालीसाठी सज्ज करुन या महाविद्यालयाने आपली जबाबदारी पुर्ण केली आहे.

# महाविद्यालयातील माझ्या आठवणी

**पवन माळी**

शिक्षक बनण्याची इच्छा घेऊन मी स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर या महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यापूर्वी माझ्यात खूप त्रुटी होत्या. शिक्षकाचे गुण, शिक्षकाचे वर्तन, बोलण्याची शैली, मत मांडण्याच्या पद्धती, प्रचंड आत्मविश्वास यापैकी एकही कौशल्य माझ्यात नसताना मी या महाविद्यालयात प्रवेश घेतला. मनात ही आशा ठेवून की या गोष्टी शिकून मी महाविद्यालतून बाहेर पडेल.

महाविद्यालयात प्रवेश मिळविल्यानंतर हळूहळू शिक्षक ओळख झाली, मित्र भेटले, त्याच बरोबर आमचा दैनंदिन प्रवासही चालू झाला. महाविद्यालयात दैनंदिन येणे सक्तीचे होते. महाविद्यालयीन शिक्षकांनी सूक्ष्मपाठ, एकात्मिकपाठ, सराव पाठ या सर्व पाठांची लेसन नोट कशी बनवायची हे समजावून सांगितले. त्याच बरोबर या पाठांचे स्वत: निरीक्षण करुन आमच्यातल्या चुकांचे निराकरणही केले. पाठ घेत असताना आमच्या कोणत्या चुका होत आहेत ते निदर्शनास आणून दिले आणि त्या चुका कशा सुधाराव्यात, त्यात कसा बदल घडवायचा आणि पाठ चांगला कसा बनवायचा यावर उत्तम मार्गदर्शन करत आमची भिती दूर केली.

महाविद्यालयात नेहमी कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाचे नियोजन केले जात असे. अशाच कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आम्ही विद्यार्थी शिक्षक तरबेज होवून गेलो. भाषणात मत मांडणे असो किंवा पाहुण्यांचा सत्कार, कार्यक्रमाची सुरुवात असो वा कार्यक्रमाचा आभार ह्या गोष्टी अगदी सहज जमू लागल्या. कारण आता मनात कोणत्याच गोष्टीची भीती नव्हती. महाविद्यालयात उपक्रम आणि त्यांचा आढावा घेऊन तयार केलेले अहवाल लेखन याची पूर्तता वेळेवर होत असे. या महाविदयालयात आलेल्या प्रत्येक दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याला नवीन आव्हानाला तोंड दयावे लागत असे. त्यात अहवाल लेखन, उपक्रम नियोजन, त्यांची कार्यवाही, अंमलबजावणी अशा गोष्टीचा समावेश असायचा. एकावेळी अनेक कामे यशस्वीरित्या पार पाडण्याचे कौशल्य आम्हाला या महाविद्यालयाने दिले.

या सर्वात एक गोष्ट शिकायला मिळाली की कामाच ओझ कितीही असो, न डगमगता फक्त धडकत राहणे आणि आपल्या कामात सातत्य ठेवले तर सर्व गोष्टी वेळेत पूर्ण होतात. महाविदयालयाचा सर्वात मोठा भाग म्हणजे छात्रसेवा कालखंडाचे आयोजन. आमची खरी कसोटी तर छात्रसेवेत होती. छात्रसेवा हा असा उपक्रम ज्यात आम्ही पूर्णपणे परिपक्व बनलो. स्वत: शाळेत जावून एक शिक्षक बनून विद्यार्थ्यांना शिकवणे, वर्गावर नियंत्रण मिळवणे, विद्यार्थ्याच्या कुवतीनुसार अध्यापन करुन त्यांचा आढावा घेणे या सर्व गोष्टी आम्ही छात्रसेवेत पार पाडल्या.

एक शिक्षक कसा असावा, त्याचे ध्येय काय असावे आणि विद्यार्थी हितासाठी नवनवीन बदल अध्यापनात कसे करावे हे आम्हाला छात्रसेवेत कळाले. छात्रसेवेचा अहवाल, छात्रसेवेचे अनुभव या सर्व गोष्टी एक शिक्षक म्हणून आम्हाला नेहमी उपयोगाचे पडतील. अभ्यास करुन आम्ही वार्षिक परीक्षेला सामोरे गेलो. महाविद्यालय सोडताना एक वेळ मन दाटून आले या विचाराने की जेव्हा विद्यालयात पाऊल ठेवले त्यावेळी काही गोष्टीची कमतरता होती, भिती होती, आणि आज विदयालय सोडून जाताना मी एक असा व्यक्ती आहे, ज्यात एक उत्तम शिक्षक बनण्यासाठी लागणारे सर्व गुण आहे. समाजात जेव्हा मी माझी वेगळी ओळख निर्माण करेन तर ती फक्त माझ्यात असलेल्या कौशल्या मुळे आणि हे कौशल्य मला माझ्या स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर या महाविद्यालयाने दिले आहे. तेथील शिक्षकांनी दिले आहे.

एका शिक्षकात असलेले संस्कार विद्यार्थ्यामध्ये येणे, विद्यार्थी आणि शिक्षक यामधील संबंध दृढ होऊन विद्यार्थी प्रगती होणे या पेक्षा शिक्षकाला काय हवे? विद्यार्थ्याची प्रगती व्हावी या साठी शिक्षकाने केलेली दिवस रात्र धडपड आणि विविध पद्धतीचे अध्यापन तेव्हाच साध्य होतात जेव्हा विद्यार्थ्यांची प्रगती होत असते. अशीच काही धडपड आमच्या शिक्षकाने आम्हाला एक उत्तम शिक्षक बनवण्यासाठी घेतली आहे. वेळेला ते आमच्याशी कठोर वागले असतील, आमच्या चुका, उणिवा, कमतरता दाखवायला आम्हाला बोलले असतील पण आम्हाला माहीत आहे हे सर्व आमच्या भल्यासाठीच होते.

समाजात जेव्हा जेव्हा आम्ही आमची कामगिरी दाखवू त्यात आमच्या महाविद्यालयातील शिक्षकांचे आम्ही जीवनभर ऋणी राहू.

## उत्तम शिक्षक व विद्यार्थ्यांची लक्षणे

डॉ.अनिल करवर

अरे कुंभारासारखा गुरु,नाही रे जगात
वरी घालतो धपाटा,आत आधाराचा हात ।।ध्रु।।
कुणी पुजेचा कलश, कुणी गोरसाचा माठ
देता आकार गुरुने, ज्याची त्याला लाभे वाट
घट पावती प्रतिष्ठा, गुरु राहतो अज्ञात ।।१।। (रानडे)

या पंक्तीनुसार प्राचीन, अर्वाचीन व आधुनिक काळापर्यंत शिक्षकाच्या भूमिका बदलत आहेत. विद्यार्थी – मग तो कोणत्याही वयाचा असो तो कोणासही गुरु मानो,तो आपले अध्ययन पूर्ण करतो. गरजेप्रमाणे विद्यार्थी आपले ज्ञानार्जन करतो.शिक्षकही अनेक भूमिका बजावतांना दिसतो. आधुनिक तंत्रज्ञान, त्याची विविध इलेक्ट्रीक – इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे शिक्षक व विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासाठी मदत करतांना दिसत आहेत. अर्थातच बदलत्या परिस्थितीनुसार विद्यार्थी व शिक्षकांना आपल्या भूमिका, ज्ञानार्जनाची माध्यमे बदलावीच लागतात.संत ज्ञानेश्वरांनी खालील अंभगाव्दारे गुरुचे महत्व स्पष्ट केले आहे.–

गुरु हा ज्ञानाचा आगरु, गुरु हा धैर्याचा डोंगरु
कधी काळी डळमळेना ।।
गुरु घाली ज्ञानांजन, दावी बीजधन जनलोक।।

अशा अनेक संतांनी, श्रेष्ठ पुरुषांनी, समाज सुधारकांनी, राजकीय लोकांनी शिक्षका विषयी आपले मत व्यक्त केले आहे.आर्थातच आपल्या सर्वांच्याच जीवनात गुरुचे, शिक्षकाचे महत्त्व एकमेवाव्दितीय, अटळ असेच आहे. अर्थातच शिक्षकांजवळ अनेक गुण असावेत. त्यात ज्ञानसंपन्नता, निर्व्यसनी, सृजनशीलता, आदर्श आचरण, सर्व प्राणीमात्रांविषयी प्रेम,चारित्र्य संपन्नता, बहुश्रुतता, सतत अध्ययनशिलता, नित्यनवीन शिकण्याची दुर्दम्य इच्छा व कृती, अध्यापन उत्साह व उत्प्रेरकता, शिकविण्याची उत्कृष्टकला, अध्यापनात नवनवीन पध्दती, सूत्रे यांचे ज्ञान व वापर, परिभ्रमण, संग्राहकवृत्ती, आधुनिक तंत्रज्ञान अवगत करुन वापरणे, बदलत्या काळाप्रमाणे आपले अध्यापन गतीशिल करणे, विद्यार्थ्यांसाठी सतत मदतशील असे एक ना अनेक गुण असावेत.

**विद्यार्थ्याची गुणवैशिष्टे :**

Knowledge is virtue. ज्ञान हा एक सद्गुण आहे. (सॉक्रेटिस) अर्थातच विद्यार्थ्यांस प्राप्त ज्ञानातून नवीन दृष्टी मिळावी.विद्यार्थ्यांजवळ पुढील पाच लक्षणे असावीत.

काकदृष्टी बक्ध्यानं, श्वान निद्रा तथैवच
अल्पआहार, गृहत्याग, इति विद्यार्थी पंचलक्षणम् ।।

अर्थातच कावळयासारखी चौफेर दृष्टी असावी, बगळ्यासारखी शांत, स्तब्ध, सावध निद्रा असावी, आहार पुरेसा आसावा, अध्ययनासाठी प्रसंगी घराचाही त्याग करावा.

विद्यार्थ्यांने बहुश्रुत,ज्ञानार्थी, सतत नित्यनवे ज्ञान प्राप्त करणे, तंत्रज्ञानाच्या आधारे ज्ञानप्राप्ती, ज्ञान देणारा कोणत्याही वयाचा असो त्याचा आदर्श ठेवणे, ज्ञानी व्यक्तीची संगत ठेवणे, नित्यनवनवीन कौशल्ये आत्मसात करणे, मिळालेल्या ज्ञानाचा पुनर्वापर करणे, अर्थार्जनासाठी ज्ञानप्राप्ती करणे, उपजिवेकेसाठी कौशल्ये प्राप्त करणे, स्वयंअध्ययन कौशल्ये विकसित करणे, संयमी जीवन व आचरण ठेवणे, उत्तम साहित्याचे वाचन करणे,लेखन करणे,शिस्त, नम्रता ठेवणे,संस्कृती संरक्षण व संवर्धन करणे, परिभ्रमण, संग्रहवृत्ती, सकारात्मक व स्पर्धक हवा.

विद्यार्थी व शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे. सर्व इलेक्ट्रीक,इलेक्ट्रॉनिक्स स्त्रोत आत्मसात करुन त्याचा वापर करावा. डिजिटल तंत्रज्ञान वापरावे. आधुनिक प्रगत तंत्रज्ञान युगात जर प्रवाहाबरोबर चाललो तरच आपले अस्तित्व उत्तम टिकेल व गतीशिल, यशस्वी होईल.

अभ्यासोनि प्रगटावे, नाहीतर तैसेचि झाकळोनी असावे।
कोणती गोष्ट प्रकट करण्यापूर्वी त्याचा अभ्यास करणे विद्यार्थी व शिक्षकांसाठी हिताचे असते.

आलस्य कुतो विद्या, अविद्यास्य कुतो धन्:।
अधन्यस्य कुतो मित्र: अमित्रस्य कुतो सुखम् ।

अर्थात आळस हा सर्वांसाठीच धोकेदायक आहे. प्रत्येक विद्यार्थी व शिक्षकाने आपली भूमिका योग्य रितीने पार पाडावी. कारण–

सिढिया उन्हे मुबारक हो, जिन्हे छत तक जाना है।
मेरी मंजिल तो आसमान है, रास्ता मुझे खुद बनाना है।

स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन अर्थात आपल्या सन १९७०–७१ मध्ये स्थापन झालेल्या महाविद्यालयास ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या सर्वच पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, छात्रअध्यापक, सेवक यांना मानाचा मुजरा आणि भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा!



## घोषित युध्द!

‘आयुष्य हे एक अघोषित युध्द असतं’
हे कधीकाळी मला खरचं वाटायचं
पण सभोवताली डोळसपणे पाहू लागल्यावर
असलं काही लिहायला नि बोलायला
माझे हात नि जीभ दोन्ही धजेनासे झालेत...

हजारो व्यवस्थांच्या गोंडस नावाखाली
अव्यवस्थेच्या सनातनी दुतांनी
आपली विषारी पाळेमुळे आता
इथल्या भुसभुशीत जमिनीत आणखीच
खोलवर रुतवायला सुरुवात केलीयं...

या भुसभुशीत नि कसदार जमिनीतून
आता अज्ञान, दारीद्रय, भूकं, उपासमार,
हिंसा नि प्रचंड विषमतेच अमाप पीक
दिवसेंदिवस अधिकच फोफावत चाललयं...


त्यामुळे तिच्या गर्भात वाढणाऱ्या
निष्पाप जीवाला मी आत्तापासूनच
सांगून टाकलयं: ‘आयुष्य एक
घोषित युध्द असतं म्हणून...’

**– डॉ.भागवत शिंदे**

## विभाग चार
## शैक्षणिक अहवाल व इतर

‘‘अस्पृश्यता निवारण आणि खेडोपाडी शिक्षण प्रसार ही माझ्या जीवनाची प्रमख ध्येये आहेत. याच कार्यासाठी ५० वर्षांपूर्वी मी किफायतशीर अशा किर्लोस्कर कंपनीतील नोकरीचा राजीनामा दिला. तेव्हापासून मी माझे सर्वस्व याकार्यासाठी वाहिले आहे. आनंदी स्थिर अशा कौटुंबिक जीवनाचाही मी त्याग केला. मी महात्मा गांधीजींचा शिष्य आहे आणि अनेक बऱ्या-वाईट प्रसंगातून जाऊन आणि टीका-टिप्पणी सहन करुन या पवित्र कार्याची सेवा करत आहे. हे काम मी माझ्या आयुष्याच्या अंतापर्यंत करणार आहे. माझे आयुष्यभर सांत्वन करणारे व मला शांती देणारे हे काम आहे. मला मुक्ती देखील याच कामामुळे मिळेल. सामान्य जनतेच्या ऱ्हदयापर्यंत खोलवर माझ्या या कामाची मुळे पोहोचलेली आहेत. यांच्या बद्दल मी कृतज्ञ आहे. हे आध्यात्मिक समाधान हेच मला मिळालेले पारितोषिक आहे.’’

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील



रयत शिक्षण संस्थेचे,

# स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

## वार्षिक अहवाल : शैक्षणिक वर्ष २०२० - २०२१

**प्रवेश प्रक्रिया :**

सन २००४–०५ या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे महाराष्ट्र शासनामार्फत सामायिक पात्रता परीक्षा घेवून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया दि. ०१–०७–२०२० ते १९–०३–२०२१ अखेर महाराष्ट्र शासन व शिक्षण संचालक, पुणे यांच्या नियोजनाप्रमाणे त्यांच्या नियमांच्या आधीन राहून पूर्ण करण्यात आाली. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये प्रथम वर्षासाठी ३७ प्रवेश पूर्ण झालेले आहेत.

**पाठ विभाग : प्रा. डॉ. नान्नर आर. के.**

विद्यार्थी शिक्षकांच्या अंगी अध्यापन कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी महाविद्यालयाचा पाठ विभाग कार्यरत आहे. या वर्षी प्रथम वर्ष विद्यार्थी शिक्षकाने सूक्ष्म अध्यापन पाठ ०६, एकात्मिक पाठ ०६, अभिरुप पाठ ०२, विविध अध्यापन पद्धतीवर आाधारित ०६पाठ, सरावपाठ ०६, सलग सराव पाठ ०६ पूर्ण केले. त्याबरोबर पाठ निरीक्षणे पूर्ण केलेली आहेत. व्दितीय वर्ष बी.एड. विद्यार्थी शिक्षकांनी०६ सरावपाठ पूर्ण केले. परिसरातील विविध विद्यालयामध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी एक महिना कालावधीचा छात्रसेवा काल तर व्दितीय वर्ष विद्यार्थ्यांनी चार महिने कालावधीचा छात्रसेवाकाल पूर्ण केला आहे.

**परीक्षा विभाग : प्रा. भोये सी.एम.**

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता बी.एड.प्रथम व व्दितीय वर्षाची पूर्व परीक्षा ओनलाईन पध्दतीने घेण्यात आली. या वर्षांत बी.एड.प्रथम वर्षाचा निकाल १००% तर सन २०१९–२१ वर्षाचा निकाल ९३.९४ % लागला असून गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे– कविता गाढेकर –८३.६०%, ओमकार घाडगे –८३.४८%, अतुल गायकवाड –८३.४०% असे आहेत. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांचे कोर्स अंतर्गत प्रात्यक्षिके व उपक्रम सुरु आहेत. प्रात्यक्षिक कार्य व उपक्रमांचे वेळोवेळी मूल्यमापन पूर्ण झालेले आहे. अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्ष ४२ द्रितीय वर्ष २२ अशी विद्यार्थी संख्या आहे. अंतर्गत परीक्षेमध्ये सादरीकरण, पोष्टर सादरीकरण, क्षेत्रभेट, स्वाध्याय, पूर्व परीक्षा घेतली जाते.

**सांस्कृतिक कार्यक्रम विभाग : प्रा.डॉ. करवर ए.के.**

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम विभागाअंतर्गत नैमित्तिक व प्रासंगिक असे उपक्रम राबविले जातात. १५ ऑगष्ट स्वातंत्र्य दिन, स्वामी सहजानंद भारती पुण्यतिथी, २२ सप्टेंबर पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती, २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, रक्षाबंधन, जागतिक महिला दिन, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन प्रेरणा दिन, राष्ट्रीय शिक्षण दिन, मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे अभिष्टचिंतन, संविधान दिन, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्वं स्पर्धा, निबंध स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात आले असून अन्य प्रासंगिक उपक्रम राबवले गेले.

**बहि:शाल विभाग : प्रा. डॉ.करवर ए.के.**

सन २०२०–२१ डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाले अतंर्गत श्री.अरुण धर्माधिकारी यांचे उद्योजकता विकास यावर व्याख्यान घेण्यात आले.

**समाजसेवा विभाग : प्रा.डॉ. करवर ए.के.**

या विभागाच्या अंतर्गत ३७ विद्यार्थ्यांची ५ गटात विभागणी करुन प्रत्येक गटाने प्रौढशिक्षण, कुटूंबनियोजन, साक्षरता या विषयांवर काम केले आहे. तसेच राष्ट्रीय सण, कर्मवीर जयंती यांच्या निमित्ताने महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. विद्यार्थी–शिक्षकंाना पर्यावरण शिक्षण, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जाणीव जागृती व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास व्हावा या हेतूने अंधश्रद्धा निर्मूलन, प्रयोग दिग्दर्शन, श्रमप्रतिष्ठा दिन, रक्तदान समज– गैरसमज यावर मार्गदर्शन करण्यात आले होते.

**विद्यार्थी कल्याण मंडळ : प्रा.डॉ. करवर ए. के.**

विद्यार्थी कल्याण मंडळ या विभागा अंतर्गत विद्यार्थी परीषद स्थापना, अंपग सोईसुविधा उपलब्धता, मतदार नोंदणी अभियान व रक्तदान जागृती विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह व आदिवासी विकास महामंडळ वसतिगृह येथे प्रवेश मिळविण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात एकूण ०४ विद्यार्थ्यांनी वसतिगृहात लाभ घेतलेला आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग : प्रा. डॉ. शिंदे.बी.ए.**

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे **(N.S.S.)** ५० विद्यार्थ्यांचे एक युनिट सुरु असून २०२०–२१ मध्ये नियमित कार्यक्रमांतर्गत वर्षभरात विविध उपक्रम घेण्यात आले.

**वार्षिक नियतकालिक विभाग : प्रा. डॉ. शिंदे.बी.ए.**

दरवर्षी महाविद्यालयाच्या **''सहजानंद''** या वार्षिक अंकातून विद्यार्थ्यांच्या लेखनाभिव्यक्तीला वाव दिला जातो. तसेच हा अंक विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेसाठी पाठवला जातो. याहीवर्षी महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवी वार्षिक अंक प्रकाशित झाला आहे.

**खेळ व क्रीडा विभाग : प्रा.डॉ.शिंदे.बी.ए.**

सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात प्रथम व व्दितीय वर्ष विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयांतर्गत संगीत खुर्ची, चमचा लिंबू, १०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, ४x४ रिले, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक. इ. वैयक्तिक व सामुहिक क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले होते.

**महाविद्यालयातील विस्तार सेवा व शैक्षणिक उपक्रम :**

**१. शालेय व्यवस्थापन पदविका कोर्स: प्रा. भोये सी.एम.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००६–०७ पासून सदरच्या कोर्सचे आयोजन केले जात आहे. सदर कोर्स एक वर्षाचा आहे. सन २०२०–२१ या वर्षी २१ प्रशिक्षणार्थींनी कोर्ससाठी प्रवेश घेतला आहे. त्यांच्या मौखिक परीक्षा माहे ऑगस्ट–२०२१ मध्ये घेण्यात आली.

**२. एम.ए. (शिक्षणशास्त्र): प्रा.डॉ.शिंदे.बी.ए.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००८–०९ पासून सदर कोर्सचे आयोजन केले जात आहे. सदर अभ्यासक्रम दोन वर्षाचा आहे. प्रवेश क्षमता ५० आहे व गुणवत्तेनुसार चालू शैक्षणिक वर्षासाठी ५१ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे. तसेच व्दितीय वर्षासाठी २४ विद्यार्थी प्रवेशित होते. एम.ए.व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या संशोधन अहवाल मौखिक परीक्षा माहे ऑगस्ट –२०२१ मध्ये घेण्यात आली.

**जनरल सुपरव्हिजन विभाग : प्रा.डॉ. नान्नर आर.के.**

महाविद्यालयातील सर्व विभागाच्या कामकाजाची नियोजने, मा. प्राचार्य आणि प्राध्यापक यांच्याशी चर्चा करुन तयार केलेला आहे. विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थी हजेरी, महाविद्यालयीन शिस्त तसेच आरक्षण समिती, रँगिंग समिती, माहिती अधिकार समिती, महिला तक्रार निवारण समिती यांचेही कार्य पूर्ण केलेले आहे.

**ग्रंथालय विभाग: प्रा. मेंगाळ एन.एच.**

नॅकच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण ग्रंथालय संगणकीकृत करण्यात आले असून ग्रंथालयाची स्वतंत्र गुगलसाईट निर्माण करुन विविध लिंक, माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रंथालयामध्ये एकूण १५,४५२ इतकी ग्रंथसंपदा आहे. तसेच सन २०१२–१३ पासून ग्रंथालयामार्फत 'बेस्ट रिडर ॲवॉर्ड' सुरु करण्यात आले आहे. सन २०१८–१९ रोजी 'बेस्ट रिडर ॲवॉर्ड' सुरु करण्यात आले आहे.

**नॅक व IQAC विभाग : प्रा.व्ही.एस.पाटोळे**

वर्षाच्या सूरुवातीस सर्व विभागांचे नियोजन केले व २०२०–२१ ची शैक्षणिक दिनदर्शिका तयार केली. IQAC समितीच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या असून त्यामध्ये शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम, प्रकल्प, योजना यादृष्टीने नियोजन व कार्यवाही करण्यात आली. एन.सी.टी.ई.च्या मार्गदर्शक सूचने नुसार २०१८–१९ या वर्षातील PAR Online जमा केली. तसेच NAAC च्या मार्गदर्शक सूचने नुसार २०१६–२०२० आखेरचे AQAR Onlile वेळेत जमा केले. सा.फु.पु.विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत विद्यापीठाने महाविद्यालयास रु. १०००००/– अनुदान मंजूर केले. तसेच विभागाच्या वतीने संस्थेत वरिष्ठ महाविद्यालयात नव्याने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांसाठी अध्यापन कैशल्य समृध्दी कार्यशाळेचे यशस्वी आसोजन करण्यात आले.

**विद्यार्थी वसतिगृह : प्रा. भोये सी.एम.**

महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये चालू शैक्षणिक वर्षात बी .एड. महाविद्यालयाच्या ०१ विद्यार्थी, सी.डी.जैन व बोरावके महाविद्यालयाचे ६ असे एकूण ७ अध्ययनार्थींना होस्टेलमध्ये प्रवेश दिला आहे.

**अभिनंदन :**

* प्रा.डॉ.ए.के.करवर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत 'आदिवासी आणि बिगर आदिवासी भागातील बहुवर्ग अध्यापन होत असलेल्या प्राथमिक शाळांचा तुलनात्मक अभ्यास' या विषया मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली.
* प्रा.सी.एम.भोये यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत 'बी.एड.शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्राकृतिक भूगोल विभागाच्या अध्ययना करिता स्वयंअध्ययन आशय संचाचे विकसन व परिणामकारकतेचा अभ्यास' या विषया मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली.

रयत शिक्षण संस्थेचे,

## स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

### सुवर्णमहोत्सवी वर्ष:२०२०-२१ बी.एड.प्रथम वर्ष विद्यार्थी

| Sr.No | Name of the Student | Mobile No. | Method I | Method II |
|---|---|---|---|---|
| 1 | Wani Adesh Balasaheb | 8308898896 | Science | Maths |
| 2 | Wagh Madhusmita Akshay | 9168239569 | Science | Maths |
| 3 | Gaware Pranjal Subhash | 9359598907 | Science | Maths |
| 4 | Thorat Jijabai Pratap | 7028311615 | History | Marathi |
| 5 | Patel Heena Dastgir | 7972153576 | History | Marathi |
| 6 | Daund Ashwini Dattatray | 9271735373 | History | Marathi |
| 7 | Sinare Asha Gopinath | 9370667228 | Hindi | Geography |
| 8 | Thorat Sonali Raibhan | 9604172036 | History | Marathi |
| 9 | Sable Rahul Ramrao | 9595968433 | Science | Maths |
| 10 | Tambe Shraddha Dnyandeo | 7066288176 | Science | Maths |
| 11 | Jawale Avinash Madhukar | 8552810947 | English | History |
| 12 | Jejurkar Madhuri Rajendra | 9146077549 | Science | Maths |
| 13 | Lonari Siddheshwar Babasaheb | 9960802495 | Science | Maths |
| 14 | Bagwan Shyada Nijam | 7888007105 | Marathi | Geography |
| 15 | Sonawane Sonali Vijay | 9112927044 | Marathi | Geography |
| 16 | Chalukya Ketakee Dhairyashil | 9420745005 | Marathi | History |
| 17 | Mali Pankaj Dnyandeo | 9552770919 | Science | Maths |
| 18 | Datir Kiran Changdeo | 8975430614 | Marathi | Geography |
| 19 | Kurhe Vaishali Bapusaheb | 8550919682 | Science | Maths |
| 20 | Mapari Rajashri Bhaskar | 9322204646 | Science | Maths |
| 21 | Barde Akash Sunil | 9860724120 | Marathi | History |
| 22 | Rathod Ravina Deepak | 9860351080 | Maths | English |
| 23 | Kadam Rutuja Lawrence | 8551920972 | Science | Maths |
| 24 | Pinjari Kausar Chotulal | 8010735519 | English | Geography |
| 25 | Bare Ajay Kisanrao | 9511996654 | Science | Maths |
| 26 | Barde Sonali Janardan | 8806164424 | English | Maths |
| 27 | Korde Trupti Rajendra | 9579520241 | Hindi | Geography |
| 28 | Waje Archan Dattatraya | 9594945685 | Science | Maths |
| 29 | Gagare Vedika Raosaheb | 9850733863 | Science | Maths |
| 30 | Gaikwad Rituja Gautam | 7249371096 | English | Geography |
| 31 | Jadhav Priyanka Ashok | 7038372101 | Hindi | Geography |
| 32 | Bhambare Sakshi Ajay | 9529173264 | English | Geography |
| 33 | Patil Snehal Dilipkumar | 9923317785 | Science | Maths |
| 34 | Dushing Sujit Annasaheb | 7972428329 | English | History |
| 35 | Khamat Priyanka Balu | 8866446681 | Science | Math's |

रयत शिक्षण संस्थेचे,

## स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

### सुवर्णमहोत्सवी वर्षः२०२०-२१ बी.एड.व्दितीय वर्ष विद्यार्थी

| Sr.No | Name of the Student | Mobile No. | Method I | Method II |
|---|---|---|---|---|
| 1. | Dholak Vishal Raju | 8975791894 | Marathi | History |
| 2. | Dudhawade Suresh Rambhau | 7558285851 | Marathi | History |
| 3. | Bhangare Dattu Laxman | 9545263945 | Marathi | Geography |
| 5. | Bangar Shailesh Dharmraj | 9834369752 | English | History |
| 6. | Bhangare Deoram Dinkar | 7620906385 | English | History |
| 7. | Bhangare Devram Shivram | 7040369879 | English | History |
| 8. | Dange Priyanka Kailas | 9284633695 | English | History |
| 9. | Dayma Pooja Rajnikant | 7040143529 | English | History |
| 10. | Gawade Rohini Shivaji | 9604651344 | English | History |
| 11. | Hapse Pratiksha Sudhir | 9588643443 | English | History |
| 12. | Mhaske Rupali Gorakh | 8446794050 | English | History |
| 13. | Ohol Nisha Bajirao | 7499828052 | English | History |
| 14. | Shaikh Sabanaaz Shafi Ahmed | 8087132913 | English | History |
| 15. | Suryawanshi Shivaji Rajendra | 7770044034 | English | History |
| 16. | Vikhe Priya Sopan | 7057406675 | English | History |
| 17. | Wagh Vaishnavi Raghunath | 8329358437 | English | History |
| 18. | Bhand Ajit Subhash | 9657585841 | English | Geography |
| 19. | Kale Supriya Shivaji | 9922957633 | English | Geography |
| 20. | Shinde Poonam Arjun | 8329116441 | English | Geography |
| 21. | Bhand Somnath Babasaheb | 9595043237 | Maths | Marathi |
| 22. | Gaware Jayashri Vilas | 9921422351 | Maths | Marathi |
| 23. | Aher Priyanka Abasaheb | 9975931996 | Maths | Science |
| 24 | Antre Kalyani Sanjay | 7028824700 | Maths | Science |
| 25. | Gadekar Kavita Dnyaneshwar | 9130500636 | Maths | Science |
| 26. | Gaikwad Atul Vaijnath | 7721081287 | Maths | Science |
| 27. | Ghadge Omkar Laxman | 8407933508 | Maths | Science |
| 28. | Nanaware P. Babasaheb | 9284845940 | Maths | Science |
| 29. | Sagalgile Prabha Dilip | 9604322995 | Maths | Science |
| 30. | Shaikh Faizeen Mushtaque | 7020285249 | Maths | Science |
| 31. | Shinde Vedita Sudhakar | 7972290202 | Maths | Science |
| 32. | Tagad Pratibha Ashok | 8208459994 | Maths | Science |
| 33. | Zarekar Nikita Sukumar | 9975063837 | Maths | Science |

रयत शिक्षण संस्थेचे,

## स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर

### सुवर्ण महोत्सवी वाटचालीतील वर्ष निहाय विद्यापीठ परीक्षेतील प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी

### १९७०-७१ ते २०२०-२१

| अ.क्र. | शै.वर्ष | प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी |
|---|---|---|
| १ | १९७०-७१ | श्री. मोरे पी.आर |
| २ | १९७१-७२ | श्रीमती.गोखले एस.एस. |
| ३ | १९७२-७३ | श्री.दरेकर टी.ए. |
| ४ | १९७३-७४ | श्री. राजवल एस.जी. |
| ५ | १९७४-७५ | श्री. निर्मळ आर.एस |
| ६ | १९७५-७६ | श्री. आदिक आर.बी. |
| ७ | १९७६-७७ | श्री.पोकळे बी.सी. |
| ८ | १९७७-७८ | श्री.पवार एस.बी. |
| ९ | १९७८-७९ | श्री. निघुटे एस.टी. |
| १० | १९७९-८० | कु. जोंधळे एल.एस. |
| ११ | १९८०-८१ | कु. शिवयोगी सी.आर. |
| १२ | १९८१-८२ | कु. देवरे जे.व्ही. |
| १३ | १९८२-८३ | कु. लुटे जे.बी. |
| १४ | १९८३-८४ | श्रीमती. हिरगळ एस.पी. |
| १५ | १९८४-८५ | कु. तिडके जे.ए. |
| १६ | १९८५-८६ | श्री.आंधळे पी.जे. |
| १७ | १९८६-८७ | श्री. राजोळे पी.एन. |
| १८ | १९८७-८८ | श्री. हवलदार एम.एफ. |
| १९ | १९८८-८९ | कु. नानकर एस.पी. |
| २० | १९८९-९० | कु. आहेर एन.बी. |
| २१ | १९९०-९१ | कु. फडके टी.के. |
| २२ | १९९१-९२ | कु.शिंदे व्ही.एम. |
| २३ | १९९२-९३ | कु. धनेश्वर व्ही.एस. |
| २४ | १९९३-९४ | कु.घुगरी व्ही.डी. |
| २५ | १९९४-९५ | कु.कांक्रेज व्ही.ए. |
| २६ | १९९५-९६ | कु.डोके डी.व्ही. |
| २७ | १९९६-९७ | कु. फटांगरे एस.आर. |
| २८ | १९९८-९९ | कु.मेहेत्रे जे.जी. |
| २९ | १९९९-२००० | कु. कसरेकर एच.ए. |
| ३० | २०००-०१ | श्री.मेहेत्रे एस.बी. |
| ३१ | २००१-०२ | कु.बांगल एस.डी. |
| ३२ | २००२-०३ | कु.जैन एस.एन. |
| ३३ | २००३-०४ | चव्हाण डी.टी. |
| ३४ | २००४-०५ | कु.टीक्यानी एस.एच. |
| ३५ | २००५-०६ | कु.कदम आर.आर. |
| ३६ | २००६-०७ | कु.मचे पी एच. |
| ३७ | २००७-०८ | कु.नजन ए.एस. |
| ३८ | २००८-०९ | कु.भालेराव एम.डी. |
| ३९ | २००९-१० | कु.आढाव एम.एस. |
| ४० | ०२०१०-११ | कु.पिंजारी के.ई. |
| ४१ | २०११-१२ | कु.बेग ए.एस.. |
| ४२ | २०१२-१३ | श्री.कडनोर ए.एम. |
| ४३ | २०१३-१४ | कु.वाघचौरे पी.पी. |
| ४४ | २०१४-१५ | श्रीमती पगारे एन.एस. |
| ४५ | दोन वर्षाचा बी.एड.अभ्यासक्रम सुरू झाला. | |
| ४६ | २०१६-१७ | कु.लोखंडे व्ही.एस. |
| ४७ | २०१७-१८ | श्री. जावळे जी.एम. |
| ४८ | २०१८-१९ | कु. पठाण के.के.<br>कु. पाचपिंड वाय.एस. |
| ४९ | २०१९-२० | कु. जाधव टी.आर. |
| ५० | २०२०-२१ | कु.गाढेकर के.डी. |

रयत शिक्षण संस्थेचे

# सावित्रीबाई फुले बालसंस्कार केंद्र

## स्व. सौ. एस. के. सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर

फोन नं. (०२४२२) २२१००९




## विद्यालयाची वैशिष्ट्ये

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मा. मीनाताई जगधने यांच्या अथक प्रयत्नांतून व समर्पित योगदानातून उभारलेले व नावारुपाला आलेले प्राथमिक विद्यालय

- संस्थेचे सर्वोच्च कर्मवीर पारितोषिक प्राप्त विद्यालय
- राज्य स्तरीय स्वच्छ व सुंदर शाळा पारितोषिक प्राप्त विद्यालय
- आय.एस.ओ.९००१-२००९ मानांकन प्राप्त विद्यालय
- शाळा सिद्धी मुल्यांकनात सातत्याने उत्तर विभागात प्रथम
- इ. ५ वी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाचा विद्यार्थी राज्यात प्रथम तर इतर दोन विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत
- दरवर्षी सातत्याने शिष्यवृत्ती व रयत प्रज्ञा शोध परिक्षेत विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत येण्याचा मान
- एल.सी.डी. प्रोजेक्टर व डिजिटल इंटरॲक्टिव्ह बोर्ड युक्त सर्व वर्ग खोल्या
- दोन स्वतंत्र संगणक कक्ष, स्वतंत्र ग्रंथालय
- प्राथमिक शाळेतील मुलांसाठी एकमेव असलेला समुपदेशन कक्ष
- इंग्रजी, विज्ञान, गणित विषयाची स्वतंत्र दालने
- प्राथमिक स्तरावरील प्रशस्त बहुउद्देशीय सभागृह
- शिक्षकांसाठी सातत्याने शैक्षणिक प्रवाहातील बदलानुसार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन
- केवळ गुणवंतच नव्हे तर सर्वगुणसंपन्न, क्रियाशील, प्रतिभावंत विद्यार्थी घडविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न

**मा. मीनताई जगधने**
सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल
रयत शिक्षण संस्था, सातारा

**श्री. संजय एम. दवंडे**
मुख्याध्यापक
स्व. सौ. एस. के. सोमैया प्राथ. विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''– कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

स्थापना : १९६४

# दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि. अहमदनगर

फोन नं. ऑफिसः (०२४८९) २२२५३४, निवासः २२२५१८

## ● महाविद्यालयाची वैशिष्टये ●

- नॅक पुनर्मूल्यांकन 'ए' ग्रेड (3rd Cycle)
- ISO 9001:2015 प्रमाणित
- सर्वोत्कृष्ट महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (ग्रामीण विभाग) प्रथम क्रमांक पुरस्कार (२००४-०५)
- कै. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे स्मरणार्थ दिला जाणारा 'रयत माऊली पुरस्कार' (२००५-०६)
- 'कर्मज्योती' वार्षिक नियतकालिक विशेषांकास अहमदनगर जिल्हा विभागीय स्तरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पारितोषिके (२०१३-१४, २०१६-१७ व २०१७-१८)
- कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत ११ वी ते पदवी व पदव्युत्तर एम. एस्सी. (Organic, Chemistry, Botany, Physics and Zoology) एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल आणि अर्थशास्त्र) शिक्षणाची सोय.
- बी. बी. ए. (सी.ए.), बी. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) आणि बी. व्होक (मेडिसिनल प्लॅण्टस ग्रोवर) इ. व्यावसायिक कोर्सेसची सोय.
- व्यवसाय अभ्यासक्रम विभागात अकौंटींग ॲण्ड ऑफिस मॅनेजमेंट, ॲनिमल हजबंडरी ॲण्ड डेअरी टेक्नॉलॉजी आणि इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी या कोर्सेसची सोय.
- समृद्ध ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा.
- मुलींसाठी वसतिगृहाची खास सोय.
- कमवा व शिका योजना.
- राज्यातील नामांकित राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.)
- रयत मिलीटरी अकॅडमी (कर्मवीर विद्या प्रबोधिनीचा भरतीपूर्व प्रशिक्षण कोर्स)
- स्वतंत्र स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र- स्वतंत्र इमारत, स्वतंत्र ग्रंथालय व वातानुकूलित अभ्यासिका.
- कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत शॉर्ट टर्म कोर्सेसची सोय.
- सुसज्ज जिमखाना व मल्टीजिम फॅसिलिटी.
- सुसज्ज संगणक प्रयोगशाळा.
- अनुभवी व व्यासंगी शिक्षक व शिक्षकेतर वर्ग.

**डॉ. बाळ कांबळे**
प्राचार्य
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत





अभय पवार
9822241611
8830209151
abhaypawar700@gmail.com

CMYK
१२x१८ कलर प्रिंट





॥ श्री स्वामी समर्थ ॥
प्रिंटर्स
ऑफसेट ॲण्ड स्क्रिन प्रिंटींग

स्टिकर, आर्ट कार्ड, आर्ट पेपर, फोर कलर लेटर हेड, प्रमाणपत्र
लग्न पत्रिका व सर्वप्रकारची छपाई एकाच छता खाली

वत्सला कॉम्प्लेक्स, बस स्टॅण्ड शेजारी, राधिका हॉटेल जवळ, श्रीरामपूर - ४१३ ७०९

आताच वजन कमी किंवा वाढवा
वाढलेले वजन म्हणजेच आजारांना आमंत्रण...

वाढलेल्या वजनामुळे आपल्या शरीरात शुगर/बी.पी./ पित्त/थॉयरॉईड, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, नैराश्य, अकाली वृध्दत्व इ.त्रास उदभवु शकतात.

सकस संतुलित आहार व
व्यायामाच्या सहाय्याने
वजन कमी करा किंवा वाढवा

उशिर होण्यापूर्वी
वजन कमी करा..
उत्साही रहा...छान दिसा...!



महिला साठी स्वंतत्र मार्गदर्शन केले जाईल.

श्रीश्री
Wellness Center

*आरोग्य सल्लागार*
सौ. सोनाली राहुल रणपिसे
मो.9284395050
श्री.राहुल बबनराव रणपिसे
मो.9270265949

*जागतिक आरोग्य सल्लागार*
श्री.अर्जुन सुसे सर
मो.7447225237
कु.सपना अर्जुन सुसे
मो.8788648277

*ऑफिस*
राहुल डिजिटल झेरॉक्स
बोरावके कॉलेज जवळ, श्रीरामपूर
मो.9270265949,8830963434



रयत शिक्षण संस्थेचे



# राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ PU/AN/A.S.C.034 (1989) । नॅक मानांकन 'ए' ग्रेड । आयएसओ मानांकित : ९००१ : २०१५

AISHE CODE : C - 41306 | Email : prinrkmm_anr@rediffmail.com | website : www.rkmmanr.org | Ph : 0241-2430318

**कनिष्ठ महाविद्यालय** ११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान

**पदवी** बी.ए. : मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र । बी.कॉम : कॉस्टिंग, मार्केटिंग मॅनेजर ।
बी.एस्सी : वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित । बी.बी.ए. (सी.ए.)

**पदव्युत्तर पदवी** एम.ए. : मराठी, हिंदी, इंग्रजी । एम.कॉम. : कॉस्टिंग । एम.एस्सी : ऑरगॅनिक केमिस्ट्री । अनॅलिटीकल केमिस्ट्री

**पीएच.डी. संशोधन केंद्र : केमिस्ट्री** / **रोजगाराभिमुख - स्किल बेस्ड् २६ शॉर्ट टर्म कोर्सेस** य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक अभ्यासकेंद्र

## • महाविद्यालयाची वैशिष्ट्ये •

- कला, वाणिज्य व विज्ञानशाखेतील पदवी व पदव्युत्तर
- शिक्षणाची केवळ विद्यार्थिनींसाठीची सुविधा असलेले
- अहमदनगर जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय.
- उच्च शैक्षणिक गुणवत्ताधारक व अनुभवी अध्यापक वर्ग
- पर्यावरणपूरक परिसरात मध्यवर्ती ठिकाणी सुसज्ज इमारत
- सुविधायुक्त जिमखाना व भव्य क्रीडांगण
- स्पर्धा परीक्षा व बँकींग परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- उद्योजकता विकास केंद्र व प्लेसमेंट सेल
- हेल्थ सेंटर । उपहार गृह । समुपदेशन केंद्र
- गरीब व होतकरू विद्यार्थिनींसाठी कमवा व शिका योजना
- उत्कृष्ट निकालाची परंपरा
- समृद्ध व संगणकीकृत ग्रंथालय
- सक्षम माजी विद्यार्थी संघटना
- राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम
- मुलींसाठी तीन वसतीगृहे
- वुमेन्स मिलिटरी ॲकॅडमी
- अभ्यासिकेची सुविधा
- डिजिटल क्लासरूम
- सुसज्ज प्रयोगशाळा
- वनस्पती उद्यान




**मा.आमदार आशुतोषदादा काळे**
चेअरमन, सी.डी.सी. समिती

**डॉ.माधव सरोदे**
प्र. प्राचार्य

स ह जा नं द । १७६



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" – कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे



# सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा

कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र आणि व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम कनिष्ठ व वरिष्ठ

स्थापना: १९५४, नॅक मानांकन 'अ+' श्रेणी (CGPA 3.63) ISO 2009-2015

स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालय

दूरध्वनी: प्राचार्य : (०२१६४) २७१३४६ (कार्यालय) २७१७९४ (निवास)

Email: sgmkarad@yahoo.com | sgm156.cl@unishivaji.ac.in | College Website : sgm.edu.in

## महाविद्यालयाची वैशिष्टये

- इ. ११ वी आर्टस्, कॉमर्स, सायन्स, व्यवसाय शिक्षण ते बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. सी. ए., बी. सी. एस., बी. एस्सी. बायोटेक (एन्टायर), बी. कॉम., आय. टी. (एन्टायर), एम. ए.- इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, व मानसशास्त्र. एम. कॉम. ॲडव्हान्स अकौंटन्सी., एम. कॉम. आय. टी. एम. एस्सी.- झूलॉजी, फिजिक्स, ऑर्गेनिक केमिस्ट्री, ॲनॅटिकल केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स, भूगोल, मॅथेमॅटिक्स, इंडस्ट्रियल मायक्रोबायोलॉजी, स्टॅटिस्टिक्स आणि एम. फिल- मराठी, झूलॉजी, बॉटनी, पीएच. डी.- झूलॉजी, बॉटनी, केमिस्ट्री तसेच हॉटेल मॅनेजमेंट पर्यंतच्या शिक्षणाची सुविधा.
- उच्च विद्याविभूषित व तज्ज्ञ प्राध्यापक
- भव्य क्रिडासंकुल, क्रिडांगण व प्रशस्त सुशोभित परिसर
- विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता सुसज्ज वसतिगृहे
- एन. सी. सी. (मुले व मुली)
- उज्वल यशाची परंपरा
- समृद्ध ग्रंथालय, रिडींग रुम, इंटरनेट व संगणक विभाग
- स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र
- विविध सेल्फ फायनान्सिंग कोर्सेस
- इ. १२ वी करिता सद्गुरु पॅटर्न, टॅलेंट बॅच, सीईटी मार्गदर्शन व क्रॅश कोर्सची सुविधा.




**डॉ. मोहन राजमाने**
प्राचार्य
सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

रयत शिक्षण संस्थेचे

# रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर



जि. अहमदनगर ४१३७०९ फोन: 02422- 222347

NAAC Aceredited 3rd Cycle 'A+' Grade (CGPA3.44) | ISO-9001-2015

Email ID: rbnbcollege@gmail.com | Web Site: www.rbnbcollege

## महाविद्यालयाची वैशिष्टये

- नॅक मानांकन 'A+' दर्जा प्राप्त महाविद्यालय
- पुणे विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार
- रयत शिक्षण संस्थेचा आदर्श कॉलेज 'कर्मवीर' पुरस्कार
- रयत शिक्षण संस्थेचा 'रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील' पुरस्कार
- मराठी, अर्थशास्त्र रसायनशास्त्र व वनस्पती शास्त्र विषयांचे संशोधन केंद्र
- उत्कृष्ट निकालाची परंपरा
- अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग
- बारावी विज्ञान परीक्षेचे खास मार्गदर्शन
- अत्याधुनिक संगणकविभाग व सुसज्ज प्रयोगशाळा
- अत्याधुनिक साधनांनी युक्त जिमखाना व भव्य क्रीडांगण
- समृद्ध ग्रंथालय व बुक बँकेची सोय
- सॉफ्ट स्किल प्रोग्रॅमची सुविधा
- प्रत्येक विषयांतर्गत शॉर्ट टर्म कोर्सेस
- माती व पाणी परीक्षण केंद्र व गांडुळ खत निर्मिती प्रकल्प
- सर्व सोयींनी युक्त विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृह
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- सैनिक व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र
- एम.बी.ए. (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक)

## उपलब्ध अभ्यासक्रम

| | |
|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय: | अकरावी व बारावी कला, विज्ञान व व्यवसाय अभ्यासक्रम |
| वरिष्ठ महाविद्यालय कला शाखा: | पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रम मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भुगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र |
| वरिष्ठ महाविद्यालय संगणकशास्त्र शाखा: | पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रम: संगणक विज्ञान |

| | |
|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखा : | पदवी अभ्यासक्रम: रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पती शास्त्र, प्राणीशास्त्र, गणित, संख्याशास्त्र |
| पद्व्युत्तर अभ्यासक्रम: | रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र |
| पीएच. डी. संशोधन केंद्र: | मराठी, अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र |



**मा. मीनाताई जगधने**
सदस्या
मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा

**डॉ. नानासाहेब गायकवाड**
प्राचार्य
रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर